स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या
पोथ्या व पुस्तके
वाचून आलेले

# ईश्वरभक्तीचे
# अनुभव- भाग २

संकलक
ॐ वनिता ॐ

☯ **ॐ वनिता बुक्स**

☯ **पुष्प : बावीसावे**

प्रथमावृत्ती : २०२३

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

☯ **मूल्य : रु.** २०० /-

☯ **प्रकाशक**
ॐ वनिता बुक्स
बी २१३,
सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),
डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई ४०० ०१२.
दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.
www.omvanitabooks.com

# अनुक्रमणिका


- ॐ वनिता ॐ ........................................ ६
- अस्मिता मनोज शेंडे .................................. ३०
- ज्योतिषी राणी बापट .................................. ४९
- रक्षी राहूनी चराचरी .................................. ५६
- निखिता ह्षीकेश कुशारे ............................... ५७
- मारुती ............................................. ५९
- दत्त राहे सर्वत्र ...................................... ६०
- दुष्टशक्तींचा नाश ..................................... ६४
- श्रीदत्त जय दत्त ....................................... ६४
- माधवी प्रभाकर वाळुंजकर ............................. ६६
- अस्मिता शेंबेकर ...................................... ६९
- तनय शेंबेकर ......................................... ७०
- तुषार रसाळ .......................................... ७४
- भैरवी ............................................... ७७
- भूतदया श्वानप्रेम ...................................... ७९
- फरिश्ता .............................................. ८५
- गुरुप्रसाद सोलापूरकर ................................. ९४
- शिवाजी जगन्नाथ काशीद ............................... ९६
- किरण रमेशचंद्र तळगांवकर ............................ ९८
- किरण पेडणेकर ..................................... १०२
- किशोर गुराम ....................................... १०७
- पी.एस.पाटील ....................................... ११४
- मनिषा देसाई ....................................... ११५
- मनिषाच्या आई ...................................... १२०
- मंजिरी ओक ......................................... १२२

- पायल ............................................ १२५
- प्रज्ञा पाटील.......................................... १२९
- प्रथमेश पावसकर..................................... १३२
- प्रतिक चौगुले....................................... १३४
- शिल्पा चौगुले ...................................... १३८
- राधिका आळशी ..................................... १४१
- सुभाष पेडणेकर ..................................... १४५
- सुनिता जाधव ....................................... १५४
- सुनिता सांडीम ...................................... १५६
- तुषार दगडु जमदाडे ................................. १६४
- वैदेही केरकर........................................ १६८
- वैशाली विशाल सांडीम .............................. १७५
- योगेश पेडणेकर ..................................... १८१
- रमेश............................................... १८४
- अश्विनी जोशी....................................... १८५
- मनाली गणपत दळवी ................................ १८७
- देव भावाचा भुकेला.................................. १८९
- सद्भक्तांचे अनुभव .................................. १९०

# ईश्वरभक्तीचे अनुभव-भाग २

## प्रस्तावना

ईश्वरभक्तीचे अनुभव हे पुस्तक २०१० साली प्रथम प्रकाशित झाले. श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तकांच्या वाचनाने लाखो लोकांना अत्यंत दिव्य अनुभव आले. त्यांच्या लाखो पत्रांमधून काही निवडक अनुभव आम्ही पुस्तक रुपात प्रकाशित केले. आत्तापर्यंत ईश्वरभक्तीचे अनुभव- भाग १, या पुस्तकाच्या पन्नास हजाराहून अधिक कॉपीज लोकांपर्यंत पोहोचल्या आहेत. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या** १० हजार कॉपीज फक्त दीड महिन्यात संपतात व आम्हाला परत छापाव्या लागतात. आत्तापर्यंत, २० लाख लोक, **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचत आहेत. त्याच्या आत्तापर्यंत तेहतीस आवृत्या काढून झाल्या.

**श्री स्वामी समर्थ सप्तशती, श्री दुर्गा सप्तशती, श्री दुर्गा त्रिशती, श्री दत्तलीलामृत श्री सिद्धलीलामृत, परमानंद लहरी, श्री दत्त गीता,** या पोथ्यांचेही लोकांना दिव्य अनुभव येत आहेत.

लोकांच्या पत्रांचे, ईमेल्सचे, व्हॉट्सअपचे वर्षाव आमच्यावर होतच आहेत. काही अत्यंत दिव्य अनुभव निवडून भाग २ काढण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ईश्वरभक्तीचे अनुभव- भाग २ प्रकाशित करत आहोत.

मनोज-अस्मिता (न्यू यार्क U.S.A.) व मेघल (कॅनडा) यांनी प्रेमळ आग्रह केला की, दीदी सुरुवातीची काही पाने तुमची स्वत:ची असावीत. त्यांच्या आग्रहामुळे काही अनुभव पुढे देत आहे.

**ॐ वनिता ॐ**

# ॐ वनिता ॐ

श्रीस्वामीजींची ओळख होऊन जवळजवळ ४० वर्षे झाली. पूर्वी ते अरण्यात रहात होते. आता ते एकान्तात राहतात. गेल्या पाच वर्षांपासून मौन धारण केलेले आहे. कोणालाही भेटत नाहीत. त्यांनी लिहिलेल्या पोथ्या-पुस्तकांच्या वाचनाने लाखो लोकांचे कल्याण झालेले आहे.

त्यांनी आश्रमात यावे, लोकांना दर्शन द्यावे अशी विनंती जेव्हा मी त्यांना केली तेव्हा ते म्हणाले, ''मी फक्त माध्यम आहे, कार्य करणारा, लोककल्याण करणारा ईश्वर आहे. त्याचे कार्य तो करत आहे. मला एकान्तात राहून ध्यान करणे जास्त आवडते व लोकांचे कल्याण होते, भले होते, हे ऐकून आनंद होतो.''

कुठलाही आडपडदा न ठेवता बोलणे हे त्यांचे वैशिष्ट्य. एकदा ते म्हणाले...

''आध्यात्मात प्रगती करणे सोपे आहे, पण विद्वान लोक सोप्या आध्यात्माला खूप कठीण करून सांगतात!''

''आपल्याला आवडणाऱ्या देवतेच्या स्तोत्राचे पाठ करावेत. ४० हजार पाठ झाले की त्या देवतेची कृपा होते. देवता सात्त्विक असावी. तामसी शक्तीची साधना कधीही करू नये. देवतेचे नामस्मरण करावे परंतु बीजमंत्राची साधना करू नये. त्याने खूप अडथळे निर्माण होतात.

नामस्मरण, स्तोत्रपठण, जप या सर्व साधनेला सगुण भक्ती किंवा सगुण साधना म्हणतात!''

''एखाद्या व्यक्तीला सगुण साधना करायची नसेल तर त्याने आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करावे. श्वास घेताना सोऽ व सोडताना हम् असा सोऽहम्

ध्वनि निर्माण होतो. त्या ध्वनिवर लक्ष केंद्रित करावे. याला निराकाराची साधना किंवा लययोग असे म्हणतात!

मंत्राच्या व बीजमंत्रांच्या साधना करून शक्ती प्राप्त होते, चमत्कार करता येतात, पण मृत्युनंतर अंध:कारमय लोकात शेकडो वर्षे काढावी लागतात, म्हणून शक्यतो तंत्रमार्गाने साधना करू नये.

सद्गुणांचा गुणाकार व दुर्गुणांचा भागाकार करणे जमले की आध्यात्मात प्रगती होते,'' हे श्रीस्वामीजींच्या उपदेशाचे सार आहे.

सात्त्विक मार्गाने साधना करणाऱ्या लोकांना ईश्वराची कृपा प्राप्त होते व ईश्वराची कृपा प्राप्त झाल्यावर मन सोऽहम् भावात आपोआप रममाण होते.

संसारातील सर्व कर्तव्य करत असतानाही साक्षी भावाने राहणे जमू लागते. कारण मन अंतर्मनातील ईश्वरात मग्न होऊन गेलेले असते व साधक आपल्या मूळ स्वभावानुसार वागत राहतो.

**आधी होता संत संग । तुका झाला पांडुरंग ।**
**त्याचे भजन राहीना । मूळ स्वभाव जाईना ।।**
**मुक्ती वरील भक्ती जाण । अखंड मुखी नारायण ।।**

जीवनातील सर्व व्यवहार करताना मनात काय चालले आहे यावर लक्ष ठेवावे. हळूहळू लक्षात येते की मनात काहीतरी भलतेच सुरू आहे. काही दिवस फक्त मनात काय चाललय हे पहाण्यात तासन्तास घालवावेत म्हणजे शरीराने घरातील अथवा बाहेरील कामे करावीत, ड्रायव्हींग करावे, खरेदी करावी किंवा एखाद्या मित्राबरोबर वाद घालावेत, हे सर्व करतांना लक्ष मनावर ठेवावे, इतके लक्ष ठेवावे की, या सर्व गोष्टींपासून 'मी' पूर्णपणे अलिप्त आहे, असे वाटले पाहिजे.

श्रीस्वामीजी मला म्हणाले–

‘‘मी अगदी लहानपणी मुलांबरोबर विटी–दांडू, लगोरी खेळत असे. त्याच वेळी, वडील देवघरात पूजा करत असतांना, पंचरत्नगीता, भगवद्गीता वाचायचे, माझे लक्ष तिकडे असायचे व नंतर मी त्यावर प्रश्न विचारत असे.

दर सोमवारी रात्री वडील शिवलीलामृताचा अकरावा अध्याय वाचायचे, आम्ही त्यावेळी काही इतर उद्योग करत असायचो तरीही माझे कान तिकडे असायचे, हळूहळू मला अकरावा अध्याय तोंडपाठ झाला.’’

श्रीस्वामीजींनी त्यांचा बालपणीचा दिनक्रम मला सांगितला, त्यावरून अभ्यास हेच प्रगतीचे कारण, हे लक्षात येते.

श्रीस्वामीजी म्हणाले...

अंथरुणावर जाग आली की प्रथम मनाकडे लक्ष टाकायचे व त्याला एखादे स्तोत्र म्हणायला लावायचे. आंघोळ करून चहा पिणे होईपर्यंत गणपतीस्तोत्र, नवग्रह स्तोत्र, मारुती स्तोत्र, रामरक्षा अशी स्तोत्र पूर्ण होत. नंतर ड्युटीवर जायचे. चार किलोमीटर चालत जाईपर्यंत व्यंकटेश स्तोत्र, शिवलीलामृताचा अकरावा अध्याय अशी मोठी स्तोत्र म्हणून पूर्ण व्हायची व ड्युटी करताना नामस्मरण सतत चालू रहायचे.

सांगण्याचे तात्पर्य–

**ओले मूळ भेदी । खडकाचे अंग ।।**
**अभ्यासासी सांग । कार्य सिद्धी ।।१।।**

अशा प्रकारे अभ्यास करून मनावर ताबा मिळवावा लागतो व मग श्वासाच्या साधना करणे, योगमार्गात प्रगती करणे हे शक्य होते.

ईश्वरभक्तीचे अनुभव खूप आहेत पण अनुभव सांगून फक्त मनोरंजन करण्या ऐवजी अनुभव येण्यासाठी काय करावे लागते हे समजावण्याचा प्रयत्न केला आहे.

**राम म्हणे ग्रासोग्रासी ।**
**तो नर जेविला उपवासी ।।१।।**
**राम म्हणे भोगी त्यागी ।**
**कर्म न लिंपे तया अंगी ।।२।।**
**राम म्हणे करिता धंदा ।**
**सुख समाधि त्या सदा ।।३।।**
**ऐसा राम जपे नित्य ।**
**तुका म्हणे जीवन्मुक्त ।।४।।**

एकनाथ महाराज म्हणतात :-

**दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।**
**हारपले मन झाले उन्मन ।।**
**मी-तू पणाची झाली बोळवण ।**
**एका जनार्दनी श्रीदत्त जाण ।।१।।**

दत्त दत्त असे अखंड ध्यान केले, म्हणजे 'मी' पण हरपते, मनाचे 'मनपण' नष्ट होते व ते उन्मन होते. माझ्यातील 'मी पण' व 'तू पण' हे दोन्ही भाव नष्ट होतात, व मग एकनाथ-जनार्दन-श्रीदत्त हे सारे एक होऊन जातात.

अशा प्रकारे मनाच्या सरळपणा पासून सुरू होऊन सद्‌गुणांचे संवर्धन करत मनाचे उन्मन झाले की भक्तीमार्ग संपतो व देव-भक्त एक होतात.

**भक्त म्हणजे विभक्त नव्हे ।**

**आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे ।।**

**हे अवघेची जाणणे ।**

**विलक्षण ।।१।।**

असे समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे.

भक्तीमार्ग येथे संपतो व योगमार्गाची सुरुवात होते. म्हणून थोडी त्याचीही माहिती घेऊ. समर्थ रामदासांनी म्हटले आहे की,

**आकाश मार्गीचे गुप्तपंथ ।**

**जाणिती ते योगीये समर्थ ।।**

**इतरांसी हा गुह्यार्थ ।**

**सहसा न कळे ।।१।।**

## योगमार्ग

योगमार्गाची सुरुवात मनावर ताबा मिळविण्यापासून सुरू होते. प्रथम नाद, बिन्दू, कला यांचा अभ्यास करावा लागतो.

## नाद

सोऽहम् वर अनेक वर्षे तासन्तास लक्ष केंद्रित केल्यावर उजव्या कानामध्ये एक विशिष्ट प्रकारचा ध्वनि निर्माण होतो. हा ध्वनि फक्त उजव्या कानात ऐकू येतो. खूप वेळा हा ध्वनि वेगवेगळ्या प्रकारे ऐकू येतो. हे

देवतांचे ध्वनि असतात. देव लोकातून हे ध्वनि ऐकू येतात. या नादावर मन एकाग्र करावे. नादात स्वत:ला विसरता आले पाहिजे. असे घडू लागले की पुढची स्टेज प्राप्त होते.

## बिन्दू

नंतर ध्यानामध्ये किंवा उघड्या डोळ्यांना टरक्काईज ब्लू रंग किंवा बिन्दू दिसू लागतो. या बिन्दूचा भेद करण्याची क्रिया करावी लागते. येथे अनेक सिद्धांचे दर्शन होते. देवतांकडून मार्गदर्शन मिळते.

**हरी हरांच्या मूर्ती ।**
**बिंदुल्यात येती–जाती ।।**

असे संत तुकारामांनी म्हटले आहे.

## कला

कला म्हणजे ज्योति! दिव्य प्रकाश! जो चिदाकाशातून सर्व ब्रह्मांडात पसरत असतो. या ज्योतीचा साक्षात्कार होतो. चिदाकाश दिसू लागते. हळूहळू चिदाकाशात विलीन होण्यासाठी साधना कराव्या लागतात. अनेक वर्षांच्या साधनेनंतर साधक चिदाकाशात विलीन होतो. पुढे अक्षरब्रह्माचा प्रांत सुरू होतो. येथे साधकाला मंत्रमहेश्वर अवस्था प्राप्त होते.

## अक्षरब्रह्म

शून्याच्या थोडं साईडच्या प्रांतामध्ये अक्षरब्रह्म असून येथे तुम्ही बोलाल तो शब्द मंत्र होतो. म्हणजे साधकाला कोट्यावधी मंत्रांचे ज्ञान होते, ते मंत्र सिद्धही होतात, पण येथे अडकण्याची शक्यता भरपूर असते. अठरा प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. साधक बोलेल ते खरे होऊ लागते. म्हणून हा प्रांत डेंजर असतो. खरे साधक अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करतात व पुढे मार्गक्रमण करत राहतात.

यानंतर शून्य महाशून्याचे प्रांत सुरू होतात. साधक आकाशमय होऊ लागतो, शून्य होऊ लागतो.

## निरक्षरब्रह्म किंवा महाशून्य

अक्षरब्रह्मरूपी महामायेच्या विळख्यातून सुटका झाल्यास शून्यात प्रवेश होतो. नंतर महाशून्यात विलीन झाल्यावर योग्याला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्राप्त होते. येथे योगमार्गाचा प्रवास संपतो. या मार्गामध्ये असंख्य फाटेही असतात. यात साधक फसण्याची शक्यता असते. पण समर्थ सद्गुरु व निष्ठावान अखंड कष्ट करणारा साधक असेल तर खूप काही गोष्टी प्राप्त होतात.

आध्यात्मिक प्रगती व्हावी या उद्देशाने साधना करणाऱ्या साधकांना या लेखातील मार्गदर्शनाचा थोडा जरी उपयोग झाला तरी मला कृतार्थ झाल्यासारखे वाटेल. आध्यात्मिक प्रगती का होत नाही? असा अनेकांचा प्रश्न असतो. याचे उत्तर 'प्रारब्ध'!

प्रारब्ध पूर्ण शुद्ध झाल्याशिवाय, आत्मा शुद्ध होत नाही व आत्मा शुद्ध झाल्याशिवाय **आत्मसुख** प्राप्त होत नाही. यासाठी घाई न करता, **चरैवेती करत रहा,** एक ना एक दिवस मुक्कामावर नक्कीच पोहोचू.

**सांडोनिया आत्मसुख ।**
**सामर्थ्य वांछिती ते मूर्ख ।।**

## बहिर्मन – अंतर्मन

माणसाला दोन मने असतात.

१. बहिर्मन    २. अंतर्मन

## बहिर्मन

बहिर्मन चंचल असते. आत्म्याला लाखो जन्म घ्यायला लावते. पशु, पक्षी, प्राणी, वनस्पती, वृक्ष, मनुष्य अशा विविध योनींमध्ये आत्मा भटकत राहतो.

मनुष्ययोनी हे सुटकेचे प्रवेशद्वार असते. परंतु बहिर्मन अनेक चांगले-वाईट उद्योग करायला लावते. व्यापारी, शिक्षक, प्रोफेसर, मजूर, कलाकार, जादूगार, गुन्हेगार, पोलीस अशी विविध रुपे घ्यायला लावते. मुक्तीच्या मार्गाने कधी जाऊ देत नाही व सदैव 'मी'-'मी' म्हणणाऱ्याला, 'मी' म्हणजे 'देह' असे वाटत रहाते याचे कारण हे बहिर्मन!

हे मन स्व-स्वरुपाची आठवणही होऊ देत नाही, आत्मज्ञान होऊ देत नाही. जन्म मृत्युच्या चक्रात लाखो वर्षे निघून जातात. हे चक्र काही थांबत नाही.

स्वतःच्या देहात आयुष्यभर 'मी'-'मी' म्हणणारा मनुष्य कधीच समजू शकत नाही की हाडा-मांसाचा देह म्हणजे 'मी' नव्हे, देह फक्त **वाहन** आहे. या वाहनात बसून प्रवास केल्याने ईश्वरप्राप्ती होणे शक्य आहे. कमीत कमी ईश्वरप्राप्तीसाठी परत मनुष्य जन्म मिळावा म्हणून आतापासून प्रयत्न करणे, पुण्यकर्म करणे आवश्यक आहे.

## अंतर्मन

अंतर्मन ईश्वराप्रमाणे विश्वव्यापी असते, सर्वज्ञ असते. अंतर्मन महाकारण देहात असते. अंतर्मनात प्रवेश मिळविणे ही गोष्ट असाध्य असते.

अंतर्मनात प्रवेश मिळविण्यासाठी दररोज रिकाम्यापोटी (empty stomach) एक तास दीर्घ श्वसन करणे आवश्यक असते.

प्रथम अर्धा तास दीर्घ श्वसन करावे. सकाळी अर्धा तास, संध्याकाळी अर्धा तास हळूहळू वेळ वाढवित जावे.

अनेक वर्षे ही साधना केल्यावर अंतर्मनाच्या कप्प्यामध्ये प्रवेश प्राप्त होतो. काही योगी दिवसातून तीन तास अंतर्मनात राहतात व इतरवेळी आपल्या प्रारब्धानुसार वर्तन करतात. येथेच मुक्तीचा मार्ग सापडतो.

## GOD

या संपूर्ण विश्वाचा ईश्वर एक आहे. आपण सर्व एकाच ईश्वराची सेवा, भक्ती, प्रार्थना करत असतो.

**हिंदू** म्हणतात ईश्वर, सत्त्व, रज, तम, किंवा उत्पत्ती, स्थिति, लय या त्रिगुणात प्रकट होतो. याला त्रिमूर्ति असेही म्हणतात.

**ख्रिश्चन** म्हणतात तो GOD म्हणजे:

G- Generator

O- Organiser

D- Destroyer

अशा तीन रुपात प्रकट होतो.

अशी श्रद्धा मानवाच्या मनात विकसित झाल्यानंतर आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारू लागतात. आपण योगमार्गाकडे वळू लागतो. इथे आपल्याला काही नवीन शोध लागतात. त्रैमूर्ति किंवा त्रिनिटी आपल्यातच सामावलेल्या आहेत किंवा ज्याप्रमाणे ५०० मैल दूर आकाशात असलेल्या सॅटेलाईटद्वारा आपण आपल्याकडील T.V वरील ५०० चॅनल्स पाहू शकतो, त्याप्रमाणे आपल्या देहातील कोट्यावधी केंद्रे जागृत केली असता, आपण ईश्वरापर्यंत पोहोचू शकतो, याचे ज्ञान होते. हळूहळू हेही लक्षात येते की, तळव्यापासून नाभीपर्यंतच्या भागामध्ये तामस (Dark) शक्तींची केंद्रे आहेत. ओटीपोट

नाभीपासून गळ्यापर्यंत रजो (Pink) शक्तींची केंद्रे आहेत व गळ्यापासून वरच्या भागामध्ये सत्त्व (Pure White Divine) शक्तींची केंद्रे आहेत.

**तामस शक्ती**– राक्षसी शक्ती, evil powers, spirits, genie, magical powers, mesmerism, चमत्कार करणाऱ्या शक्ती, यांना तामसी शक्ती असे म्हटले जाते. या शक्ती माणसाला, साधकाला ईश्वरापासून दूर नेतात.

**राजस शक्ती**– या प्रांतामध्ये देवता, अर्धदेवता, यक्ष, योग मार्गातील साधक, good spirits, भक्ती मार्गातील आत्मे येतात. हे सर्व प्रकाशमान असतात. मानवांच्या इच्छा पूर्ण करणारे असतात. तरीही यांच्या प्रसन्नतेने साधक तेथेच अडकतो त्यामुळे ईश्वरापर्यंत पोहोचण्यात गतिरोध निर्माण करतो.

**सात्त्विक देवता**– या प्रांतामध्ये अतिशय प्रकाशमान, तेजोमय देवता असतात. या मानवांना ज्ञान, सद्‌गुण, परमशांती, परमानंद देतात व ईश्वराशी एकरूप करून टाकतात. येथे साधक ईश्वरमय होतो.

## मनसः मन आलोक्यम्

## मनाने मनाला पहावे

मनावर लक्ष ठेवण्याची सवय लावावी, अगदी सकाळी उठल्याबरोबर मनात काय चाललय हे पहावे. जे काही चालले असेल तिकडे फक्त पहात राहायचे, त्याला अडवण्याचा किंवा रोखण्याचा, थांबवण्याचा प्रयत्न मुळीच करू नये. असे सहा महिने करावे.

तुमच्या लक्षात येईल की, पूर्वी मनांत आले की आपण त्याप्रमाणे धावत जाऊन करत होतो. उदा. मनात आले की लगेच फोन करून एखाद्याला

काही माहिती देत होतो किंवा ओरडत होतो किंवा तारीफ करत होतो. मनाचा हा उतावळेपणा आता थोडा कमी झाला आहे. रागही कमी झाला आहे. अशा प्रकारे खाताना, पिताना, चालताना, ड्रायव्हींग करताना, सिनेमा पहाताना, ड्युटी करताना, प्रत्येक गोष्ट करताना मनावर सतत लक्ष ठेवल्याने मनाचा उतावळेपणा कमी होत आहे, असे लक्षात येईल.

मनात सदैव विचारांचे वादळ सुरू असते पण मनावर लक्ष ठेवण्याची सवय झाली की वादळ हळूहळू शांत होत आहे असा अनुभव येईल. मनातील विचारांचे वादळ शांत होऊ लागल्यावर मनाला एक प्रकारची शांती व आनंद प्राप्त होत आहे असा अनुभव येऊ लागेल. मनामागून धावणे कमी झाले आहे असा अनुभव येईल.

मनाचा स्वभाव एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारणाऱ्या पक्ष्यासारखा किंवा हट्टी मुलासारखा आणि डॉमिनेटींग स्वभावाच्या मुली सारखा असतो. म्हणून यावर सतत लक्ष ठेवावे लागते व पिंजऱ्यातील पोपटाला आपण शिकवतो त्याप्रमाणे मनाला शिकवावे लागते.

मनाचा आणखीही एक गुण आहे. ते एखाद्याच्या प्रेमात पडले की, सारखे त्याचेच चिंतन करत बसते, त्याला सोऽहम्चे व्यसन लावावे. सात-आठ तास जर सोऽहम् केले तर मग मन कितीही सांगितले तरी तुमचे ऐकत नाही. ते खाताना, पिताना, चालताना, वाचताना, सिनेमा पाहताना, ऑफिस, अथवा कारखान्यात काम करताना सारखे सोऽहम् करीत राहते. मग आपली अवस्था:-

**ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे जीवन्मुक्त ।।**

अशी होते. हळूहळू सोऽहम्च्या पलीकडे कसे जायचे हे शिकावे लागते. हे शिकल्यावर शून्यात प्रवेश होतो.

याच अवस्थेचे वर्णन संत जनाबाईने–

**सोऽहम् शब्दे मारा केला । विठ्ठल काकुळती आला ।।**

असे केले आहे.

तुम्ही सर्वकाही करतांना सोऽहम् भावात राहिलात तरी याचा अर्थ असा नव्हे की, मन तुमच्या ताब्यात आले!

बरोबर ध्यानाच्या वेळी, ते तुमच्या मनात अत्यंत सात्त्विक विचार निर्माण करून तुम्हाला खाली खेचायचा प्रयत्न करते. इथेही सावध राहून शून्यात विलीन होण्याचा प्रयत्न करावा. एकदा शून्यात विलीन झालो की आपण **स्वयंभू** होतो, **चैतन्य** होतो, **ईश्वरस्वरूप** होतो तरीही प्रवास चालूच ठेवावा.

सोऽहम् किंवा ईश्वर चिंतनाची सवय लावावी लागते. सुरुवातीला शरीर व मनाला हट्टाने बसवावे. २ मिनिटे कपालभाती प्राणायाम करावा व ५० वेळा अनुलोम–विलोम प्राणायाम करावा. Abdominal breathing करावे, एवढे करताच मन एकाग्र होऊ लागेल. नंतर जितका वेळ जमेल तितका वेळ सोऽहम् करावे. हळूहळू वेळ वाढवावा.

काही काळ अशी साधना केल्यावर सोऽहम् मोजण्यास आरंभ करावा. काही दिवस ५०० वेळा सोऽहम् म्हणावे– म्हणजे श्वास घेताना सोऽ व सोडताना हम् असे म्हणून मनातल्या मनात आकडे मोजावेत. सुरुवात ५०० पासून करावी. अशी साधना किमान वर्षभर करावी नंतर हे आकडे ३००० पर्यंत मोजावेत नंतर आकडे मोजावयाची आवश्यकताच पडणार नाही. मन सोऽहम् भावात रंगून जाऊ लागेल. मन सोऽहम् भावात रंगून जाऊ लागले की एकेक चक्रावर ध्यान करावे. रोज ३ तास एकाच चक्रावर सोऽहम् ध्यान केल्यास दीड वर्षात ते चक्र जागृत होते. काही योगी चक्रावर ध्यान न

करताच सरळ ब्रह्मरंध्रावर ध्यान करतात किंवा आज्ञा चक्रातून सहस्त्रार चक्राकडे प्राणाला नेण्याचा प्रयत्न करतात.

सकाळी सहा वाजता, दुपारी बारा वाजता, संध्याकाळी सहा वाजता, पंधरा मिनिटे ध्यान करावे. या काळात दोन्ही नाकपुड्यांमधून श्वास वाहतो व देहामध्ये अग्नितत्त्व जागृत होते. श्वास सरळ कुंडलिनीला धक्के देत असतो. हीच स्थिती रात्री बारा वाजता पण असते पण त्यावेळी ९९% साधक झोपलेले असतात.

सोऽहम् साधनेमध्ये निष्णात झाल्यानंतर सोऽहम् असे म्हणण्याची आवश्यकता उरत नाही. योगतारावली ग्रंथात सांगितल्याप्रमाणे फक्त ध्वनिवर लक्ष केंद्रित करायचे. हा ध्वनि म्हणजेच ॐ. तो स्पष्टपणे ऐकू येऊ लागतो. या ध्वनिलाच ॐ म्हणतात. हा ध्वनि उजव्या कानांत ऐकू येतो, तिकडे लक्ष ठेवायचे. हळूहळू या नादामध्ये मनाचा लय होऊ लागतो.

लयावस्थेचा भरपूर आनंद घेऊन झाल्यानंतर काही साधक विज्ञान भैरव पद्धतिमार्गे साधना करतात तर काही साधक लय झालेल्या मनाला जगाचे व्यवहार करतांना लय कसा साधायचा ते शिकवतात. यासाठी काही गूढ साधना कराव्या लागतात. योग्य वेळ आली की, आवश्यक ते मार्गदर्शन करणारे गुरु भेटतात व पुढील मार्ग दाखवतात. शून्य, महाशून्य, परमशून्य अशा तिनही शून्याचे प्रांत पार करून पुढे कसे जायचे व सहजावस्थेत कसे रहायचे हे शिकवले जाते.

दीप रत्नाकर ग्रंथात, कल्पना करणे सोडून द्या, तुम्ही परब्रह्म व्हाल असे म्हटले आहे. पण कल्पना करणे कसे सोडावे किंवा मन निर्विचार कसे करावे, हे सांगितलेले नाही.

सोऽहम् साधनेने मन निर्विचार होते व हळूहळू निर्विकल्पसुद्धा होते. इतकेच नव्हे तर सहज समाधी अवस्थाही प्राप्त होते.

या सर्व गोष्टी प्राप्त झाल्यावर प्रवास थांबतो का?

तर याचे उत्तर, 'नाही' असे द्यावे लागेल. प्रवास थांबत नाही. सोऽहम् हे मानसिक उच्चारण थांबते व अंतरंगामध्ये जो ध्वनि ऐकू येतो त्याकडे लक्ष केंद्रित करावे लागते.

हा प्रवास चालू असताना, लोकोद्धार करण्याचे कार्य काही साधकांना दिले जाते. ही ईश्वरी आज्ञा असते. या आज्ञेचे पालन करावेच लागते. न ऐकल्यास शिक्षा होतात. लोकोद्धाराचे कार्य करताना खूप चांगले-वाईट अनुभव येतात. या अनुभवांनी साधक परिपक्व होतो.

या सर्व गोष्टींना अनुलक्षून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

**तू मन हे मीचि करी ।**
**माझीया भजनी प्रेम धरी ।।**
**सर्वत्र नमस्कारी ।**
**मज एकाते ।। १।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

अर्जुना, तू मनाने ईश्वरमय झालास व तुला सर्वत्र चैतन्यरूप दिसू लागले, तरी माझे भजन प्रेमाने करावे लागेल म्हणजे लोकोद्धार कार्य करावे लागेल.

हे सर्व वाचून वाचकांना असे वाटेल की, परमार्थ खूप सोपा आहे. अगदी खरं आहे! परमार्थ सोपा आहे. ईश्वरप्राप्ती कोणालाही होऊ शकेल. तरीही कोट्यावधी लोकांमध्ये एखाद्यालाच ईश्वरप्राप्ती होते. असे का?

या ईश्वरप्राप्तीच्या किंवा आध्यात्मिक प्रगतीच्या आड कोण येते?

याचे उत्तरही सोपं आहे!

आपणच आपल्या आध्यात्मिक प्रगतीच्या आड येत असतो.

आपल्यातील सात्त्विक, राजस, तामस अशा विविध प्रवृत्ती, दोष दुर्गुण, आपल्या प्रगतीच्या आड येत असतात. या प्रवृत्तींना ओळखून त्यांना दूर करावे लागते. सर्व प्रवृत्ती दूर झाल्यावर निवृत्ती ही अवस्था प्राप्त होते. ज्ञानाचा उदय होतो व साधक ईश्वरप्राप्तीचा, मुक्तीचा सोपान (शिडी किंवा जिना) चढू लागतो.

सर्वसाधारणपणे आपला श्वास बारा अंगुले म्हणजे सुमारे ९ इंच वाहत असतो. जसजसे मन एकाग्र होऊ लागते तसतसा श्वासाचा बाहेरच्या दिशेने होणारा प्रवाह कमी कमी होत जातो व आतल्या दिशेने प्रवाह वाढू लागतो. यासाठी सोऽहम्‌ची सवय लागल्यानंतर श्वास आतल्या बाजूला कुठे जात आहे इकडे लक्ष द्यावे. हळूहळू लक्षात येते की, कधी श्वास ब्रह्मरंध्राकडे जात आहे तर कधी मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, इत्यादि चक्रांकडे जात आहे. अशा प्रकारे लक्ष देण्याचे दोन फायदे होतात:–

१. मनाला भटकायला साधन मिळते.

२. आपली साधनेतील एकाग्रता वाढते.

## एकाग्रतेचा अभ्यास

सोऽहम् साधना करत असताना एक नोटबुक डोक्यावर ठेवावे व त्या नोटबुककडे डोळे मिटून मनाने पहावे.

एक–दोन महिने असे केल्यावर लहान आकाराची नोटबुक किंवा पॅड ठेवावे व तिकडे लक्ष ठेवावे. एक–दोन महिने असे केल्यावर, ब्रह्मरंध्राच्या जागी एखादी छोटी वस्तू किंवा त्रिकोणी पिरॅमिड ठेवावा किंवा बोटातील अंगठी ठेवावी व डोळे मिटून मनाने पहात रहावे. याने तृतीय नेत्र जागृत

होण्यास मदत मिळते. एवढी साधना पूर्ण होण्यास सुमारे एक वर्ष एवढा काळ लागतो. नंतर डोळे मिटून भ्रूमध्यावर लक्ष केंद्रित करावे.

अशा प्रकारे मनाला अंजारत-गोंजारत साधना वाढवावी व शेवटी भ्रूमध्य, ब्रह्मरंध्र, सहस्त्रार अशा ठिकाणी लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करावा. सर्वसाधारणपणे ३ लाख सोऽहम् केले असता मन एकाग्र होऊ लागते व साडेतीन कोटी सोऽहम् केले असता आत्मसाक्षात्कार होतो. परंतु, प्रारब्ध खराब असेल तर खूप अडथळे येतात. प्रारब्धाने योग्य प्रकारे साथ दिली तर ईश्वरीकृपेचा अनुभव येतो. चिदाकाशात प्रवेश प्राप्त होतो.

आपल्याच सूक्ष्म देहातील गुप्तकेंद्रांचे, शक्ती स्थानांचे व देवता मार्गाचे ज्ञान होते.

## शक्तीत्रय (तीन शक्ती)

सोऽहम् साधनेत प्रगती झाली की, विविध प्रकारच्या शक्ती प्राप्त होतात. परंतु या शक्तींकडे दुर्लक्ष करणे किंबहुना या शक्तींना विसरणे आवश्यक असते. नाहीतर या शक्ती साधकाला भरकटवत नेतात. सर्वात शेवटी, **इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती** या तीन शक्ती प्राप्त होतात, यांनाच शक्तीत्रय म्हटले जाते. या शक्तींकडे दुर्लक्ष केल्यास या तिन्ही शक्ती एकजीव किंवा एकरुप होतात व एक नवीन शक्ती निर्माण होते. तिला **आल्हादिनी शक्ती** असे म्हणतात. ही शक्ती प्राप्त झाल्यावर एक प्रकारचा कैफ चढतो. हा कैफ किंवा धुंद अवस्थाही पचविता आली पाहिजे. ही धुंदावस्था पचविल्यानंतर **सहजावस्था** प्राप्त होते. असा योगी चमत्कार करत नाही पण त्याच्या भक्तांच्या जीवनात चमत्कार घडतात किंवा त्यांचे जीवन चमत्कारमय, ईश्वरकृपामय होऊन जाते.

## क्रिया

निष्ठेने सोऽहम् साधना करीत राहिले असता प्रथम हंस स्टेज प्राप्त होते. हंस स्टेजमध्ये साधकाला शुद्ध स्पंदने व अशुद्ध स्पंदने यांचे ज्ञान होते.

कुठल्या जागेतील स्पंदने शुद्ध आहेत कुठल्या जागेतील स्पंदने अशुद्ध आहेत हे कळू लागते. हळूहळू वस्तूतील स्पंदने कळू लागतात, माणसातील स्पंदने कळू लागतात. हळूहळू या सर्व गोष्टी पचविण्याची सवय करावी लागते. अशा प्रकारे साधना करत राहिले असता, श्रेष्ठ आत्मे, ऋषी-मुनी, सिद्ध-महासिद्ध यांची दर्शने होऊ लागतात. त्यांच्याकडून मार्गदर्शन होत राहते. देव-देवता दर्शन देतात, दुसऱ्यांचे प्रारब्ध बदलण्याची शक्ती प्राप्त होते. आपल्यातील व दुसऱ्यातील सद्प्रवृत्ती-असद्प्रवृत्ती ओळखता येऊ लागतात व चुकीच्या प्रवृत्तींना काढून टाकता येऊ लागते. आपल्यातील सद्गुणांचा विकास करता येऊ लागतो. अंगी चातुर्यही बाणू लागते. बुद्धीचा विकास होतो. साधनेत आणखी प्रगती झाल्यावर परमहंस स्टेज प्राप्त होते. या स्टेजमध्ये परमानंद, परमशांती व परमात्म्याशी तादात्म्यता प्राप्त होते.

**सुवर्ण मणी सोनिया । ये कल्लोळ पाणीया ।।**
**तैसा मज धनंजया । शरण ये तू ।।**

**।। ज्ञानेश्वरी ।।**

लौकिक अर्थ- अर्जुना ! मुशी भट्टीमध्ये सोने उकळत असते, त्यात एखादा सोन्याचा अलंकार टाकला की तो सुद्धा सोनेच होतो, तसा तू मला शरण ये !

आध्यात्मिक अर्थ- सोऽहम् ध्यानात अशा प्रकारे मग्न हो की तूही हवे (Air) प्रमाणे सूक्ष्म व चराचरात व्यापून राहिलेला परमात्मा होशील!

परमहंस स्टेज प्राप्त झाल्यानंतर अशी अवस्था प्राप्त होते. साधक परमात्मा स्वरूप होतो.

**तैसे संकल्पोनि काढिले ।**

**जयाचे मनचि चैतन्य जाहले ।**

**तेणें एकदेशिये परि व्यापिले ।**

**लोकत्रय ।।**

सोऽहम् ध्यानाने मन व प्राण (श्वास) एक होतात. हळूहळू एक झालेले प्राण व मन, चैतन्य किंवा कॉस्मिक एनर्जी होतात. अशा प्रकारे ज्या योग्याने स्वत:चे मन चैतन्य केलेले आहे, असा योगी, शरीराने कुठेतरी एका जागी बसलेला असला किंवा चालत-बोलत व्यवहार करत असला तरी त्याने स्वर्ग, मृत्यू, पाताळ, व्यापलेले असते. थोडक्यात तो विश्वव्यापी असतो.

## दैवीशक्ती

आध्यात्मात प्रगती का होत नाही? या प्रश्नाचे उत्तर या अध्यायात देण्याचा प्रयत्न थोडा पुनरुक्तीचा दोष पत्करून करीत आहे.

पायवाटेने सुमारे सात डोंगर चढून आम्ही श्रीस्वामीजींच्या अरण्यातील आश्रमात जात असू. आश्रम म्हणजे तीन-चार झोपड्या होत्या.

जंगलातून पायवाटेने जायचे असल्याने माझ्या बरोबर नेहमी डॉ.मेघल, डॉ. अल्पा, शैला मसुरकर या मैत्रिणींपैकी कोणीतरी असायचेच.

शैला मसुरकर बरोबर प्रथम गेले तेव्हा श्रीस्वामीजी शैलाला म्हणाले तुझ्या मागे काही अदृश्यसृष्टीतील शक्ती आहेत. तू या परिसरात कोठेही फिरु शकतेस पण धुनीच्या झोपडीत जाऊ नकोस!

शैलाची कुरकुर सुरू झाली, मलाच का बंधने? मीच काय पाप केले? वगैरे कुरकुर ती करू लागली.

श्रीस्वामीजींनी तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, पण तिची समजूत काही पटेना!

दुसऱ्या दिवशी मी सकाळी आठ-साडेआठला धुनीत पूजा करण्यासाठी गेले. शैला नकळत माझ्या मागून मला काहीतरी देण्यासाठी आली.

ती झोपडीच्या दारात येताच किंचाळून बेशुद्ध पडली. मी पटकन मागे वळून पाहिले, इतर सेवक पण धावत आले. श्रीस्वामीजींना कळवले. त्यांनी पाणी मंत्रून दिले. ते पाणी तिच्या चेहेऱ्यावर मारताच शैला शुद्धीवर आली. तिला चहा वगैरे देऊन ती नॉर्मल झाल्यावर श्रीस्वामीजी तिला म्हणाले, ''बघ शैला मला याचा अंदाज कालच आला होता म्हणून मी तुला सावध केले होते.''

श्रीस्वामीजी जेव्हा अरण्यात रहावयास गेले तेव्हा त्यांच्याकडे फक्त दोन लंगोट व एक टॉवेल एवढीच संपत्ती होती. ते जेथे रहात तेथून ४-५ किलोमीटर वर ५-६ झोपड्यांचे खेडेगाव होते. त्या लोकांनी झोपडी बांधून दिली होती.

त्या गावातील एक ४५ वर्षांची स्त्री आपल्या दोन वर्षांच्या मुलीला कडेवर घेऊन श्रीस्वामीजींकडे येत असे व श्रीस्वामीजींना सुमारे दोन कप दूध देत असे. या दोन वर्षांच्या मुलीचे नांव निर्मला. या मुलीचे वैशिष्ट्य म्हणजे श्रीस्वामीजींच्या समोर आल्याबरोबर आईच्या कडेवर असतांनाच ही मुलगी मान टाकत असे म्हणजे तिला आईच्या कडेवरच गाढ झोप लागत असे.

झोपडीसमोर छोटासा मांडव होता, या मांडवातच तिला झोपलेल्या अवस्थेत ठेवून तिची आई केर कचरा काढतांना म्हणे- ''घरात सारखी हट्ट

करत बसते, 'आई मला बाबांकडे घेऊन चल' व इथे श्रीस्वामीजींना पाहिले की लगेच झोपते.''

अशी ही निर्मला, हिला सतत समाधी लागत असे व देवतांची दर्शने होत असत. हळूहळू मोठी झाली. पण ती कधीही श्रीस्वामीजींच्या समोर जात नसे, खूप दूर राहून सेवा व इतर कामे करत असे. कधीकधी इतर सेवकांबरोबर आश्रमात रहात असे.

एकदा मी तिला विचारले, तू श्रीस्वामीजींना नमस्कार का करत नाहीस? ती म्हणाली, ''तेज सहन होत नाही.'' (ती खूप दुरुन नमस्कार करत असे.)

एकदा मी व शैला आश्रमात गेलो होतो. संध्याकाळी सात साडेसातची वेळ होती. कंदीलाच्या प्रकाशात मी व श्रीस्वामीजी गप्पा मारत बसलो. दुसऱ्या झोपडीत शैला व इतर सेवक बसले होते.

रात्री आठ-सव्वाआठ वाजता शैला आली व म्हणाली निर्मला खूप रडते आहे. ''काय झाले?'' मी विचारले.

शैला म्हणाली, ''आम्ही सर्वांनी तिला विचारले काय होतय? पण ती उत्तर देत नाही. खूप वेळ हा प्रकार सुरू आहे. शेवटी मला रहावले नाही म्हणून मी तुम्हाला सांगायला आले!''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''तिला इकडे घेऊन ये!'' श्रीस्वामीजींनी मला सतरंजी अंथरण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्रीस्वामीजींपासून सहा-सात फूट दूर अंतरावर सतरंजी अंथरली.

शैला निर्मलाला घेऊन आली. श्रीस्वामीजींनी विचारले. काय झाले? निर्मला म्हणाली, ''माझ्या डोक्यामध्ये हजारो लाखो ज्योति पेटलेल्या आहेत. मला सहन होत नाही.''

श्रीस्वामीजी म्हणाले त्या सतरंजीवर झोप, बरे वाटेल!

निर्मला सतरंजीवर झोपली. एका सेकंदात तिला प्रचंड गाढ झोप लागली.

श्रीस्वामीजी मला म्हणाले, ''तिच्या देहातून तेजाचे प्रचंड प्रवाह वाहत आहेत. तिला काय करावे कळत नव्हते. तिची कुन्डलिनी जन्मत: जागृत आहे.''

उंबरठ्यावर बसलेल्या शैलाकडे पाहून अचानक श्रीस्वामीजी म्हणाले, ''याला दैवीशक्ती म्हणतात. ही सहन करण्यासाठी प्रचंड तयारीचे शरीर असावे लागते. तयारी असल्याशिवाय दैवीशक्ती किंवा दैवी अनुभव प्राप्त व्हावा अशी अपेक्षा करणे म्हणजे दहा वॅटच्या बल्बने माझ्यात १००० वॅट का येत नाहीत असे म्हणण्यासारखे आहे.

तू सदैव कुरकुर करत असतेस आता मी सांगतो तसे कर पण घाई नको!

मी सांगेन तेवढेच कर!

निर्मलाच्या देहातून प्रचंड शक्तीचे प्रवाह वाहत आहेत. तू तुझ्या उजव्या हाताचे एक बोट अगदी अलगद स्पर्श झाला न झाला अशा प्रकारे निर्मलाच्या तळव्याला लाव! अगदी अलगद सांभाळून. बोटाने दाबू नकोस!''

श्रीस्वामीजींच्या सांगण्याप्रमाणे शैलाने अगदी अलगद आपल्या उजव्या हाताचे बोट निर्मलाच्या तळव्याला लावले.

तात्काळ शैलाच्या हार्टमध्ये कळ मारल्या सारखे झाले, ती बेशुद्ध झाली.

श्रीस्वामीजींनी लगेच मंत्र म्हणून पाणी मारून शैलाला शुद्धीवर आणले, व म्हणाले, ''पूर्ण चराचरांत ईश्वरीशक्ती भरुन राहिली आहे, ती प्राप्त होण्यासाठी आपण तयारी करायची असते.''

थोड्या वेळाने निर्मला उठली. त्यावेळी ती फक्त १२ वर्षांची होती. तिला खूप लाज वाटली. मान खाली घालून ती झोपडी बाहेर निघून गेली.

कालान्तराने निर्मलाची खूप प्रगती झाली. ती देवतांशी संभाषण करू लागली. एक दिवस श्रीस्वामीजी तिला म्हणाले, ''निर्मला तू आता वयात आली आहेस. देवता दर्शन, संभाषण, समाधी या सर्व गोष्टी आता बंद करत आहे. तू आता संसारिक गोष्टींकडे लक्ष दे!''

आध्यात्मात कणभर प्रगती व्हावी म्हणून जग धडपडत असते, **येथे तर गंगा उलटी वाहत होती!**

हा अध्याय लिहिण्याचे तात्पर्य, आध्यात्मात प्रगती का होत नाही? किंवा दैवी अनुभव का येत नाहीत? म्हणून कुरकुर करू नये किंवा निराश होऊ नये. आपली योग्यता वाढवत रहावी अनुभव आपोआप येतीलच, न आल्यास **आपले प्रारब्ध अजून शुद्ध झाले नाही असे समजावे.**

ज्या निर्मलाची गोष्ट वर लिहिली आहे तिचे वय आता ५० च्या आसपास असेल. गेल्या ३० वर्षात आमचा संपर्क नाही. पण जन्माला आल्यापासून तिने कधीही हॉटेलमधील चहा प्याला नाही. हॉटेल किंवा बाहेरील खाद्यपदार्थ विकत घेऊन खाल्ले नाहीत. **'जमेल का असे एखादे छोटेसे व्रत!'**

## दत्त–वचन

४० वर्षांपूर्वी श्रीस्वामीजींनी मला सांगितले तुम्ही माझे लिखाण प्रसिद्ध करायचे पण जाहिरातबाजी करायची नाही. No Publicity.

''हे ईश्वरी कार्य आहे. त्याचे कार्य तो करणार आहे. आपण फक्त निमित्त व्हायचे!''

तुमच्या मागे दुर्गादेवी आहे. ती दुर्गादेवी कोणाला उद्धाराच्या मार्गाने न्यायचे व कोणाला त्याच्या कर्मानुसार न्यायचे हे ठरवेल. आपण फक्त पहात रहायचे. ईश्वर अनेकांना उद्धाराची संधी देणार आहे, आपण लोकांना प्रेम व आनंद द्यायचा.

त्यांच्या शब्दाचा मान राखून कुठलीही पब्लिसिटी न करता पुस्तके प्रकाशित केली, आज २० लाख घरांमध्ये पोथ्या, पुस्तके वाचली जात आहेत.

हे लिहित असतांनाच एक अनुभव, ज्योतिषी राणी बापटने कळविला. माझ्या वरच्या लिखाणाला तो अनुरुप असल्याने पुढे देत आहे.

राणीकडे एका मुलीची पत्रिका आली. प्रश्न होता, वय वाढत जात आहे, लग्न जुळत नाही. राणीने पत्रिका पाहिली. पत्रिकेत लग्नाचे योग नव्हते. राणीला प्रश्न पडला, ''मुलीला सांगणार काय?'' तिने ईश्वराची प्रार्थना करून उत्तर दिले. दुर्गा त्रिशती दररोज वाच, तीन महिन्यांनी फोन कर!

त्या मुलीचा फोन दीड महिन्यात आला, लग्न जुळले!

अनुभव सांगून राणी म्हणाली, गेल्या तीन चार वर्षात लोकांचे असे खूप अनुभव ऐकले. माझा स्वत:चा अनुभव तुम्हाला सांगते. चांगल्या पगाराची नोकरी आहे, चांगले सेव्हींग आहे, खूप तीर्थयात्रा केली आहे, कसलीही चिंता नाही. पण...

श्रीस्वामीजींच्या पोथ्या नित्यनेमाने वाचायला सुरुवात केल्यापासून हृदयातून आनंदाचे फवारे उडू लागले. हा आनंद अनेक देशांच्या प्रवासानेही

लाभला नाही. ताई, मी ४० देश फिरलेली आहे, पण खरा आनंद या पोथ्यांच्या वाचनाने मिळाला.

**तीर्थी धोंडा पाणी ।**

**देव रोकडा सज्जनी ।।**

तुकारामांनी हे ४०० वर्षांपूर्वीच सांगितले आहे.

ईश्वर लोकांना आनंद देऊन सुखी करून मुक्तीमार्गाकडे नेत आहे हेच खरे!

**ॐ वनिता ॐ**

# अस्मिता मनोज शेंडे

श्रीस्वामीजी आणि सौ. दीदी (सौ. वनिता दीक्षित यांना मी, दीदी किंवा ताई या दोन्ही नावाने हाक मारते), यांच्या मार्गदर्शनानुसार मी साधना करत असते. श्रीस्वामीजींची पुस्तकेही माझ्या नित्य वाचनात असतात. त्या दोघांच्या कृपेने मला अनेक दिव्य अनुभव आले. त्यापैकी काही निवडक अनुभव मी खाली देत आहे.

## ध्यानाचे अनुभव

एक दिवस मी ध्यान करत असतांना मला श्री साईबाबांचे दर्शन झाले. मी त्यांना नमस्कार केला. श्री साईबाबांचे हे तिसऱ्यांदा दर्शन झाले होते. मी लहान असतांना दोनदा शिर्डीला गेले, दोन्ही वेळेला मला खूप त्रास झाला. माझी तब्येत सुधारण्यास बरेच दिवस लागले. त्यामुळे श्री साईबाबांचे दर्शन झाले की मला खूप आश्चर्य वाटायचे. माझ्या मनात असे विचार चालू असतांना श्री साईबाबा मला म्हणाले, ''मी व स्वामीजी खूप चांगले मित्र आहोत म्हणून मी तुला दर्शन देत असतो. अगदी लहानपणापासून माझं तुझ्याकडे लक्ष आहे. तू शिर्डीला दोनदा येऊन गेलीस पण तुझ्या बरोबरची माणसे योग्य नव्हती, त्यामुळे तुझी तब्येत बिघडली व तुला त्रास झाला.'' माझ्या मनात अनेक वर्षांपासून घोळत असलेल्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले. मी त्यांना मनापासून नमस्कार केला व ते अदृश्य झाले.

एक दिवस ध्यान करतांना मला माझ्या नाभीपासून छातीच्या भागामध्ये सौ. दीदी ध्यानस्थ बसलेल्या दिसल्या व त्यांच्या मागे एक देवी (लक्ष्मी) उभी दिसली. ती देवी माझ्या कपाळापर्यंत उंच होती. हे लक्ष्मीचं रूप आपण

जसं फोटोत बघतो तसं होतं. फरक इतकाच की ती लक्ष्मी black n white दिसली. मी दोन्ही देवींना मनोभावे नमस्कार केला.

मी दोन प्रकारे ध्यान करते, कधी बसून ध्यान करते तर कधी शवासनामध्ये (झोपून) ध्यान करते. अशा प्रकारे ध्यान करतांना मला वेगवेगळे अनुभव येतात. कधी कधी फक्त शांती-आनंदाचा अनुभव येतो तर कधी देहाच्या बाहेर पडून इकडे-तिकडे आपण फिरतोय असा अनुभव येतो. देहाच्या बाहेर पडल्यानंतर माझा देह मी पहाते, मनोज काय करतोय हेही पहाते तर कधी आसपासचा परिसर दिसतो.

मार्च २०२० मध्ये एकदा ध्यान करतांना, मी देहाच्या बाहेर पडले व दुसऱ्या सेकंदाला मी आश्रमामध्ये औदुंबराच्या झाडाखाली पोहोचले. औदुंबराच्या झाडाखाली नृसिंहस्वामी सरस्वती बसलेले होते. मी त्यांना नमस्कार केला. नृसिंहस्वामी सरस्वती संपूर्ण पारदर्शक व प्रकाशमय दिसत होते. त्यांच्या देहातून विविध रंगांचे तेजाचे किरण बाहेर पडून सर्वत्र पसरत होते. मी क्षणभर त्यांच्या समोर बसले तेव्हा माझ्या सूक्ष्मदेहामध्ये आनंदाच्या लहरी उठू लागल्या! येथे एक वैशिष्ट्य असे होते की मी एकाच वेळी चारही दिशांचे पाहू शकत होते.

मी औदुंबराखाली बसले होते, नृसिंहस्वामी सरस्वती यांच्याकडे पहात होते, आनंदाच्या लहरींचा अनुभव घेत होते. पण त्याच वेळी माझ्या मागे भिंतीच्या पलीकडे हॉलमध्ये ऋतुजा मुजुमदार काहीतरी करतेय असे मला दिसले. माझ्या मनांत विचार आला- 'कोरोना काळ सुरू आहे, सर्वजण आपापल्या घरात बंद आहेत, मग ही मुंबईची मुलगी इथे कशी आली?' या विचाराबरोबर माझे ध्यान भंग पावले. मी परत न्यूजर्सीमध्ये होते. उठून मी लगेच दीदींना, मुंबईला फोन केला. माझा अनुभव सांगितला व विचारले:- 'मला ऋतुजा का दिसली, ऋतुजा तर ठाण्यात (मुंबई) राहते?'

दीदी हसून म्हणाल्या:- ''अस्मिता तुला जे दिसले ते अगदी बरोबर आहे, ऋतुजा नागार्जुन सागरला गेलेली आहे. ती तिकडे गेली व लॉकडाऊन सुरू झाले म्हणून ती तिकडेच अडकली. जवळजवळ एक महिना झाला ती तिकडेच आहे. तुझे ध्यान एकदम रियलिस्टीक आहे. इथे कल्पनेचा, आभासाचा, स्वप्न स्थितीचा असा कुठलाही भाग नाही, तुझी प्रगती खूप छान होत आहे.'' दीदींचे हे उद्‌गार ऐकून मनाला खूप आनंद झाला.

## मराठी देवीसूक्त वाचनाचे अनुभव

मी बऱ्याच वर्षांपासून मराठीमध्ये देवीसूक्त वाचत आहे. या वाचनाचे मला खूप अनुभव आले आहेत. सगळे अनुभव जर सांगायचे झाले तर अनेक पानांचे एक पुस्तकच होईल. इथे अगदी महत्त्वाचे दोन-तीन अनुभव सांगते.

रोज देवीसूक्त वाचल्याशिवाय मी साधारणपणे दिवस सुरू करत नाही. देवीसूक्त वाचल्यामुळे त्या दिवशी येणाऱ्या अनेक अडचणी आपोआप सुटतात व दिवस चांगला जातो.

एक दिवस मला ऑफिसमध्ये खूप महत्त्वाची meeting व presentation होते व रात्री घरी यायला उशीर होणार होता. त्यामुळे मी सकाळी लवकर उठून देवीसूक्त वाचले व टीव्हीवर ट्रॅफिकचा आढावा घेऊन निघाले. मी ज्या highway वरून जात होते, तेथे अचानक एक accident झाला होता व ट्रॅफिक जॅम झाला होता. Accident झाल्यामुळे तेथे पोलीस आले होते. सगळा ट्रॅफिक परत चालू होईपर्यंत ३०-३५ मिनिटे गेली. महत्त्वाची meeting व presentation असल्यामुळे मी घरातून नेहेमीपेक्षा बरीच आधी निघाले होते, पण आता मात्र मला उशीर होणार होता. मला काळजी वाटू लागली. माझ्यावर असलेली जबाबदारी आता ऐनवेळेला कोण पार पाडणार? असे विचार मनांत येत होते. मी प्रार्थना करू लागले.

इतक्यात माझ्या बॉसचा फोन आला व मिटींग एक तास उशीरा चालू होणार आहे, असे त्याने सांगितले. माझी काळजी दूर झाली. एवढी सगळी गडबड होऊनसुद्धा मी meeting ला वेळेवर पोहोचले.

मनोज परदेशात काही महिन्यांसाठी गेला होता. मी नेहमीप्रमाणे ऑफिसला गेले. एक दिवस अचानक मला ऑफिसमधून ताबडतोब घरी जावेसे वाटू लागले. ऑफिसमध्ये busy असल्यामुळे मी त्या विचारांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पण कुठलीतरी दैवी शक्ती मला आत्ताच घरी चल, म्हणून फोर्स करत होती. शेवटी, दोन मिटींग्सच्यामध्ये मी घरी आले. दार उघडून पाहाते तर घरात सर्वत्र orange रंगाचा glow दिसला. माझ्या छातीत धस्स झाले. Purse तशीच टाकून मी वर धावले. बघते तर आमची fireplace चालू होती. जर मी वेळेवर घरी आले नसते तर खूप मोठा problem झाला असता, ज्याची मी कल्पनाही करू शकत नव्हते. ऑफिसला जाताना, fireplace आणि घरातले lights बंद आहेत की नाही हे मी नेहमी check करते, त्याप्रमाणे त्या दिवशीही करून गेले होते. परत fireplace कशी सुरू झाली, हे कळायला मार्ग नाही. नंतर मी electrician ला बोलावले. त्याने मला fireplace च्या switch चे connection loose आहे असे सांगितले आणि तो switch लगेच बदलून दिला. त्या दिवशी जर स्वामीजींनी आणि दीदींनी मला संकेत दिला नसता तर काय झालं असतं याची कल्पना वाचक करू शकतील.

या गोष्टी जरी छोट्या वाटल्या तरी रोजच्या जीवनात या अतिशय महत्त्वाच्या आहेत व देव आपली किती काळजी घेतो, हे यावरून कळून येते.

मला जवळपास एक ते दीड महिना नीट झोप लागत नव्हती. नक्की काय होत आहे मला कळत नव्हतं. कधी वाटायचं की आपण झोपलेलो

आहोत तर कधी वाटायचं की सगळा वेळ आपण जागे आहोत. असे एक दोन तास गेल्यानंतर मला चांगली झोप लागायची. एक दिवस मी असेच विचार करत पडले होते, तेवढ्यात मला देवीचे दर्शन झाले. मला देवी म्हणाली की तुझ्या डोळ्यांसमोर एवढं सगळं दिसत आहे आणि तुझ लक्ष मात्र इकडे–तिकडे आहे. जे काही डोळ्यांसमोर दिसत आहे तेथे तू नीट लक्ष दे. मी देवीला नमस्कार करून झोपले. दुसऱ्या दिवसापासून मी डोळे मिटून, माझा डोळ्यांसमोर काय दिसत आहे याकडे लक्ष वळवले. काही दिवसांनी माझ्या डोळ्यांसमोर एका पाठोपाठ एक असे अनेक सूर्योदय झाले, पूर्ण आकाश सोनेरी रंगाचे झाले. असे मला लागोपाठ दोन दिवस दिसले. त्यानंतर एक दिवस मला अनेक रंगीबेरंगी तारे दिसले व संपूर्ण आकाश त्या ताऱ्यांनी भरून गेले होते. काही दिवसांनंतर एके दिवशी, डोळ्यांसमोर वीजेसारखे अनेक प्रकारचे आकार दिसले. मला त्या आकाराचे अर्थ कळले नाहीत, तरी पण मी लक्ष देऊन बघत होते. तेवढ्यात मला देवीचे दर्शन झाले व देवी म्हणाली की, या आकारांचे अर्थ तुला आणखी काही दिवसांनी कळतील. या सगळ्या अनुभवांमध्ये मी पूर्णपणे जागी होते व नंतर मात्र मला चांगली झोप लागली.

सौ. दीदी या प्रत्यक्ष देवी आहेत यावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्या जेव्हा जेव्हा आमच्याकडे येतात, तेव्हा तेव्हा आम्हाला आवडणाऱ्या व्यक्तींवर त्यांची कृपा व्हावी असं आम्हाला वाटत असतं. अशीच एक ओळखीची व्यक्ती (माझ्या आईच्या वयाची एक स्त्री ) आमच्यापासून अर्ध्या तासावर राहते. त्या खूप देवभोळ्या आहेत. त्या एकट्या राहतात, त्यांच्याकडे गाडी नाही, त्यांना drive करता येत नाही व त्यांना वयानुसार phone ही सहज वापरता येत नाही. सौ. दीदींच्या एका न्यूजर्सी भेटीमध्ये त्यांना सौ. दीदींचं दर्शन झालं. अशीच एक दोन वर्ष निघून गेली. COVID pandemic सुरू

झाल्यानंतर सौ. दीदींनी तिची विचारपूस करत राहा असे मला सांगितले. त्यामुळे आम्हाला जसे जमेल तसे आम्ही त्यांना जाऊन भेटतो व शक्य तेवढी मदत करतो. प्रत्येक भेटीत माझी मदत स्विकारतांना त्या नको म्हणतात व मी त्यांना म्हणते, ही मदत तुमचा देव देतो आहे असे समजा. गणपतीच्या पहिल्या दिवशी त्यांच्याकडे जायला पाहिजे असे मला वाटू लागले. सकाळची कामे आटोपून आम्ही त्यांच्याकडे गेलो. मला बघताच त्या रडायला लागल्या. मी त्यांना थोडे समजावून रडण्याचे कारण विचारले. त्या मला म्हणाल्या की काल रात्री मी नैवेद्यासाठी चुर्मा लाडू केले. लाडू करतांना मला हे तुझ्यापर्यंत पोहोचावेत अशी खूप इच्छा झाली. सकाळी उठल्यानंतर मला तुझी परत आठवण झाली. मी आत्ताच देवळातून नैवेद्य दाखवून परत आले व तुझी doorbell वाजली. तुला बघून मला अत्यंत आनंद झाला व तू जी मला मदत करतेस ती फक्त देव करतो याच्यावर माझा विश्वास बसला. तुला माझ्याकडे काही काम असो किंवा नसो, तू माझ्याकडे महिन्यातून एकदा तरी येत जा, असे त्यांनी मला सांगितले.

मागची अनेक वर्षे, भारतात गेल्यावर मी सौ. दीदींच्या घरी राहते. आपण आपल्या मुलीची जशी काळजी घेतो तशीच काळजी सौ. दीदी माझी घेतात. माझी सर्व प्रकारे हौस पुरवतात. नेहमी नवीन कपडे, दागिने, नवीन पदार्थ; अशा अनेक गोष्टी देत असतात. एक दिवस स्वप्नामध्ये मी सौ. दीदींच्या घरी होते. सौ. दीदींनी देवीचे सर्व अलंकार घातले होते. नेहमीप्रमाणे त्या प्रसन्न दिसत होत्या. त्यांनी माझ्यासाठी एक नवीन लाल dress आणला होता. तो घालून त्यांनी मला देवीसमोर बसायला सांगितले. आणि त्या माझ्यासमोर बसल्या. त्यानंतर त्यांनी मला आधी कुंकू लावले व नंतर हाताच्या सगळ्या बोटांमध्ये सोन्याच्या अंगठ्या घातल्या व स्वतःच्या गळ्यातल्या अनेक सोन्याच्या माळांपैकी मूठभर माळा त्यांनी माझ्या गळ्यात

घातल्या. कपाळावर सोन्याची बिंदी लावली व म्हणाल्या आता आपण दोघी ध्यान करू. एवढे स्वप्न बघितल्यानंतर सकाळी उठायची वेळ झाल्यामुळे मी उठले. उठल्यानंतर लगेच ध्यान केले. ध्यानामध्ये मला हेच स्वप्न पूर्णतः परत अनुभवता आले व प्रत्यक्ष सौ. दीदी माझ्या जवळ आहेत याची जाणीव झाली. सौ. दीदींना नमस्कार करून मी माझ्या दिवसाची सुरुवात केली.

मी एक दिवस परमानंद लहरी पोथी वाचत होते. ही पोथी मी नेहमीच वाचत असते व मला अनेक अनुभव आले आहेत. येथे नवीन दोन अनुभव देत आहे.

१. मी एक दिवस पोथी वाचत असतांना, पोथीच्या पानांवर देवी प्रकट झाली. देवीने मला सांगितले की, तू असंच वाचत राहा, अनेक देवता तुला खूप शक्ती देतील.

२. एक दिवस मला देवीने सांगितले की, आपल्या स्वामीजींना या संपूर्ण सृष्टीतल्या सगळ्या गोष्टींची माहिती आहे. त्यांना माहीत नाही असं काहीही नाही. त्यांच्याजवळ किती अफाट ज्ञान आहे, हे पण मला सांगितले.

## संस्कृत देवीसूक्त वाचनाचे अनुभव

एक दिवस देवीसूक्ताचे पाठ करत असतांना देवी प्रकट झाली व देवीने मला सांगितले की, तुला श्री स्वामीजी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करतील आणि तू त्यांनी सांगितलेल्या साधना करत रहा. त्यामुळे तुझी पुढील आध्यात्मिक प्रगती होत राहील. हे ऐकल्यावर मी देवीला मनोभावे नमस्कार केला व पुढील पाठ संपवले.

एके दिवशी मला देवीने सांगितले की, तू आत्ता ज्या साधना करत आहेस त्या तू श्री स्वामीजींना सविस्तर सांग आणि ते तुला पुढच्या साधना सांगतील. मी देवीला नमस्कार केला व माझा हा अनुभव सौ. दीदींना

सांगितला. श्री स्वामीजी मौनात असल्यामुळे सौ. दीदींनी मला एक नवीन साधना सांगितली. श्री स्वामीजी आत्ता प्रवासात आहेत हे पण सांगितले. मला मिळालेल्या सूचनांप्रमाणे मी साधना करायला लागले. एक दोन दिवस साधना केल्यानंतर मला देवीने परत दर्शन दिले व सांगितले की तुला अजून माझा सगळा निरोप मिळालेला नाही. तेव्हा मी देवीला म्हणाले की, मी श्री स्वामीजींच्या पुढच्या निरोपाची वाट पाहीन. मी देवीला नमस्कार करून देवीसूक्त संपवले. इतर पूजा संपवून मी माझ्या फोनवरील मेसेज बघावेत म्हणून फोन चेक केला. मला आश्चर्य वाटले की मी पूजा करतांनाच मला सौ. दीदींचा निरोप होता व मला श्री स्वामीजींनी आणखीन एक साधना सांगितली होती. मी, श्री स्वामीजी, देवी व सौ. दीदी यांना मनोभावे नमस्कार करून अगदी दुसऱ्या दिवसापासून दोन्ही साधना सुरू केल्या.

या नवरात्रीमध्ये (ऑक्टोबर २०२०) मला सौ. दीदींच्या घरच्या देवीचे आणि आश्रमातल्या देवीचे photo द्वारे दर्शन झाले. पण सौ. दीदींचा photo मात्र बघता आला नाही. स्मिता नवरात्रात सौ. दीदींच्या दर्शनाला जाईल असा माझा अंदाज होता. नेरुळला गेल्यानंतर सौ. दीदींचा एक photo काढून पाठव अशी मी तिला विनंती करणार होते. पण आमचा रोजचा contact नसल्यामुळे मी एक दोन दिवसात message पाठवीन असं मनात ठरवलं. नवमीच्या दिवशी देवीसूक्ताचे पाठ करत असताना मला देवीने दर्शन दिले व म्हणाली स्मिता आत्ता सौ. दीदींच्या घरी आहे, तू तिला message पाठव व photo मागवून घे. मी लगेच स्मिताला message पाठवला व सौ. दीदींचा एक photo काढ आणि मला पाठव अशी विनंती केली. पाच मिनिटात स्मिताने मला message केला की तू अगदी वेळेवर मला सांगितलेस. मी आत्ता सौ. दीदींच्याच घरी आहे. मी तिला सांगितले की, मला देवीने सांगितले की, स्मिता नेरुळला आहे. म्हणून मी लगेच तुला

message पाठवला. तिने मला सौ. दीदींचे दोन photo पाठवले. स्मितामुळे मला नवरात्रात सौ. दीदींचे दर्शन झाले. आम्हा दोघींनापण या अनुभवाचे आश्चर्य वाटले.

श्री स्वामीजी व सौ. दीदी हे दोघंही माझ्याकडून साधना करून घेतात. या अनुभवांचे proper अर्थ मला माहीत नाहीत. परंतु अशा अनुभवांनंतर मनाला एक समाधान, आनंद, व शांती यांचा लाभ होतो एवढं मी नक्की सांगू शकते.

## २६-११-२०२०

रात्री मला एक स्वप्न पडले मी एका बिल्डिंगच्या चौथ्या मजल्यावर होते. बाल्कनीतून बाहेर पहात होते. विठ्ठल-रुक्मिणीच्या दोन अत्यंत सुंदर मूर्ती दिसत होत्या. मूर्ती सुमारे २०० फूट उंच होत्या. मूर्तींना अनेक प्रकारचे अलंकार घातलेले होते. दोन्ही मूर्ती एवढ्या विलोभनीय होत्या की नजर त्यांच्यावरून हटत नव्हती, सारखं पाहत रहावस वाटत होतं.

सकाळी उठले तेव्हा खूप आनंद होत होता प्रसन्न वाटत होतं. आज काय विशेष आहे असे विचार मनात आले, म्हणून कालनिर्णय कॅलेंडर पाहिले, तेथे लिहिलेले होते 'ता. २६ नोव्हेंबर २०२०, पंढरपूर यात्रा भागवत एकादशी.'

मला कार्तिक एकादशीच्या दिवशी विठ्ठल व रखुमाई दोघांनीही दर्शन दिले होते, मी त्यांची आठवण केली नव्हती. पण देवांनी माझी आठवण केली. हे फक्त गुरुकृपेनेच शक्य होत असते.

## ३०-११-२०

आज स्वप्नांत दीदी आल्या! त्यांनी माझी खूप तारीफ केली. माझे खूप कौतुक केले. म्हणाल्या, ''आध्यात्मिक प्रगती व्हावी म्हणून तू जे

प्रयत्न करतेस, तू जी धडपड करतेस ते पाहून मला खूप आनंद होतो. असेच प्रयत्न करत रहा!

आणखी काही गोष्टी सांगते, त्या लक्षात ठेव. आध्यात्मातील ज्या स्टेज प्राप्त करायला अनेक वर्षे लागतात, त्या स्टेज श्रीस्वामीजी आपल्याला काहीही न करता देत असतात. फक्त आपले मन स्वच्छ हवे अगदी काचेसारखे स्वच्छ किंवा स्फटिकासारखे स्वच्छ. या मनात सुईच्या टोकाएवढा जरी अहंकार असेल, स्वार्थ असेल किंवा श्रीस्वामीजींना इंप्रेस करण्याची प्रवृत्ती असेल तर प्रगती होणार नाही. एक साधी गोष्ट सांगते, सर्वसाधारणपणे मनुष्य नेहमी दुसऱ्याचे दोष पाहतो, त्याच्यावर टीका करतो, ही गोष्टसुद्धा प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण करते. कमीतकमी गुरुने ज्याचा हात धरला आहे, त्याला/तिला नावे ठेऊ नयेत. या छोट्याशा गोष्टीही आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गात खूप महत्त्वाच्या असतात.

माझ्याकडे पाहा मी काही फारशी साधना अथवा तपस्या केलेली नाही. तरीही त्यांनी मला देवतांनाही दुर्लभ अशी स्टेज दिली आहे. तुलाही अशी स्टेज प्राप्त होऊ शकते, फक्त मन पराकोटीचे शुद्ध व्हायला हवे व कुठल्याही प्रवृत्तीत अडकता कामा नये. अत्यंत सूक्ष्मसृष्टीतून त्यांचे आपल्याकडे लक्ष असते. ते आपल्या प्रवृत्ती तपासत असतात व बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत असतात. मनाचा सरळपणा त्यांना खूप आवडतो. मनाने सरळ रहा व खूप मोठी हो!'' माझे स्वप्न संपले. उठले तेव्हा अगदी आनंदी-आनंद वाटत होता. सर्वत्र आनंदाच्या लहरी वहात आहेत असे वाटत होते.

मला स्वप्नाविषयी दीदींबरोबर चर्चा करायची होती. म्हणून त्यांना फोन करण्याची इच्छा होती. परंतु आम्ही न्यूजर्सीत (अमेरिका) राहतो व दीदी मुंबईत राहतात. त्यांच्याकडे सकाळी आठ वाजतात तेव्हा आमच्याकडे रात्रीचे साडे दहा वाजलेले असतात. ही आमची झोपायची वेळ असते व

दीदींची सकाळची कामाची व खूप गडबडीची वेळ असते. म्हणून मी सहसा यावेळी फोन करत नाही. दीदी जेव्हा निवांत असतात, अशा वेळी म्हणजे शनिवारी किंवा रविवारी फोन करते.

मला स्वप्नातील गोष्टी नीट समजून घ्यायच्या होत्या. पण निवांत वेळ मिळत नव्हता, असे काही दिवस गेले.

मधल्या काळात एक छोटासा अनुभव आला तोही दिवसा:-

मनोज सकाळी दाढी करत होता. साईडच्या भिंतीवर-शंखाचा एक फोटो टांगलेला होता, तो आरश्यातून स्पष्टपणे दिसत होता. नेहमीच दिसतो, पण आज जेव्हा मनोज दाढी करत होता, तेव्हा त्या फोटोमध्ये श्रीस्वामीजींचा चेहरा दिसू लागला. मनोजने मागे वळून पाहिले तर फोटोत शंख दिसत होता व आरश्यात पाहिले तर श्रीस्वामीजींचा चेहरा दिसत होता. असे बऱ्याच वेळा झाले. त्याने ही गोष्ट मला सांगितली मी आरश्यात पाहिले मला मात्र शंखच दिसला. याचा अर्थ तो अनुभव फक्त मनोज पुरताच होता. माझ्यासाठी नव्हता. मी मनोजला म्हटले, ''स्वामीजींचे तुझ्याकडे नीट लक्ष आहे.'' असा याचा अर्थ आहे. असो...

दीदींना फोन करायची इच्छा होती पण वेळ मिळत नव्हता. शेवटी दीदींना फोन केला. स्वप्नातील सर्व मॅटर त्यांना सांगितली व थोडे अधिक मार्गदर्शन करण्याची प्रार्थना केली. त्याचप्रमाणे, मी दीदींना म्हटले, ''दीदी बऱ्याच वेळा तुम्ही माझ्या सूक्ष्मदेहात प्रकट होता व मार्गदर्शन करता, उपदेश करता ते स्वप्न नसते, ध्यानही नसते, तरीपण व्यावहारिक भाषेत त्याला ध्यान किंवा स्वप्न म्हणावे लागते. अशा प्रकारे जे ज्ञान प्राप्त होते ते मी लिहून ठेवते व स्वप्नेही लिहून ठेवली आहेत. आता थोडे अधिक खुलासेवार सांगा मी ते लिहून ठेवीन.''

दीदी म्हणाल्या:-

फक्त मनाचा सरळपणा, स्फटिकासारखे स्वच्छ मन, व अहंकार नसणे या गोष्टी आध्यात्मिक प्रगती व देवत्त्व प्राप्त करून देतात.

आणखी एक गोष्ट सांगते, लक्षात ठेव- समजा आपण नि:स्वार्थपणे, स्वच्छ मनाने, सरळपणाने, मोठ्या मनाने, प्रेमाने व आनंदाने सेवा करत असलो, परोपकारी बुद्धीने वागत असलो, तरी श्रीस्वामीजी खूप वेळा चिडतात किंवा रागावतात, तेही काहीही चूक नसतांना किंवा कारण नसतांना. त्यांच्या भयानक रागाचा मला ४० वर्षांचा अनुभव आहे, तू दूर अमेरिकेत राहातेस तुला याचा अनुभव नाही. पण या रागाचे रहस्य मी तुला सांगते, ते नीट लक्षात ठेव भविष्यकाळात याचा तुला उपयोग होऊ शकतो.

श्रीस्वामीजींचा स्वभाव प्रेम, दया व करुणा यांनी परिपूर्ण भरलेला आहे. तरीही ते रागावतात याला काही अर्थ आहेत. मी याचे अर्थ पुढील प्रमाणे काढलेत. तू ते लिहून ठेव.

१. साधना व तपस्या करणे, हे आपल्याला जमत नाही. आपल्याला धक्का देऊन पुढे ढकलण्यासाठी ते रागावतात किंवा आपल्याला वरच्या पायरीवर चढवतात.

२. आपल्या सूक्ष्मदेहाला (Astral body) शुद्ध करतात, कारणदेहातील (Causal Body) वाईट संस्कार नष्ट करतात.

३. आपल्यातील अहंकार कितपत जागा आहे, पूर्ण नष्ट झाला की नाही हे पाहतात. खूप वेळा असेही घडते:- भक्ताच्या स्वभावात जे दोष असतात, ते वातावरणातील देवतांना आवडत नाहीत. त्या देवता स्वामीजींना सांगतात याला सुधारा, नाहीतर आम्ही याच्या कर्माचे परिणाम याला भोगायला लावू.

अशावेळी भक्ताला सांभाळणे व देवतांची नाराजी सांभाळणे कठीण होते. अशावेळी श्रीस्वामीजी त्या भक्तावर रागावतात व देवतांना सांगतात मी रागावलोय आता तो सुधरेल, आपण संधी देऊ या! खूप वेळा असेही घडते की, देवतांच्या रोषापासून वाचविण्यासाठी भक्ताला दूर करतात. तरीही भक्त आपल्या स्वभावात सुधारणा करीत नाही. दूर केलेल्या भक्तावर श्रीस्वामीजींचे जास्त लक्ष असते. त्याची प्रगती ते सूक्ष्म सृष्टीतून पहात असतात. जर प्रगती झाली, मन स्वच्छ झाले, अहंकार कमी झाला, तर देवतांना विचारून त्याला परत बोलावले जाते.

आपण देवासमोर दिवा लावतो, त्याप्रमाणे भक्तीची ज्योत त्यांना दिसते, बऱ्याच माणसांमध्ये अगदी देवासाठी कोट्यावधी रुपये खर्च करणाऱ्यांमध्येही ही भक्तीची ज्योत नसते. श्रीस्वामीजी अशी ज्योत माणसांच्या हृदयात निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करतात. तू, ती ज्योत प्रत्यक्ष पाहिली आहेस. खूप माणसं खोटी स्वप्न, ध्यान दृश्य, खोटे अनुभव वर्णन करून सांगतात पण श्रीस्वामीजींना सत्याची जाणीव असते.

४. आपल्यात एखादी चुकीची प्रवृत्ती असते व चुकीच्या प्रवृत्तीचा तोरा आपण श्रीस्वामीजींच्या समोर किंवा सद्गुरु समोर मिरवीत असतो. ती प्रवृत्ती नष्ट व्हावी म्हणून ते चिडतात.

५. माझ्या असेही पाहण्यात आले आहे की, काही लोकांनी सेवा-भक्ती खूप केली पण सतत इतरांना नांवे ठेवणे, लोकांची, सद्भक्तांची निंदा करत रहाणे या प्रवृत्तींमुळे त्यांची आध्यात्मिक प्रगती झाली नाही व वातावरणातील देवता त्यांना अनेक प्रकारे त्रास देऊ लागल्या.

म्हणून शक्यतो कुणाची निंदा करू नये, किंवा कुणाचा आकस करू नये.

मी असे पाहिले आहे की, एका भक्तावर श्रीस्वामीजींचे खूप खूप प्रेम होते. त्याचेही श्रीस्वामीजींवर खूप प्रेम होते. पण त्याच्यात एक मोठा दोष होता, तो श्रीस्वामीजींच्या समोर अगदी नम्र असायचा पण थोडा दूर झाला की, अहंकाराने वागायचा. त्याच्यातील सर्वात वाईट प्रवृत्ती म्हणजे तो लहान मुलांना खूप त्रास द्यायचा! श्रीस्वामीजींना यातील काहीच माहीत नव्हते. अचानक वातावरणातील देवतांनी श्रीस्वामीजींना कठोर शब्दात या भक्ताला दूर करण्याची आज्ञा केली व श्रीस्वामीजींना त्याला दूर करणे भाग पडले. सांगायचे तात्पर्य आपण सद्गुणांची कास धरायला हवी, सद्गुण वाढवले की सद्गुरुंची कृपा होते.

६. सत्पुरुषांना एकाच वेळी दोन कामे करावी लागतात. भक्तांना सांभाळावे लागते व वातावरणातील लक्षावधी शक्तींना व देवतांना सांभाळावे लागते. हे काम खूप कठीण असते.

प्रत्येक माणसावर शेकडो शक्तींचा, गणांचा, अर्धदेवतांचा, देवतांचा प्रभाव असतो. या सर्वांना सांभाळून सद्गुरुंना किंवा सत्पुरुषाला काम करावे लागते व भक्त मात्र आपल्या अहंकारात मशगुल असतो.

७. भक्त कितीही दूर असला तरी त्याच्यात होणारे बदल त्यांना कळत असतात व त्यानुसार ते वागत असतात. म्हणून ते रागावले तर आपण समजायचे की ही सुद्धा कृपाच आहे. अशावेळी मन व्यथित झाले तर गोंदवलेकर महाराजांनी केलेली गुरुसेवा किंवा महायोगी मिलारेपा, महासिद्ध नरोपा यांनी केलेली गुरुसेवा आठवायची. स्वत: आनंदात रहायचे व इतरांना आनंद द्यायचा.

भारतामध्ये पहाटेचे साडेतीन वाजले होते, तरीही न कंटाळता दीदी मार्गदर्शन करीत होत्या. शेवटी मला अपराधी वाटू लागले व मी फोन ठेवला.

दीदी वर्षानुवर्षे सदैव निर्मळ, खळखळ वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे आनंदी का असतात, कशा राहू शकतात व सर्वांना कशा आनंद देऊ शकतात, हे एक रहस्य आहे! ते कळण्यासाठी खूप मोठी आध्यात्मिकता हवी हेच खरे!

श्रीस्वामीजींनी केलेल्या अभंगातील एक ओळ आठवली ती लिहून हे लेखन संपवते.

**स्वामी म्हणे संत । वर्तती ते कैसे ।**
**आपण व्हावे तैसे । तेव्हा कळे ।।१।।**

## नवीन अनुभव

सौ. दीदी नेहमीचं खूप busy असतात. मी जर त्यांना १० मिनिटं phone केला, तर त्या वेळेत त्यांना ३-४ calls येतात. मी त्यांना कधी कधी phone करते पण आम्हाला शांतीत बोलायला वेळ मिळत नाही.

एक दिवस अचानक सौ. दीदींनी मला phone केला. त्या दिवशी मला त्यांच्याकडून खूप चैतन्याचे vibes येऊ लागले. अगदी दोन-तीन मिनिटात त्या मला आध्यात्मातील अनेक गोष्टी सांगू लागल्या. मी लगेच पेन व पेपर घेऊन त्या लिहायला लागले. त्यांनी मला सगळ्यांशी प्रेमाने कसे वागावे, लहान मुलांची काळजी कशी घ्यायची, आपल्या सगळ्या जबाबदाऱ्या चांगल्या रीतीने कशा सांभाळायच्या, परोपकाराची एकही संधी कशी सोडायची नाही, कितीही problems आले तरी मन विचलित न करता कसं पुढे

जायचं, व्यवहार आणि आध्यात्म कसं balance करायचं; अशा अनेक गोष्टींचं मार्गदर्शन केलं. सौ. दीदी हे सगळं जवळपास एक ते दीड तास बोलत होत्या व मी ते लिहीत होते. शेवटी त्या म्हणाल्या, अस्मिता, तुझी प्रगती व्हावी म्हणून हे सगळं माझ्या मुखातून देवी सांगते असं मला वाटतं. आता मला उशीर होत आहे व आपण phone ठेवूया. सौ. दीदींनी मला ज्या गोष्टी सांगितल्या, त्याचं मला फार आश्चर्य वाटायला लागलं. मी विचार केला की यापैकी काही गोष्टींचा आणि माझा काहीही संबंध नाही. सौ. दीदींनी हे ज्ञान दिल्यानंतर १-२ आठवड्यात माझ्या व मनोजच्या आयुष्यात अचानक बदल घडले. बऱ्याच गोष्टी मनाविरुद्ध घडल्या, जबाबदाऱ्या वाढल्या. आश्चर्य म्हणजे, सौ. दीदींनी सांगितलेल्या, उपदेश केलेल्या गोष्टी वापरता येतील अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे, प्रत्येक परिस्थिती कशी सांभाळायची हे मला कळलं. जसं काही, एखाद्या शिक्षकाने परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची चांगली तयारी करून घेतली. त्यांच्यामुळेच सगळ्या परिस्थितीला मला व मनोजला आनंदाने सामोरे जाता आले. सौ. दीदी जे जे नेहमी सांगतात ते मी लिहून ठेवते व वारंवार वाचते. कारण, तो एक प्रकारचा अभ्यास आहे. हे लिहिताना मला एक जुना अनुभव आठवला तो पुढे देत आहे.

जेव्हा आपण परमानंद लहरी ही पोथी प्रकाशित केली, त्यानंतर काही दिवसांनी सौ. दीदी अमेरिकेत आल्या व त्यांनी मला नुकतीच प्रकाशित केलेली पोथी दिली. त्या रात्री, मला त्या पोथीवर ज्या देवीचा photo आहे त्याऐवजी सौ. दीदींचा photo दिसला. मी त्यांना नमस्कार केला. दुसऱ्या दिवशी सौ. दीदींनी मला त्या पोथीतल्या एका मंत्राचा जप करायला सांगितला. त्यांनी सांगितल्या प्रमाणे मी मंत्र जप सुरू केला. काही महिन्यानंतर मी भारतात गेले व श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठी आश्रमात गेले. श्रीस्वामीजींनी

माझ्यासाठी अगदी तोच मंत्र निवडला जो सौ. दीदींनी मला दिला होता. मला खूप आश्चर्य वाटले. मी जेव्हा श्रीस्वामीजींना हे सांगितले तेव्हा ते काही बोलले नाहीत. फक्त हसले. मला मात्र हे पूर्णपणे कळले की सौ. दीदी आणि श्रीस्वामीजी हे अगदी एकच आहेत.

सप्टेंबर २०२१ मध्ये सौ. दीदींनी मला काही साधना करायला सांगितल्या. साधना बऱ्यापैकी मोठी असल्यामुळे मी माझं office आणि social calendar बघून, सौ. दीदींना नमस्कार केला व साधना सुरू केली. एक आठवडा अगदी त्यांनी सांगितल्या प्रमाणे साधना झाली. दुसऱ्या आठवड्यात मात्र office मध्ये अचानक खूप काम आले. मी अगदी सकाळी ५ वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत फक्त office चं काम करत होते. पण, सुरू केलेली साधना खंडित होऊ नये म्हणून सौ. दीदींना नमस्कार करत साधना सुरू ठेवली. त्यांच्या कृपेमुळे सांगितलेली साधना पूर्ण झाली.

साधना सुरू असताना मला अनुभव आले. त्यापैकी फक्त १-२ इथे देत आहे.

१. Office चं काम आणि साधना संपवून मला झोपायला मध्यरात्र व्हायची. झोपण्यापूर्वी ध्यान करायची सवय असल्यामुळे जरा वेळ ध्यानासाठी डोळे मिटले. हवन करताना जशा ज्वाळा पेटतात अगदी तशा ज्वाळा मला दिसायला लागल्या. एक सेकंद असं वाटलं की एवढ्या प्रखर ज्वाळा आपल्या डोळ्यांजवळ आहेत तर आपल्याला काही इजा तर होणार नाही? हा विचार येताच मला नेरुळच्या देवीचं दर्शन झालं व देवी म्हणाली की तुझे सूक्ष्म शरीर शुद्ध करायची ही एक प्रक्रिया आहे. मी देवीला नमस्कार केला व डोळ्यांसमोर जे दिसत आहे त्याचा आनंद घेत झोपी गेले.

२. साधना चालू असताना, एका रात्री मी नेहमीप्रमाणे ध्यान करून झोपले. रात्री अचानक मोठा विजेचा लोळ माझ्या डोळ्यावर लखलखला. इतका प्रचंड विजेचा लोळ माझ्या इतक्या जवळ पाहून मला दोन मिनिट काही कळलंच नाही. अगदी दोन सेकंदात ती वीज माझ्या टाळूमधून माझ्या शरीरात गेली. मला चांगला धक्का बसला व मला लगेच जाग आली. जागी झाल्यावर आमच्या bedroom मध्ये नजर टाकली. थोडं पाणी प्यायले व घड्याळ बघितलं तर पहाटेचे २ वाजले होते. सौ. दीदी व श्रीस्वामीजींना नमस्कार करून परत झोपी गेले. हा एक शारीरिक व मानसिक अनुभव होता.

एकदा ध्यान करताना ध्यानात नेरुळची देवी आली व म्हणाली की तुझ्या fridge मध्ये जो मिठाईचा box आहे तो ज्या व्यक्तीसाठी आणला आहे त्या व्यक्तीला ही मिठाई मिळणार नाही. मला फार आश्चर्य वाटलं कारण त्याच दिवशी मनोजने एक मिठाईचा box आमच्या घराजवळ असलेल्या gas station वर काम करणाऱ्या काकांसाठी आणला होता. ध्यान संपवून मी दिवस सुरू केला आणि खरंच अख्खा दिवस गेला पण तो box काही त्या काकांना आम्ही देऊ शकलो नाही. दुसऱ्या दिवशी ध्यान करताना मला देवीने सांगितले की पुढच्या वेळी जेव्हा जेव्हा मनोज मिठाईच्या दुकानात जाईल तेव्हा मनोजने तुझ्यासाठी काहीतरी गोड आणलंच पाहिजे. नाहीतर जी मिठाई मनोज दुसऱ्यांसाठी आणेल ती त्यांच्या जवळ पोहोचणार नाही. मी सौ. दीदींना हा अनुभव सांगितला. सौ. दीदींनी आध्यात्मातल्या अनेक stages कशा पचवायच्या व पुढे कसं जायचं याचं ज्ञान दिलं.

मी ध्यान करताना, देवी माझ्या ओळखीच्या किंवा माझ्या आजूबाजूच्या लोकांच्या स्वभावातले अनेक दोष सांगत असते. सुरुवातीला ही गोष्ट नवलाईची होती व मी त्या व्यक्तींच्या वागणुकीकडे जवळून पाहायचे.

पण त्यात माझा बराच वेळ जायचा. एक दिवस माझ्या जवळच्या व्यक्तीचे दोष मला सांगितले व म्हणाली की श्रीस्वामीजींच्या जवळ राहून काही व्यक्ती स्वार्थीपणे वागतात पण तरीही त्यांची काही प्रमाणात तरी आध्यात्मात प्रगती होतेच. ज्या व्यक्तीबद्दल देवीने सांगितले ती माझ्या माहितीतली होती. त्यामुळे मी देवीला म्हणाले कोणाचे काय दोष आहेत हे मला काही कळून घ्यायचे नाहीत. त्यावर देवी मला म्हणाली की या दोषांकडे तू नीट लक्ष दे. ते स्वतःमध्ये येऊ नयेत म्हणून नेहमी सतर्क राहा व स्वतःमधले दोष कमी कर.

प्रत्येक अनुभव हा मला खूप महत्वाचा आहे. मला त्यातून काहीतरी शिकायला मिळते आणि रोजच्या धकाधकीच्या जीवनात आनंद व शांतीचा अनुभव येतो.

**अस्मिता मनोज शेंडे**

**न्यूजर्सी, अमेरिका**

ॐ

# ज्योतिषी राणी बापट

राणी बापट (मुंबई) या ज्योतिषी असून त्यांच्याकडे जे कोणी मार्गदर्शनासाठी येतात त्यांना त्या श्रीस्वामीजींच्या पोथ्या वाचायला सांगतात. ज्यांना ज्यांना त्यांनी पोथ्या दिल्या त्यांना दिव्य अनुभव आले. त्यातील काही अनुभव येथे देत आहे.

१. पनवेलहून एक गरीब स्त्री सल्ला घेण्यासाठी आली. तिचा मुलगा जेमतेम ४०% मार्कांनी पास होत असे. मुलाचे पुढे कसे होणार अशी चिंता त्या स्त्रीला लागून राहिली होती. राणीताईंनी तिला सांगितले, ''मुलाच्या नावाने रोज श्रीदुर्गा त्रिशती वाच.'' त्या स्त्रीने श्रद्धेने श्रीदुर्गा त्रिशती वाचावयास सुरुवात केली. मुलाच्या वागण्यामध्ये फरक दिसू लागला. त्याची एकाग्रता वाढली, त्याला अभ्यासात गोडी निर्माण झाली. त्यानंतरच्या परिक्षेत त्याला ७८% मार्क्स मिळाले.

२. सौ. सामंत यांच्या मुलाचे लग्न होऊन पाच वर्षांनंतरही संतती होत नव्हती. राणी बापट यांनी सुनेला '**श्रीदत्त जयदत्त**' असा जप अखंड करण्यास सांगितले व दररोज दोन वेळा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सांगितले. तीन-चार महिन्यानंतर सौ. सामंत यांनी सुनेला दिवस गेल्याचे कळविले.

३. सौ. मादुस्कर यांच्या मुलीचे लग्न होऊन सहा वर्षे झाली होती. मुलीला संतान नव्हते. राणीने त्यांना **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** श्रद्धेने नित्य पठण करण्यास सांगितले. मादुस्कर यांच्या मुलीला पुत्र झाल्याचे सौ. मादुस्कर यांनी राणीला कळवले. त्यांनी १६ महिने नित्य **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** पठण केले. राणीने पुढेही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचत रहा असे सांगितले.

४. एका मुलीने आपली पत्रिका दाखवून राणीला विचारले माझे लग्न होईल का? राणीने तिला विचारले– तू असे का म्हणतेस? यावर ती मुलगी म्हणाली:– ''मला अनेक ज्योतिषांनी लग्न होणार नाही, या करिता **'कुंभ विवाह'** विधी करून पहा असे सांगितले आहे.''

कुंभ विवाह विधी म्हणजे ज्याप्रमाणे मुलीचे लग्न जुळवतात, साखरपुडा करतात, आमंत्रण पत्रिका छापतात, सर्वांना आमंत्रण देतात, विधी करतात, हवन करून सात फेरे घेतात, या सर्व गोष्टी पूर्णपणे करायच्या. लाखो रुपये खर्च करायचे पण **वरमाला** मुलीने मातीच्या घड्याला घालायची, याला कुंभ विवाह म्हणतात. अनेकांनी असे कुंभ विवाह करूनसुद्धा शेवटी मुली अविवाहित राहिल्या किंवा डिव्होर्स झाले. हे सर्व राणीला माहीत असल्याने, राणीने त्या मुलीची पत्रिका काळजीपूर्वक तपासली तिच्या पत्रिकेत लग्नाचे योग नव्हते. म्हणून राणी म्हणाली:–

''तुझी पत्रिका मी पाहिली आहे. या पत्रिके विषयी मी काहीही बोलणार नाही. फक्त तुला एक उपाय सांगते तो श्रद्धेने कर व तीन महिन्यानंतर मला फोन कर.''

ती मुलगी म्हणाली, ''ताई तुम्ही सांगाल तो उपाय मी श्रद्धेने करीन.'' राणीने तिला **श्रीदुर्गा त्रिशती** ही पोथी दिली व दररोज सकाळ संध्याकाळ वाचायला सांगितली.

मुलीने श्रद्धेने पोथी घेतली व दररोज दोन वेळा वाचावयास सुरुवात केली. सुमारे दीड महिन्यानंतर, त्या मुलीचा राणीला फोन आला. ती म्हणाली, ''राणी ताई, माझे लग्न जुळले आहे, खूप चांगला मुलगा

आहे व श्रीमंत आहे. गाडी व फ्लॅटही आहे.'' राणीने उत्तर दिले, ''हे बघ **श्रीदुर्गा त्रिशतीचे** वाचन बंद करू नकोस!''

''मी **श्रीदुर्गा त्रिशती** मरेपर्यंत वाचत राहणार आहे. **श्रीदुर्गा देवीने** माझे अपरंपार कल्याण केले आहे.'' त्या मुलीने राणीला उत्तर दिले.

५. सौ. जोग यांच्या दोन्ही मुलींना संतान नव्हते. लग्नाला ४ वर्षे झाली होती. राणीने मुलींच्या नांवे तुम्ही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचा असे सौ. जोग यांना सांगितले. सौ. जोग यांनी आपल्या मुलींच्या नांवे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** रोज पठण केले. सुमारे दीड वर्षांनंतर त्यांच्या मुलीला जुळी मुले झाली व दुसऱ्या मुलीलाही मूल झाले.

६. सौ. पाखरे (विक्रोळी, मुंबई), या राणीकडे मुलाची पत्रिका घेऊन आल्या. त्यांनी राणीला सांगितले, माझी परिस्थिती बेताचीच आहे. मुलगा शिकून मोठा होईल काहीतरी करेल अशी आशा धरली आहे. पण मुलगा मुळीच अभ्यास करत नाही. जेमतेम पास होतो, खूप हूड स्वभावाचा आहे. सारखा मस्ती करत राहतो. आता तो नववीत आहे. हा SSC ला कसा पास होणार असे सारखे वाटत रहाते.

राणीने पाखरेंना घरामध्ये **श्रीदुर्गा सप्तशती** वाचा असे सांगितले. सौ. पाखरे यांनी **श्रीदुर्गा सप्तशतीचे** नित्य पठण सुरू करताच मुलाचा स्वभाव बदलू लागला. तो शांत झाला, अभ्यास करू लागला व SSC परिक्षेत ७८% मार्कांनी पास झाला.

७. एका मुलीला इंटरव्ह्यूसाठी बोलावत पण नोकरी मिळत नसे. अनेक इंटरव्ह्यू देऊनही नोकरी न मिळाल्याने ती खूप निराश झाली होती. काही दिवसानंतर इंटरव्ह्यूला बोलावणे ही बंद झाले. राणीने तिला

**श्रीदुर्गा त्रिशती** वाचायला सांगितले. दोन महिन्यात त्या मुलीला चांगली नोकरी लागली.

८. राणी बापट हिची भाची रविना हिलासुद्धा नोकरी मिळत नव्हती. राणीने तिला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** रोज वाचण्यास सांगितले व **श्रीदत्त जय दत्त** जप रोज करण्यास सांगितले, किमान १००० तरी जप पूर्ण कर असे सांगितले. एक महिन्यात रविनाला नोकरी लागली. राणीने साधना सतत पुढे चालू ठेव बंद करू नकोस असेही सांगितले.

९. श्री. व सौ. पांचाळ गेली १० वर्षे मुलाचे लग्न व्हावे म्हणून प्रयत्न करत होते. पण काहीतरी विघ्न येऊन लग्न जुळत नव्हते. राणीने त्यांना दोघांनाही **संक्षिप्त** श्रीगुरुचरित्र दररोज वाचावयास सांगितले व '**श्रीदत्त जय दत्त**' हा जप रोज किमान १००० करायला सांगितला. एक वर्षात लग्न झाले व सद्गुणी सून मिळाली.

१०. कु. स्वातीचे खूप वर्षे प्रयत्न करूनही, लग्नाचे योग येत नव्हते. राणीने तिला '**श्रीदत्त जय दत्त**' जप दररोज २००० वेळा व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** रोज वाचन अशी साधना सांगितली. दोन महिन्यात स्वातीचे लग्न झाले व तिच्या मनासारखे स्थळ मिळाल्याने तिने राणीचे खूप आभार मानले व राणीने तिला ही साधना पुढे चालू ठेव, बंद करू नकोस असे सांगितले.

११. श्री. तावडे यांना, **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचतांना तिसऱ्या पानावर ॐ दिसू लागले. ही गोष्ट त्यांनी राणीला सांगितली.

१२. पार्ला (मुंबई) येथील एका स्त्रीला कॅन्सर झाला. सव्वादोन वर्षे ती बेडरिडन होती. सर्व प्रकारचे उपचार चालू होते. कॉटवर झोपून ती दररोज तीन-चार वेळा **श्रीदुर्गा त्रिशती** वाचायची. कॅन्सरमुळे तिला

आंघोळ वगैरे करणे शक्य नव्हते. पडलेल्या अवस्थेतच ती **श्रीदुर्गा त्रिशती** वाचत असे. जगण्याची आशा सर्वांनीच सोडलेली होती. परंतु ईश्वरीकृपा होऊ लागली. सव्वादोन वर्षांनंतर अचानक तिला बरे वाटू लागले. आता कॅन्सर या भयानक रोगातून तिची पूर्ण सुटका झालेली आहे. ती पूर्ण बरी झाली आहे.

१३. ईश्वर कोणाला कसे अनुभव देईल हे सांगता येत नाही. ईश्वरभक्ती करून आपण आपली पात्रता सतत वाढवत राहिली पाहिजे. देण्याची वृत्ती जशी वाढत जाते तशी देवतांची कृपा प्राप्त होत जाते. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** नित्य पठण करण्याने अनेकांना दिव्य अनुभव आले. असाच एक अनुभव नुकताच ज्योतिषी राणी बापट यांचे कडून कळला तो पुढे देत आहे.

ज्योतिषी राणी बापट यांची मैत्रिण निता ठाकूर ही बोरीवली (मुंबई) येथे आपली बहीण रुपाली नाईक हिच्या समवेत एका भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहते. राणी बापट यांच्या संगतिने दोघीही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचू लागल्या व पोथ्या विकत घेऊन सद्‌भक्तांना वाटू लागल्या.

काही दिवस अशी उपासना केल्यावर त्यांना गूढ अनुभव येऊ लागला. प्रथम घराच्या एका कोपऱ्यात मूठभर तांदूळ दिसले. त्यांना वाटले आपल्या हातून पडले असावेत. ते तांदूळ गोळा करून, त्यांनी डब्यात ठेवले. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या कोपऱ्यात दोन मुठी (अंदाजे १५० ग्रॅम) तांदूळ त्यांना दिसून आले, तेव्हा ते न गोळा करता तसेच राहू दिले. तिसऱ्या दिवशी आणखी एका कोपऱ्यात तांदूळ दिसले. तेव्हा सर्व तांदूळ गोळा करून पक्ष्यांना घालण्यास त्यांनी सुरुवात केली व राणीला सर्व प्रकार सांगितला. तेव्हा राणीने थोडे तांदूळ पक्ष्यांना घालून उरलेले साठवा असे सांगितले. त्याप्रमाणे (निता ठाकूर

व रुपाली नाईक) यांनी तांदूळ साठवण्यास सुरुवात केली. ऑक्टोबर २०२२ पर्यंत सुमारे ५० किलोहून अधिक तांदूळ साठले आहेत व दररोज तांदूळ येतच आहेत. आतातर म्हणजे, नोव्हेंबर २०२२ पासून दरमहा ४० ते ५० किलो तांदूळ जमा होत आहेत. राणीने ते दैवी तांदूळ गरीबांना वाटण्यास सांगितले आहे.

नीता ठाकुर यांच्याकडे कामगार काम करत होते तेव्हा तांदूळ येत नव्हते, कामगार गेल्यानंतर तांदूळ येऊ लागले.

ईश्वर कोणाला काय चमत्कार दाखवेल हे सांगता येणे कठीण. ईश्वरी लीला अगाध आहे हेच खरे!

ही ईश्वरी लीला ऐकून एका तथाकथित बुद्धीवाद्याने प्रश्न केला :- ''असे चमत्कार घडतात तरी कसे?'' यावर श्रीस्वामीजींनी उत्तर दिले, ''देण्याची, वाटण्याची प्रवृत्ती जोपासा, तिची वाढ करा की जीवनात चमत्कार घडू लागतात.''

ज्योतिषी राणी बापट यांनी आतापर्यंत सुमारे चार हजार लोकांना पोथ्या वाटून सन्मार्गाला लावले आहे.

**राणी बापट (मुंबई)**

ॐ



अदृश्य सृष्टीतून येणारे तांदूळ

# रक्षी राहूनी चराचरी

राजन कुशारे व सौ. ज्योती कुशारे हे उभयता पती-पत्नी नाशिकला राहतात. त्यांचा स्वत:चा बिझनेस आहे. अरुण दाभोळकरांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ते पोथ्या वाचणे, जप करणे याप्रमाणे साधना करत असतात.

पोथ्या व पुस्तकांच्या वाचनाने आध्यात्म मार्गात त्यांची प्रगती झाली. त्याचप्रमाणे बिझनेसमध्ये येणाऱ्या अडीअडचणी पण दूर झाल्या.

राजन व ज्योती यांचा मुलगा हृषीकेश, व सून निखिता हे मिशिगन (अमेरीका) येथे राहतात. ते पोथ्या व पुस्तके वाचतात, त्यांनाही खूप चांगले अनुभव येतात. त्यातील दोन अद्भूत अनुभव पुढे देत आहे, त्यांच्याच शब्दात...!

हे अनुभव वाचल्यावर लक्षात येते की चराचरामध्ये परमेश्वर भरून राहिला असून आपल्या भक्तांचे रक्षण करण्यासाठी तो सदैव तत्पर असतो. पण असे अनुभव त्याच भक्तांना येतात ज्यांची मने साफ असतात, आचार-विचार शुद्ध असतात, ईर्षा द्वेष मत्सर मनात नसतात. आत एक बाहेर एक असे जे कधीही वागत नाहीत अशा सद्भक्तांना असे अनुभव येत असतात.

ॐ वनिता ॐ

# निखिता हृषीकेश कुशारे

## विलंबनातून संरक्षण-१

आपण हॉटेलमध्ये जातो, एखाद्या पदार्थाची ऑर्डर देतो, पदार्थ वेळेवर आला नाही की वैतागतो....! पण या साध्या घटनेमध्येसुद्धा काहीतरी ईश्वरीसंकेत असतो याचे दोन अनुभव आम्हाला आले. श्री दत्तप्रभू चराचरात राहून आपले संरक्षण करीत असतात याचे दोन दिव्य अनुभव पुढे देत आहे.

सप्टेंबर २०१९, वाढदिवसानिमित्त आम्ही एका हॉटेलमध्ये जेवायला गेलो. ऑर्डर दिली, पण बराच वेळ झाला तरी जेवण आलेच नाही. सर्व वेटर आमच्याकडे दुर्लक्ष करत होते. अडीच-तीन तास आम्ही बसून होतो. शेवटी जेवण आले. जेवून घरी आल्यावर ईश्वराची अगाध लीला लक्षात आली.

आमच्या फ्लॅटपासून दहा फूट अंतरावर असलेल्या फ्लॅटमध्ये मोठी आग लागली होती. बिल्डिंग खाली फायर रेस्क्यूच्या गाड्या, ॲम्बुलन्स गाड्या आलेल्या होत्या.

आम्ही बिल्डिंग जवळ पोहोचलो तेव्हा सर्व गाड्या फायर ब्रिगेड, ॲम्बुलन्स तेथून निघत होत्या. याचा अर्थ जितका वेळ आग विझविण्यासाठी लागला तितका वेळ ईश्वराने आम्हाला हॉटेलमध्ये आरामात बसवून ठेवले होते.

## विलंबनातून संरक्षण–२

दुसरा अनुभव मार्च २०२१ मध्ये आला. मी (निखिता) व हृषीकेश हवाई येथे फिरायला गेलो होतो. पहिल्या दिवशी 'हिलो' या स्थानात जाण्याचा आमचा प्लॅन होता. हे ठिकाण थोडे लांब असल्याने लवकर निघायचे ठरविले. वेळ वाचविण्यासाठी रिसॉर्ट खाली असलेल्या हॉटेलमध्ये ब्रेकफास्ट करायला गेलो.

आमची ऑर्डर घेवून वेटर गेले ते परत आलेच नाहीत. आमच्या मागून जे लोक आले ते सर्व खाऊन गेले. हॉटेल पूर्ण रिकामे झाल्यावर वेटरच्या लक्षात आले की आमची ऑर्डर सप्लाय केलेली नाही. त्यानी सॉरी म्हणून आम्हाला ब्रेकफास्ट सप्लाय केला तोपर्यंत इतका उशीर झाला होता की, आम्हाला 'हिलो' येथे जाण्याचा प्लॅन कॅन्सल करावा लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला कळले की, 'हिलो' येथे प्रचंड पाऊस पडला लँड स्लाईड झाले, महापूरामध्ये शेकडो गाड्या वाहून गेल्या, अनेक घरे पडली ठिकठिकाणी रस्ते बंद होऊन ट्रॅफिक जाम झाले. या सर्व आपत्तींतून वाचविण्यासाठी परमेश्वराने सर्व वेटर्सना आमची ऑर्डर विसरून जाण्याची प्रेरणा दिली व आम्हाला अडकवून ठेवले. 'हिलो' चा प्लॅन कॅन्सल करायला लावले. चराचरात भरून भक्तांचे संरक्षण करणाऱ्या दत्तप्रभूंचा हा दिव्य अनुभव.

**निखिता हृषीकेश कुशारे**

**मिशिगन, अमेरिका**

ॐ

## मारुती

निखिता कुशारे यांचे अनुभव लिहितांना मला ६० वर्षापूर्वी घडलेली एक गोष्ट आठवली ती सांगण्याचा मोह आवरत नाही.

मारुती साळवी नांवाचे एक सद्‌भक्त असून त्यांची व श्रीस्वामीजींची सुमारे ६०-६२ वर्षांची मैत्री आहे. पूर्वी ते नागार्जुन सागर आश्रमात रहायचे. आता वय ८८ झाल्याने श्रीस्वामीजींच्या घरी राहातात. आम्ही सर्व त्यांना मारुतीकाका म्हणतो.

मारुतीकाका मनाने सरळ, साधे, निष्कपट, नि:स्वार्थ, प्रेमळ, ईश्वरभक्ती करणारे, सतत चांगले विचार करणारे. सतत नामस्मरण करणारे.

एकदा ते बसस्टॉपवर उभे होते, बस आली. सर्वजण बसमध्ये चढले. मारुतीकाका बसमध्ये चढू लागले. इतक्यात कंडक्टर मारुतीकाकांना म्हणाला, ''उतर खाली, दिसत नाही का बस भरली आहे.'' मारुतीकाका खाली उतरले.

विशेष म्हणजे मारुतीकाका खाली उतरल्यावर मारुतीकाकांच्या मागे उभी असणारी चार माणसे बसमध्ये चढली. मारुतीकाका हा विचित्र प्रकार विस्मयाने पहात राहिले.

बस निघून गेली, पांच मिनिटात मारुतीकाकांना ती बस दरीत कोसळल्याचे कळले. सर्वजण जखमी झाले. मारुतीकाकांच्या नंतर चढलेले मृत झाले. व बरेच इतर प्रवासी ही मृत्युमुखी पडले.

आपण मनाने नि:स्वार्थ, निरहंकारी, नम्र व सरळ असलो तर चराचरात भरून राहिलेला परमेश्वर आपले सदैव रक्षण करतो, हे सत्य आहे.

ॐ वनिता ॐ

# दत्त राहे सर्वत्र

मी मीनाक्षी अमृतकर, राहणार नवी मुंबई.

२०१३ मध्ये मी हिमालय यात्रा केली. ते सर्व अनुभव **सिद्धयोग्याच्या सहवासात** या पुस्तकात, लिहिलेले आहेत. हे पुस्तक २०१४ मध्ये प्रसिद्ध झाले. जवळजवळ आठ वर्षांनंतर मी पुन:श्च वाचकांच्या भेटीस या लेखाद्वारे येत आहे. ईश्वर कृपेचे अनुभव जीवनात रोजच येत असतात. पुढे लिहिलेला अनुभव अद्‌भुत व मती गुंग करणारा आहे.

अंदाजे १३-१४ वर्षांपूर्वी मी श्रीस्वामीजींच्या दर्शनार्थ नागार्जुन सागर येथे गेले होते. औदुंबराखाली श्रीस्वामीजींसमोर गप्पा मारत बसले होते. इतक्यात माझा मोबाईल वाजला. अर्चना राजे या माझ्या मैत्रिणीचा फोन होता.

मी श्रीस्वामीजींना म्हणाले, ''या माझ्या मैत्रिणीला मी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले आहे. ती रोज वाचते, तिच्यावर लक्ष असू द्या!''

श्रीस्वामीजी म्हणाले, ''लक्ष राहील.'' यानंतर सुमारे १०-१२ वर्षे निघून गेली. त्या मैत्रिणीचा व माझा फारसा कॉन्टॅक्ट राहिला नाही. कधी फारशी भेट ही झाली नाही. कधी तरी वर्षातून एकदा हॅपी न्यू इयर या व्यतिरिक्त काही संबंध राहिला नाही.

मी डॉक्टर असल्याने सकाळपासून रात्रीपर्यंत बिझीच असते. त्यामुळे माझा लोक संपर्क कमीच आहे.

तारीख २० मार्च २०२२ रोजी ताईंचा फोन आला. ताई म्हणाल्या, ''मी तुझ्या बिल्डींगजवळ १० मिनिटात येते, तू तेथे भेट.''

मी हो म्हटले व लगेच बिल्डींग खाली गेले. ताई आलेल्याच होत्या, त्यांच्या गाडीत बसले. मनात विचार येत होते. ''ईश्वरी आदेश झाल्याशिवाय ताई कोणाला भेटत नाहीत, फोनही करत नाहीत, त्या संपूर्ण ईश्वराधीन राहतात. आज नक्कीच काहीतरी वरून आदेश आलेला असणार!''

ताई म्हणाल्या, ''मीनाक्षी, नवीन **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** छापले आहे, त्यात काही नवीन अनुभव लिहिलेले आहेत, ते तू वाच.'' असे म्हणून त्यांनी मला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले.

त्यानंतर ताई म्हणाल्या, ''मीनाक्षी, श्रीस्वामीजींचा खास आदेश आहे. तुझी एक मैत्रिण आहे जिला तू १४ वर्षांपूर्वी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिलेस. तिला ही प्रत ताबडतोब पोचव व लगेच वाचायला सांग.''

ताईंचे हे उद्‌गार ऐकून मला आश्चर्य वाटले. 'सुमारे १४ वर्षांपूर्वी श्रीस्वामीजींच्या समोर बसले होते, तेव्हा मैत्रिणीचा फोन आला. गेल्या दहा-बारा वर्षांत तिचा माझा कॉन्टॅक्ट नव्हता, श्रीस्वामीजींना ती ओळखतही नाही, असे असूनसुद्धा तिच्यावरही श्रीस्वामीजींचे लक्ष! नक्कीच काहीतरी तिच्यावर संकट आले असणार!'

ताईंनी तिच्या नांवाने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले. त्या दिवशी तारीख होती, २० मार्च २०२२.

ताईंचा निरोप घेऊन मी घरी गेले व तिला फोन लावला. ४-५ वेळा फोन लावूनही तिने फोन उचलला नाही. म्हणून मेसेज केले, मेसेजला उत्तर प्रश्न चिन्ह आले. मला काहीच समजेना.

तारीख २३ मार्च २०२२ रोजी संध्याकाळी ती व तिचा नवरा माझ्या क्लिनिकमध्ये आले. तिला चालता येत नव्हते. दहा पावले चालायला तिला पाच मिनिटे लागली. नवऱ्याने धरुन सुद्धा तिला पाऊल उचलता येत नव्हते,

श्वास लागला होता. मी विचारले, 'काय झाले?' तिच्या तोंडातून शब्दही फुटत नव्हता, गळा आवळल्या सारखा होत होता. शेवटी मी तिला म्हटले, ''अर्चना, घाबरु नकोस, साक्षात् दत्तात्रेयांचा प्रसाद खास तुझ्यासाठी माझ्याकडे आला आहे.'' असे म्हणून मी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** तिच्या हातात ठेवले.

**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** हातात पडताच तिचा गळा मोकळा झाला व ती बोलू लागली.

## विशिष्ट जागेतील दुष्टशक्ती

अर्चना म्हणाली–

''१९ मार्च २०२२ रोजी रात्रीच्या बसने मी माझ्या गावी गेले. २० मार्च २०२२ रोजी सकाळी शॉर्टकटने जायचे म्हणून एक स्टॉप अगोदरच उतरले व रस्त्याने चालू लागले. याच रस्त्याने माझा भाऊ मला पीकअप करणार होता. त्याला वाटेत गाठायचे म्हणून घराच्या दिशेने पुढेपुढे जात होते.

खूप वर्षांनी गावी जात होते म्हणून लहानपणीच्या काही आठवणी आठवल्या. एक मोठे झाड होते. लोक त्या झाडाला नमस्कार करत, तर मी त्या झाडाच्या सावलीत खेळत असे. मी ८-१० वर्षांची होते. आई मला ओरडत असे व त्या झाडाखाली जाऊ नको, खेळू नको असे सांगत असे. एक-दोनदा मारले सुद्धा! पण मला ते झाड आवडायचे. विचारांच्या तंद्रीत त्या झाडापर्यंत पोहोचले सुद्धा! त्या झाडाला नमस्कार केल्यासारखे करून मी पुढे चालू लागले.

इतक्यात- 'तू आलीस अर्चना!' असा आवाज ऐकू आला. तो आवाज भयानक होता. वेळ सकाळची होती जवळपास कोणी माणूस नव्हते व आवाज भयानक होता. मी जोरजोरात पळू लागले व घराच्या दारात पोहोचले. माझ्या मागे कोणीतरी आहे अशी सारखी जाणीव पळतांना होत

होतीच! घराच्या दाराजवळ पोहोचले म्हणून मी मागे वळून पाहिले. माझ्या मागे धुरकट रंगाची, आठ फूट उंचीची एक आकृती उभी होती. त्या भयानक आकृतीला पाहून मी किंचाळले व उंबरठ्यातच बेशुद्ध पडले. मला सडकून ताप भरला, मला बोलता येईना व चालता ही येईना!

मी तात्काळ नवी मुंबईत परत यायचे ठरवले व २१ मार्च २०२२, या तारखेला सकाळी भावाला घेऊन मी मुंबईत परत आले.

आत्ता तू **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** हातात दिल्यानंतर मी बोलू लागले, खूप एनर्जी आली.

दत्तप्रभूंनी माझे रक्षण केले हेच खरे! मला आता छान वाटत आहे.''

अर्चनाने आपली हकिकत संपविली व ती स्पीडने चालत आपल्या घरी गेली. ती एकटी चालत होती, नवऱ्याने धरलेलेही नव्हते.

ती गेल्यावर ईश्वराच्या अद्‌भूत लीलेचा मी विचार करू लागले.

ज्या व्यक्तीला श्रीस्वामीजींनी कधीही पाहिलेले नाही, नांव माहीत नाही, अशा व्यक्तीला ते ताईंच्या मार्फत कृपाशिर्वाद पोहोचवतात, हे कसे शक्य आहे? सारे बुद्धीच्या पलिकडचे आहे. आपण भक्ती केली की ईश्वराचे आपल्यावर पूर्ण लक्ष असते हेच खरे!

**२८ मार्च २०२२**
**डॉ. मीनाक्षी अमृतकर**
**नवी मुंबई**

ॐ

## दुष्टशक्तींचा नाश

स्वाती साटमकर यांच्या घरामध्ये काही दुष्टशक्तींचे अस्तित्त्व होते. त्यामुळे घरात सुखशांती नव्हती. त्यांचा नऊ वर्षांचा मुलगा कामेश अतिशय विचित्र वागत असे. शाळेत जात नसे व अभ्यासही करत नसे. तो भडकला की आईला मारायला धावत असे. स्वाती साटमकर यांची मैत्रिण सुनिताने, स्वाती साटमकर यांना **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दररोज वाचण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे त्यांनी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दररोज वाचण्यास सुरुवात करताच घरातील वातावरण पालटले. मुलगा व्यवस्थित शाळेत जाऊ लागला. अभ्यास करू लागला. सर्व विस्कटलेली घडी ठीक झाली.

**स्वाती साटमकर**

## श्रीदत्त जय दत्त

कार्तियायनी नायर यांच्याकडे काम करणारी मेडसर्व्हन्ट  रुक्मिणी अशिक्षित होती, तिला ३ मुले होती. तिच्या अनेक समस्या होत्या, नवरा दारू पीत होता. त्यांनाही तो वाईट मार्गाला लावण्याचा प्रयत्न करत होता. पैशासाठी तो रुक्मिणीला मारत असे. म्हणून रुक्मिणी वेगळी रहात होती. मुलांना घेऊन पत्नी वेगळी रहाते म्हणून, नवरा मुलांना आईच्या विरोधात भडकावत असे. शेवटी मुलेही बापाकडे राहू लागली. बापाला वाटे मुलांनी पैसे कमवावेत व मला दारूसाठी पैसे पुरवावेत.

या सर्व परिस्थितीने हैराण होऊन रुक्मिणीने आपली परिस्थिती कार्तियायनी यांना सांगितली. कार्तियायनी यांनी रुक्मिणीला '**श्रीदत्त जय दत्त**' हा जप अखंड करण्यास सांगितले.

रुक्मिणीने जप करण्यास सुरुवात करताच तिच्या मनाला शांती व आनंदाचा लाभ झाला. तिचा चेहरा प्रसन्न दिसू लागला. ८-१० दिवसात तिची मुले तिच्या घरी परत आली. घरातील सर्व वातावरण बदलले व एक दिवस नवराही परत आला व सर्वांची माफी मागून त्याने आपण दारू सोडली असल्याचे सांगितले. आता ते सर्व आनंदात आहेत.

**कार्तियायनी नायर**

**ठाणे**

ॐ

# माधवी प्रभाकर वाळुंजकर

मी माधवी प्रभाकर वाळुंजकर, जुलै २०१५ मध्ये मला आलेला अनुभव देत आहे. माझे यजमान श्री. प्रभाकर वाळुंजकर हे बरेच वर्षे हृदयविकाराने आजारी होते. त्यांचा आजार वाढल्याने आम्ही दोघे हाईड पार्कला माझ्या मुलीच्या- शिल्पा चौगुलेच्या शेजारच्या ब्लॉकमध्ये भाड्याने रहायला गेलो. आपण जर योग्य मार्गात असलो व नित्यनियमाने पोथ्या वाचन केले की त्या पोथ्या व पुस्तकांमध्ये असलेल्या शक्ती आपल्याला कशाप्रकारे सांभाळून घेतात व सर्व संकटे व आजारपणाला सामोरे जाण्याची ताकद देतात याचे सर्वात जास्त अनुभव मी माझ्या यजमानांच्या आजारपणात घेतले.

माझ्या यजमानांची तब्येत जरा जास्तच खालावली होती. या आजारपणामुळे त्यांना श्वास घ्यायला त्रास होत होता तसेच स्मृतीभ्रंश सुद्धा वाढला होता. यामुळे दिवसाच काय तर रात्रीदेखील त्यांना झोप लागत नसे, पूर्ण वेळ त्यांना बसून रहावे लागत असे. विशेषत: रात्रीचे ते फारच अस्वस्थ असायचे व सर्व खोल्यातून फिरत रहायचे. एकदा ते पलंगावरून पडल्यामुळे त्यांना कपाळावर मोठे टेंगुळ आले होते, ते त्यांना खूपच दुखायचे, त्या टेंगुळाच्या जवळपास जरी हात गेला तरी त्यांना खूप वेदना होत असत. त्यांना अनेकदा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते परंतु डॉक्टरांनी देखील त्यांना आता घरीच ऑक्सीजन व इतर तयारी ठेवायला सांगितल्यामुळे त्यांची सर्व व्यवस्था आता घरीच केली होती.

माझ्या दोन्ही मुली शिल्पा चौगुले व दीपा शेंबेकर गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्रथमच पालखी गीते म्हणणार होत्या. २-३ महिन्यापासून सर्वांबरोबर

प्रॅक्टीस करत होत्या. त्यावेळी उत्सवानिमित्त आश्रमात गेल्या होत्या. माझे जावई नंदन दुसऱ्या दिवशी सकाळी आश्रमात जाणार होते व दुसरे जावई केतन कामानिमित्त शहराबाहेर होते. नंदन आश्रमात निघण्याच्या मध्यरात्री, माझे यजमान असेच अस्वस्थपणे फिरत असताना एकदम भिंतीवर आपटले. मी त्यांना सावरले व पलंगावर बसवले, पण थोड्याच वेळात ते कमरेपर्यंतचा अर्धा भाग पलंगावर व गुडघ्यापासून पाय खाली अशा अवस्थेत अचानक पलंगावर निपचित पडले. त्यावेळी त्यांचे तोंडदेखील उघडे राहिले होते. मी ताबडतोब नंदनच्या मोबाईलवर फोन केला पण लागला नाही, इंटरकॉम आणि घरच्या नंबरवर पण फोन लावला पण कोणीच उचलला नाही. घराबाहेर येऊन बेल वाजवली, माझ्याकडे असलेल्या चावीने दार उघडायचा प्रयत्न केला पण आतून कडी लावलेली होती. वास्तविक नंदनची झोप अतिशय सावध आहे. आता विचार केला असता असे वाटते की मुद्दामच त्यांना उठवले गेले नाही कारण सर्वजण जमले असते तर ....

शेवटी मी हताश होऊन यजमानांच्या काखेत हात घालून त्यांना वर खेचले व पलंगावर नीट निजवले. तेव्हाही ते निपचितच पडून होते. मी त्यांचे कपाळावरचे टेंगुळ दाबून बघितले कारण एरवी जरा जरी तिथे हात लागला की ते कळवळायचे. पण काहीच हालचाल नाही... आता मात्र मला वेगळीच शंका यायला लागली. त्यांचे पूर्ण शरीर थंड पडले होते, श्वासही बंद झाल्यासारखा वाटत होता, शरीरात प्राण नसल्यासारखे त्यांचे शरीर निपचित पडून होते. मग मात्र मी श्रीस्वामीजींच्या फोटोपुढे हात जोडून प्रार्थना केली की ही दोन्ही कुटुंबे गुरुपौर्णिमेनिमित्त आश्रमात गेली आहेत व मोठ्या हौसेने पालखी गीतांची तयारी केली आहे, तेव्हा ही गुरूपौर्णिमा व्यवस्थित पार पडू दे..... आणि काय आश्चर्य अचानक त्यांनी खाकरल्यासारखे केले व कण्हायला लागले. काही क्षणापूर्वी निपचित पडलेल्या देहात अचानक

कोणीतरी प्राण परत टाकावेत असे काहीतरी जाणवले व हे सर्व अगदी माझ्यासमोरच घडले. माझ्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले कारण मुलींची गुरूपौर्णिमा निर्विघ्नपणे पार पडणार होती. त्यादिवशी श्रीस्वामीजींनी त्यांना जीवनदान दिले आणि म्हणूनच मी केलेला फोन, बेल नंदनला ऐकू आली नाही.

त्यानंतर दीड महिन्यातच अगदी त्याच पद्धतिने माझ्या यजमानांना देवाज्ञा झाली. त्यावेळीसुद्धा शिल्पा आश्रमात सेवेला गेली होती आणि फक्त १५ दिवसांसाठीच ती परत मुंबईला आली होती. १ सप्टेंबरला ती आश्रमातून आली व २ सप्टेंबरला हे वारले. त्यांचे सर्व दिवसवार अशा रितीने सांभाळले गेले होते. अगदी अजूनही पदोपदी माझं सर्व सांभाळलं जातय हे आजही मला जाणवतं...श्रीस्वामीजींना व सौ.ताईंना शतश: प्रणाम.

**श्रीमती माधवी वाळुंजकर**
**ठाणे**

ॐ

# अस्मिता शेंबेकर

मी अस्मिता शेंबेकर. माझ्या सासुबाई विजया शेंबेकर या गेली काही वर्षे हृदयविकारामुळे आजारी होत्या. अंगकाठी बारीक असल्याने ताकददेखील जरा कमीच होती. पण त्यांनी जर नियमित पोथी वाचन केले तर त्यांची तब्येत चांगली राहते व ताकदही वाढते हा त्यांचा दरवेळेचा अनुभव.

मला उत्सवाच्या निमित्ताने आश्रमात जायचे होते व पालखी गीतांची सर्वांबरोबर प्रॅक्टीस चालू होती. मी जाण्याच्या १० दिवस आधी अचानक त्यांना श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. त्यांना लगेचच हॉस्पिटल मध्ये ॲडमिट केले गेले. त्यांची तब्येत एकदम क्रिटीकल झाली आहे व काहीही होऊ शकते, व्हेंटिलेटरवर पण टाकावे लागेल, नातेवाईंकाना कल्पना द्या असे डॉक्टरांनी सांगितले. त्यांना I.C.U. मध्ये ठेवले होते. त्यांनी नंतर मला पुढील अनुभव कथन केला: ''मी तोंडाने जप चालू ठेवला होता व अचानक माझे डोळे मिटले व माझ्या डोळ्यासमोर एकदम प्रकाश आला, त्या प्रकाशात मला श्रीस्वामीजी दिसले, तोपर्यंत मला त्यांचे दर्शन कधीच झाले नव्हते. ते एकदम स्पष्टपणे मला समोर दिसत होते. ते माझ्याकडे बघून हसले व त्यांनी आशीर्वादासाठी हात वरती केला आणि क्षणार्धात तो प्रकाश नाहीसा झाला. मी डोळे उघडले आणि काही क्षणापूर्वी जराही ताकद नसलेल्या माझ्या शरीरात मला इतके चैतन्य जाणवले की मला होणारा त्रास लगेच थांबला.'' खरंतर त्यांना सकाळी ॲडमिट केले होते, पण त्यांच्या तब्येतीत फरक इतका लगेच पडला की दुसऱ्या दिवशी त्यांना I.C.U. मधून बाहेर काढले व तिसऱ्या दिवशी हॉस्पिटलमधून घरी पण सोडले. एरवी हॉस्पिटलमधे ॲडमिट व्हायची जेव्हा त्यांच्यावर वेळ येते तेव्हा किमान ६/७ दिवस तरी घरी यायला लागतात व परत तब्येत पुर्ववत व्हायला १५ दिवस तरी

लागतात. पण यावेळी तिसऱ्या दिवशीच त्यांना घरी सोडले व पुढेदेखील त्यांना काही त्रास झाला नाही. त्यामुळे मला पण आश्रमात उत्सवासाठी बिनधास्तपणे जाता आले.

या पोथ्या, पुस्तके व स्तोत्र म्हणायला लागल्यापासून त्यांच्या स्वभावात एक शांतपणा आला होता, समाधान व आनंद मिळू लागला होता.... श्रीस्वामीजींना व सौ.ताईंना शतश: प्रणाम.

दिनांक २ फेब्रुवारी २०२२, रोजी सासूबाई ईश्वरचरणी विलीन झाल्या. त्या दिवशी सुद्धा त्या अतिशय आनंदात होत्या व शेवटच्या क्षणी सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर शांती व समाधान झळकत होते.

## तनय शेंबेकर

माझा मुलगा तनय शेंबेकर याला डिसेंबर २०२१ मध्ये आलेला अनुभव देत आहे. इंजिनियरींग पूर्ण करून त्याला M.S. साठी ऑस्ट्रेलियाच्या नावाजलेल्या University मध्ये admission मिळाली. डिसेंबर २०२१ पासून ऑस्ट्रेलियानी विद्यार्थ्यांकरिता borders खुल्या केल्या. तोपर्यंत कोविडमुळे त्यांच्या borders बंद होत्या. तनयची आईवडिलांपासून दूर राहण्याची पहिलीच वेळ होती, त्यामुळे त्याची रहायची सोय, तेथे गेल्यावर थोडे दिवस quartine राहण्याची सोय, खाण्याची सोय सर्वच दुसऱ्या देशात कसे होणार याबद्दल थोडी चिंता होती. जशा borders खुल्या झाल्या, तसे आम्ही २५ जानेवारीचे तिकीट बुक केल. त्यावेळी भारतामध्ये कोविडची ३ री लाट चालू होती, त्यामुळे फ्लाईटस् सतत रद्द करण्यात येत होत्या. तो जाण्याच्या आधीच्या आठवड्यापासून एक दिवसाआड एक अशी विमाने रद्द होत होती. तो जाण्याच्या आधीचे तीनही दिवस विमाने रद्द झाली. जे होईल ती ईश्वराची

इच्छा असा विचार करून आम्ही श्री स्वामीजींना नमस्कार केला व शांत मनाने जे होईल ते बघण्याचा प्रयत्न केला. जेव्हा तुम्ही स्वत:च्या वृत्तीत चांगला बदल घडवण्याचा प्रयत्न करता तेव्हा ईश्वर तुम्हाला नक्कीच मदत करतो हे त्या दिवशी जाणवले. तनय जाणार होता त्यादिवशी विमान एकदम वेळेवर निघाले व पुढेही त्याला कसलाही त्रास झाला नाही. परत त्याच्या पुढचा पूर्ण आठवडा सर्व विमाने रद्द झाली. फक्त तनय जाणार तेच विमान रद्द झाले नाही ,ही श्रीस्वामीजींची कृपा नाहीतर अजून काय!

जसा तो ऑस्ट्रेलियाला उतरला तसे आपले गुरुबंधु सांडिम, देसाई व पेडणेकर परिवार त्याला घ्यायला आले होते. पुढचे ५ दिवस त्याची test negative येईपर्यंत त्याला quarantine रहायचे होते म्हणून आम्ही भारतातूनच त्याचे हॉटेलमध्ये booking केले होते. ऑस्ट्रेलियामध्ये खाण्याचे पदार्थ न्यायला परवानगी नसल्याने व त्याची एकट्याने विदेशात जायची पहिलीच वेळ असल्याने आम्ही त्याच्याबरोबर जास्त काही पाठवू शकत नव्हतो. त्याला हॉटेलमधूनच मागव असे जरी सांगितले असले, तरीपण qurantine असताना हॉटेलमधून त्याला खाणे पुरवले जाईल की नाही याची आम्हाला खात्री नव्हती. परंतु या सर्व गुरूबंधूंनी त्याला ५ दिवस पुरेल इतके खाणेपिणे व औषधाची सोय आधीच केली होती.

भारतातून जाण्याआधी तनयचे ऑस्ट्रेलियाच्या estate agent शी त्याच्या राहण्याच्या जागेविषयी बोलणे चालू होते. त्याचे quarantine जसे संपले तसे त्यानी विशाल सांडीम सोबत काही भाड्याच्या जागा बघितल्या. त्यातली एक जागा अगदी ३/४ दिवस आधीच रिकामी झाली होती. जागा हवेशीर, सुरक्षित व मुख्य म्हणजे कॉलेजच्या जवळ होती. सर्व दृष्टीने योग्य

अशी जागा त्याला अगदी पहिल्या दिवशीच मिळाली. या तीनही परिवारानी त्याला खुप आधार दिला व तो तेथे set होईपर्यंत खुप मदत केली. हे सर्व बघितले तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की आम्ही व ऑस्ट्रेलियातले भक्त यांच्यामधील समान दुवा म्हणजे श्री स्वामीजी व आज श्रीस्वामीजींमुळे या परक्या देशात जाऊनसुद्धा त्याला काहीच अडचण किंवा त्रास झाला नाही. विमान असो किंवा घर मिळणे असो सर्व गोष्टी अगदी सहजपणे होत गेल्या.

या सहजपणे झालेल्या गोष्टींची जाणीव आम्हाला प्रकर्षाने तेव्हा झाली जेव्हा तनयचा एक मित्र ६ दिवसानंतर ऑस्ट्रेलियाला गेला. त्याचे विमान रद्द झाले होते. त्याला आधीच्या विमानाचे पैसे तर परत मिळाले नाहीतच पण ऑस्ट्रेलियाला येण्यासाठी दुसऱ्या विमानाचे नव्याने तिकीट काढावे लागले, त्याला baggage चासुद्धा बराच problem झाला. ऑस्ट्रेलियाला पोहोचल्या वर पण त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. हे सर्व बघितले तेव्हा असे वाटते की जर आम्ही या मार्गात नसतो तर आमचीसुद्धा तनयच्या मित्रासारखीच अवस्था झाली असती. हे सर्व सांगण्या मागचा उद्देश हा की जेव्हा आपण योग्य मार्गात असतो, ईश्वरभक्ती, सेवा करण्याचा प्रयत्न करत असतो व सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वत:तील दुर्गुण ओळखून सद्‌गुण व चांगले विचार जोपासण्याचा जो थोडाफार प्रयत्न करत असतो, तेव्हा तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही जा तुम्हाला अदृष्य सृष्टीतून मदत मिळत राहते. आपल्या पुस्तकात सांगितलेल्या या विचारांचा तनयनी या काळात पुरेपुर अनुभव घेतला. तनय मला सारखा सांगतो की मी भारतातून निघाल्यापासून कायम माझी कोणीतरी काळजी घेत आहे हे मला जाणवते व वेळोवेळी मला प्राध्यापक आणि इतर सर्वांकडून मदत मिळत

राहते, सगळीकडे फक्त चांगलीच लोक भेटत राहतात. योग्य मार्गात आणल्यामुळे ईश्वराचे खूप खूप आभार.

ही पुस्तके व पोथ्या वाचनात ठेवल्याने मनाला एक स्थिरता यायला लागली आहे व आयुष्य जसे चालले आहे तसे ते बघण्याची ताकद वाढत आहे. सर्वांना मदत करा, सर्वांशी प्रेमाने वागा, शक्यतो कोणाचे मन दुखवू नका, तुम्ही जे वागाल तेच तुमच्याकडे परत येईल हे या पुस्तकातून श्रीस्वामीजींनी सांगितलेले विचार आमच्यापर्यंत पोहोचले; हे विचार नुसते पोहोचलेच नाही तर त्याचे महत्त्व पण आता कळू लागले आहे. श्रीस्वामीजींची ही शिकवण आमच्यात रुजू देत व सौ.ताईंचा आदर्श डोळ्यापुढे राहून सद्‌गुणांची वाढ होऊ देत हीच श्रीस्वामीजी व सौ.ताईं चरणी प्रार्थना.

**सौ. अस्मिता शेंबेकर**

ॐ

# तुषार रसाळ

मी अर्पणा मंडावडे. मार्च २०२१ मध्ये माझी बहीण (सौ प्रिया रसाळ) व तिचे पती (श्री तुषार रसाळ) आपल्या कुटुंबियांसह पुण्याहून होळीसाठी त्यांच्या गावी गेले. तेथे त्यांना कोरोनाची लागण झाली. सगळ्यांमध्ये कोवीडची लक्षणे दिसू लागली. तुषारची मोठी बहीण व मेहुणे पुण्यात नामांकित डॉक्टर असल्यामुळे, त्यांनी पुण्यात येऊन उपचार घेण्याचा निर्णय घेतला. लक्षणे सौम्य असल्याकारणाने, बहिणीच्या सल्लयाने घरी राहूनच (Home Quarantine) त्यांचे उपचार चालू केले गेले. तुषारची आई, मुली व प्रिया यांना त्या उपचाराचा गुण आला व त्यांच्या तब्येतीत सुधारणा होऊ लागली.

तुषारवर मात्र औषधांचा फारसा परिणाम होताना दिसत नव्हता. त्याच्या बहिणीच्या परिचयाने, पुण्यातील कोवीडच्या सर्वात अनुभवी डॉक्टरांकडे आता त्याचे उपचार सुरू करण्यात आले. HR CT report अजूनही धोक्याच्या टप्प्याच्या आत असल्याकारणाने त्यांनीही घरी राहून उपचार सुरू ठेवण्याचा सल्ला दिला. अशा प्रकारे एक आठवडा गेला. Remdesivir औषधाचा डोस पूर्ण झाला तरीही तुषारला ताप येत होता. आता त्याला खोकला येऊन धाप लागू लागली, तसेच ऑक्सिजन level सुद्धा कमी होऊ लागली. त्याला दवाखान्यात ॲडमिट करून त्याच्यावर उपचार सुरू झाले. बहीण वैद्यकीय क्षेत्रात असल्यामुळे त्याला सर्व अद्ययावत औषधे व उपचार मिळत होते.  कोवीडवर उपचार करण्याचा सर्वात जास्त अनुभव असलेले पुण्यातील डॉक्टर जातीने त्याच्यावर उपचार करत होते. असे असतानाही त्याच्या तब्येतीत काही सुधारणा दिसून येत नव्हती. आम्ही सगळेच खूप काळजीत होतो, पण तो योग्य देखरेखीखाली आहे व योग्य उपचार मिळत

आहेत या गोष्टीने स्वत:ला दिलासा देत होतो. माझी आई त्यावेळी Houston (अमेरिका) येथे होती. तिला आतून खूप अस्वस्थ वाटू लागले होते. कसलीतरी भीती वाटत होती. ती सतत आम्हाला सांगू लागली, सगळ्यांनी पोथ्यांचे वाचन वाढवा, स्तोत्रांचे पाठ वाढवा, श्रीस्वामीजींना प्रार्थना करूया, आता तेच काहीतरी करू शकतील. आम्ही तिला धीर देण्याचा प्रयत्न करत होतो.

गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी तुषारच्या बहिणीचा मला फोन आला. ती खूप रडत होती. तिने रडतच मला कसेबसे सांगितले की उपलब्ध असलेली कोवीडची सर्व औषधे तुषारला देऊन झाली आहेत परंतु त्याचे शरीर कशालाच साथ देत नाही व त्याचे आता काही सांगता येत नाही. वैद्यकीय शास्त्रात आता यापुढे करता येण्यासारखे काहीच राहिले नाही. ती अगदी हतबल होऊन खूप रडत होती. तिची परिस्थिती व बोलणे ऐकून माझ्या अंगातील त्राणच गेल्यासारखे वाटले. क्षणात माझी बहीण व तिच्या लहान मुलींचे चेहरे डोळ्यासमोर येऊन गेले. (आदल्या दिवशी रात्रीच माझ्या आईचा मला फोन आला होता, ज्यात ती मला कळवळून पुन्हा पुन्हा श्री स्वामीजींना प्रार्थना करण्यास सांगत होती व आता तेच काहीतरी करू शकतील असे सतत म्हणत होती) मी व अमरने (माझा नवरा) अक्षरश: रडतच श्री स्वामीजींना तुषारची काळजी घेण्याची प्रार्थना केली. त्यानंतर नंदिनीला फोन करून सर्व परिस्थिती सांगितली. तिने 'तुषारला उदी देऊ या व तुम्ही सगळ्यांनी त्याच्यासाठी गुरुचरित्राचे पाठ करा,' असे सुचविले. त्याप्रमाणे पुण्यात सौ रुचिकाने, तुषारच्या बहिणीकडे उदी पोहोचविली. परंतु कोवीड ICU मध्ये बाहेरून काही देण्याची परवानगी नसल्यामुळे तुषारला उदी मिळेपर्यंत संध्याकाळ झाली होती. तोपर्यंत दिवसभरात जे घडले, त्याने आम्हाला पुन्हा एकदा श्री स्वामीजींच्या, आमच्यासारख्या लहानसहान भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या दयाळू स्वभावाची व प्रचंड दैवी शक्तीची अनुभूती दिली.

आम्ही प्रार्थना केल्यावर व नंदिनीशी बोलणे झाल्यावर काही वेळातच माझ्या बहिणीचा मला फोन आला तिचे तुषारशी बोलणे झाले होते व तो म्हणत होता खरेतर मला कुशीवर वळलो तरी धाप लागते आहे परंतु आतून इतका उत्साह जाणवतो आहे की उठून खोलीत एक फेरी मारून यावी असे वाटते. (९९ टक्के फुफ्फूस ब्लॉक असणाऱ्या रूग्णाला आतून क्षीण वाटण्याऐवजी अचानक उत्साही कसे वाटू शकते यावर वैद्यकीय शास्त्रात निश्चितच उत्तर नाही). त्याचवेळी आपल्या येथील सकाळ म्हणजे अमेरिकेत रात्र असल्यामुळे माझी आई झोपली होती. तिला या सगळ्याची काहीच कल्पना नव्हती. झोपेत तिला ECG monitor वर दिसणारी वरखाली होणारी रेष दिसली, अचानक हृदय बंद पडल्यानंतर ती रेष सरळ जाते तशी जाऊ लागली व काही सेकंदातच ती पुन्हा वरखाली होऊ लागली. असे दिसल्यावर ती दचकून जागी झाली व खूप घाबरली. तिने लगेच मला फोन करून हे सांगितले, तेव्हा मी तिला समजावले की ज्याअर्थी सरळ जाणारी रेष पुन्हा वरखाली होऊ लागली त्याअर्थी श्रीस्वामीजींच्या कृपेने तुषारवरचे खूप मोठे गंडांतर टळले असावे. तू निश्चिंत रहा. आता नक्की सगळे ठीक होणार. अगदी तसेच घडले! त्यादिवशी दुपारपासून तुषारच्या तब्येतीत सुधारणा दिसू लागली. कृत्रिम ऑक्सिजनची आवश्यकता हळूहळू कमी होऊ लागली. सगळे औषधोपचार चालू असूनही सलग २१ दिवस येणारा ताप, उदी दिल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून येणे बंद झाले. पुढच्या पाच दिवसातच त्याच्या तब्येतीत झपाट्याने सुधारणा होऊन तो सुखरूप घरी परतला.

**अर्पणा मंडावडे**

**ठाणे**

ॐ

# भैरवी

मी खरंतर अगदी कमी आत्मविश्वास असणारी, भिडस्त स्वभावाची मुलगी आहे. माझ्या बहिणींमुळे (शिल्पा चौगुले व दीपा शेंबेकर) माझ्या आयुष्यात पोथ्या, स्तोत्र व पुस्तके आली. प्रथम मी, श्री दत्त स्तोत्र तसेच श्री दुर्गा त्रिशती या पोथीमधील श्री देव्या कवच व श्री देवी सूक्त यांची पारायणे करू लागले. स्तोत्रपठण व पोथीवाचन यामुळे माझ्यामध्ये आमूलाग्र बदल झाला.

कितीतरी वर्षे मी करियर व्हावे म्हणून धडपडत होते, यश येत नव्हते. पण वाचन सुरू झाल्यावर माझा आत्मविश्वास अतिशय वाढला. मी tuitions चालू केल्या. काही वर्षातच विद्यार्थ्यांची संख्या ६५ वर गेली. मी मदतीला आणखी चार teachers ठेवले.

श्रीस्वामीजींच्या पुस्तकांच्या वाचनामुळे मला दानाचे महत्व व गरज लक्षात आली. मग मलाही 'काहीतरी दान करावे' असे प्रकर्षाने वाटू लागले. त्यानुसार जमेल तसे हळूहळू दान करू लागले. मधल्या काळात मी वनिता बुक्समधे जाऊन दाभोळकर काकांकडून मार्गदर्शन घेतले. प्रथम 'मला tuitions व संसार सांभाळून एवढे वाचन जमेल का?' असे वाटून काळजी वाटत होती. कारण यापूर्वी इतका वेळ एका जागी बसून वाचन मी कधीच केले नव्हते. पण काकांनी 'दोन दिवसात तुला वेळ मिळेल तशी साधना कर' असे सांगून हिम्मत दिली. त्यांच्या सांगण्यानुसार मी भक्तीभावाने साधना चालू केली व आश्चर्य म्हणजे आज श्रीस्वामीजींच्या कृपेने माझी साधना खूप चांगली चालू आहे. थोड्याशा संकटांनी घाबरुन जाणारी मी, आता सर्व गोष्टी समर्थपणे झेलायला लागले. आर्थिक बाबतीत सांगायचे तर, प्रत्यक्ष देवाने जरी स्वप्नात येऊन सांगितले असते तरी विश्वास बसला

नसता एवढा, अचानक धनलाभ दोन वेळा झाला. मी सर्व बाजूंनी सुखी झाले.

माझा ठाम विश्वास आहे की हे वाचन माझ्याकडून कोणीतरी करवून घेत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे हल्ली वेळोवेळी जाणवते की Somebody is there who is taking care of me.

**भैरवी**

**मुंबई**

ॐ

# भूतदया–श्वानप्रेम

गेले चार दिवस रोज सकाळी सहा–सातच्या दरम्यान बिल्डींगच्या गेटजवळ अनेक कुत्री येऊन बराच वेळ भुंकत आणि पुन्हा दिवसभर गायब झालेली असत. मधेच कधीतरी एखाद दुसरा कुत्रा दिसत असे. रस्त्यावरील कुत्र्यांना आपण सर्व नेहमीच बघतो. तसेच ही कुत्री इतर भागातून आलेले एखादे वाट चुकलेले कुत्रे दिसले की त्याला सळो की पळो करून पिटाळून लावतात. पण गेले चार दिवस हे अनोखेच चित्र दिसत होते. बहुधा वेगवेगळ्या ठिकाणावरून ही कुत्री आली असावीत. हे दृश्य पाहून कोणी त्याला कुत्र्यांचा कळप म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सैनिकांच्या कवायतीत जशा रांगा दिसतात तसेच काहीसे या कुत्र्यांचे दृश्य सर्वांना दिसत होते. असे दर दोन ते तीन महिन्यांनी घडत असे पण या खेपेस एवढया मोठ्या संख्येने कधीच असा कुत्र्यांचा ताफा दिसला नव्हता. सर्वांसाठी हा एक कुतुहलाचा विषयच झाला होता.

मात्र आज ही कुत्री फार भुंकली नाहीत. त्याला कारण मन्नूभाई करोडीमल सेठ. गेल्या पाच दिवसात त्या प्रसंगानंतर तो कुणालाच दिसला नव्हता. आज सकाळी मात्र या कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे त्याने खिडकीतून डोकावले. त्याने सर्व कुत्र्यांना त्यांच्या नावाने हाक मारून अभिवादन केले. तेव्हा कुठे ही सर्व कुत्री भुंकायची थांबली. एकमेकांशी मैत्री असल्यागत शेपट्या हलवीत वेगवेगळे आवाज काढत व लाडात येत, मन्नूभाईकडे आनंदाने पाहत निघून गेली.

मन्नूभाई करोडीमल सेठ कपड्यांचा मोठा व्यापारी. मुंबईत अनेक ठिकाणी भर मार्केटमध्ये त्याची मोठी मोठी दुकाने. हैद्राबाद, अहमदाबाद

आणि चेन्नईवरुन वेगवेगळ्या प्रकारच्या साडया, शर्ट, पँट आणि इतर कापड घाऊक पद्धतिने विकत घेत असे. दर दोन तीन महिन्यांनी आफ्रिका, दुबई अथवा थाईलँड येथे जाऊन माल विक्री करून येत असे. मन्नूभाई व्यापारात एकदम पक्का पण मनाने अतिशय प्रेमळ. सर्वांशी मिळून मिसळून वागत, शक्य असेल तशी सर्वांना मदतही करत असे. फार पूर्वी म्हणजे वीस पंचवीस वर्षांपूर्वी मन्नूभाई आणि त्याची बायको दोघे मिळून कॉलनीभर घरोघरी कापडाची गाठोडी घेऊन विक्रीस जात असत. त्यामुळे मन्नूभाई सेठला बरेचजण ओळखत होते. आता परिस्थिती एकदम वेगळीच. मन्नूभाई स्वत:च्या कारमधून मार्केटला ये-जा करत. त्याला आता घरोघरी माल घेऊन फिरावे लागत नाही.

मन्नूभाई म्हणजे भूतदयेचा आविष्कारच. माणुसकी आणि प्रेम करणे हे त्याच्याकडे येणाऱ्या प्रत्येकास जाणवते. मन्नूभाई सदैव पांढरा लेंगा आणि कुर्ता याच वेशात असायचा. खांद्यावर जानवे घालावे तशी मोठी झोळी घालूनच दिसायचा. जेव्हा त्याला कोणी भेटत असे तेव्हा थोडे थांबून हमखास त्याच्याशी बोलायचे. भेटलेल्यामध्ये जर लहान मुले असतील तर त्या मुलांना एक चॉकलेट हमखास मिळणारच. मन्नूभाईची झोळी सदैव खाऊने भरलेलीच असे.

जेव्हा त्याचा दौरा बाहेरगावी अथवा परदेशी नसे, तेव्हा रोज सकाळी सहा ते नऊ त्याची कॉलनीभर आणि जवळच असणाऱ्या दोन तळ्यांवर फेरी असतेच. त्याची प्रभात फेरीच जणू. त्याला जर भेटायचे असेल तर ती हीच वेळ होती, जेव्हा हमखास तो भेटत असे. नेहमीची झोळी आणि एक मोठी कापडी पिशवी घेऊन तो फिरत असे. मोठ्या पिशवीत नेहमी कुरमुरे, बिस्किटे, दुधाच्या पिशव्या आणि दह्याचे डबे. कधी शिजवलेला भात व

भाजलेल्या मऊ मऊ चपात्या आणि दुधासाठी दोन तीन प्लास्टिकचे लांबट वर्तुळाकार पसरट डबे ठेवलेले असत. त्याच्या मागोमाग रस्त्यावरील प्रत्येक गल्लीतील कुत्री असतच. हा देखावा सर्वांनाच परिचित होता.

रस्त्यावरील कुत्र्यांवर त्याचे अपार प्रेम. त्यांना वेगवेगळी नावे ठेवलेली आणि गम्मत अशी की त्या कुत्र्यांना त्यांच्या नावाने हाक मारली की ते कुठेही असोत धावत–धावत मन्नूभाईच्या पुढ्यात हजर होत. राजो, रज्जू, दामिनी, शिखा, लाली, लाडो, मुन्ना, अप्पू, अशी अनेक नावे ठेवलेली ही रस्त्यावरील कुत्री म्हणजे मन्नूभाईचे कुटुंबच. एखादा कुत्रा किंवा कुत्री त्याच्या जागेवरून उठून आले नाहीत तर मन्नूभाई त्यांना त्यांच्या नावापुढे महाराज किंवा महाराणी लावून त्यांना संबोधित असत. सकाळी फिरायला येणाऱ्या लोकांना हे बघून मजा यायची. त्यांना मन्नूभाईचे या बाबतीत कौतुक आणि कुतुहलच वाटे. अनेक लोकांना जरी या रस्त्यावरील कुत्र्यांची भीती वाटत असली तरी, ते लोक त्याला स्वत:हून पैसे, बिस्किटे अथवा दूध विकत घेऊन देत असत. त्यांचाही या कामात छोटासा हातभार. खारीचा वाटा. मन्नूभाई देखील त्यांच्याकडून ते आनंदाने घेत असे. लोकांच्या परोपकारी भावनेचा तो नेहमीच आदर करतो. त्यांनाही पुण्य मिळावे हीच त्याची भावना.

मन्नूभाईला झुंडीत एखादा नवीन कुत्रा आला की लगेच कळायचे आणि जे सुचेल ते नाव लगेच ठरवून त्या नावाने त्या कुत्र्याला हाक मारण्यास सुरुवात करत. सर्वांना समान खाणे वाटप करत. मन्नूभाई सेठ, कुत्र्यांच्या डॉक्टरांच्या संपर्कात सतत असतात. कोणत्याही कुत्र्याने खाणे खाल्ले नाही किंवा खाणे अर्धवट टाकले की त्याची नोंद करतात. डॉक्टरांनी दिलेली औषधे खाण्यात कालवून त्यांना देतात. एखादी कुत्री पिल्ले घालणार असेल

तर तिला जास्त दूध देणे, दूध भात किंवा दही भात खाण्यास देतात. एखादी मोहीम काढून काही कुत्र्यांना इंजेक्शनही दिले जात असे. पुन्हा कुत्रीने पिल्ले घालू नयेत या करताही तो महानगर पालिकेच्या संपर्कात नेहमीच असतो आणि त्या कुत्रीचे लसीकरण करून घेत. कुत्र्यांचे संगोपन नीट व्हावे याकरता तो नेहमीच झटत असतो. त्याचे पक्षांना खाऊ घालणेही अतिशय मनोरंजक. कधी कधी चपात्याचे तुकडे आकाशात उडवत आणि कावळ्याची उडवलेल्या तुकड्यावरील झडप घालताना पाहणे, हे मनमोहक दृश्य बघण्यासारखेच होते. कबुतर, चिमण्या, मैना, साळुंकी व इतर पक्षांनाही कुरमुरे, शेव आणि चणे खाऊ घालत. बहुतकरून हे पक्षी त्याच्या अंगावरच बसत. तळ्यातील मासे, कासव यांनाही तो कुरमुरे, कधी भाताची शिते खाण्यास देत असे. कासवांनाही खाऊ घालत. मन्नूभाई पाणवठ्याजवळ आला रे आला की माशांचा आणि कासवांचा घोळकाच घोळका त्याचा पायाशी येत. त्यावेळेस रंगीबेरंगी मासे अतिशय मोहक दिसत असत. बदकांचीही रांगच रांग त्याच्या मागे मागे फिरत असे. मन्नूभाई सेठला आता सगळे कुत्रेवाले मन्नूभाई म्हणूनच ओळखू लागले होते. जलचर व इतर प्राण्यांना खाऊ पिऊ घालणे हे खरोखर पुण्यकर्मच.

माणसेच नव्हे तर प्राणीसुद्धा मन्नूभाईवर प्रेम करतात. याचा मूर्तिमंत दाखला या कुत्र्यांचा घोळक्यामुळे समजला. पाच दिवसांपूर्वी मन्नूभाई परदेशी दौऱ्यावरून भल्या पहाटे तीन वाजता त्याचा राहत्या घरी जाण्यासाठी बिल्डिंगजवळ ओला कारमधून उतरला. खूप सामान नव्हतेच. हातात पैसे आणि पासपोर्ट असलेली एक छोटी बॅग व चार दिवस लागणारे कपडे असलेली दुसरी बॅग घेऊन सोसायटीच्या पायऱ्या चढत असताना, चारपाच चोरांनी त्याच्यावर हल्ला केला. मन्नूभाई सेठ आणि त्यांच्यामध्ये झटापट

झाली. मन्नूभाई पायऱ्यांवरून गडगडत खाली रस्त्यावर पडला. चोरांना त्याच्या हातातील पैश्यांची बॅगच तर हवी होती. हे मन्नूभाईच्या लक्षात आले. त्यानी खूप प्रतिकार केला. त्याचवेळी त्याच्या तोंडून मोठमोठ्याने सर्व कुत्र्यांची नावे निघाली. मन्नूभाई जीवाच्या आकांताने कुत्र्यांची नावे घेऊन ओरडत होता. झाले क्षणार्धात सर्व बाजूंनी कुत्री धावली. मन्नूभाईला त्या कुत्र्यांची खूपच मदत झाली. चोरांना हे अगदीच अनपेक्षित होते. कुत्र्यांनी चोरांना रक्तबंबाळ केले. चार-पाच चोर आणि असंख्य कुत्री. चोरांची त्रेधातिरपीट उडाली त्यांना पळता भुई थोडी झाली. सोसायटीचा गुरखा त्यांच्या मदतीला धावला. त्याने इतर सोसायटीच्या वॉचमनना जोरजोरात हाका मारल्या. मन्नूभाईलासुद्धा खूप दुखापत तसेच जखमही झाली होती. आजूबाजूच्या दुकानात काम करणारी आणि तेथेच झोपणारी माणसेही धावली.

लोकांनी चोरांना पकडले. पोलिसांना फोन करून बोलावले. पोलिस आले आणि सर्व चोरांना पोलिस व्हॅनमध्ये बसविले. इन्स्पेक्टर मन्नूभाईला घेण्यास जसे वळले तसे स्तब्ध उभेच राहिले. समोरील दृश्य बघतच राहिले. मन्नूभाई सेठ घळाघळा रडत होता. ते त्याचे आनंदाश्रू होते. तो कुत्र्यांना कुरवाळत होता. सर्व कुत्रीसुद्धा त्यांना चाटत होती. त्याच्या अंगाशी लडिवाळपणे लगट करत होती. प्रत्येक कुत्रा मन्नूभाईचा हात त्यांच्या अंगावरून फिरावा म्हणून धडपडत होता. न भूतो न भविष्यती असे ते दृश्य अचंबित, अनाकलनीयच.

रितसर पोलिस केस दाखल झाली. चोरांना त्यांच्या कर्माची शिक्षा मिळाली. मन्नूभाईचे आर्थिक अथवा वस्तूचे काहीच नुकसान झालेले नव्हते. मन्नूभाईला मुका मार मात्र लागला होता. त्याना पूर्णवेळ आरामाची अत्यंत

गरज होती. त्यामुळेच तो रोजच्या त्याच्या प्रभात फेरीला जाऊ शकत नव्हता. याच कारणास्तव गेले चार दिवस, रोज सकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान बिल्डींगच्या गेटजवळ अनेक कुत्री येऊन बराच वेळ भुंकून जात होती. उद्यापासून मन्नूभाईची प्रभात फेरी सुरू होणार होती. तसे त्याने खिडकीतून ओरडून त्यांच्या कुटुंबियांना सांगितलेही.

**रविंद्र रामचंद्र बुधकर**

**मुंबई**

ॐ

# फरिश्ता

माझे नाव रविंद्र रामचंद्र बुधकर. शिकागो (अमेरिका) ते मुंबई प्रवासात मला अतिशय अद्‌भुत अनुभव आला. खरं म्हणजे मला एकट्याला पाठवायचे माझ्या मुलाच्या मनात नव्हते कारण मला पोटाचा त्रास होता.

विमानाचा प्रवास सुरू झाला होता. विमानातील कर्मचारी सर्वांची विचारपूस आणि खानपानाच्या सोयीचे बघत होते. मी माझ्या जागेवर शांत बसून होतो. गेले दोन दिवस माझ्या पोटात बारीक बारीक दुखत होते आणि फारच जळजळत होते. विमानात जेवण, नाश्ता, चहा आणि इतर पेयांची सुविधा होती. पण मला काहीच खावेसे किंवा प्यावेसे वाटत नव्हते.

तेवढ्यात अचानक आलेला हा पठाण मला देवदूतच वाटला. त्याने समोरून येऊन माझ्या दोन्ही खांद्यावर हात ठेवले आणि म्हणाला खुदा की मर्जी और उसके मर्जी से सब दुनिया चलती है। कोई फिकीर नको। सब कुछ ठीक होगा। अल्लाह मेहरबान। अंगात फिकट लाल रंगाचा स्पोर्टस्मन ट्रॅकसूट, पायात लालसर जाड पांढरी रेषा असलेले स्पोर्टशूज आणि गळ्याभोवती मानेखाली गाठ मारलेला पांढऱ्यावर निळ्या रेषा असलेला, आकाराने मोठाच रुमाल. साडे सहा फुट ऊंची, आडव्या अंगाचा लाल गोरापान, टपोरे डोळे, डोळ्यात घातलेलं अंजन. सरळ टोकदार नाक आणि प्रसन्न हसतमुख चेहरा. त्याच्या या पद्धतिने झालेली ओळख मला खूपच दिलासादायक आणि उत्साहवर्धक वाटली. माझे नाव विचारून तो मला रविभाई असे संबोधित होता. त्याने त्याचे नाव मोझिम अहमद असे सांगितले. मी त्याला मोझिम साहब असे म्हटले तर थोडासा रागावला मग मी त्याला मोझिमभाई असे म्हणू लागलो. त्यावर त्याने हसून मान्यता दर्शविली.

मै तुमको जो देती वोईच खावों और ये थोडा पानी पिलो। Just do what I say. आवाजात धमकी नव्हती तर काळजी, जिव्हाळा आणि काळजीपोटी असणारे प्रेम जाणवत होते. खरे तर मला कुणाची ना कुणाची गरज होती. पण मला या गोष्टीचे कुतूहल होतेच की हा पठाणी जो थातुरमातुर हिन्दी आणि अस्खलित इंग्रजीत माझ्याबरोबर बोलतोय याला कसे कळले की मला सोबतीची गरज आहे. हा विचार सारखा माझ्या मनात घोळत होता.

माझ्यासमोर त्याने एक लांबट गुलाबी रंगाची अंगठ्याएवढी गोल डबी काढून त्यातील गुलाबी रंगाची गोळी आणि थोडेसे पाणी दिले. ये तुम खाती तो तुमारी पेट को आराम मिलती. मी काहीही आढेवेढे न घेता ती गोळी घेतली. थोड्या वेळाने येऊन अजून एक हिरवी डबी काढून हिरवी गोळी, सफरचंदाच्या रसाबरोबर दिली. ते पित असताना तो म्हणाला ये जूस मै बनाती मेरी फॅक्टरी मे। My Brand. It is supplied at international level even in all international flights too. ये तुमको एनर्जी देती। तुमारी पेट की बर्निंग और दुखी बंद हो जाती। एकदम आराम देती। हे ऐकल्यावर मला खूपच आश्चर्य वाटले. मी त्याच्याकडे पाहतच राहिलो. त्याला माझे दुखणे कसे कळले या विचारात थोड्या वेळाने मला झोप लागली. बराच वेळाने मला जाग आली ती त्याच्या हालचालीमुळे. माझ्या अंगावर पांघरूणदेखील घातलेले होते. मोझिमभाई माझ्या बाजूच्या सीटवर बसून माझ्याकडे तिरक्या नजरेने बघत गालातल्या गालात हसत होता. अभी कैसे लगती, आराम मिली ? मी त्याला वॉशरूमला जाऊन येतो म्हणालो तर तो माझ्या मागोमाग आला. बिजनेस क्लासमधून जाताना त्याने कुणालातरी हात केला. परत मी आणि तो आमच्या जागेवर आलो. आता मला राहवेना. मी त्याला विचारले की तुला कसे कळले की मला बरे वाटत नाही. माझे दुखणे तुला कसे कळले. त्यावर तो हसला आणि म्हणाला I am also

suffering from same my dear Ravibhai. त्याने माझ्या बाजूला बसणाऱ्या व्यक्तीस त्याच्या बिजनेस क्लास सीटवर बसण्यास सांगून मोझिमभाई माझ्याशेजारी इकॉनॉमी क्लासमधे बसला. मी काही खाणार किंवा पिणार नाही हे त्याने ऐकले किंवा पाहिले असावे की काय असे मला वाटले. मला आता खूपच बरे वाटत होते.

मी त्याला वारंवार विचारत राहिलो की माझी काळजी घ्यावी आणि मदत करावी असे तुला का वाटले. त्याने मला जे सांगितले ते अत्यंत अचंबित करणारे होते. त्याच्या बिजनेस क्लास सीटवर त्याला तीव्रतेने असे जाणवले की त्याने मला मदत करावी. त्याला कुणीतरी कोणत्यातरी अज्ञात शक्तीने किंवा त्याच्या अल्लाहने, मला मदत करण्याची आज्ञा केली. त्या सुप्रिम अनामिक शक्तीने, त्याच्या अल्लाहने त्याला एक उत्तम संधी दिली आहे आणि ती त्याने मुळीच गमावू नये. त्याला असेही वाटले की त्याने केलेल्या चुकांचे परिमार्जन करण्याची संधी चालून आली आहे अथवा अल्लाहची अजून एक मर्जी मिळवता येणार आहे. रविभाई तुम जिंदगीमे अच्छा काम करी. दुसरोको मदत करी उसका मीठा फल, तुमको उपरवाला, खुदा मालिक बक्षा है और मालिक ने उसके बंदे की सेवा करने का मुझे मोका देती. In world, there is always an aura around every live species and lightened waves are received, reciprocated and passed on. Our waves matched and this is what happened with you and me Ravibhai . ईंसान के जनम मेही ईंसान अगर अच्छा करम करती तो उपरवाला कबूल करेगी. God returned it with gift and you received it in the same life. मी हे ऐकून खरोखरच हबकूनच गेलो.

त्याने आपणहून त्याची माहिती दिली. त्याची दोन मुले, दोन मुली

आणि त्याची बायको बिजनेस क्लासमध्येच बसलेली होती. त्याचा सर्व परिवार दिसण्यातच नव्हे तर वागण्यात आणि बोलण्यातही अगदी सुंदर आणि लाघवी होता. तो नेहमीच आयुर्वेदिक गोळ्या त्याच्या मौलविबाबांकडून घेतो. खास करून तो प्रवास करताना घेतोच घेतो आणि त्याच्यातल्याच गोळ्या त्याने मला दिल्या होत्या. त्याचे स्वत:चे एक पंचतारांकित हॉटेल आणि दोन फळांच्या बागा आहेत. फळांचे रस काढण्याचा कारखाना आहे. प्रत्येक मुलांमध्ये तीन वर्षाचे अंतर आहे. बायको मेक्सिकन असून सुंदर व सुग्रण आहे. मोझिमभाई गेली पस्तीस वर्षे अमेरिकेतील शिकागोला वास्तव्य करून आहेत. त्यांनी त्यांचे आई, वडील, दोन भाऊ, तीन बहिणी यांना त्यांच्या परिवारासकट अमेरिकेत स्थायिक केले आहे. ते सर्वजण ग्रीन कार्ड होल्डर असून सर्वजण व्यवसायात व्यस्त आहेत.

मोझिमभाई म्हणाला रविभाई तुम बहुत देरतक कुछ खाए नही। मेरी वाईफने बहुत अच्छा खाना घरसे बनवाकर साथमे लाया है। आपको गरमागरम वेज पुलाव देती। मला भूक होती पण मी त्याला छानपैकी कॉफी पिणार म्हणालो. कॉफी भी देती, मगर पहिले गरमागरम वेज पुलाव उसके बाद गरम कॉफी पिलाएंगे। मोझिमभाई फारच उत्साहित होते. त्यांनी पुलाव गरम करण्यास विमानातील हवाईसुंदरीला बोलावून सांगितले. गरम केलेला पुलाव देण्याअगोदर मोझिमभाई माझ्या गळयातले जानवे पाहून म्हणाला की रविभाई आप तो हिंदू हो वो भी बामन हिंदू और मै मुसलमान पठाण क्या मेरी घर की खाना आपको चलती। मी त्यांच्याकडे हसत बघून पुलाव खात होतो. पुलाव संपत असतानाच त्याने स्वतः कॉफी करून माझ्या हातात कप दिला आणि स्वत:ला सफरचंदाचा रस मागवला. मला आता खूपच बरे वाटत होते. आम्ही दोघेही खूपच आनंदात होतो आणि छान गप्पा मारत होतो. विमानातील हवाईसुंदरीने मला सांगितले की मी मोझिमभाईचा अत्यंत महत्वाचा माणूस

असणार आणि म्हणूनच तो तुमची म्हणजे माझी खूप सेवा करत आहे. त्याने स्वत:ची बिजनेस क्लास सीट सोडून, तुमच्याबरोबर बसला आहे. असे दृश्य यापूर्वी माझ्या सर्विसमध्ये मी स्वतः कधीच अनुभवले नाही. मोझिमभाईने त्याचे दोन्ही हात वर करून खुदाकी मर्जी असे म्हटले. मी त्या हवाईसुंदरीचे आभार मानले. मीसुद्धा त्याच्या या सेवेने भारावलो होतो. मला येणारा अनुभव खचितच फार अनोखा होता.

मोझिमभाईचा देवावर, त्याच्या अल्लाहवर गाढा विश्वास. त्याला त्याच्या आयुष्यात स्पिरीचुयल पॉवरचे अफाट अनुभव आलेले आहेत. आजपर्यंत तो जे काही आहे ते त्या अल्लाहमुळेच, असे त्याचे म्हणणे. अर्थात् माझाही यावर विश्वास आहेच. खरे तर प्रत्येकाला आपल्या धर्माचा नेहमीच आदर आणि अभिमान असतोच पण मोझिमभाई हिंदू धर्माचाही खूपच आदर करतो. त्याच्या सर्व मुलांचा जन्म अमेरिकेतच झाला. त्याच्या मुलांना तो दिवसातून पाचवेळा नमाज पढण्यास लावतो. त्याचबरोबर त्यांना एक खास शिक्षक ठेवला आहे. तो शिक्षक त्याच्या मुलांना उर्दू, हिन्दी आणि गीतेतील काही श्लोकांचा अनुवाद करून शिकवतो. काही हिंदू राष्ट्रातील ऐतिहासिक किस्से भाषांतर करून सांगतो की ज्यामुळे मानव हीच जात आणि मानवता हाच धर्म हे त्यांना समजावे तसेच हिंदू धर्माचेही किती महत्व आहे हे त्यांना जाणीवपूर्वक कळावे आणि त्यांनी त्याचे अनुसरण करावे अशी त्याची व त्याच्या आईवडिलांची तीव्र इच्छा आहे. त्याच्या आईवडिलांनी हिंदुस्तान फाळणीपूर्वीचा अनुभव घेतला होताच. आजही तो मुलांना आणि त्याच्या बायकोला घेऊन धार्मिक यात्रेवर चालला होता. मुलांची खरे तर शाळा चालू होती पण त्याने त्यांच्या शाळेत चिठ्ठी लिहून आठ दिवसांची रजा मिळवली होती. मुलांकडून मस्जिदीच्या बाहेर दूध, फळे, पाणी आणि इतर खाद्यपदार्थ वाटायचे ठरवले होते. हे करताना त्याच्या मुलांना माणुसकी, दया आणि

अल्लाहचा अनुभव आणि परोपकारी भावना यावी, हीच त्याची सदिच्छा. त्याने त्याच्या मुलांसाठी भरपूर कमावून ठेवले आहे पण या अनुभवाचा प्रत्यय त्यांना स्वत:ला मिळावा आणि त्यांचीही पुण्याईची शिदोरी वाढावी असे त्याला मनापासून वाटत होते. जगात लोकांना काय काय भोगावे लागते याची जाण त्याच्या मुलांना असावी, असे त्याचे विचार होते.

मोझिमभाईने विमानातच त्याच्या मुलांची एक एक करून बोलावून माझ्याशी ओळख करून दिली. मला त्याच्या मुलांना भरभरून आशीर्वाद देण्यास सांगितले. त्या मुलांना तो मला वाकून नमस्कार करण्यास भाग पाडत होता. मीही मनापासून त्यांना आशीर्वाद दिलाच. खरे तर मीच त्यांचा उतराई होतो कारण त्यांचे पिता सतत माझ्याबरोबरच होते. मोझिमभाई मला अल्लाहच्या मर्जीतला समजत होता. त्याची प्रचिती अनुभवत होता. मोझिमभाई माझ्याकरता अल्लाहकडे दुवा मागणार होता. माझी तब्येत तंदुरुस्त रहावी आणि माझा परिवार सुखी राहावा यासाठी प्रार्थना करणार होता. माझ्या मुलाची मी अजिबात काळजी करू नये असे वारंवार मला बजावून सांगितले. माझ्या मुलाने त्याला केव्हाही फोन करावा आणि त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची मदत, सेवा हक्काने मागून घ्यावी असे फर्मानच सोडले. त्याने माझ्या मुलाचा ध्वनिक्रमांक मागून घेतला आणि त्याची नोंद करून घेतली.

आमचे विमान आबूधाबी विमानतळावर लवकरच उतरणार होते. त्याने माझा आणि त्याचा सेल्फी, त्याच्या मुलाला काढायला सांगितला. माझे सामान काही आहे का असे त्याने विचारले. माझ्या गळ्यातील बॅगेशिवाय माझ्याकडे काहीच नव्हते. त्याने एक कागदाची पुडी मला दिली त्यात दोन-दोन आयुर्वेदिक गोळ्या दिल्या. त्या गोळ्या मी दुधाबरोबर घ्याव्या असे सांगितले. तसेच मी मुंबईला घरी पोहोचलो की त्याला व्हॉटस्प मेसेज करावा असे मला सांगितले.

आबूधाबीला विमानातून बाहेर मी हळूहळू चालत आलो. काही पावले चालून गेल्यावर मला लगेच मोझिमभाई दिसला. तो एका पोलीसाला माझ्याकडे बोट दाखवून अरेबिक भाषेत बोलला. त्या पोलिसाने वॉकी-टॉकीवर काहीतरी सांगितले आणि लवकरच मला व्हीलचेअर मागवली गेली. त्या दरम्यान मोझिमभाईची बायको माझ्याशी बोलली. मला परत शिकागोला आलो की घरी येण्याचे आमंत्रण दिले. मोझिमभाई आणि मी एकमेकांना कडकडून मिठी मारली. पुन्हा भेटण्याचे आश्वासन दिले. पोलिसाने मला व्हीलचेअर मध्ये बसण्यास मदत केली. आता त्या गँगवेमध्ये इतर कुणीच नव्हते. माझी व्हीलचेअर पुढे जात असताना फक्त मोझिमभाई आणि त्याचा पूर्ण परिवार रांगेत असल्यासारखे बाजूला उभे होते. त्यांनी सर्वांनी उजवा हात स्वत:च्या छातीच्या उजवीकडे ठेऊन अल्लाह मेहेरबान! खुदा हाफिज! सुभानल्लाह! असे माझ्याकडे बघून म्हटले. मीही त्यांना शुक्रिया! थँक्यू! फिर मिलेंगे! असा प्रतिसाद दिला. मी मुंबईला येणाऱ्या विमानाच्या स्थळाकडे निघालो आणि ते सर्व त्यांच्या मार्गाने गेले. आबूधाबी पोलिसाने मला चौकशी आणि चेकिंग विभागातून सुखरूप बाहेर काढून, मुंबईच्या विमानात बसवून, मगच तो त्याच्या पुढच्या कामाला निघून गेला.

मी फारच भारावून गेलो होतो. मोझिमभाई माझ्या अगदी जवळचा सखा होऊन गेला. पुन्हा एकदा मला परमेश्वराची त्या अद्भुत शक्तीची प्रचिती आली आणि कदाचित मोझिमभाईला त्याच अद्भुत शक्तीची अनुभूती मिळाली. मी मुंबईला पहाटे अडीचला उतरलो. कदाचित गोळ्यांचा अम्मल कमी झाला असावा. मला थकवा जाणवू लागला. पोटात बारीक दुखणे आणि जळजळणे पुन्हा चालू झाले होते. माझ्या बायकोने मला रिसीव केले. मी घरी येता येता तिला मोझिमभाईविषयी थोडक्यातच सांगितले. तिलाही ऐकून कुतूहल वाटले पण तिला रागही आला होता कारण तिच्या दृष्टीने मी एका

अनोळखी माणसाकडून त्याने दिलेल्या गोळ्या खाल्ल्या होत्या. पण मला मोझिमभाई पहिल्या भेटीतसुद्धा अजिबात परका वाटला नाही. घरी पोहोचेपर्यंत चार वाजले. घरी आल्यावर मी मोझिमभाईने दिलेल्या गोळ्या दुधाबरोबर घेण्याचे मिसेसला सांगितले पण मला तिने तसे करू दिले नाही आणि मलाही तिचे मन मोडता आले नाही. मी गोळ्या घेतल्याच नाही. मिसेसने माझ्या मुलाला सुखरूप पोहोचल्याचे कळवले पण मी तिला पुन्हा पुन्हा सांगूनसुद्धा मोझिमभाईबद्दल काहीही सांगितले नाही. त्याच दिवशी सकाळी आमच्या फॅमिली डॉक्टरकडे गेलो. माझा ECG चेक केला. पुन्हा पुन्हा चेक केला पण रिपोर्ट विपरीतच येत होता. मला लगेच ॲडमिट केले. सर्व तपासण्या केल्या. रिपोर्ट घेतले आणि निदान केले. मला न सांगता, माझ्या मिसेसला आणि इतर नातेवाईकांना सांगितले की मला माईल्ड हार्ट ॲटॅक येऊन गेला आहे. मला डॉक्टरने छोटी सर्जरी करावी लागेल असे सांगितले. माझी तीन दिवसांनी बायपास केली. पुढील तीन दिवस ऑबझरवेशनमध्ये ठेवले.

मला मोझिमभाईला कळवावेसे वाटले. तो माझ्या फोनची अथवा मेसेजची नक्कीच वाट बघत बसला असेल असे वाटले. मला बोलताही येत नव्हते आणि मोबाइल वापरणे वर्ज्य केले होते. मी मागे लागल्यामुळे मिसेसने शेवटी त्याला मेसेज आणि व्हॉइसमेसेज पाठवले. त्याचे काहीच उत्तर आले नाही. मी फारच खजील झालो होतो. मला घरी जाण्याची परवानगी मिळाली आणि त्याच दिवशी मला माझ्या बायपासचे कळले. त्या अगोदर मला छोटीशी मामुली सर्जरी एवढेच माहीत होते. याचा अर्थ मी माईल्ड ॲटॅक नंतरच प्रवास करून आलो होतो. त्या अद्भुत शक्तीनेच मोझिमभाईला ते सांगितले असावे. त्याच्या रूपातच मला त्या शक्तीने संपूर्ण प्रवासात आधार दिला होता व माझी सर्जरी पण व्यवस्थित पार पडली होती.

मोझिमभाई माझ्यासाठी फरिश्ता होता. माझा फोन मला मिळताच मी मोझिमभाईला अपराधी भावनेने माफीचा व्हॉइसमेसेज टाकला. त्याची माफी मागितली लगेच कळवले नाही याबद्दल. त्याचा व्हॉइसमेसेज चार दिवसांनी आला. एअरपोर्ट भेटीच्या तिसऱ्या दिवशी त्याने अल्लाह मालिककडे माझ्या सेहतसाठी दुवा मागितली. अल्लाहने त्याची हाक ऐकली होती. त्याच दिवशी माझी बायपास झाली होती. आताही दोन दिवसापूर्वी त्याचा व्हॉइसमेसेज आला की तो मक्का मदिनासाठी जात असून माझ्या दोस्तीची आणि माझ्या तब्येतीसाठी प्रार्थना करणार आहे. माझी खात्री आहे अल्लाह त्याची सेवा, प्रार्थना कबूल करणारच. मी पण मनापासून माझ्या प्रभूला, दत्तदिगंबरना, स्वामी समर्थांना आर्जव केली की त्याला आणि त्याच्या कुटुंबीयांना सदैव सुख, शांती आणि उत्तम आरोग्य लाभो. तसे मी त्यालाही कळवले.

आजही मी आणि मोझिमभाई विचारात आहोत की त्याला माझी मदत करायला सांगणारी आणि पाठवणारी ती अद्भुत अनाकलनीय शक्ती कोणती? माझी पूर्णपणे खात्री आहे की अल्लाह आणि प्रभू म्हणजेच अल्लमप्रभू, दत्ताचेच अवतार यांनीच माझी आणि मोझिमभाईची भेट घालून दिली. त्याचे नी माझे नाते आता अतूटच. परमेश्वर एकच पण त्याची रुपे अनेक. त्याची लीला अपार. परमेश्वर तुमची इच्छा असो वा नसो त्याला जे घडवून आणायचे ते आणतोच. जिथे आशा, विश्वास आणि प्रयत्न असतात तेथे नक्कीच चमत्कार घडतात.

**रविंद्र रामचंद्र बुधकर**
**मुंबई**

ॐ

# गुरुप्रसाद सोलापूरकर

श्रीस्वामीजी व सौ. ताईंना कोटी कोटी प्रणाम. माझे नाव गुरुप्रसाद सोलापूरकर असून मी कोथरूड, पुणे येथे राहतो.

माझी पाच वर्षांची मुलगी ईशानी ही बऱ्याचदा अस्वस्थ असून तिला प्रचंड राग येत असे. यावर आम्ही होमियोपथी औषधेसुद्धा घेतली. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. सुमारे चार महिन्यांपूर्वी मी वनिता बुक्स मुंबई येथे फोन केला व श्री दाभोळकरकाकांशी सविस्तर बोललो. त्यांनी तिच्याकडून गणपती स्तोत्र म्हणून घेण्यास सांगितले. त्यानुसार आम्ही दोघांनी (मी व ईशानी) रोज २१ वेळा गणपती स्तोत्र म्हणण्यास सुरुवात केली. तेव्हापासून तिच्यात आमुलाग्र बदल होऊ लागला. आता ती खूप शांत झाली असून मोठ्या माणसांचे ऐकू लागली आहे. आता ती अभ्यासही उत्तम करते व drawing ही काढू लागली आहे. ती सर्वांशी प्रेमाने वागते, यामुळे आम्हा पति-पत्नींना खूप आनंद झाला आहे.

मी दीड वर्षांपासून, रोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** हा ग्रंथ, एक दिवस चार व दुसऱ्या दिवशी तीन अध्याय असे वाचतो. म्हणजेच दोन दिवसात एक पारायण पूर्ण होते. मी श्रीस्वामीजींची सर्व पुस्तके वाचली असून त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न करतो. माझ्या धाकट्या मुलीचे नाव श्रीजा असून ती नऊ महिन्यांची आहे.

माझ्या दोन्ही मुली धार्मिक, आनंदी व धीट होऊ देत. परमेश्वराला अभिप्रेत असलेले आचरण आम्हा चौघांच्या हातून होऊ दे तसेच श्री स्वामीजी, सौ. ताई यांची कृपादृष्टी सदैव माझ्या कुटुंबावर राहो ही प्रार्थना!

**गुरुप्रसाद सोलापूरकर**

**पुणे**

ॐ

# शिवाजी जगन्नाथ काशीद

मी, सध्या पुण्यात, पाषाण येथे राहतो. माझे वय ७९ आहे. साधारणतः सुमारे दीड वर्षापूर्वी मला माझ्या वकील मित्राकडून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** ही पोथी मिळाली. ती मी श्रद्धेने वाचावयास सुरुवात केली. नंतर वनिता बुक्सद्वारे छापलेली सर्व पुस्तके मी विकत घेतली व ती वाचली. फेब्रुवारी २०२० मध्ये ऑस्ट्रेलियाला जाण्याचा योग आला. मी जाताना फक्त श्रीस्वामी दत्तावधूत यांचे ग्रंथ घेऊन गेलो. तिकडे मी **श्री दुर्गा सप्तशती** वाचत होतो व अधूनमधून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** देखील वाचनात होते. ऑगस्ट २०२० मध्ये मी परत भारतात आलो. माझ्या मुलाला दारूचे खूप व्यसन लागलेले होते. माझ्या मुलाच्या व्यसनात फरक पडावा असे मला मनोमन वाटत होते. त्यासाठी मी बऱ्याच ठिकाणी फिरलो पण काहीही उपयोग झाला नाही. मी सहजच वनिता बुक्समध्ये फोन केला व यावर काय उपाय आहे का म्हणून विचारले असता, श्री दाभोळकर सरांनी मला श्री दुर्गा सप्तशती ग्रंथ घरात मोठ्याने वाचावयास सांगितला. मी तो ग्रंथ वाचावयास सुरुवात केली आणि माझ्या मुलाच्या व्यसनात चांगलाच फरक पडला. तो माझ्याशी नीट बोलायला लागला व त्याचे व्यसन पूर्णपणे सुटले. त्यामुळे मी श्री दुर्गा सप्तशती ग्रंथ दररोज वाचण्यास सुरुवात केली. मुलगा व्यसनातून पूर्णपणे बाहेर आला. त्यामुळे मला खूप समाधान व आनंद वाटत आहे.

मला प्रोस्टेटचा त्रास होत होता. डॉक्टरांनी मला ऑपरेशन करावयास सांगितले. मी श्रीस्वामी समर्थांच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घेऊन दिनांक

३ फेब्रुवारी २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालो व माझे ऑपरेशन व्यवस्थित झाले. त्या दिवशी संध्याकाळी सात ते आठच्या दरम्यान मी कॉटवर पडलो असता छतावर बऱ्याच देव-देवतांची दर्शने झाली. त्या देवी-देवता इतर कुणालाही दिसत नव्हत्या. फक्त मलाच दिसत होत्या. त्या काळात माझा मुलगा हॉस्पिटलमध्ये माझ्याबरोबर होता. त्याने माझी खूप खूप काळजी घेतली व सेवा केली. मी हे सर्व श्री दाभोळकर सरांना फोनवर सांगितले व त्यांना विचारले की आध्यात्मात पुढे जाण्यासाठी आणखी काय करावे? त्यांनी मला काही साधना सांगितलेल्या आहेत. त्या मी करीत आहे. त्यामुळे मला खूप आत्मिक समाधान व आनंद मिळत आहे.

**शिवाजी जगन्नाथ काशीद**

**पुणे**

ॐ

# किरण रमेशचंद्र तळगांवकर

माझ्या जीवनातील घडलेला एक अनुभव मी थोडक्यात सांगू इच्छितो. माझे वडील गिरणी कामगार होते. मी सात वर्षांचा असताना गिरणी कामगारांचा संप झाला व काही महिन्यांनी वडील दुसऱ्या गिरणीमध्ये जाऊ लागले. माझे लहानपण गरिबीतच गेले. दरम्यान वडिलांकडून पॉकेटमनी म्हणून मिळत असलेल्या ५० रुपयांतील ३५ रुपये रेल्वेपाससाठी खर्च होत होते. बारावीनंतर मी आयटीआय पूर्ण करुन टी. व्ही. रिपेरिंग चालू केले. पण त्यातूनही कमाई होत नसल्यामुळे शेवटी नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडलो. सन १९९६ मध्ये मला HCL कंपनीमध्ये स्टोअरकीपर म्हणून नोकरी मिळाली. नोकरी करता करता वरकमाई चालू झाली आणि मी वाईट व्यसनांच्या अधीन कधी झालो हे माझे मलाच कळले नाही. वरकमाईतून लाखो रुपये मिळत असतानाही बचत शून्य होती कारण मी दारूच्या नशेत काय करीत होतो ते मलाच कळत नव्हते. शेवटी सन २००२ मध्ये माझी HCL मधील नोकरी सुटली. त्यानंतर सहा महिन्यातच माझ्या क्रेडीट कार्डची कर्जे १.७५ लाखाच्या घरात गेल्याने आईने स्वतःचे दागिने गहाण ठेऊन कर्ज फेडले.

त्यानंतर पुन्हा नशिबाने साथ दिली आणि सन २००४ मध्ये सी एम एस कंम्प्यूटर कंपनीमध्ये नोकरी मिळाली. परंतु भरपूर पैसा मिळवायची घमेंड काही गेली नाही आणि व्यसनमुक्तही झालो नाही. पाच वर्षातच मॅनेजरची पोस्ट मिळाली. लगेचच सन २००८ मध्ये लग्न झाले आई–

वडीलांबरोबर स्वतःच्या संसाराची जबाबदारी व इतर कर्तव्ये वाढली. पैसा भरपूर मिळत होता पण कुठल्या ना कुठल्या कारणाने दुप्पट नुकसान होत होते, दारुचे व्यसन सुटत नव्हते. व्यसन सुटण्यासाठी औषधे करुनही व्यसनमुक्त होता येत नव्हते. इच्छा नसतानाही प्रत्येक दिवशी ऑफिस सुटल्यावर आपसुकच माझे पाय बारच्या दिशेने वळत होते. याचा मला पश्चात्ताप होत असूनही वारंवार तीच बाब घडत होती. त्यामुळे घरातही ताणतणाव वाढू लागला होता. माझ्या बहिणीने मला लागलेल्या व्यसनाबद्दल दाभोळकर सरांना सांगितले व श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेली मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते ७, पोथ्या व योगीकथामृत माझ्या आईला दिले. तिने त्या पोथ्यांचे वाचन सुरू केले. मी ही मानवी जीवनातील गूढ रहस्ये या भागांबरोबरच, योगीकथामृताचे वाचन सुरू केले. दाभोळकर सरांकडून इतरांचे कळलेले अनुभव बहीण मला वेळोवेळी सांगत होती तसेच त्यांच्याकडून प्राप्त झालेले श्री दत्त स्तोत्रही मला मिळाले. त्यानंतर मी जे काही नामस्मरण चालू केले त्याने माझ्या मनात येणारे वाईट विचार कमी होऊ लागले. उठता बसता नामस्मरण करता करता मी श्री दत्त स्तोत्रही सुरू केले. असे करता करता माझे बऱ्याच वर्षांपासून चालू असलेले दारुचे व्यसन जे माझ्या लिव्हरला सूज येऊनही सुटले नव्हते, बरीच व्यसनमुक्तीची औषधे करुनही सुटले नव्हते, ते व्यसन नामस्मरण, दत्तस्तोत्र करता करता कधी सुटले ते माझे मलाच कळाले नाही.

त्यानंतर सन २०१७ मध्ये श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या दर्शनासाठी पीठापूरला जाण्याच्या आईच्या हट्टामुळे मी संपूर्ण कुटुंबासाठी ऑनलाईन तिकिटे काढली.

परंतु पीठापूर येथील भक्तनिवासामध्ये रहाण्यासाठी ६ महिने आधीच बुकींग करावे लागते असे मला कळले. इतरत्र शोध घेतला असता मंदिराजवळ निवासाची दुसरी सोय नसल्याने तसेच मंदिरापासून २५/३० किलोमीटर अंतरावर असलेले हॉटेल माझ्या बजेटमध्ये नसल्याने मला वाईट वाटत होते. वरच्या कमाईच्या घाणीत पुन्हा हात घालायचा नाही असा मनाचा पक्का निर्धार केला होता. अचानक माझ्या पत्नीने संपादक श्री.शिरीष कुळकर्णी (सोलापूर निवासी) यांचे पीठापूर येथील मासिक वाचता वाचता, मासिकातून मिळालेल्या त्यांच्या फोनवरुन त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्याकडून आम्हास खूप मोठी मदत मिळाली, ती अशी, मंदिराजवळ भाविकांच्या सोयीसाठी श्री. कुळकर्णी यांनी स्वतः नव्याने उभारलेल्या श्रीपाद भवनामध्ये आमची कोणतेही पूर्वबुकींग नसताना एक रुपयाही न घेता माझ्यासह माझ्या कुटुंबाची सोय झाली. अक्षरशः सदर श्रीपाद भवनाची सुरुवात आमच्याकडूनच झाली. महत्त्वाचे म्हणजे आम्ही श्री.कुळकर्णी यांना ओळखतही नव्हतो.

आम्ही पीठापूरला गेल्यावर त्यांनीच एका रिक्षावाल्याचीही ओळख फोनवरुन करुन दिली, कारण श्री.शिरीष कुळकर्णी हे सोलापूर येथे रहात होते. ७५ वर्षांच्या माझे आई-वडिल, पत्नी व मुलीसह मुंबई ते पिठापूर २६ तासांचा प्रवास, श्री.कुळकर्णी यांनी फोनवरून केलेल्या मार्गदर्शनामुळे सुकर झाला व परतीच्या प्रवासातही त्यांनी त्यांच्या नातेवाईकांमार्फत आमच्या जेवणाचीही सोय केली. मला भेटायला येणाऱ्या माझ्या भक्ताची काळजी घेण्याबाबत श्रीपाद श्रीवल्लभ यांनी श्री.कुळकर्णी यांना दृष्टांत दिल्याने त्यांनी कर्तव्यसेवा केल्याचे त्यांनीच आम्हाला सांगितले.

त्यानंतर दाभोळकर सरांची भेट घेतली असता, त्यांनी मला मार्गदर्शन केले आणि त्यानुसार माझी ईश्वरभक्ती सुरू आहे.

**किरण रमेशचंद्र तळगांवकर,**
**घाटकोपर, मुंबई**

ॐ

# किरण पेडणेकर

## अंगठी सापडली

दोन वर्षांपूर्वी मी रत्नागिरी येथे आश्रमात सेवा करत असताना माझ्या हातातील ॲमेथिस्टची अंगठी हरवल्याचे माझ्या लक्षात आले. सकाळी आंघोळ करताना अंगठी माझ्या हातात होती. त्यावेळी माझ्याबरोबर बबलू व प्राजक्ता पण होते. त्यांनी व मी सर्व ठिकाणी ती खूप शोधली पण आम्हाला अंगठी काही मिळाली नाही. तेव्हा काही विपरित घटनेमधून, या अंगठीच्या मार्फत देवांनी माझी सुटका केली असावी असे समजून मी ती गोष्ट विसरून घरी गेलो. पण एप्रिल २०२१ ला मी नागार्जुन सागर येथील आश्रमात असता पहाटे एक स्वप्न पडले. त्यात मी एका देवस्थानात होतो पण मला तेथे श्री दत्त दिसत नव्हते म्हणून मी आत प्रवेश करत नव्हतो. बराच वेळानंतर तिथे अन्नदान सुरू झाले. सर्व लोक प्रसादभोजन घेण्यासाठी पुढे जाऊ लागले. पण मी तेथेच थांबलो कारण मला दत्त दर्शनाशिवाय आत जायचे नव्हते. एवढ्यात सर्व भाविक हातात अन्नाचे ताट घेऊन जेवायला बसले. मला त्या जागेवरून पुढे जायला मिळत नव्हते. तेव्हा मी काही लोकांना बळेच बाजुला सारून बाहेर जाऊ लागलो. मी अगदी बाहेर पडणारच होतो तेव्हा माझ्या वाटेवर एक वृद्ध गृहस्थ पाय पसरून बसले होते. त्या व्यक्तीचे हात पाय खूप लांब होते तसेच नाकही खूपच लांब होते. अंगावर शाल होती. कुठे चाललास एवढ्या दुपारी असे ते मला करारी आवाजात म्हणाले. अन्न घेऊनच पुढे जा. त्यांचे बोलणे ऐकून मी दचकलो आणि निमुटपणे जिथे अन्नदान चालले होते त्या दिशेने चालू लागलो, कारण आता मला श्री दत्त दर्शन झाले होते. मी भोजन घ्यायला गेलो पण माझ्याकडे ताट नव्हते. म्हणून मी पुजाऱ्याकडे विचारणा केली असता त्याने मला पत्रावळ

देण्यासाठी हात पुढे केला. मी पण जेव्हा पत्रावळ घ्यायला हात पुढे केला तेव्हा त्या पुजाऱ्याने मला विचारले की तुझ्या बोटात अंगठी दिसत नाही. कोठे आहे? मी दचकुन माझ्या हाताकडे बघितले तर हातात अंगठी नव्हती. पण तेवढ्यात पहाट झाली व माझे स्वप्न भंगले. जे काही पाहिले त्याचा मला काही अर्थ कळत नव्हता. त्यानंतर मी मुंबईला गेलो तेव्हा मी या स्वप्नाविषयी श्री अरूण सरांशी बोललो व परत आश्रमात आलो. माझ्या कामात व्यस्त झालो. सागरला बरोबर दोन महिन्यांनी म्हणजेच १३ जुलै २०२१ ला दुपारी मला भूमीचा फोन आला व तिने माझी अंगठी सोहमला सोफ्याच्या पायाजवळ सापडल्याचे सांगितले. तेव्हा मी तिला म्हणालो की माझी अंगठी तर रत्नागिरीत हरवली होती ती मुंबईच्या घरी कशी मिळेल! तेव्हा तिने मला त्या अंगठीचा फोटो पाठवला. तो फोटो बघून मी आश्चर्यचकित झालो व ईश्वराचे मनोमन आभार मानले व हा सर्व श्री स्वामीजींचाच कृपाशिर्वाद आहे असे मी मानतो.

## आरोग्य लाभ

माझ्या वडिलांच्या आजारासंदर्भात आलेला अनुभव पुढे देत आहे. दिनांक १६ डिसेंबर २०१३ रोजी दत्तजयंतीनिमित्त मी आश्रमात असतानाचा अनुभव आहे. माझ्या गावी तेंडोली (कुडाळ) येथे माझे आई-वडिल राहतात. माझ्या घरी पण दत्तजयंती साजरी केली जाते. त्या दिवशी माझ्या वडिलांना कीर्तन चालू असताना हार्ट अटॅक आला. ते अस्वस्थ झाल्याने लगेचच माझा भाऊ योगेश त्यांना कुडाळ येथील हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. तेथे गेल्यावर माझ्या वडीलांना हार्ट अटॅक आल्यानंतर बराच कालावधी झाल्यामुळे यांच्यावर उपचारांचा काहीही उपयोग होणार नाही असे डॉक्टरांनी सांगितले. मला योगेशने फोन करून सर्व काही सांगितले. मी ही गोष्ट अरूण सरांना सांगितली व त्यांनी सौ. वनिता ताईंना सांगितली. त्यांनी माझ्या वडिलांना

इंजेक्शन द्यायला सांगितले. माझ्या वडिलांना साधारण रात्री १०.३० च्या सुमारास डॉक्टरांनी ते इंजेक्शन दिले. त्यानंतर साधारण रात्री १२ ते १२.३० च्या सुमारास माझ्या वडिलांच्या दातातून रक्त वाहण्यास सुरुवात झाली. त्यावेळी रक्तस्त्रावाचा वेग एवढा होता की माझ्या वडिलांचे ब्लड प्रेशर कमी झाले व पल्स रेट तर चक्क २८ पर्यंत आला.

त्यानंतर ऑन डयुटी नर्सने डॉक्टरांना बोलावून आणले. रात्रौ १.०० वाजता डॉक्टर आले व त्यांनी माझ्या वडिलांना चेक केले व म्हणाले हा रक्तस्त्राव बंद झाला नाहीतर तुमच्या पेशंटचे काही खरे नाही. रक्तस्त्राव कमी झाला नाही तर त्यांना जे इंजेक्शन द्यावे लागणार आहे ते आमच्याकडे उपलब्ध नाही. ते तुम्हांला जिल्हा रूग्णालय ओरोस येथून आणावे लागेल. त्यानंतर माझा भाऊ योगेश याने माझा दुसरा भाऊ संदीप जो गावी आमच्या घरी असतो त्याला रात्रौ ३.०० वाजता बोलावून घेतले व मला फोन करून सांगितले की पप्पांचा पल्स रेट २८ वर गेला असून दातातून रक्तस्त्राव होत आहे. पहाटे ४.०० च्या सुमारास डॉक्टर पुन्हा खाली आले व माझ्या वडीलांना चेक करून म्हणाले आत्ता थोडा फरक जाणवतो आहे अजून अर्धा तास वाट पाहू. तेव्हा योगेशने मला पुन्हा फोन करून तसे सांगितले. सकाळी साधारण ५.३० च्या सुमारास माझ्या वडिलांची तब्येत स्थिरावली. त्यांना थोडे बरे वाटू लागले व पल्स रेट ६५ ते ७० च्या दरम्यान होता. माझ्या वडीलांची प्रकृती बघून सकाळी डॉक्टर म्हणाले हे तर मिरॅकल आहे. एका रात्रीत पेशंट एवढा कसा रिकव्हर होऊ शकतो. तरीसुध्दा त्यांनी आम्हाला माझ्या वडिलांची एन्जोप्लास्टी करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर आम्ही आमच्या वडिलांना घेऊन मुंबईला आलो. तेथे बऱ्याच डॉक्टर्सना त्यांची फाईल दाखविली.

एकदा योगेश माझ्या वडीलांची फाईल घेऊन नवी मुंबई महापालिका हॉस्पिटल वाशी येथील हॉस्पिटलच्या डीनला जाऊन भेटला. तेव्हा त्यांनी योगेशला सांगितले की ही फाईल घेऊन का फिरताय व मला का दाखवताय? हा माणूस जिवंत तरी आहे का? जो माणूस योगेशला त्या डीनकडे घेऊन गेला होता तो म्हणाला काही काळजी करू नका, मी तुम्हाला डॉ. राठोड यांच्याकडे पाठवतो. त्याच दिवशी योगेश हृदयरोगतज्ञ डॉ. रतन राठोड यांच्याकडे गेला. सर्व फाईल वाचल्यावर त्यांनी आणखी एक टेस्ट करावी लागेल असे सांगितले. ती टेस्ट लिहून देताना ते म्हणाले की ही टेस्ट मुंबईत फक्त टाटा हॉस्पिटलमध्येच होते व ती लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. योगेश टेस्टसाठीची अपॉईंटमेंट घेण्याकरिता टाटा हॉस्पिटलमध्ये गेला असता त्याला ४२ दिवसानंतरची अपॉईंटमेंट मिळाली. तेथेच योगेशला एका माणसाचा धक्का लागल्यामुळे त्याच्या हातातील सर्व पेपर्स खाली पडले. तो माणूस योगेशला पेपर्स उचलून देताना म्हणाला फारच टेन्शनमध्ये दिसता. त्यावर योगेश म्हणाला माझ्या वडीलांच्या हार्ट कप्यॅसिटी चेक करण्याची टेस्ट डॉक्टरने करायला सांगितली असून तुमच्या हॉस्पिटलने ४२ दिवसानंतरची अपॉईंटमेंट दिलेली आहे. तीन चार दिवसांत रिपोर्ट आला नाहीतर पप्पांच्या प्रकृतीची शाश्वती देणार नाही असेही सांगितले. तो माणूस योगेशला, बघतो मला काही करता येते का असे म्हणून अपॉईंटमेंटचे कार्ड घेऊन गेला व दहा मिनिटांनी परतला व ते कार्ड योगेशच्या हातात दिले व म्हणाला दिलेल्या तारखेला वडीलांना घेऊन या. योगेशने तारीख बघितली तर ती दुसऱ्या दिवशीचीच होती. दुसऱ्या दिवशी आम्ही वडीलांना घेऊन गेलो. त्यांचा रिपोर्ट आला त्यात माझ्या वडिलांच्या हार्टची क्षमता केवळ ३२% असल्याचे सांगितले. त्यात पाच ब्लॉकेजेस्ही होती. डॉ. राठोड म्हणाले आता बायपास करावे लागणार आहे, पण तुमच्या वडिलांचे हार्ट खूपच अशक्त आहे व

बायपास करूनही काही उपयोग होणार नाही. तरीही मी त्यांना सांगितले की आम्हाला बायपास करायचे नाही. तुम्ही एन्जियोप्लास्टी करा. काय होईल ते पुढे बघू. खर्च जास्त होईल पण त्यांना बायपास झेपणार नाही. यावर डॉक्टर म्हणाले तुमची मर्जी मी एन्जियोप्लास्टी करतो. तुम्ही पैसे डिपॉझिट करा. त्यांनी साडेचार लाख खर्च सांगितला. माझ्याकडे एवढे पैसे नव्हते त्यामुळे पैसे जमा करायला आणखी आठ दिवस गेले. पण त्याची सोय देवाने केली. मी पैशांच्या चिंतेत असताना एक दिवस माझ्या बॉसने मला आपल्या केबीनमध्ये बोलावले. मी केलेल्या कामाचे कौतुक करू लागले व शेवटी ते मला म्हणाले की मॅनेजमेंट तुझ्यावर खूप खुश आहे. तेव्हा आम्ही तुला चार लाख इनसेंटीव्ह देऊ केला आहे. तू आत्ता अकाऊंट मॅनेजरच्या केबीनमध्ये जा व चार लाख कॅश घेऊन जा. एवढे बोलून ते थांबले नाहीत तर अकाउंट मॅनेजरला स्वत: केबिनमध्ये बोलावून घेतले व माझ्यासमोरच त्याला पैसे द्यायला सांगितले. माझ्या हातात ते पैसे येताच मला रडू कोसळले व श्रीस्वामीजी किती लक्ष देऊन आम्हांला सर्वांना सांभाळत आहेत यांची जाणीव झाली. त्यानंतर मी त्यांचे मनोमन आभार मानले आणि तडक घरी आलो व दुसऱ्या दिवशी मी पैसे हॉस्पिटलमध्ये डिपॉझिट केले व दिनांक १४.०२.२०१४ रोजी माझ्या वडीलांची एन्जियोप्लास्टी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली व चार दिवसांनी माझे वडील बरे होऊन घरी आले. या घटनेला आज ७ वर्षे पूर्ण झालेली आहेत. माझे वडील सध्या त्यांना श्रीस्वामींजीच्या कृपाशिर्वादाने मिळालेले आयुष्य ईश्वरभक्तीत व्यतीत करत आहेत.

**किरण पेडणेकर**

**मुंबई**

ॐ

# किशोर गुराम

घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे बारावीची परिक्षा पास झाल्यावर वडिलांनी मला mechanic होण्यासाठी लागणारे तांत्रिक प्रशिक्षण घेण्यास सांगितले ज्यामुळे लवकर नोकरी मिळू शकेल व घराला हातभार लागेल. तीन वर्ष प्रशिक्षण घेतल्यावर मुंबई मधील एका डिलरकडे mechanic चे काम करू लागलो. दोन वर्षांनंतर प्रमोशन मिळून supervisor झालो.

सर्व काही सुरळीत चालले होते तेवढ्यात अचानक ती कंपनी नुकसानीत गेल्याने बंद झाली. वयाच्या २६ व्या वर्षी नोकरी गेल्यामुळे धक्का बसला. त्या काळात dealership मध्ये सर्वत्र अस्थिरता होती. त्याचवेळी माझे काही मित्र ऑस्ट्रेलियाला जाण्याचा प्रयत्न करत होते कारण तेथे mechanic ना खूप मागणी होती. त्यांनी मलादेखील ऑस्ट्रेलियाला जाण्यासाठी प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. पण सर्वात महत्वाचा अडथळा visa साठी लागणाऱ्या पैशाचा होता.

कंपनी बंद झाल्याने provident fund चे मिळालेले थोडे पैसे व माझ्या काही savings यांच्या आधारावर visa ची प्रक्रिया सुरू केली. या संपूर्ण प्रक्रियेला साधारणपणे दोन वर्षे लागतात. मधल्या काळात एका कार डिलरकडे supervisor ची नोकरी मिळाली. सर्व काही सुरळीत चालले होते. श्रीस्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार साधनाही चालू होती.

काहीवेळा प्रारब्ध खूप खडतर असते. पण अशावेळी ईश्वरभक्ती व गुरुकृपा, त्याची तीव्रता बरीच कमी करते, हे दर्शवणारा अनुभव आला.

२००३ साली एका रविवारी माझी आई स्वयंपाकघरात काम करत असताना पडली. तिच्या डाव्या हाताला मार लागून तो सुजला होता. तिला

हात हलवतासुद्धा येत नसल्याने आम्ही घाबरलो. त्यात रविवार सकाळ असल्याने डॉक्टरही मिळत नव्हते.

तिला जवळच्या प्रसिद्ध हाडांच्या hospital मधे नेऊन एक्स रे काढला. तेथील मुख्य डॉक्टरांनी हाडांचे बरेच तुकडे झाले असून त्यावर ते इथे उपचार करू शकत नाहीत असे सांगितले. आम्हाला आईला एखाद्या मोठ्या hospital मधे नेण्यास सांगितले. आम्ही आईला माहिम मधील एका मोठ्या hospital मधे नेल्यावर तेथील डॉक्टरांनी सांगितले की ऑपरेशन करू पण ते किती यशस्वी होईल ते सांगता येणार नाही. शस्त्रक्रियेनंतर ती हाताची कितपत हालचाल करू शकेल ते सांगू शकत नाही असेही सांगितले. शस्त्रक्रियेचा खर्चही खूपच होता. काहीच सुचत नव्हते.

हा पूर्ण वेळ मी श्रीस्वामीजींचे नामस्मरण करत होतो. त्यांना प्रार्थना केली की आता तुम्हीच मार्ग दाखवा. अचानक माझ्या आतेभावाचा फोन आला. त्याला सर्व परिस्थिती सांगितली. तो लगेच भेटायला आला व विरारमधील त्याच्या ओळखीच्या एका हाडांच्या डॉक्टरला फोन केला ज्याचे विरारला स्वतःचे hospital होते. त्याने माझ्या आईला त्वरीत त्याच्या hospital मधे घेऊन येण्यास सांगितले.

त्या डॉक्टरचा एक मित्र, हिंदुजा hospital मध्ये मोठा सर्जन असून, यायच्याआधी त्याला एक्स रे दाखवून यायला सांगितले होते. त्याप्रमाणे मी संध्याकाळीच त्यांना भेटलो. त्यांनी आईंचे सर्व एक्स रे तपासले व म्हणाले की आईच्या कोपराच्या हाडाचे बरेच तुकडे झाले आहेत त्यामुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी होण्याची शक्यता फार कमी आहे. केवळ ईश्वरच काही चमत्कार करू शकतो. त्यांच्या या वाक्याने मी पूर्णपणे हादरलो. आम्ही आईला विरारच्या hospital मध्ये हलवले. माझ्या आतेभावाच्या डॉक्टर मित्राने

आम्हाला आधार देत, operation यशस्वी करण्याचा पूर्ण प्रयत्न करेन तसेच पैशाची काळजी करू नका असे सांगितले.

आईचे operation कठीण असल्याने, घरी परतल्यावर पण मी फार उदास होतो पण तरीही एक अदृश्य शक्ती आपल्या पाठीशी असल्याची जाणीव होत होती. मी स्नान करून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** व **श्री दुर्गा त्रिशतीचे** पारायण केले. त्या वेळी कोणीतरी अदृश्य शक्ती पाठीशी असल्याची जाणीव होत होती त्यामुळे मनाला थोडी उभारी आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी operation साठी hospital मध्ये पोहोचलो असता डॉक्टर म्हणाले की काळजी करू नकोस. मी पूर्ण प्रयत्न करीन. सर्वकाही ठीक होईल. ''भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे.''

मी अखंड नामस्मरण करत होतो. पूर्णत: श्रीस्वामीजींना शरण गेलो होतो. आईचे operation सुमारे तीन तास चालले. तीन तासानंतर, अंत:करणापासून केलेली प्रार्थना कधीच व्यर्थ जात नाही हा अनुभव मी घेतला. माझी आई त्यातून अगदी उत्तमरित्या बरी झाली व देवाच्या कृपेने योग्यवेळी पैशाची सोयही झाली.

Visa आल्यावर सप्टेंबर २००४ ला मी ऑस्ट्रेलियाला स्थलांतरित झालो. पोथ्यांचे वाचन व नामस्मरण चालूच होते. तेथे ओळखीचे कोणीच नव्हते तरी माझी रहाण्याची सोय झाली व एका आठवड्यात छोटीशी नोकरीही मिळाली.

Mechanic चा जॉब मिळण्यासाठी driving license जरुरी होते. ते मिळाल्यावर मार्चमध्ये motor mechanic ची नोकरीही मिळाली. सुरुवातीला अनुभव कमी असल्याने खूप कठीण जात होते, पण अखंड नामस्मरणाच्या सवयीमुळे प्रत्येक संकटावर मात होत होती.

त्या काळात मला दत्त स्तोत्र म्हणण्याची सवय होती. काम करत असतानाही मी दत्त स्तोत्र म्हणत असे ज्यामुळे खूप कठीण कामदेखील सहज होत असे. मी दिवसाला ३३३ दत्त स्तोत्र म्हणत असे. हळूहळू कामात कुशलता आली. सर्वकाही व्यवस्थित चालले होते. मधल्या काळात माझे लग्न झाले. कालांतराने मुलगा झाला. माझे स्वत:चे घर झाले.

परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रारब्धाचे अटळ भोग कधी ना कधी भोगावेच लागतात.

एकदा मी वर्कशॉपमध्ये एका मोठ्या गाडीचे पुढचे suspension तपासत होतो. Suspension मध्ये खूप मोठी लोखंडी स्प्रिंग, प्रचंड प्रेशरनी बसवलेली असते. संपूर्ण गाडीचे वजन या स्प्रिंगवरच असते. ते प्रेशर एवढे असते की जर ती तुटली तर मधे येणाऱ्या माणसाचे शिरदेखील धडापासून वेगळे करू शकते. यामुळे काही लोकांना स्वत:चे प्राणदेखील गमवावे लागले आहेत.

मी या कामात अनुभवी असल्याने बऱ्याचदा अशा प्रकारचे काम मी करीत असे. परंतु कधी कधी नियतीने काही वेगळेच ठेवलेले असते. एकदा गाडीचे suspension तपासत असताना, त्याच्या स्प्रिंगला प्रेशरमधे ठेवण्यासाठी असलेला एक क्लॅम्प अचानक तुटला.

मी सवयी प्रमाणे काम करताना नामस्मरण करत होतो. Clamp तुटल्याचा खूप मोठा आवाज झाला व ती स्प्रिंग वेगाने वर उडाली. पण एका अदृश्य शक्तीने माझा चेहरा बाजूला केला, मला काही क्षणासाठी समजलेच नाही.

आवाज ऐकून माझे सहकर्मचारी धावत आले. क्षणभराने सावरल्यावर मला समजले की काहीतरी मोठे घडले आहे. माझ्या चेहऱ्याला हात लावल्यावर

मला जाणवले की तोंडातून रक्त येत आहे. परंतु नामस्मरणामुळे मला त्याची तीव्रता जाणवत नव्हती. माझ्या सहकर्मचाऱ्याला माझा चेहरा पाहून चक्कर आली. पण मी व्यवस्थित होतो.

विशाल व मी एकत्र काम करत असल्याने, त्याने रुग्णवाहिकेची वाट न पाहता तात्काळ कंपनीच्या गाडीतून मला Hospital ला नेले. तोंडातून रक्त येत असल्याने मी तोंडावर हात धरून नामस्मरण करत होतो.

Hospital च्या emergency विभागात गेल्यावर डॉक्टरांनी सांगितले, ''चेहऱ्याला जबरदस्त फटका बसला आहे. खालचा ओठ फाटला असून दोन दात पूर्णपणे तर एक दात अर्धा तुटला आहे. नाकाला सुद्धा मार लागला आहे. नशीबाने डोळे ठीक आहेत.'' जेव्हा डॉक्टरांनी अपघाताची तीव्रता सांगितली तेव्हा त्यांनाही आश्चर्य वाटत होते. ते मला म्हणाले, ''अशा प्रकारच्या अपघातात रुग्ण साधारणपणे अत्यवस्थ होतो व त्याला रुग्णवाहिनीतून आणावे लागते. तू तर स्वत:च चालत रुग्णालयात दाखल झाला आहेस, ही देवाची खूप मोठी कृपा आहे.'' तेव्हा कुठे मला अपघाताची तीव्रता समजली. मग डॉक्टरांनी मला आतील बाजूने टाके घातले.

नाकाचा CT Scan करण्यासाठी पाठवले. CT Scan च्या रिपोर्टमध्ये नाकाच्या हाडाला दोन-तीन hairline crack दिसल्या. डॉक्टर म्हणाले की घाबरण्यासारखे काही नाही पण पुन्हा एकदा तपासावे लागेल. अपघातामुळे माझा चेहरा खूप सुजला होता. पण दोन तासानंतर जेव्हा डॉक्टरांनी पुन्हा तपासले तेव्हा सूज पूर्णपणे उतरली होती.

डॉक्टर म्हणाले की normally अशा अपघातानंतर पेशंटला आम्ही निरिक्षणासाठी हॉस्पिटलमध्येच ठेवतो, पण तू घरी जाऊ शकतोस.

मी देवाचे मनोमन आभार मानले कारण माझी पत्नी गौरी ही सहा महिन्यांची गरोदर होती. माझा मुलगासुद्धा फक्त दोन वर्षांचा असून ते घरी

एकटे होते. मी झालेल्या प्रसंगाबद्दल व ईश्वरी चमत्काराबद्दल गप्पा मारत विशालबरोबर घरी आलो.

घरी येईपर्यंत गौरीला अपघाताची काहीही कल्पना नव्हती. माझ्याबरोबर विशालसुद्धा होता पण आम्ही दोघे एकत्र काम करत असल्याने तो कधीतरी घरी येत असे. त्यामुळे गौरीला या गोष्टीचे नवल वाटले नाही. पण माझ्या चेहऱ्याकडे बघून अंदाज आला. मग विशालने तिला अपघाताबद्दल सांगितले.

इथे मला हे सांगावेसे वाटते की एवढ्या मोठ्या अपघातानंतरही ईश्वराने उत्तम उपचार उपलब्ध करून दिलेच पण माझ्या पत्नीलादेखील सावरण्यासाठी वेळ दिला. तिला धक्का बसण्याची जी भीती आम्हाला होती ती देखील दूर केली.

त्यानंतर जेवढे मित्र मला भेटायला आले त्यांना अपघाताच्या तीव्रतेबद्दल सांगितल्यावर, माझ्या चेहऱ्याकडे पाहून विश्वासच बसत नव्हता. ही केवळ ईश्वरीकृपाच होती. माझी तब्येत भराभर सुधारली व लवकरच मी कामावर रूजूदेखील झालो.

परंतु माझ्या दातावर उपचार चालूच होते. देवाच्या कृपेने सिडनीतील सर्वात प्रसिद्ध सर्जनची appointment मिळाली. त्यांनी माझ्या दातावर उपचार करून वर्षभरात माझे तीनही दात बसवले. आता माझ्याकडे बघून कोणीही सांगू शकत नाही की हे दात अपघातानंतर बसवले आहेत. दोन डॉक्टरांनी माझ्याकडून उपचाराचे पेपर्स अभ्यासासाठी मागून घेतले.

या पूर्ण उपचाराचा खर्च सुमारे दोन लाख आला जो insurance मध्ये cover केला गेला.

या संपूर्ण अनुभवावरून एक गोष्ट समजते की अटळ प्रारब्धभोग टाळू शकत नाही पण गुरुकृपेने त्याची तीव्रता मात्र नक्कीच कमी होते व ते भोगण्याची शक्ती मिळते. तसेच ते भोगत असताना सर्व बाजूने मदतसुद्धा मिळते.

श्रीस्वामीजींनी केलेल्या मार्गदर्शनानुसार या आध्यात्मिक मार्गाचे आचरण सुरू करून आता बावीस वर्षे झाली आहेत. या काळात बरीच संकटे आली पण श्रीस्वामीजींच्या आशीर्वादाने काहींची तीव्रता कमी झाली तर काही टळून गेली.

**किशोर गुराम**
**ऑस्ट्रेलिया**

ॐ

# पी. एस. पाटील

मी पी. एस. पाटील, राहणार शाहुवाडी, कोल्हापूर. निवृत्त सुपरींटेन्डंट न्याय खाते.

माझे हृदयाचे ऑपरेशन ११ नोव्हेंबर २०२० रोजी झाले. त्यामुळे जिल्हा न्यायाधिशसाहेबांचे स्टेनो श्री. कुंभार मला भेटावयास आले होते. त्यांनी मला आराम करण्याचा सल्ला दिला. यावर मी त्यांना सांगितले की मी पाण्यासाठी ७ ते ८ हजार फुट पाईपलाईन घातली आहे, परंतु त्यासाठी लागणारी मोटर दुसऱ्याच्या मालकीच्या जागेत ठेवली आहे. त्यांनी मला ती मोटर काढायला सांगितली आहे. मोटर बसवण्यासाठी मला कोणाचीही जागा मिळत नाही, या चिंतेने मला झोप लागत नाही.

यावर त्यांनी मला ''**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दररोज वाचा म्हणजे तुमची अडचण दूर होईल,'' असा सल्ला दिला. ही पोथी मिळाल्यापासून मी दररोज सकाळी नियमितपणे ती वाचू लागलो. दत्तकृपेने, दोन महिन्यातच गोरक्ष पाटील नावाचा मनुष्य मला त्याची १ गुंठा जागा विकायला आला. मी ती जागा खरेदी केली ज्याने माझी समस्या सुटली. आताही मी रोज श्रद्धेने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचतो.

**पी. एस. पाटील,**

**कोल्हापूर**

# मनिषा देसाई अनुभव

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः ।।

मी मनिषा देसाई. श्री स्वामीजींची कृपा म्हणूनच हा अनुभव लिहिण्याचा योग आला. कारण कर्ता करविता तेच, मी केवळ निमित्तमात्र.

मला २०१४ साली प्रथम आश्रमातून बोलावणे आले. पण माझा धाकटा मुलगा अक्षय त्यावेळी फक्त ५ महिन्यांचा होता. त्याचा Passport व visa याची काहीच तयारी नसल्याने मला माझा जाण्याचा विचार रद्द करावा लागला. मला फार दुःख झाले. पण काय करणार ही सर्व माझीच चूक होती. मी अगोदरच तयारी ठेवायला हवी होती. असो. चुका केल्याशिवाय आपण काय गमावले याची किंमत कळत नाही. त्यानंतर मी ताबडतोब मुलांचे passport बनवून घेतले. माझे नागरिकत्व अजुनही भारतीय असल्याने माझा passport भारतीय व Australia साठी, Permanent Resident हा परवाना आहे.

२०१६ साली हा सुवर्णयोग माझ्या आयुष्यात पुन्हा आला. माझे गुरु, माझे देव मला भेटणार याचा मला खूप आनंद होत होता. तयारीसाठी फक्त दोन आठवडे होते. मला व माझ्या मोठ्या मुलाला, अविरतला दोन आठवडे वास्तव्याची परवानगी मिळाली होती. मनात कोणतीही शंका-कुशंका न ठेवता मी व अविरतने आश्रमात जायची तयारी सुरू केली. आश्रमात जायला निघताना, मी श्रीस्वामीजींना अक्षयची काळजी घ्या अशी प्रार्थना केली. कारण तो फक्त दोन वर्षांचा होता व प्रथमच त्याच्या वडिलांबरोबर एकटा राहणार होता. माझे आई-वडिल त्यावेळी त्यांच्याबरोबर सिडनीला असल्याने काळजी थोडी कमी झाली होती.

आश्रमात पोहोचल्यावर खूपच आनंद झाला. अविरत तर अतिशयच खूष होता. पहिले तीन-चार दिवस श्रीस्वामीजी आश्रमात नव्हते, पण आम्हाला तेथे रहावयास मिळत होते, हेच आमच्यासाठी भाग्याचे होते. जेव्हा ते आश्रमात येत असल्याची बातमी मिळाली तेव्हा अत्यानंदाने हृदय भरुन गेले. त्यांच्या दर्शनाने आनंदाश्रु वाहू लागले.

आश्रमातील पवित्र वातावरणात दोन आठवडे कसे गेले ते समजलेच नाही. परतीचा दिवस उगवला तसा निघण्याच्या कल्पनेने उर भरुन आला. आम्हा सर्वांना संध्याकाळी सहा वाजता निघायचे होते. पण श्रीस्वामीजींकडून तीन वाजता निघा असा निरोप आला. आम्हाला काही समजेना. पण निघण्यापूर्वी त्यांच्या दर्शनासाठी जमलो तेव्हा त्यांनी माझ्याकडे पाहिले व मला सांगितले की airport वर लवकर गेले पाहिजे. कधीकधी कारण नसताना उशीर होतो व मग धावपळ होते. एका भक्ताचा अनुभवही सांगितला. मला मात्र आश्रमातून लवकर निघावे लागणार याचे दु:ख होते. पण श्री स्वामीजींनी लिहिलेली पुस्तके व ग्रंथ वाचनामुळे काही गोष्टी थोड्याशा लक्षात आल्या होत्या. सत्पुरुष कोणतीही गोष्ट स्पष्ट न सांगता सांकेतिक भाषेत सांगतात. पण गुरुआज्ञेचे पालन करणे यातच आपले हित असते. सौ. आईंनीही गुरुआज्ञेचे पालन कसे करावे हे सांगितल्याचे व लिहिल्याचे आठवले.

श्रीस्वामीजींच्या, आश्रमाच्या व सर्व आश्रमवासीयांच्या आठवणी मनात साठवत आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. सर्वांनी airport वर check-in केले. पण मला थांबवण्यात आले. तुम्ही भारतात आला आहात पण पुन्हा Australia ला जाऊ शकत नाही असे सांगण्यात आले. मला कारणच कळत नव्हते. मी, विशालभाऊ, सुभाषभाऊ खूप प्रयत्न करूनही काही उपयोग झाला नाही. नंतर आम्हाला समजले की मी passport renew केला पण permanent Resident Visa(PR) देखील दर पाच

वर्षांनी renew करायचा असतो हे मी व महेश पूर्णपणे विसरलो होतो. हे ऐकल्यावर मी खूपच घाबरले व श्रीस्वामीजींचा धावा सुरू केला.

विशालभाऊंनी श्री अरुणसरांना सर्व हकिगत कळवली. सरांनी थोड्या वेळाने फोन करण्यास सांगितले. आम्ही सर्वच तणावाखाली असताना अविरत मात्र खूपच खूष दिसत होता. त्याच्यासाठी ही सुवर्णसंधी होती. तो म्हणाला, ''मम्मा, किती छान! आपण अजून काही दिवस बाप्पांबरोबर राहणार. You should be happy Mamma. What else you want?'' त्याचे हे वाक्य ऐकल्यावर मलाही थोडे बरे वाटले. जणुकाही माझी सर्व काळजीच देवाने घेतल्यासारखे मला वाटले. तेवढ्यात अरुणसरांचा फोन आला. मी व विशालभाऊ पुन्हा check-in counter ला गेलो तेव्हा त्यांनी Australian Embassy ला फोन केला व सांगितले की तेथे काहीही संपर्क होत नाही म्हणून तुम्हाला तुमच्या जबाबदारीवर जाऊ देतो. हे ऐकून अविरतचा थोडा हिरमोड झाला. पण आमचा प्रवास सुरू झाला. मी देवाचे आभार मानले. पुढे काय वाढून ठेवलंय ते आम्हाला काय माहीत!

सोळा तासांच्या प्रवासानंतर Australia ला पोहोचल्यावर check-out करताना मला व अविरतला पुन्हा थांबवले. तुमचा visa नसताना तुम्ही भारतात कसे गेलात व परत कसे आलात? असे आम्हाला विचारण्यात आले. अहो, जो काही अहंकार होता ना 'मी तयारी केली', 'मी निघाले दर्शनाला' तो सर्व गळून पडला व मी तिथेच रडत बसले. ज्या officer ने मला बसवून ठेवले होते त्याला काय वाटले कोणास ठाऊक? त्याने मला Bridging visa देऊन बाहेर जायची परवानगी दिली व पुढील सात दिवसात permanent Resident Visa ची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितली. हे न केल्यास मला देश सोडावा लागेल अशा आशयाच्या कागदपत्रावर सही घेऊन मला बाहेर सोडण्यात आले.

हे सर्व झाल्यावर सहजच मनात वाटून गेले की जर आत्ता माझ्याबरोबर अक्षय असता तर त्याला किती त्रास झाला असता? आता वाटतं की देवानेच मला बिना कागदपत्राची ही भारतभेट विनासायास पार पाडण्यास मदत केली. देवाचे त्याच्या भक्तांवर व एकंदरीत सर्वांवरच किती नि:स्वार्थ प्रेम असते हे मला कळाले.

अशीच कृपादृष्टी आम्हा सर्वांवर राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

मी माझ्या दोन्ही मुलांसह (अविरत व अक्षय) २०१७ नोव्हेंबर महिन्यात आश्रमात आले. साडे-तीन वर्षाच्या अक्षयची आश्रमात येण्याची ही पहिलीच वेळ. आश्रमात आल्यावर श्रीस्वामीजींनी अक्षयची विशेष काळजी घेण्यास सांगितले व काही साधनाही सांगितल्या. मी त्या मनापासून करत होते. डिसेंबरमध्ये महेश आश्रमात आला व त्यानंतर आम्हाला आई-वडिलांना भेटायला पुणे व रत्नागिरीला जायचे होते. या संदर्भात श्रीस्वामीजींना विचारले असता त्यांनी परवानगी दिली व ओंकारदादाला आठवणीने भेटण्यास सांगितले.

प्रथम पुण्याला माझ्या आई-वडिलांची भेट घेऊन रत्नागिरीला महेशच्या आई-वडिलांना भेटण्यास निघालो. एक दिवस मी, अविरत व अक्षय ओंकारदादाच्या घरी राहण्यासाठी निघालो. पूर्णपणे ठणठणीत असणाऱ्या अक्षयची तब्येत आश्रमात हळूहळू बिघडू लागली व एक दिवस तर त्याला खूपच ताप भरला. औषध देऊनही त्याचा ताप उतरत नव्हता. अशातच श्री स्वामीजींचाही अक्षयच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी फोन येऊन गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही ओंकारदादाने सुचवलेल्या डॉक्टरांकडे अक्षयला घेऊन गेलो. वातावरणातील बदलामुळे त्याला त्रास होत असावा असे आम्हाला वाटत होते. डॉक्टरांनी व्यवस्थित तपासले व असेच काहीसे मत व्यक्त केले. पण अचानक का कुणास ठाऊक डॉक्टरांनी त्याचे नाक तपासले व आम्हाला धक्कादायक गोष्ट सांगितली की अक्षयच्या उजव्या

नाकपुडीत अगदी आतल्या बाजुला पांढऱ्या रंगाची काहीतरी गोष्ट अडकली आहे. त्यांनी आम्हाला अक्षयला ताबडतोब ENT specialist कडे नेण्यास सांगितले व ओळखीच्या डॉक्टरांचा पत्ताही दिला. त्या डॉक्टरांनी तपासल्यावर सांगितले की जर चिमट्याने हे निघाले तर ठीक नाहीतर ऑपरेशन करावे लागेल.

परंतु देवाच्या कृपेने ऑपरेशनशिवायच, त्याच्या नाकात अडकलेला पेन्सिलच्या मागचा गोल रबर निघाला आणि अक्षयचे नाक मोकळे झाले. याचा अर्थ गेले दोन महिने अक्षयच्या नाकात तो रबर अडकलेला होता ज्याची आम्हाला कल्पनादेखील नव्हती. यानंतर अक्षय लगेचच पूर्ण बरा झाला.

दोन दिवसांनंतर एका नातेवाईकाला भेटायला गेलो असता त्यांनी त्यांच्या नातवाबद्दल एक घटना सांगितली. त्यानेही अक्षयप्रमाणेच काहीतरी नाकात घातले होते. काही तासातच त्याचा चेहरा सुजला व त्याला श्वास घेणे अवघड झाले. त्याची शस्त्रक्रिया करावी लागली होती. हे ऐकल्यावर आम्हाला श्रीस्वामीजींनी कोणत्या संकटातून सुखरूप बाहेर काढले याची जाणीव झाली.

ताप आला म्हणून डॉक्टरांकडे जाणे, त्यांनी नाक तपासणे हा निव्वळ योगायोग नव्हता. अक्षयला त्यांनी जिवावर बेतलेल्या संकटातून अलगद बाहेर काढण्यासाठी केलेली एक अद्भुत लीलाच होती.

आमच्या मनातील भक्ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो व देवाची अशीच कृपादृष्टी आम्हा सर्वांवर राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**मनिषा देसाई**

**ऑस्ट्रेलिया**

# मनिषाच्या आईचे अनुभव

मी माझ्या सासरी गेले होते. सर्वांचे चहापाणी व नाष्टा झाला होता. तेवढ्यात बाहेरून एक आवाज आला. बाहेर येऊन बघितले तर दाढी वाढलेली, खांद्यावर पिशवी असलेली एक व्यक्ती दारात उभी होती. ते ओळखीचे वाटले नाहीत, तरी घरात आले. त्यांना काही विचारायच्या आत त्यांनी पिशवीतून एक छोटीशी साईबाबांची मूर्ती काढून दिली. मी चहा घेऊन बाहेर येईपर्यंत ते नाहीसे झाले.

एकदा आम्ही माझ्या मोठ्या मुलाकडे गेलो होतो. देवखोलीत पोथी वाचत असताना मला तंद्री लागली व देव्हाऱ्याच्या भिंतीवर असंख्य चांदण्या चमकताना दिसल्या. तेवढ्यात माझ्या मोठ्या मुलाने देवखोलीच्या डाव्या कोपऱ्यात असलेले सामानाचे बॉक्स मागितले. मला ते सापडलेच नाही पण दोन-तीन मोठ्या बॉक्समधे शोध घेताना नोटांची मोठी बंडले सापडली. ते पाहून मी थक्क झाले.

२०१२ मधील अनुभव. माझ्या मुलीने काही पोथ्या मला वाचनासाठी दिल्या होत्या. मी देवपूजा, आरती वगैरे नेहमी करत असे. पण पोथीवाचन सुरू करताच चार महिन्यात माझ्या मोठ्या मुलाचा विवाह निर्विघ्नपणे पार पडला.

लोणावळ्यात माझे जुने घर होते. ते मोडकळीला आलेले होते. मुलाचे शिक्षण चालू असताना दोन-तीन वेळा प्रयत्न करूनही काही उपयोग झाला नाही.

मी माझ्या मोठ्या मुलाकडे असताना काही कारणानी वादविवाद झाला व आम्ही दोन महिन्यात घर सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर

अचानक माझे लोन पास झाले व त्यामुळे आम्ही लोणावळ्याचे घर बांधायला सुरुवात केली. माझ्या मुलीची खूप आर्थिक मदत झाली तसेच माझ्या दोन्ही मुलांनीही मदत केली. पेन्शनर असतानाही अनपेक्षितरित्या माझे घर बांधून झाले. श्रीस्वामीजींच्या कृपेने हे सर्व पार पडले व २९ सप्टेंबर २०१८ मध्ये मी श्रीस्वामीजींच्या फोटोसह, माझ्या नवीन घरात रहायला गेले. हा स्वप्नवत अनुभव मी कधीही विसरू शकणार नाही.

मी लोणावळ्यात असताना, देवासमोर दिवा लावून प्रार्थना करत होते. अचानक मला तंद्री लागली व फोटोतून श्रीस्वामीजी बाहेर आल्याचा अनुभव आला. मी तत्क्षणी तंद्रीतून बाहेर आले. हा सर्वात सुंदर व कधीही न विसरण्यासारखा अनुभव होता.

**मनीषा देसाईची आई**

**लोणावळा**

ॐ

# मंजिरी ओक

मी मुळची मुंबईची व मॉर्डर्न वातावरणात वाढलेली. देवावर विश्वास होता परंतु पुजा-पाठ, व्रतवैकल्ये या कशाशीही माझा दुरान्वयेही संबंध नव्हता. आजोळचे वातावरण अति-धार्मिक असल्याने बहुधा आध्यात्मासारख्या विषयाकडे माझा स्वाभाविक कल नव्हता. जेव्हा मी खरच खूप कष्ट भोगत होते तेव्हाही मी या सगळ्याचा कधीच विचार केला नाही.

वरवर पाहता सर्व व्यवस्थित होते- शिक्षण झालेले, नोकरी होती. पण माझ्या लग्नासाठीचे शोधकार्य जवळजवळ अडीच वर्ष सुरू होते. कुठेच नीट जमत नव्हते. विनाकारण नकार येत होते. त्यातच एका नावाजलेल्या IT Company मध्ये मी sales चा job करत होते. अतिशय कठीण targets होती जी प्रामाणिकपणे मेहनत घेऊनही पूर्ण होत नव्हती. सलग दीड वर्ष दररोज मी वरिष्ठांकडून प्रचंड अपमान सहन करत होते. काय चुकतंय याचं उत्तर नव्हतं माझ्याकडे! संकट आल्यावर देवापुढे याचना करणाऱ्यातील मुलगी मी नव्हते. स्वबळावर व कष्टाने गोष्टी मिळवण्यावर माझा विश्वास होता. उच्चारशुद्धीसाठी कधीतरी मी श्लोक किंवा स्तोत्र म्हणत असे. पण तेही ईश्वरभक्तीच्या भावनेतून नसायचे.

मग २०२० मध्ये करोना काळात एका विवाह संस्थेच्या माध्यमातून माझी समीर ओक याच्याशी ओळख झाली. Lockdown मुळे आमची भेट होत नसली तरी आम्ही बोलत होतो. आमची मैत्री वाढत होती व त्यातूनच लग्नाचा विचार पक्का होत होता.

मला प्राथमिक बोलण्यातूनच कळले होते की समीर आध्यात्मिक विचारांचा आहे. बाकी सर्व पसंत होते. स्वभाव जुळत होते. परंतु या

बाबतीत कसे जुळणार हा विचार मनात होता. पण तरीही आमचे लग्न ठरले व त्यानंतर समीरच्या आईने (सौ. रश्मी ओक) मला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दिले. श्रीस्वामी दत्तावधूत यांचे विचार सांगितले. आध्यात्म हे विज्ञान आहे, त्यातही एक शास्त्र आहे, काही नियम आहेत जे आपण दैनंदिन जीवनात अनुभवतो पण मानवी बुद्धीला त्याची जाणीव होत नाही असे सांगितले.

समीर व त्याच्या घरच्यांनी मला अतिशय प्रेमाने, सांभाळून हा विषय किती गहन आहे हे समजावले. पण कधीही कोणतेही दडपण आणले नाही. मी सुरुवातीला गंमत म्हणून पोथ्या-पुस्तके वाचायला सुरुवात केली. कोणताही पूर्वग्रह न ठेवता!

अजूनही माझ्या नोकरीत असंख्य अडचणी होत्या, रोजचे अपमान वाढतच होते. पण पोथी वाचायला लागल्यापासून ३ आठवड्यात अचानक एका नावाजलेल्या कंपनीकडून कळवण्यात आले की माझा profile बघून मला interview साठी बोलावलय. मला तर तेथे apply केल्याचे देखील आठवत नव्हते. बऱ्याच महिन्यांपूर्वी माझा profile पाठवला होता तो पाहून त्यांनी आत्ता माझ्याशी संपर्क साधला होता.

दोन दिवसात माझा interview होऊन माझी निवड सुद्धा झाली! मला लवकरात लवकर join करायला सांगितले होते आणि आश्चर्य म्हणजे माझ्या आधीच्या कंपनीचे contract त्याच दिवशी संपले होते. अद्भुत होतं सगळं! जवळजवळ पावणे दोन वर्षांचे रोजचे अपमानीत जीवन क्षणार्धात संपले होते. त्यामुळे जाता-जाता आधीच्या कंपनीत पण थोडा मान मिळाला.

या झालेल्या सर्व घटनांवर, समीरने किंवा घरच्यांनी मला स्वत:हून कधीच काही सांगितले नाही पण माझे मलाच हे जाणवले की हा सर्व पोथीवाचनाचा परिणाम आहे ज्यामुळे हे सर्व आपोआपच घडून आले आहे.

आज मी नवीन कंपनीमध्ये समाधानाने काम करत आहे. या एकाच अनुभवातून एवढी प्रचिती आली की आता मी रोज श्रद्धेने पोथीवाचन करते. कधी कामाच्या गडबडीत राहून गेले तर मनाला चुटपुट लागून राहते.

आज मी हे ठामपणे सांगू शकते की माझे पूर्वीचे विचार किती चुकीचे होते. खरच देव व मदत आसपासच असते. तुम्ही निर्मळ मनाने व शुद्ध हेतुने मागितले तर खरोखरच मदत मिळते. ईश्वरभक्ती करणे हे कमीपणाचे नसून मानव व ईश्वरामधील सुसंवाद वाढवण्याचे साधन आहे.

श्रीस्वामी दत्तावधूतांनी सांगितलेल्या सर्व नियमांचे पालन करण्याचा मी प्रयत्न करते. ईश्वरभक्ती, दान व परोपकार ही आयुष्याची त्रिसुत्री आहे हे अगदी खरं आहे. आज मला एक नवीन सकारात्मक आयुष्य व दृष्टीकोन दिल्याबद्दल तसेच मानवी जीवनाचा खरा हेतु समजण्यास मदत केल्याबद्दल मी श्रीस्वामीजींची अत्यंत ऋणी आहे.

**मंजिरी ओक**

**मुंबई**

ॐ

# पायल

श्रीस्वामीजी आणि सौ.आईंना कोटी कोटी प्रणाम करुन त्यांच्या कृपेने आलेले अनुभव पुढे देत आहे. लिखाणात काही चुका झाल्यास क्षमा करावी ही प्रार्थना करते.

माझे बाबा आधीपासूनच पोथ्यांचे वाचन करत होते. वयाच्या १८ व्या वर्षापासून मला पोथ्या व पुस्तके वाचायला मिळाली आणि त्यानंतर माझे आयुष्यच बदलून गेले.

श्रीस्वामीजींनी माझ्याकडून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** आणि **श्री दुर्गा त्रिशतीची** अनेक पारायणे करून घेतली. यामुळे माझ्या जीवनात खूप चांगले बदल झाले. साधनेने मनोबल वाढले, मनाला शांती प्राप्त झाली.

श्रीस्वामीजींनी माझ्याकडून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची** एक हजार पारायणे तसेच श्री दुर्गा त्रिशतीची एक हजार पारायणे, श्री दत्त स्तोत्राचे १०,००० पाठ, श्री दुर्गा स्तोत्राचे ५,००० पाठ व हवन यासारख्या साधना करून घेतल्या.

माझ्या आयुष्यात तो सुवर्ण दिवस आला ज्या दिवशी मला श्रीस्वामीजी आणि सौ. आईंचे (ॐ वनिता ॐ) दर्शन झाले. असे मुळीच वाटले नाही की मी श्रीस्वामीजींना पहिल्यांदा पाहत आहे. त्या दर्शनाचा आनंद शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. खूप आनंद झाला. मनामध्ये खूप ओढ निर्माण झाली. साधनेचा ध्यास वाढायला लागला. एक वेगळाच आनंद निर्माण होऊ लागला, त्या आनंदामध्ये खूप सुंदर अनुभव आले.

एकदा महाशिवरात्रीच्या दिवशी दुधाचा अभिषेक करत होते, मध्येच डोळे बंद केले तेव्हा श्रीस्वामीजी डोळ्यासमोर आले. असे वाटत होते की

दुधाचा अभिषेक त्यांच्यावर होत आहे. माझ्या डोळ्यातून पाणी आले. खूप खूप आनंद झाला.

**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** व **श्री दुर्गा त्रिशतीची** पारायणे चालू असताना असं वाटायचं की श्रीस्वामीजी आणि सौ. वनिता आई माझे संरक्षण करत आहेत.

एकदा श्री दत्तस्तोत्र म्हणत असताना श्रीस्वामीजी डोळ्यासमोर आले. त्यावेळी असे वाटत होते की ते माझ्या जवळच आहेत.

मानसपूजेला सुरुवात केल्यापासून मला खूप खूप फ्रेश वाटते.

एकदा संध्याकाळी आम्ही माझ्या बाबांच्या मित्रांकडे गेलो होतो. पावसाचे दिवस होते, येताना खूप रात्र झाली. रस्ता अतिशय खराब, अरुंद व तीव्र उताराचा होता. पावसाला सुरुवात झाली. माझी तब्येत बरी नव्हती. त्यात मी माझी रेनकोट कॅप विसरले होते. मी आता भिजणार असा विचार मनात येताच माझ्या तोंडावर पाणी पडणे बंद झाले. मला खूप आश्चर्य वाटलं म्हणून मी माझ्या बाबांना विचारलं तर ते म्हणाले मी तर भिजलो आहे. मी मनोमन श्रीस्वामीजींचे खूप खूप आभार मानले.

माझ्या वडिलांची तब्येत बिघडली होती, त्यावेळी त्यांच्याबरोबर हॉस्पिटल मध्ये राहणे व त्यांची काळजी घेणं हे करत असतानासुद्धा माझं मन खूप शांत व प्रसन्न होतं. या दरम्यान साधना आणि जबाबदारी याचा समतोल कसा साधावा हे मला श्रीस्वामीजींच्या दिव्य पुस्तकांमधून शिकायला मिळालं.

त्यानंतर माझी तब्येत बिघडली, घरचे काळजी करू लागले. अशा परिस्थितीतसुद्धा देवाच्या कृपेने माझी मन:स्थिती उत्तम होती. मी माझ्या घरच्यांना धीर देत होते. पोथ्या व पुस्तके वाचायला लागल्यापासून कोणतेही

दु:ख, आजारपण, संकट हे खूप छोटं वाटतं. अशा परिस्थितीतसुद्धा देवावर अपार श्रद्धा आणि ओढ असते.

ही सगळी जबाबदारी पार पाडत असताना मला असं लक्षात आलं की साधनेबरोबरच सद्गुणांना खूप महत्त्व आहे. सिद्धयोग्याच्या सहवासात भाग (१, २) यामध्ये सौ.आईंनी त्यांचे जे अनुभव दिले आहेत, त्यातून मला सद्गुण जोपासण्याची प्रेरणा मिळाली. मी सद्गुणांचा अभ्यास करू लागले. कोणाचेही मन दुखावले जाऊ नये, इतरांची सेवा कशी करावी, सगळ्यांवर मनापासून आणि नि:स्वार्थ प्रेम कसं करावं, कोणाचाही तिरस्कार करू नये हे या पुस्तकातून शिकायला मिळालं. पुस्तके वाचनात ठेवली की दैनंदिन जीवनात कसं वागायचे हे समजतं. सौ.आईंनी (ॐ वनिता ॐ) सांगितल्याप्रमाणे सगळ्यांचा विचार करणे, त्यांच्याशी आपुलकीने वागणे याचासुद्धा अभ्यास करू लागले. या वागण्यामुळे आजूबाजूचे सर्व लोक खूप खुश झाले, ते माझे कौतुक करू लागले. माझ्या आई बाबांना खूप आनंद झाला. नेहमी आनंदात राहणे अतिशय गरजेचे आहे हे जाणवले. कारण त्यामुळेच ईश्वर आपल्याजवळ राहतो. बाबांच्या आजारपणामध्ये मी माझ्या मनाला शांत आणि सकारात्मक ठेवलं. हे सगळं मला पुस्तकातून शिकायला मिळालं. त्याचबरोबर प्रत्येक काम हे ईश्वराची पूजा समजून करावे हे समजले. देवाच्या कृपेने हा आनंद दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे.

प्रत्येक वेळी आपली कोणीतरी खूप काळजी घेत आहे हे जाणवते. अपरिचित ठिकाणीसुद्धा चांगली मदत मिळते. पोथ्यांचे वाचन सुरू केल्यापासून स्वभावात खूप चांगले बदल झाले. मन शांत व प्रसन्न झाले. आत्मविश्वास वाढला, कसं वागावं हे समजलं, स्ट्रेंथ वाढली. प्रत्येक परिस्थितीत आनंदाने व समाधानाने कसे जगायचे, नम्रता, इतरांचा आदर करणे, परोपकार,

इतरांसाठी आपल्या शरीराला कष्ट देणे, या गोष्टी श्रीस्वामीजींच्या आणि सौ.आईंच्या कृपेने समजल्या. माझ्या आयुष्याला योग्य दिशा मिळाली.

प्रत्येक क्षण श्रीस्वामीजी आणि सौ.आईंच्या स्मरणात जावो आणि माझ्याकडून ईश्वरभक्ती होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**पायल**

ॐ

# प्रज्ञा पाटील

श्रीस्वामी दत्तावधूत यांचे ग्रंथ म्हणजे माझ्या जीवनाचा आधार. २०१० साली माझ्या वडिलांना एका व्यक्तीने **श्रीसिद्धलीलामृत-श्रीदत्तलीलामृत** ही पोथी दिली. पण कोणी दिली तेच आठवत नाही. ही पोथी घरात येताच आमचे कर्ज फिटले, आम्ही नवीन घर बांधले. मी **श्रीसिद्धलीलामृत-श्रीदत्तलीलामृत** मधील एक अध्याय दररोज वाचत असे. मी पास होणार नाही असे वाटत असताना second class मध्ये पास झाले. काही दिवसांनी मी श्रीस्वामीजींचे सर्व ग्रंथ आणले. ते सर्व ग्रंथ वाचून भारावून गेले.

✻ १४ जून २०१३ ला मी अचानक पडले. पायाला लागले व पाय सुजला. रविवार असल्याने सर्व दवाखाने बंद होते. वेदना असह्य होत्या. अनेक औषधे केली, पण वेदना थांबत नव्हत्या. मग मी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केली. मी चौथ्या अध्यायापर्यंत पोहोचले असता वेदना थांबून कधी झोप लागली कळले देखील नाही.

✻ जून २०१५ साली माझ्या वडिलांच्या पोटात दुखायला लागले. त्या आधी दोनदा त्यांचे मुतखड्यांचे ऑपरेशन झाले होते. रात्री १ वाजता त्यांना दुखायला लागले. हॉस्पिटलमध्ये जाण्याअगोदर **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** आणि **श्रीस्वामी समर्थ सप्तशतीचे** वाचन केले. मग हॉस्पिटलसाठी निघणारच होतो तेवढ्यात पोटदुखी थांबली.

✻ आम्ही गावाहून येत असताना आंब्याच्या पाच पेट्या आणि इतर सामान होते त्यामुळे एकही रिक्षावाला थांबेना. दीड तास झाला शेवटी श्रीस्वामीजींना प्रार्थना केली, अचानक पोलिस व्हॅन आली. त्यातून पूर्ण

पांढरे कपडे घातलेली एक व्यक्ती आली. त्यांनी दोन रिक्षा थांबवल्या. आम्ही सामान रिक्षात ठेवेपर्यंत ती व्यक्ती निघूनही गेली.

✻ २०१९ महाशिवरात्रीच्या दिवशी पहाटे उठून गॅसवर पाणी ठेवताना, गॅस चालू, ब्रॅकेट तुटून, ट्यूब लाईट अंगावर फुटली. घरातले सर्व घाबरले, पण कोणाला काहीही झाले नाही. फार मोठा अपघात होणार होता पण श्रीस्वामीजींनी सर्व सांभाळले.

✻ एकदा मला माझ्या शाळेतील शिक्षिकेने गोरेगावला नेले. जाताना त्या बसने गेल्या व मी ट्रेनने निघाले. गोरेगाव स्टेशन नवीन केल्यामुळे कसं जायचं हे काहीच समजत नव्हते. दहा मिनिटे फिरून मी पुन्हा तिकीट घराकडे यायची. अचानक मला माझा एक विद्यार्थी भेटला व तो मला प्लॅटफॉर्मला सोडून निघून गेला.

✻ १९ डिसेंबर २०१९ रोजी माझ्या आईचे ऑपरेशन ठरले. तिचे बीपी सारखे वाढत असल्याने ऑपरेशन पुढे ढकलले जात होते. १९ डिसेंबरला ऑपरेशन ठरले. त्या दिवशी जर बीपी कमी झालेले नसेल तर ऑपरेशन होणार नाही असे डॉक्टरांनी सांगितले. आम्ही सकाळपासून हॉस्पिटलमध्ये बसून मोबाईलवर **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** आणि **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** वाचले. हॉस्पिटलमध्ये एक वाजता एवढा सुगंध पसरला की दोन वाजता माझी आई ऑपरेशन वॉर्डमध्ये चालत गेली आणि ऑपरेशन उत्तम झाले.

✻ जुलै २०२० मध्ये रत्नागिरीला असताना, रात्री १ वाजल्यापासून ३ वाजेपर्यंत एक बाई आईच्या कानात बोलत रहायची. आई माजघर फिरत रहायची. सकाळी चेहरा सुजायचा. सगळे रिपोर्ट केले तेव्हा डॉक्टरांनी सांगितले अजून चार दिवस झोपल्या नाही तर काही सांगू शकत नाही. एका रात्री तर एवढा कहर झाला की मी रात्री दोन वाजता उठून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला

सुरुवात केली.  तत्क्षणी आईला आवाज ऐकू येणे बंद होऊन गाढ झोप लागली.

✻ २८ ऑगस्ट २०२० रोजी माझ्या वडीलांना ताप आला. Pneumonia असल्याचे सांगण्यात आले. पण दिवसेंदिवस तब्येत खालावत होती. शुगर वाढली होती, ब्लड प्रेशर कमी झाले होते, पेशी कमी झाल्या होत्या. आम्ही त्यांना मुंबईला आणण्याचा निर्णय घेतला. ४ सप्टेंबर रोजी त्यांना मुंबईला आणताना सांगितले की ते कुठेही आपटले तर ब्लिडिंग होऊ शकते जे थांबवता येणार नाही. गाडीत एका बाजूला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन चालू आणि दुसरीकडे बाबांना हॉस्पिटलमध्ये नेत होतो. डॉक्टर हैराण झाले की एवढा प्रवास करणं अशक्य आहे. दुसऱ्या दिवशी कोविड टेस्ट करण्यासाठी दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेत असताना डॉक्टरांनी सांगितले की श्वास बंद झाला आहे. फक्त पोट हलत आहे. सेव्हन हिल्स हॉस्पिटलमध्ये नेईपर्यंत ऑक्सिजन लेव्हल २५ वर आली. हॉस्पिटलमध्ये घेत नव्हते पण प्रत्येक ठिकाणी श्रीस्वामीजींनी सोय केली. ते आयसीयू मध्ये असताना ऑक्सिजनही खेचू शकत नव्हते. अरूण सरांना फोन केला तेव्हा त्यांनी श्रीस्वामी समर्थ सप्तशती ग्रंथाची पारायणे करायला सांगितले. सर्व सुरळीतपणे पार पडले. २९ सप्टेंबर २०२० रोजी डिस्चार्ज देखील मिळाला. इथे घरी आई पण आजारी होती तीसुद्धा बरी झाली. खरोखरच श्रीस्वामीजींचे ग्रंथ म्हणजे भक्तांसाठी अमृतच आहेत.

**प्रज्ञा पाटील**

**जोगेश्वरी**

ॐ

# प्रथमेश पावसकर

## दैवी सहाय्य

लांजा येथे रहाणारा प्रथमेश पावसकर नावाचा २५ वर्षांचा युवक आपल्या मित्रांसोबत कारने पालीला निघाला होता. गाडी तोच चालवित होता. दुर्दैवाने त्यांच्या गाडीला अपघात झाला व त्यात इतरांना किरकोळ दुखापत झाली, पण तो मात्र गंभीरपणे जखमी झाला.

त्याला रत्नागिरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो अनेक दिवस बेशुद्धावस्थेत होता व शेवटी कोमात गेला. डॉक्टरांनी आशाच सोडली व त्याला कोल्हापूरला घेऊन जाण्यास सांगू लागले. शेवटी त्याला व्हेंटीलेटर लावण्यात आले. आता तो काही दिवसांचाच सोबती आहे असे सांगण्यात आले.

प्रथमेश कोमात गेल्यानंतर एकदा मंदार आचरेकरचा मित्र, योगेश, रुग्णालयात त्याला पहायला गेला. योगेशने पाहिले की प्रथमेशची oxygen level कमी होत चालली होती, तेव्हा योगेशने त्याच्या छातीवर हात ठेऊन श्रीस्वामी समर्थांचा जप केला. काही वेळातच प्रथमेशची नाडी वाढल्याचे दिसले. योगेशने मग प्रथमेशच्या आईला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** ही पोथी देऊन रोज दोन वेळा वाचायला सांगितले. त्याप्रमाणे आई सकाळी एकदा व संध्याकाळी एकदा पोथी वाचू लागली. हळूहळू प्रथमेशच्या तब्येतीत सुधारणा दिसू लागली. तो आपली बोटे हलवू लागला व नंतर आपला हात हलवू लागला. अशी चमत्कारिक सुधारणा दिसल्यानंतर डॉक्टरांनी लगेच उपचार सुरू केले.

कोमात गेल्यापासून तो पस्तीसाव्या दिवशी पूर्ण शुद्धीवर आला. त्यानंतर तो वॉकरच्या सहाय्याने चालू लागला. आता तो काठी घेऊन सगळीकडे फिरत असतो.

**प्रथमेश पावसकर**

**लांजा**

ॐ

# प्रतिक चौगुले

मी प्रतिक चौगुले, माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा माझा अनुभव कळवत आहे.

मला अगदी लहानपणीच म्हणजे चौथीत असतानाच हातात पोथ्या मिळाल्या. आईने माझ्याकडून गणपती स्तोत्र, नवग्रह स्तोत्र, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र, दत्तस्तोत्र हे सर्व पाठ करुन घेतले. या स्तोत्रांचे हजारो पाठ केले. तसेच श्रीस्वामीजींच्या कृपाशिर्वादाने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र**, श्री देवी कवच, श्री देवी सूक्त व श्री नारायणी स्तुती यांचे रोज पारायण होत होते. या सर्वांमुळे माझ्या स्वभावात एक प्रकारचे स्थैर्य व शांती येत गेली. श्रीस्वामीजींवरील श्रद्धा दृढ होत गेली जी मला भावी आयुष्यात अत्यंत गरजेची होती. त्यामुळे C.A. चे attempt देताना माझी श्रद्धा तसूभरही कमी झाली नाही उलट आश्रमात जाऊन सेवा करावी अशी बुद्धी होत गेली. दिसताना जरी परिस्थिती विपरित दिसत असली तरी 'श्रीस्वामीजी सर्वकाही माझ्या भल्यासाठी करत आहेत व या सर्वातून मला घडवत आहेत' हा माझा विश्वास बळकट होत गेला. त्यातूनच मला Certified Public Accountant (C.P.A.) हा कोर्स करण्याची प्रेरणा मिळाली.

मी अमेरिकेतील California Board of Accountancy मधून Certified Public Accountant (C.P.A.) हा कोर्स केला आहे. प्रथम जेव्हा मी हे सर्व पेपर दिले तेव्हा अमेरिकेत असतानाच, पहिल्या पेपरचा result लागून त्यात मी पास झाल्याची बातमी समजली होती व इतर पेपरमध्ये पण मी पास होईन अशी खात्री वाटत होती. पण अनपेक्षितरित्या

जेव्हा मी इतर पेपरमध्ये पास होऊ शकलो नाही तेव्हा मला खरोखरच धक्का बसला. Result मुळे खरेतर आम्हा सर्वांनाच धक्का बसला होता.

श्रीस्वामीजींची सर्व पुस्तके आम्ही सर्वजण एकत्रित वाचतो व घरात नेहमी त्यावर चर्चा होते. बऱ्याचदा या वाचनातून आम्हाला एखादी न जाणवलेली गोष्ट समजण्यास मदत होते. एकदा आम्ही चर्चा करत असताना असे जाणवले की श्रीस्वामीजींनी सर्व पुस्तकांमधून ईश्वरभक्ती, दान व परोपकाराचे महत्व अधोरेखित केले आहे. जर या तीन गोष्टी व्यवस्थित झाल्या तर माणसाच्या आयुष्यातील बऱ्याचशा समस्या सुटतात. माणसाच्या बहुतांश समस्यांचे मूळ, या तीन गोष्टीपैकी एखादी गोष्ट आपल्या हातून न होणे, यातच दडलेले आहे. याचाच अर्थ असा की आपल्याकडून कदाचित एखादी गोष्ट up to the mark होत नाही. विचार केला असता असे वाटले की आपण दान आणखी वाढवायला हवे. त्यानुसार पप्पाने एक lump sum amount दान केली व नंतर २ महिन्यांनी मी पुन्हा अमेरिकेला परिक्षेसाठी गेलो. मधल्या काळात मी वाचन व स्तोत्रपठण करतच होतो व श्रीस्वामीजींच्या कृपेने अगदी regular आश्रमात जात होतो. या गोष्टींमुळे मला stable रहायला मदत मिळत होती. याच आधारावर मला नव्याने उभे रहायचे बळ मिळत होते.

यावेळी मी फक्त १५ दिवसांसाठी अमेरिकेला गेलो होतो. पण भारतातून निघतानाच, California येथील श्री योगानंदांच्या आश्रमात, शक्य झाल्यास जायचे असे मी ठरवले होते. त्यानुसार शेवटच्या पेपरच्या दोन दिवस आधी मी सकाळीच तेथे पोहोचलो. कारण मी आधीच बघून ठेवले होते की तेथे फक्त ६.३० ते ७.३० या वेळेत ध्यानमंदिर उघडे असते. बाकी पूर्ण वेळ ते बंद असते. म्हणून मी त्या वेळेतच तेथे पोहोचलो. ध्यानासाठी आजूबाजूचे काही भक्तही आले होते ते ७.३० ला तेथून निघून गेले. ध्यान

conduct करणाऱ्या व्यक्तीकडे चौकशी केली असता असे समजले की आश्रम ९ वाजल्यानंतरच लोकांसाठी उघडला जातो. त्याआधी आत जाऊ शकत नाही. मी घरी (ठाण्याला) फोन लावला व इतका वेळ काय करु, आश्रम उघडेपर्यंत बाहेरच बसतो वगैरे गप्पा मारत त्यांना बाहेरुन आश्रम दाखवला. माझे सर्व बोलणे कारमध्ये बसलेला एक अमेरिकन मनुष्य ऐकत होता. त्याला मराठी समजत नसावे असे मला वाटते. मी फोन ठेवल्यावर त्या माणसाने माझी चौकशी केली. मी त्यांना सर्व सांगितले तेव्हा ते म्हणाले, ''चल बस, मी तुला आत घेऊन जातो.'' मला आश्चर्यच वाटले कारण अमेरिकेतील माणसे नियम खूप काटेकोरपणे पाळतात व कोणासाठीही तो मोडत नाहीत. मी त्यांच्याबरोबर आत गेलो. बोलता-बोलता मी त्यांना म्हणालो की येथील vibrations अगदी माझ्या गुरुंच्या आश्रमातील vibrations सारखी आहेत. त्यावर ते हसून म्हणाले, ''बहुधा तुमच्या गुरुंनीच माझ्या गुरुंना निरोप पाठवला असावा आणि म्हणूनच मला तुला आत नेण्याची प्रेरणा झाली असावी.'' मी मनोमन श्रीस्वामीजींना नमस्कार करुन आत प्रवेश केला. 'तेथे काय बघायचे' हे सर्व मला सविस्तर सांगून ते भक्त तेथून निघून गेले.

मी आश्रमात फिरु लागलो व घरच्यांना फोन करुन आश्रमाचा सर्व परिसर दाखवला. फिरता-फिरता मी एका lake जवळ आलो. त्यात एक बोट उभी होती. तेथे गेल्यावर मला तेथील सेवेकऱ्यांनी सांगितले की येथे श्री योगानंद रहात असत. मी त्यांना 'आत येऊ शकतो का' असे विचारले असता ते म्हणाले की सध्या येथे renovation चे काम चालू असल्याने तू एक महिन्यानंतर ये. मी त्यांना म्हणालो की मी येथून ३-४ दिवसात भारतात परत जाणार आहे त्यामुळे मला ते शक्य नाही. त्यावर थोडा विचार करुन ते म्हणाले, ''ठीक आहे. तू आत ये. मी तुला पूर्ण बोट दाखवतो.'' मला त्यांनी

पूर्ण बोट दाखवली व तेथील माहिती दिली. मग ते म्हणाले की ती वरची खोली श्री योगानंदांची असून तेथे कोणालाही प्रवेश नाही पण मला, तुला तेथे न्यावेसे वाटत आहे. तू माझ्याबरोबर चल. त्या खोलीत प्रवेश करताच बाहेरील सर्व आवाज पूर्णपणे बंद झाले. एक वेगळीच एनर्जी तेथे जाणवली. त्यांनी मला ती खोली दाखवली व श्री योगानंदांबद्दल बरीच माहिती दिली. तेथून बाहेर पडल्या-पडल्याच ते सर्व आवाज परत ऐकू येऊ लागले. मला धक्क्यावर धक्के बसत होते. भारावलेल्या अवस्थेत मी तेथून बाहेर आलो व घरी फोन केला. आम्हा सर्वांना खूपच आनंद झाला होता. तेवढ्यात आणखी एक सेवेकरी येऊन म्हणाला की खरेतर इथे video call करायला मनाई आहे. पण तू फोन बंद करू नकोस. दाखव पूर्ण आश्रम.

९ वाजेपर्यंत पूर्ण आश्रम पाहून झाल्यावर मी reception जवळ आलो. तेव्हा ते नुकतेच उघडले होते. मी तेथील पुस्तके व फोटो पहात होतो. मला काही फोटो हवे होते त्याबद्दल, तेथे बसलेल्या lady ला मी विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या की हे फोटो मला वर जाऊन घेऊन यावे लागतील तोपर्यंत हा counter सांभाळशील का? मी हो म्हणालो. ती गेल्यावर एक माणूस तेथे आला. त्यांना मी आश्रमाची पूर्ण माहिती दिली व 'कसे व कुठे जा' हे सांगितले. तोपर्यंत ती lady आली. मला हवे असलेले फोटो मी घेतले. तेव्हा त्यांनी तेथील ३४ छोटी पुस्तके मला भेट दिली व म्हणाल्या की तू इतका वेळ volunteering केल्याबद्दल भेट. काय करावे व काय बोलावे हे मला सुचत नव्हते. श्री योगानंदांच्या आश्रमात जाऊन थोडा वेळ सेवा करण्याची संधीही श्रीस्वामीजींच्या कृपेने मला मिळाली. मी आनंदातच घरी परतलो.

परिक्षेदरम्यान, वाचन व ध्यानामुळे माझा आत्मविश्वास टिकून होता व मी नक्की यातून बाहेर येईन हा विश्वास दृढ होत होता. पण शेवटचा पेपर

मला खूपच कठीण गेल्यावर माझे tension वाढले. असे खात्रीपूर्वक वाटू लागले की मला हा पेपर पुन्हा द्यावा लागणार. कारण C.P.A. चे passing percentile ७५% आहे. पण result लागल्यावर या पेपरमध्ये मला इतर पेपरपेक्षाही जास्त मार्कस् मिळाले होते. मला खूपच आश्चर्य वाटले कारण तेवढे मार्कस् मिळतील असे मला वाटलेच नव्हते. श्रीस्वामीजींच्या सांगण्यानुसार 'दान' केल्यामुळे, तसेच त्यांनी ईश्वरभक्ती व सेवा करुन घेतल्यामुळेच, हा एवढा मोठा चमत्कार त्यांनी घडवला होता याची जाणीव झाली. या अनुभवामुळे आम्हाला श्रीस्वामीजींचे, त्यांनी लिहिलेली पुस्तके सतत वाचनात ठेवण्याचे व विशेषत: त्यांनी सांगितलेल्या 'दानाचे महत्व' पुन्हा एकदा पटले.

**प्रतिक चौगुले**

**ठाणे**

## शिल्पा चौगुले

मी शिल्पा चौगुले, माझा मुलगा प्रतिक, याच्या लग्नादरम्यान आलेले अनुभव कळवित आहे. प्रतिकचे नाव लग्नासाठी नोंदविल्यानंतर, दोन महिन्यातच lockdown सुरू झाला. या काळात मुलामुलींना एकमेकांना भेटणे शक्य नसल्याने, लग्न जमण्यात खरेतर बऱ्याच अडचणी येऊ शकल्या असत्या. पण श्रीस्वामीजींच्या कृपेने, चार-पाच महिन्यातच त्याचे लग्न जमले आणि एका उच्चशिक्षित व अत्यंत सुसंस्कृत घराण्याशी संबंध जुळला. कल्याणीच्या शांत, मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावामुळे, मला सूनेच्या रुपात मुलगीच लाभली. लग्न जमल्यानंतर आम्ही मोठा फ्लॅट घेण्याचा विचारात होतो. दोन

महिन्यातच अनपेक्षितपणे अनेक घटना घडल्या. आमच्या रहात्या घराला, या lockdown मध्ये अपेक्षेपेक्षा खूपच चांगली किंमत मिळाली, आम्ही नवीन फ्लॅट बुक केला व एक अतिशय सुंदर घर वाजवी किंमतीत भाड्याने मिळाले. श्रीस्वामीजींचा कृपाशिर्वाद आमच्या पाठीशी असल्याचा अनुभव, आम्ही अगदी पदोपदी घेतला. त्या आधारावरच lockdown च्या काळात लग्न तसेच आमचे shifting, कोणतीही अडचण न येता, अगदी सुरळीतपणे पार पडले.

लग्न ठरल्यापासून, आमच्या सर्वांच्या बोलण्यातून, कल्याणीला श्रीस्वामीजींचे विचार समजले. आध्यात्म म्हणजे केवळ पोथी वाचन, तीर्थयात्रा करणे किंवा देवळात जाणे नसून, त्याचबरोबर स्वत:मध्ये positivity आणणे, आपल्यातील दोष जाणून घेऊन सद्गुणांची जोपासना करणे आहे, हे त्यांचे विचार तिला खूपच आवडले. या विचारांनी प्रेरीत होऊन, लग्नानंतर हळूहळू ती श्रीस्वामीजींची पुस्तके वाचू लागली. त्यातून प्रेरणा मिळून काही महिन्यातच, तिने श्री दत्त स्तोत्र म्हणणे सुरू केले. मग हळूहळू **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** जमेल तसे वाचू लागली. एवढेच नव्हे तर तिची आई श्रीस्वामीजींची पुस्तके व पोथ्या घेऊन गेली. त्या घरी गेल्यावर, तिचा भाऊ अभिजित याला देखील ती पुस्तके वाचण्याची प्रेरणा झाली. त्याला ती पुस्तके व त्यातील विचार एवढे आवडले की त्याने सर्व पुस्तके झपाट्याने वाचून काढली. ती वाचून झाल्यावर तो देखील **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचू लागला. त्यानंतर त्याला कंपनीत promotion मिळाले व अनपेक्षितपणे पगारात वाढ झाली.

कल्याणी, Siemens कंपनीत काम करते. यावर्षी देखील कंपनीकडून तिला Star Award मिळाले. सलग तिसरे वर्ष तिला हे बक्षीस मिळाल्याने, आम्ही सर्व खूष होतो. यावर्षी कंपनीच्या सर्व employees करिता Covidshield vaccine देण्याची जबाबदारी, तिच्यावर सोपवली

गेली. त्यासाठी लागणारी सर्व व्यवस्था, जसे hospital ची निवड, vaccine ची availability, डॉक्टरांशी सतत संपर्कात रहाणे अशा इतर अनेक गोष्टींसाठी, सलग २ महिने अथक काम केले व सर्वांचे लसीकरण करुन घेतले. शनिवार व रविवारी देखील बऱ्याचदा तिला काम करावे लागे. या सर्व गडबडीत सुद्धा ती जसे जमेल तसे वाचन व दत्त स्तोत्र म्हणत होती. त्यातूनच हे काम करण्याची उर्जा मिळत असल्याचे तिला जाणवले. त्यामुळे ती अधिक जोमाने वाचन करु लागली.

तिचे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचन व स्तोत्रपठण सुरू होते. त्याच दरम्यान तिला पुन्हा एकदा Star Award तसेच promotion देखील मिळाले. ती म्हणाली की आमच्या कंपनीत, एकाच वर्षी दोन award मिळणे हे जरा दुर्मिळच आहे. आम्ही सर्वांनी श्रीस्वामीजींच्या फोटोला नमस्कार केला व तिने स्वत:हून १०८ दत्त स्तोत्र म्हणून त्यांचे आभार मानले. दुसऱ्या दिवशी कंपनीच्या Health Management India Head कडून personal mail व खास बक्षिस मिळाले. अशा प्रत्येक चांगल्या बातमीनंतर, १०८ दत्त स्तोत्र म्हणून तिने श्रीस्वामीजींचे मन:पूर्वक आभार मानले. Vaccination drive तिला करायला मिळणे तसेच नंतर award व recognition मिळणे याचे श्रेय ती श्रीस्वामीजींना देते. अशा रितीने श्रीस्वामीजी आम्हा सर्वांना, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याची सद्‌बुद्धी देवोत ही त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना.

**शिल्पा चौगुले**

**ठाणे**

ॐ

# राधिका आळशी

गुरु गोविंद दोनो खडे। काके लागु पाय ।
बलिहारी गुरु आपकी । गोविंद दियो दिखाय ।।

श्रीस्वामी दत्तगिरींच्या कृपेचा अनुभव–

पूर्वजन्मीच्या सुकृताचे फळ म्हणून स्वामींची पुस्तके माझ्या हाती लागली. भाग्य फळफळले. आयुष्याला दिशा मिळाली. संपूर्ण जीवन अंतर्बाह्य बदलून गेले. आचार विचार बदलले. दृष्टी बदलली, अंतर्मन उजळून गेले.

स्वामींची पुस्तके वाचणे, वाटणे, त्यांनी दिलेली साधना, नोकरी व घर सांभाळून जशी जमेल तशी करणे चालू होते. त्याचे आश्चर्यकारक परिणाम व अनुभव क्षणोक्षणी येतच होते. सतत येणाऱ्या संकटांमधून अचानक मार्ग मिळत होता.

पण शंका होती. सर्वसाधारण गुरु-शिष्याचे नाते, गुरुंनी स्वत: दिलेला मंत्र, गुरुंचे प्रत्यक्ष दर्शन व त्यांच्याबरोबरचा प्रत्यक्ष संवाद किंवा प्रवास, त्यांनी स्वत: एखाद्या शंकेचे निरसन करणे असे माझ्याबाबतीत काहीच नव्हते.

स्वामी पुस्तक रुपानी तसेच श्री. दाभोळकर यांच्याकरवी मार्गदर्शन करत होते. सतत वाटायचे की श्रीस्वामीजी भेटले पाहिजेत. मला कसे

कळेल की श्रीस्वामीजी माझ्या पाठीशी आहेत? माझी भक्ती, साधना त्यांच्या पर्यंत पोहोचते का? वगैरे अनेक शंका होत्या.

त्यातच माझी बदली नागपूरला झाली. बदली झाल्याझाल्या माझ्या जावेने मला सांगितले की तू काळजी करू नकोस. तेथे माझ्या बहिणीचे घर आहे, तू फक्त तुझे कपडे घेऊन जा. सर्व इतर सामानासहित भांडीकुंडी, एसी, मिक्सर, गॅसपर्यंत सर्व गोष्टी तेथे होत्या. भाडेही नाममात्र होते. हे श्रीस्वामीजींच्या कृपेशिवाय शक्यच नव्हते.

२ ऑक्टोबर २०१६ ला गांधी जयंतीच्या दिवशी मी, माझे यजमान, नणंद, तिच्या दोन सुना व नातू असे सातजण माझ्या कारने रेणुका देवीचे दर्शन घ्यायला निघालो. माझ्या गाडीत श्रीस्वामीजींचा फोटो होता. तो नवरात्रीचा दुसरा दिवस होता. मी कार चालवत होते. अचानक पुढे ट्रक आला व मला पुढचे काही कळलेच नाही. बेशुद्ध होण्याआधी मी मनातल्या मनात श्रीस्वामीजींना प्रार्थना केली की गाडीतील सर्वांना वाचवा.

थोड्या वेळानी शुद्धीवर आले तेव्हा पाहिले की गाडीचा चक्काचूर झाला होता पण सर्वजण व्यवस्थित होते. किरकोळ fracture वगळता कुणालाही गंभीर इजा झाली नव्हती.

काही महिन्यांनंतर मी खामगाव येथील श्री गोंदवलेकर महाराजांचे भक्त आणि थोर व्यक्ती श्री देडे मामा यांच्याकडे गेले. त्यांना, व्यक्ती पाहताच त्यांचा पूर्वेतिहास दिसतो असे कळले होते. त्यांच्याकडून मार्गदर्शन घेण्यासाठी खामगावला जायचे ठरवले. श्री. देडे मामांकडे जाताना मी मनातल्या मनात श्रीस्वामींना म्हटले की देडे मामांना तर सर्व समजते व दिसते. तुम्ही माझ्या पाठीशी आहात हे मला आज समजायला हवे.

आम्ही देडे मामांकडे पोहोचलो. काही वेळ त्यांच्याशी मार्गदर्शनपर बोलणे झाल्यावर, त्यांनी आमच्या झालेल्या अपघाताचे वर्णन करायला सुरुवात केली. अपघात कसा झाला ते सांगितले. ते म्हणाले की तुझ्या गुरुंनी तुला लहान मुलासारखे उचलून बाजूला ठेवले. तुझ्या पुण्याईने तुझ्या नवऱ्याचेही प्राण वाचले आहेत.

त्यांनी मला विचारले की तुला तुझ्या स्वामींना भेटायचे आहे का? मी लगेचच हो म्हटले कारण मला पक्की खात्री हवी होती. त्यांनी माझ्या डोळ्यावर हात ठेवला व मला डोळे मिटून मन एकाग्र करण्यास सांगितले. मग त्यांनी श्रीस्वामीजींचे वर्णन करण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, ''तुझे श्रीस्वामीजी पांढऱ्या शुभ्र वस्त्रात असून त्यांना दाढी आहे. ते हिमालयातील एका गुहेत बसले आहेत.'' तरीही माझी संपूर्ण खात्री झाली नव्हती.

पण जेव्हा त्यांनी परवलीचा शब्द उच्चारला तेव्हा मला पूर्ण खात्री पटली की हे माझे गुरुच आहेत. तो शब्द होता, ''तुझे श्रीस्वामीजी प्रकाशमार्गाचे गुरु आहेत.'' माझा आनंद गगनात मावेनासा झाला. ते पुढे म्हणाले की तुझे गुरु मला दिसत असून ते माझ्याशी कनेक्ट झाले होते. मी लगेच त्यांचे पाय धरले व नमस्कार करत होते, तेवढ्यात त्यांनी त्यांचे पाय मागे घेतले व म्हणाले, ''तुमच्या गुरुंना पाया पडलेले आवडत नाही.'' मग तर मला पूर्णच खात्री पटली. त्यांनी मला पुन्हा मन एकाग्र करून श्रीस्वामीजींचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला, पण मला तेवढे कनेक्ट होता आले नाही. यावर ते म्हणाले की तुला अजून साधनेची गरज आहे. साधना कर म्हणजे गुरुभेट नक्की होईल. आता माझे मन नि:शंक झाले आहे. श्रीस्वामीजी माझ्या पाठीशी आहेत याची आता मला खात्री पटली आहे.

आता मला फक्त त्यांनी दिलेल्या मार्गावरून मार्गक्रमण करायचे आहे. त्यांच्यामुळे मला देण्यातला आनंद समजला आहे. जीवनाचा आनंद समजला आहे. गूढ रहस्ये कळली आहेत.

यह तन विष की बेलरी, गुरु अमृत की खान ।
शीश दियो जो गुरु मिले, तो भी सस्ता जान ।।

**सौ. राधिका आळशी**
**भांडुप, मुंबई**

ॐ

# सुभाष पेडणेकर

माझे नाव सुभाष पेडणेकर. मी पुणे येथून तीन वर्षांचे शिक्षण घेतल्यानंतर, TELCO च्या डीलरशिप मध्ये motor mechanic म्हणून कामाला लागलो. त्यानंतर मुंबईमध्ये टाटा कंपनीच्या एका कार अँड ट्रक डीलरकडे नोकरी करीत होतो. कंपनीतील माझे काही मित्र TELCO मधून प्रशिक्षण घेऊन आलेले होते तर काहीजण कामासाठी परदेशातही निघून गेले होते. पण काही वर्षांनी माझे कंपनीतले काम बदलले व मी वॉरंटीचे काम पाहू लागलो. हे Warranty Administrator चे काम पूर्णतः ऑफिसमध्ये बसून, फायलींग व कॉम्पुटरच्या सहाय्याने केले जाते. या पदावर रूजू झाल्यापासून माझा वर्कशॉप मधील मेकॅनिक म्हणून असलेल्या कामाशी संबंध संपला.

अशा प्रकारे त्या दिवसापासून ते ऑस्ट्रेलियामध्ये स्थलांतरित होईपर्यंत जवळजवळ सहा वर्षे मी याच पद्धतीचे काम केले. इथे मी सांगू इच्छितो – त्या काळात (१९९८ ते २००६) एकंदरीतच ऑटोमोबाईल डीलरशिप व सर्व्हिस उद्योगामध्ये अत्यंत हलाखीची परिस्थिती होती, अत्यंत कमी पगार, पगार वेळेवर न मिळणे, management तसेच ग्राहकांकडून प्रचंड त्रास तसेच वाईट वागणूक अशा अनेक समस्यांना तोंड देऊन नोकरी सांभाळण्याची तारेवरची कसरत दररोज करावी लागत असे. त्यात घरची परिस्थिती बेताचीच होती आणि लग्न होऊन नुकतीच मुलाची व संसाराची जबाबदारी असल्यामुळे, आहे ती नोकरी टिकवणे याच्याशिवाय माझ्यासमोर दुसरा कुठलाही मार्ग नव्हता. मला याच प्रकारचे काम येते आणि जरी नोकरी बदलली तरीही कामाच्या ठिकाणाची परिस्थिती व पगार यात काहीही फरक होणार नव्हता.

आमच्या मित्रमंडळींमधील काहींनी परदेशात जाण्याचा मार्ग शोधला व त्याबद्दल माहिती गोळा केली. मिळालेल्या माहितीवरुन असे समजले की ऑस्ट्रेलियामध्ये मेकॅनिक, इलेक्ट्रीशिअन, फिटर, प्लंबर या सारख्या तांत्रिक/औद्योगिक कौशल्य असलेल्यांना खूप मागणी आहे व तेथे पगारही चांगले मिळतात. माझ्या ओळखीतील काही सिनिअर बॅच (टेलको) मधील मुले, काही वर्षांपूर्वीच ऑस्ट्रेलियाला जाऊन स्थायिक झाली होती आणि त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळून, ते अगदी सुखात होते. त्यांच्याकडून असेही कळले की तिथे मेकॅनिकना लगेच नोकरी मिळते व काही महिन्यातच आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली होते. सारासार विचार करता माझ्या लक्षात आले की आपली अतिशय कष्टाची अशी सद्यपरिस्थिती बदलण्याची सुवर्णसंधी म्हणजेच ऑस्ट्रेलियाला स्थलांतरीत होणे. माझ्यासमोर आता दोन आव्हाने होती ......

पहिले आव्हान म्हणजे ऑस्ट्रेलियात जाण्यासाठी मला मोटर मेकॅनिक (ट्रेडस्कील वर्कर - मायग्रंट) याच कौशल्याच्या आधारावर स्थलांतराची प्रक्रिया करावी लागणार होती. परंतु या कामाशी माझा असलेला संबंध सहा वर्षांपूर्वीच तुटला होता. दुसरे आव्हान म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणाऱ्या रक्कमेची (सुमारे अडीच लाख रुपये) जमवाजमव, त्याचबरोबर त्यासाठी लागणारी घरच्यांची परवानगी मिळवणे. मी ईश्वराचे नाव घेतले आणि घरच्यांची कशीबशी परवानगी मिळवली होती. साठवणीतील पैशांच्या आधारे तसेच प्रॉविडेंट फंड वापरून मी ऑस्ट्रेलियाला जाण्याचा व्हिसा मिळवला.

मार्च २००६ मध्ये मी सिडनी, ऑस्ट्रेलियामध्ये स्थलांतरीत झालो. ठरल्याप्रमाणे मी आधी सिडनीला आलो व त्यानंतर एक महिन्याने माझी पत्नी संध्या व मुलगा चिन्मय दोघेही तेथे आले. सुदैवाने माझे काही मित्र, मुंबईतील सहकर्मचारी आणि श्रीस्वामीजींनी दाखविलेल्या मार्गावर चालणारे

विशाल व किशोर माझ्या आधीच ऑस्ट्रेलियात आलेले होते. त्यामुळे माझी इथे आल्याबरोबर राहण्याची व जेवणाची व्यवस्था ईश्वराने आधीच करून ठेवली होती.

विशाल व किशोर नुकतेच स्थलांतरीत झाल्यामुळे, अद्याप ते स्वतंत्र अशा जागेत राहत नव्हते आणि ते इतर दोन मित्रांबरोबर एका दोन बेडरूम - हॉल - किचन असलेल्या फ्लॅटमध्ये राहत होते. माझ्याबरोबर विशालची पत्नी वैशाली व त्यांचा पाच वर्षांचा मुलगा श्लोक हे सुद्धा सिडनीला आले. अशा प्रकारे सिडनीच्या त्या छोट्या फ्लॅटमध्ये आम्ही जवळजवळ सात माणसे राहत होतो. आल्या दिवसापासून माझा एकच ध्यास होता की माझी पत्नी व मुलगा पुढच्या महिन्यात येणार असल्याने ते येण्याआधी कुठल्याही परिस्थितीत आपल्याला नोकरी मिळाली पाहिजे जेणेकरून जमेल तेवढ्या लवकर आपल्याला राहण्याची स्वतंत्र व्यवस्था करता यावी. ईश्वराचे नाव घेऊन नोकरी शोधायला सुरुवात केली. नोकरीचा शोध व स्थलांतरीत झाल्यानंतरची काही औपचारिक कामे करण्यामध्ये विशाल व किशोर तसेच माझ्या इतर मित्रांनी माझी खूप मदत केली. हे सर्व करताना माझ्या लक्षात आले की जर मला मित्रांचे मार्गदर्शन मिळाले नसते तर एकट्याने ही सर्व कामे इतक्या कमी वेळात करणे माझ्यासाठी केवळ अशक्य होते. पुन्हा एकदा ईश्वराच्या कृपेचे स्मरण झाले. सहा वर्षांपूर्वी विशालने आम्हाला श्री स्वामीजींनी दाखविलेल्या मार्गाबद्दलची माहिती व त्यांनी लिहिलेली पुस्तके व पोथ्या दिलेल्या होत्या. तेव्हापासून मी व माझी पत्नी नियमितपणे व श्रद्धेने पुस्तके व पोथ्यांचे वाचन करत होतो. त्यामुळे अशा परिस्थितीतही मन शांत होते व वेळोवेळी ईश्वराच्या कृपेचे अनुभव येत होते. या कृपेमुळेच, मला आल्यापासून पंधराव्या दिवशी एका कार डीलर (वर्कशॉप) कडे मेकॅनिकची नोकरी मिळाली.

नोकरी मिळाल्याचा आनंद होता पण त्याचबरोबर भीती वाटत होती कारण या कामाचा माझा सराव पूर्णपणे सुटला होता. विशाल व किशोर यांनी या क्षेत्रात आधीच काम सुरू केले होते. त्यांच्या माहितीनुसार इथले कामाचे स्वरूप खूपच वेगवान असून, कुठलीही मदत न घेता स्वतःचे टूल्स (कधीही पूर्वी न पाहिलेल्या) वापरून वेगवेगळ्या गाड्यांवर अगदी पहिल्या दिवसापासून एखाद्या सराईत मेकॅनिकप्रमाणे काम करावे अशी कंपनीची अपेक्षा असते. असे न केल्यास पहिल्या दिवशीच नोकरीवरून काढून टाकण्यात येते व येथे कुठल्याही प्रकारची वशिलेबाजी चालत नाही.

ईश्वराचे नाव घेऊन मी नोकरीवर रुजू झालो खरा, पण ज्या गोष्टीची भीती वाटत होती तसेच घडले. सुपरवायझरच्या अपेक्षेप्रमाणे माझ्याकडून काम होत नव्हते. माझ्या कामाचा वेग अतिशय कमी होता कारण ते काम शारीरिकदृष्ट्या फारच अवघड व अवजड होते. सुरुवातीला मला असे वाटले की हळूहळू मला काम जमू लागेल पण ते दिवसेंदिवस अवघड होऊ लागले. अपेक्षेप्रमाणे कामात सुधारणा होत नसल्यामुळे सुपरवायझरची चिडचिड होऊ लागली. कामामुळे येणाऱ्या थकव्यामुळे व नैराश्यामुळे रोजच्या वाचनात खंड पडू लागला. अशा अवघड परिस्थितीमध्ये माझी पत्नी व मुलगा भारतामधून सिडनीला आले व आधीच सात माणसांनी भरलेल्या त्या छोट्याश्या फ्लॅटमध्ये राहू लागले. पत्नी व मुलगा आल्यामुळे आनंद व एक प्रकारचा आधार वाटू लागला. पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीव जास्त तीव्र होऊ लागली. अशा प्रकारे कुटुंबाची काळजी, कामाचा तणाव व शारीरिक कष्ट आणि दिवसेंदिवस वाचनात पडणारा खंड या सर्वांचा परिणाम झाला आणि मी आजारी पडू लागलो. असेच काही दिवस गेले आणि एक दिवस सुपरवायझरने मला सांगितले की आम्हाला तुझी आवश्यकता नाही व आम्ही तुला कामावरून काढून टाकत आहोत. पुढे काय? या प्रश्नाने व कुटुंबाच्या

काळजीने मी हादरूनच गेलो. अशा परिस्थितीमध्ये पुन्हा एकदा विशाल आणि किशोरने मला व माझ्या पत्नीला धीर दिला. विशालने मला श्री अरुण दाभोळकर सर यांनी केलेल्या मार्गदर्शनाची आठवण करून दिली आणि जास्तीत जास्त लक्ष, पोथी-पुस्तके वाचण्यात द्यावे असे सुचविले. ईश्वराचे नाव घेऊन आम्ही पोथ्या-पुस्तके वाचण्यास सुरुवात केली. यात **संक्षिप्त श्री गुरुचरित्र, श्री स्वामी समर्थ सप्तशती, श्री दुर्गा त्रिशती, श्रीदत्त स्तोत्र, श्रीगणेश स्तोत्र** आणि **श्री दत्त जय दत्त** हा जप तसेच मानवी जीवनातील गूढ रहस्ये या पुस्तकांचा समावेश होता. जसजशी रोज ईश्वरभक्ती होऊ लागली तसतशी मनःशांती मिळू लागली व सकारात्मक विचारांनी नवीन नोकरीचा शोध सुरू झाला. दररोज मी नोकरीसाठी अनेक अर्ज करू लागलो. भरपूर अर्ज करूनही यश येत नव्हते, त्यामुळे कधी कधी नैराश्य निर्माण होई, घरामधील इतर सर्व मित्रांना चांगल्या नोकऱ्या होत्या व ते आनंदात होते. त्यामुळे दररोज संध्याकाळी ते आपापल्या कामाबद्दल चर्चा करीत असत. अशा गप्पांमुळे मी एकटा पडे, मला नोकरी नसल्याची जाणीव होऊन आणखी निराशा वाटू लागे. त्यात एखाद्याने मला माझ्या नोकरी शोधण्याबद्दल विचारपूस केल्यास, मला आणखीनच न्यूनगंड येत असे.

काही मित्र अशीही चर्चा करत होते की, हा (सकाळ संध्याकाळ) फक्त देवाचेच करताना दिसतो. मग हा नोकरीचा प्रयत्न करतोय की नाही. आता नोकरी जाऊन जवळजवळ चार महिने झाले होते, मी दररोज अनेक अर्ज करत होतो. या काळामध्ये नोकरी शोधण्याबरोबरच, जमेल तेवढा वेळ काढून मी व माझी पत्नी संध्या साधना करत होतो. बऱ्याचदा साधना, सकाळी व संध्याकाळी चार तास चाले. त्यामुळे अशा परिस्थितीतही मन शांत होते पण नोकरीची चिंताही होतीच. या दरम्यान दाभोळकर सरांकडून निरोप आला की तुमचे प्रयत्न असेच चालू ठेवा, सर्व काही ठीक होईल.

काही गोष्टी प्रारब्धात नसतात त्यामुळे ईश्वराला प्रारब्धात बदल घडवून आणावा लागतो आणि यासाठी वेळ हा लागणारच. तात्पर्य : नशिबात नसलेली गोष्ट मिळण्यासाठी वेळ हा लागतोच आणि ईश्वरीकृपेने जे काही मिळते ते खूपच असते आणि किंबहुना अपेक्षेपेक्षाही जास्त असते. मात्र त्यासाठी आपल्याला श्रद्धा, संयम ठेऊन, साधना अविरतपणे करावी लागते. या मार्गदर्शन प्रमाणे आम्ही दोघेही साधना पूर्ण श्रद्धेने करण्याचा प्रयत्न करत होतो. अनेक अर्ज केल्यानंतर एका मोठ्या मल्टीनॅशनल कंपनीने मला Warranty Administrator या पदासाठी interview देण्यासाठी बोलावले. त्यादिवशी नेहमीप्रमाणे नोकरी शोधण्यावरून माझ्या मित्रांकडून मला विचारले गेले, मी पटकन या interview call बद्दल सांगितले. Warranty Administrator हा शब्द ऐकताच एक दीर्घ अनुभवी आणि वेल सेटल्ड मित्र म्हणाला, या पदासाठी तुझी निवड? नो चान्स. तू विसरून जा व दुसऱ्या कामासाठी अर्ज करत राहा कारण अशा पदासाठी फक्त स्थानिक श्वेतवर्णीय ऑस्ट्रेलियन व्यक्तीचीच निवड होते. त्यामुळे तुझ्यासारख्या नवीन मायग्रंट माणसाला असे जबाबदारीचे व ऑफिसमधील काम मिळणे शक्यच नाही. तेव्हा तू या नोकरीची आशा सोड आणि मेकॅनिकच्या नोकरीसाठी प्रयत्न चालू ठेव. हे ऐकून काहीही प्रतिक्रिया न देता मी आतल्या रूममध्ये निघून गेलो व पोथी वाचनास बसलो. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे प्रथम सकाळी पहाटे उठून वाचन पूर्ण करून कॉम्पुटरवर नोकरी शोधण्यासाठी प्रयत्न करू लागलो आणि त्यासाठी ई-मेल चेक करत असतानाच मला Warranty Administrator या सब्जेक्टखाली लिहिलेली ई-मेल दिसली, देवाचे स्मरण करून ई-मेल वाचण्यास सुरुवात केली. त्यात 'अभिनंदन तुम्हाला ही नोकरी मिळाली आहे' असे लिहिलेले होते. हे वाचून अतिशय आनंद झाला आणि मनातल्या मनात मी ईश्वराचे आभार मानले कारण जवळपास चाळीस

अर्जदारांमधून व तब्बल तीन interview नंतर माझी निवड झाली होती. त्याच क्षणी मला माझ्या मित्राचे शब्द आठवले, Warranty Administrator? – विसरून जा. तुझ्यासारख्या नवीन इमिग्रण्टला ही नोकरी मिळणे अशक्य आहे. पण त्याला कदाचित माहीत नव्हते, ''**अशक्य ते शक्य करतील स्वामी!**''

मी पुन्हा एकदा ईश्वराचे आभार मानले. त्याचप्रमाणे श्री अरुण दाभोळकर सर यांचेही आभार मानले आणि ताबडतोब माझी पत्नी संध्या, विशाल, वैशाली व किशोर यांना ही आनंदाची बातमी सांगितली.

त्या दिवसापासून खऱ्या अर्थाने आमच्या ऑस्ट्रेलिया मधील सुखी व समृद्ध संसाराची सुरुवात झाली. लवकरच सर्व आर्थिक समस्या सुटू लागल्या व इतरही गोष्टी मार्गी लागल्या. त्यानंतर काही महिन्यातच आम्ही एका स्वतंत्र घरात राहायला गेलो. माझा भारतातील या कामाचा अनुभव इथे उपयोगी पडला आणि म्हणून या कामावर मी लवकरच स्थिरस्थावर झालो व वेगाने प्रगती करू लागलो.

दुसरी जमेची बाजू अशी की आमच्या कंपनीचे ऑफिस घरापासून जवळ असल्यामुळे मी बसने, छोटासा प्रवास करून कामावर जाऊ शकत होतो. त्यामुळे लगेच कार घेण्याची आवश्यकता पडली नाही. इथे ही ईश्वराने माझे आर्थिकदृष्ट्या संरक्षण केले. त्यामुळे माझ्या पत्नीला इथे पूर्ण वेळ शिक्षण घेण्याची संधी मिळाली आणि मुलाला प्री–स्कूल/चाईल्ड केअरमधे पाठवता आले.

आज हा अनुभव लिहिताना मला या कंपनीमधे जवळपास पंधरा वर्षे पूर्ण होत आहेत. या पंधरा वर्षांमध्ये मी माझ्या कामामध्ये खूप प्राविण्य मिळवले आहे. माझी कार्यक्षमता आणि कौशल्य पाहून आमच्या कंपनीने स्वीडन येथे आयोजित, अंतिम जागतिक कौशल्य स्पर्धा (वोल्वो इंटरनॅशनल

स्किल कॉंपिटिशन) यात मला, ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठविले. त्यापूर्वी उपांत्यफेरीसाठी बँकॉकला (थायलंड) पाठविण्यात आले होते. कामानिमित्त मला ऑस्ट्रेलियामधील या कंपनीच्या विविध शाखांमधे काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे अनेक नवीन कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देण्याची संधी मिळाली. माझ्या या कारकिर्दीमधे मी कंपनीला अनेक चांगल्या-वाईट परिस्थितीतून जाताना पाहिले आहे. यामध्ये जागतिक आर्थिक मंदी, काही गंभीर कारणांमुळे आलेली बंदी अशी महाभयंकर संकटेही सामील आहेत. या संकटांमुळे अनेकांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. अशा परिस्थितीमध्ये माझी नोकरी कशी टिकून राहिली याचे मला खूपच आश्चर्य वाटते. हा विचार मनात येताच असे लक्षात येते की ईश्वराचे आपल्यावर व आपल्या कुटुंबावर किती लक्ष आहे. अशी नोकरी मिळणे जसे ईश्वराच्या कृपेशिवाय शक्य नाही तसेच अशा सतत बदलणाऱ्या व अवघड परिस्थितीत अशी नोकरी टिकून राहणे हे सुद्धा ईश्वराच्या कृपेशिवाय शक्य नाही. ईश्वराच्या या असीम कृपेमुळे मिळालेल्या या नोकरीने, मला व माझ्या कुटुंबियांना खूप काही दिले आहे. आमचे आता स्वतःचे घर झाले आहे. आमचा मुलगा चिन्मय विद्यापीठात शिकत आहे आणि ईश्वरकृपेची मिळालेली सर्वात अमूल्य भेट म्हणजे श्रीस्वामीजी जेव्हा जेव्हा आम्हाला आश्रमात येण्याची संधी देतात तेव्हा तेव्हा आम्हाला तेथे जाणे सहज शक्य होते. आमच्या घरात आम्ही सर्व म्हणजेच माझी पत्नी संध्या, मुलगा चिन्मय व मी - श्रीस्वामीजींनी लिहिलेली पुस्तके व पोथ्या सतत वाचनात ठेवतो.

त्याचप्रमाणे श्री अरुण दाभोळकर सर यांच्या मार्गदर्शनानुसार, आम्ही एका पाठोपाठ एक अशा विविध साधना पूर्ण करत आहोत व त्याचे आम्हाला खूप छान अनुभव येत आहेत. आजपासून बरोबर २० वर्षांपूर्वी जेव्हा पहिल्यांदा आमच्या हातामध्ये श्रीस्वामीजींनी लिहिलेली पुस्तके आणि त्यांनी दाखविलेल्या

मार्गाची माहिती मिळू लागली, तेव्हापासून आमचे आयुष्य पूर्णपणे बदलून गेले. आम्हा सर्वांना अनेक चांगले अनुभव आले आहेत. त्याचप्रमाणे कुठल्याही परिस्थितीमध्ये मनाची शांती, समाधान व आनंद अबाधित राहते असा आमचा अनुभव आहे. आमच्यासाठी हीच खरी ईश्वरी कृपा.

**अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त !**

**सुभाष पेडणेकर**
**सिडनी ऑस्ट्रेलिया**

ॐ

# सुनिता जाधव

मी सुनिता किसन जाधव. माझा अनुभव म्हणजे कलियुगातील आश्चर्य आहे. २०१७ मध्ये मला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री दत्तलीलामृत–श्री सिद्धलीलामृत** एकत्र असलेली पोथी मिळाली. तेव्हापासून मी ही पोथी रोज वाचते. त्याचबरोबर **श्री दुर्गा सप्तशती** ही पोथीदेखील वाचू लागले. २०१८ साली माझी गिरनार यात्रा पूर्ण झाली. पोथी वाचन चालू केल्यावर गिरनार यात्रा घडली हा माझा पहिला अनुभव.

मार्च २०१९ मध्ये माझी मोठी बहीण जयश्री जाधव, वय ६३ ही घर सोडून गेली. ती mentally challenged असून तिला पैसे व प्रवास याबद्दल काही समजत नसे. पोलिसात तक्रार केली तरी ती काही मिळेना. मी व माझा एक मित्र दिवसभर तिचा शोध घेत असू. असे आठ दिवस उन्हात फिरल्याने माझी तब्येत बिघडली. मग मी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री दत्तलीलामृत–श्री सिद्धलीलामृत** व **श्री दुर्गा सप्तशती** रोज वाचनाचा निश्चय केला. माझा मित्र मला म्हणाला की शोध घेण्याचे सोडून हे तू काय करते आहेस? त्यावर मी उत्तरले की ते माझे व माझ्या बहिणीचे माय–बाप आहेत. तेच आमचा सांभाळ करत आहेत व माझी बहीण जिथे असेल तिथे ते तिची काळजी घेत असतील.

मार्च ते जून खूप पाऊस होता. मी विचार करत असे की एवढ्या पावसात ती काय करत असेल, कपडे, जेवण व राहण्याची काय व्यवस्था असेल? पण लगेच विचार येई की बाप्पा म्हणजेच दत्तगुरु तिच्याबरोबर आहेत व ते तिची व्यवस्था करत आहेत. सर्वजण मला म्हणत की ती आता परत येणार नाही. तू तिचा विचार सोड. पण पोथी वाचताना मी दत्तगुरु व

आईंना एवढेच सांगितले की मला फक्त सत्य दाखवा, मग ते काहीही असले तरी मी त्याचा स्विकार करीन. मी माझ्या आईला बहिणीचा सांभाळ करण्याचे वचन दिले होते.

२०१९ ऑगस्टच्या पहिल्या गुरुवारी मला माझ्या भाचीचा फोन आला की माझी बहीण सापडली असून ती जी. टी. हॉस्पिटलमध्ये आहे. मला या आधी स्वप्नात असे दिसले होते की तिचा ॲक्सिडेंट झाला असून तिच्या डोक्याला मार लागला आहे. तिचे ऑपरेशनसुद्धा आहे. पण त्यावेळी मी जी. टी. हॉस्पिटलमध्ये न जाता सायन हॉस्पिटलला गेले होते. ती दीड महिना हॉस्पिटलला असून नर्स, डॉक्टर, वॉर्डबॉय व सफाई कर्मचारी सर्वांनी तिची काळजी घेतली. तिचे ऑपरेशनदेखील व्यवस्थित पार पडले होते. या काळात आम्ही कोणीही तिच्याजवळ नसतानाही दत्तगुरु व आईंनी तिची काळजी घेतली होती. तिच्या डोक्याला नऊ टाके पडले होते, पण तिची स्मृती कमी झाली नव्हती. पोलिस, डॉक्टर, नर्स या सर्वांना हा चमत्कार वाटत होता जो माझ्या बाप्पाने केला होता. तो शक्य झाला केवळ श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथींमुळे. आज मी व माझी बहीण जिवंत आहोत ते फक्त या पोथींमुळेच.

श्रीस्वामी दत्तावधूत, वनिता ताई यांना शतश: नमन. अरूणकाकांना धन्यवाद. या सर्वांमुळे माझे जीवन सुंदर झाले आहे.

**सुनिता जाधव**
**मुंबई**

ॐ

# सुनिता सांडीम

## (१)

शाळा बंद झाल्या आणि कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षणपद्धती सुरू झाली. नोकरीमुळे मला गावी जाण्याची संधी फार कमी वेळा मिळायची, पण कोरोना काळात मला पूर्ण एक वर्ष गावी राहून ऑनलाइन शाळा सुरळीतपणे घेण्याची संधी प्राप्त झाली. निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचे माझे स्वप्न देवाने पूर्ण केले.

जुलै महिन्यामध्ये कोकणामध्ये खूप पाऊस असतो, पण कधीच नेटचा प्रॉब्लेम झाला नाही..

एक दिवस अचानक मला नागिणीचा आजार झाला. पहिल्या दिवशी पाठीवर लहान पुरळ उठले. दुसऱ्या दिवशी पाठीवर उठलेली नागीण पोटापर्यंत पोहोचली. मोठ-मोठे लाल पुरळ होऊन त्याचे फोड झाले, ही नागीण अतिशय जलद गतीने वाढू लागली. खेडेगावात या आजारासाठी कोणाकडे उपचारासाठी जायचे असा आम्हाला प्रश्न पडला होता. त्यातच कोरोना होऊन फक्त एक महिनाच झाला होता. ॲलोपॅथी औषधे शरीराला झेपणारी नव्हती. श्रीस्वामीजींकडे प्रार्थना केली आणि मनामध्ये विचार आला की किरण पेडणेकरला सांगावे. फोन करून मी त्याला या आजाराची कल्पना दिली. त्याने ताबडतोब रत्नागिरीमध्ये त्यांच्या ओळखीचे एक गृहस्थ होते, त्यांच्याकडे पाठवले. त्यांनी जे औषध दिले त्यामध्ये दही आणि चंदनाचा लेप लावण्यास सांगितले गेले. सहसा हा आजार ज्यांना होतो त्यांना ताप येतो, त्वचेची आग होते, नागीण झालेल्या ठिकाणी प्रचंड वेदना होणे हा अनुभव येतो. पण म्हणतात ना सद्गुरुची कृपा असेल तर व्यवहारिक दृष्ट्या

औषधपाण्याची व माणसांच्या मदतीची सोय होते. भोगातील दु:खाची जाणीव कमी होते. भोगाचा काळ भरभर निघून जातो.

श्रीस्वामीजींची कृपादृष्टी माझ्यावर सदैव आहे, याचा अनुभव त्यांनी वेळोवेळी मला दिला. या आजारपणात मला कसलाही त्रास झाला नाही. घरातल्या लोकांना आश्चर्य वाटायचे. त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवले की तू तुझ्या वेदना कशा सहन करतेस, आम्हाला सांगतही नाहीस. माझ्या या मोठ-मोठ्या पुळ्या पाहून त्यांच्या डोळ्यात पाणी येत असे आणि सर्वात मोठा चमत्कार म्हणजे जेव्हा जेव्हा घरातील कोणी चंदनाचा लेप लावत असे तेव्हा त्यांच्या हाताला दाह जाणवायचा. त्वचेची आग होऊन जो दाह जाणवायचा तो मला नाही, तर औषध लावणाऱ्यांना जाणवायचा; म्हणतात ना, सद्गुरु, शिष्याचे भोग टाळीत नाहीत. पण भोग भोगीत असताना ते त्यांच्या मनाचे समाधान टिकवतात. श्रीस्वामीजींबद्दलचे प्रेम शब्दात व्यक्त करणे फार कठीण आहे. त्यांचे आभार मानण्यासाठी शब्दही अपुरे पडतात.. 'संत आपल्यावर येणारी संकटे नाहीशी करत नाही तर त्या संकटांची भीती नाहीशी करतात. त्या आजारपणाच्या वेदना आपल्यापर्यंत पोहोचू देत नाहीत. खरच! गुरुकृपेचे मोल नाही.' आलेल्या परिस्थितीला तोंड देऊन समाधानाने राहिल्याने गुरु आपल्यातील आत्मिक बळ वाढवतात.

(२)

कोणत्याही भक्ताची कळकळीची इच्छा देव पूर्ण करतो. पण आपल्या प्रार्थनेला परमेश्वर किती प्रमाणात प्रतिसाद देतो यावर आपण क्वचितच विचार करतो.

२१ एप्रिल २०२१ रामनवमीचा शुभ दिवस. घरी नैवेद्यासाठी मिष्टान्न करण्यात आम्ही व्यस्त होतो. पण दोन-तीन दिवसांपासून सतत वाटत होते की प्रत्येक सणाला आपण देवासमोर नैवेद्य दाखवतो आणि नंतर घरातले

मिळून तो प्रसाद खातो. पण यावेळी, मनात एक इच्छा निर्माण झाली की ''हा प्रसाद एखाद्या गरजू व्यक्तीच्या मुखी लागावा.'' कोणालातरी घरी जेवायला बोलवावे, पण कोरोना काळात कोणी कोणाला आमंत्रणही देत नसे किंवा कोणाकडे जातही नसे. त्यात गावी आमच्या घराच्या आसपास दुसरे घरही नव्हते.

रामनवमीच्या दिवशी श्रीस्वामीजी आणि सौ.ताईंच्या फोटोसमोर नैवेद्य ठेऊन त्यांच्याकडे प्रार्थना केली, की देवा आज कुणाच्यातरी मुखात हा प्रसाद पडू दे. नेहमीच स्वत:साठी हा प्रसाद बनवतो आणि खातोही आम्हीच. प्रार्थना करून आम्ही सर्वजण जेवायला बसलो, आणि गंमत अशी की जेवण झाल्यावर जेवणात काहीच शिल्लक राहिले नाही व आम्ही सर्वजण आपापल्या कामात व्यस्त झालो.

आमच्या घराच्याखाली मुंबई-गोवा हायवे मार्ग आहे. माझ्या वहिनीने एक जोडपे त्या रस्त्यावर उभे असलेले पाहिले. त्यांच्याकडे चार घोडे होते. आपल्या घरात असलेले गहू त्या घोड्यांना खाऊ घालण्याच्या हेतूने तिने बाबूला, म्हणजे माझ्या भावाला त्यांना विचारण्यासाठी पाठवले. त्यांना विचारून बाबू वर आला आणि म्हणाला, त्या गृहस्थाने सांगितले आहे की ''आमचे घोडे गहू खात नाही. त्यांचे खाणे वेगळे आहे.'' पुढे त्या जोडप्याने सांगितले की ते सिंधुदुर्ग येथून पायी प्रवास करत आमच्या गावापर्यंत पोहोचले आहेत. कोरोना काळात पर्यटनस्थळे बंद असल्याने, आम्ही घोडे घेऊन खेडला आमच्या गावी जात आहोत. पुढे त्यांनी विनंती केली की आज रामनवमी आहे, आम्हाला काही खायला मिळेल का? आम्ही उपाशी आहोत. हा निरोप ऐकल्यावर आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. ताबडतोब आम्ही जेवण करायला लागलो. घरातील मुले पाणी, पत्रावळी आणि गरम गरम जेवण घेऊन अत्यानंदाने खाली गेली. आमचा गोडाचा

प्रसाद त्या जोडप्याच्या मुखी लागला. ते दोघेही पोटभर जेवले आणि पुढच्या प्रवासाला निघाले. मनातील इच्छा पूर्ण केल्याबद्दल आम्ही देवाचे शतशः आभार मानले.

### (३) स्वामी समर्थ सप्तशती

तळेकांटे, रत्नागिरी येथे दत्तमंदिरातर्फे पोथ्यांचे वाटप करताना रेखा राणे यांना **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** पोथी मिळाली. त्यानंतर गेली पंधरा वर्षे त्यांची आणि माझी भेट झालीच नाही. एकदा अचानक त्या काही कामानिमित्त आमच्या घरी आल्या. आमची पंधरा वर्षांनी भेट झाल्याबद्दल त्यांना खूप आनंद झाला कारण या पोथीच्या नियमित वाचनामुळे त्यांच्या आयुष्यात जे विलक्षण बदल झाले होते ते त्यांना सांगायचे होते. त्यांच्या संसारात अनेक अडचणी होत्या, नवऱ्याचे  दारू पिणे, मारणे हे प्रकार पोथीच्या वाचनाने पूर्णतः बंद झाले. त्यांच्या नवऱ्यानेदेखील आता पोथी वाचण्यास सुरुवात केली आहे. गेली १५ वर्ष ही पोथी मी दररोज वाचते, असे सांगून त्या निघून गेल्या.

माझ्या मनात विचार आला की, गेली १५ वर्षे त्या एकच पोथी वाचत आहेत. त्यांना नवीन पोथी द्यावी आणि त्यांना सांगावे की जुन्या पोथीचे नदीमध्ये विसर्जन करून नवीन पोथीचे वाचन सुरू करावे. एक महिना असाच गेला त्यांच्याकडे जाण्याचा योग आलाच नाही.

रक्षाबंधनाच्या दिवशी मनात आले, की त्यांच्या घरी जाऊन श्रीस्वामी समर्थ सप्तशती तसेच इतर पोथ्या त्यांना द्याव्यात. मी, राणी आणि अमिषा यांच्यासोबत त्यांच्या घरी पोथ्या घेऊन गेले. मी बाहेर रस्त्यावर थांबले व रेखा राणे यांना या मुलींनी त्यांच्या घरी जाऊन पोथ्या दिल्या, तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. आम्ही घरी पोहोचलो तसा त्यांचा फोन आला. त्या

म्हणाल्या तुम्ही पोथ्या देण्याच्या दहा मिनिटेआधी माझ्याशेजारी राहणाऱ्या एक बाई आल्या आणि मला त्यांच्या संसारातील अडचणी सांगू लागल्या. यापूर्वी सुद्धा अनेक वेळा त्यांनी त्यांच्या समस्या मला सांगितल्या होत्या. पण यावेळी त्या 'मला वाचण्यासाठी काहीतरी द्या' असं म्हणू लागल्या. माझ्याजवळ असलेली पोथी '**स्वामी समर्थ सप्तशती**' मी त्यांना दिली. पंधरा वर्षे नित्यनेमाने मी ती पोथी वाचत असे. पण तिची अडचण पाहून माझ्या जवळची पोथी मी तिला दिली. परंतु नवीन पोथी मला पुन्हा कधी मिळेल याची खात्री नव्हती. उद्यापासून वाचन बंद होणार याची मनाला खंत वाटू लागली. शेजारची बाई पोथी घेऊन तिच्या घरी गेली आणि पाच मिनिटातच राणी आणि अमीषा पोथी घेऊन माझ्या दारात उभ्या होत्या. नवीन समर्थ सप्तशती माझ्या हातात मिळाली. 'ईश्वराचे किती बारीक लक्ष असतं, आपल्या भक्ताकडे.' हे या अनुभवातून कळून येते.

(४)

श्रीस्वामीजी आपल्या भक्तांच्या मुलांवर खूप प्रेम करीत व त्या मुलांवर ईश्वरभक्तीचे संस्कार करीत. ज्या मुलांना त्यांचा सहवास मिळाला त्यांचे भाग्य उजळले. लहान मुलांचा त्यांच्याप्रती असलेला आदर, प्रेम आणि लळा पाहून नेहमी आश्चर्य वाटत असे. या लहान मुलांचे आणि श्रीस्वामीजींचे अनेक जन्माचे नाते असावे असे वाटत असे. एखाद्या मुलाला भूक लागली किंवा काही खाण्याची इच्छा झाली की त्यांना ती गोष्ट त्या मुलाच्या आईच्या आधी कळत असे. श्रीस्वामीजींना मुलांच्या आवडी-निवडी माहीत असत. श्रीस्वामीजींच्या सहवासात मुलांचा आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा असे.

माझा भाचा श्लोक हा तीन-चार वर्षाचा असेल. तो आपल्या आजीबरोबर घरी एकटाच होता. दारात एक मुक बधिर माणूस आला.

त्याच्या आजीने त्याला पैसे देऊ केले पण त्याने ते घेण्यास नकार दिला. तो खुणावून सांगण्याचा प्रयत्न करत होता की त्याला शर्ट हवा आहे. श्लोकची आजी कामात होती. तिने या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. पण या तीन वर्षाच्या श्लोकने हट्ट धरला की आजी, त्या माणसाला कपाट उघडून शर्ट दे. शेवटी आजीचा नाईलाज झाला आणि तिला कपाट उघडून त्या माणसाला त्याच्या वडिलांचे शर्ट द्यावे लागले.

रस्त्याने कोणाबरोबर फिरायला जाताना, विशेष म्हणजे त्याच्या आजीबरोबर, रस्त्यात कोणी गरीब दिसला की आजीच्या पाकिटामधून पैसे दिल्याशिवाय तो पुढे जात नसे. ही गोष्ट सांगण्याचा हेतू हाच की ज्या गोष्टी शिकण्यासाठी आम्हाला खूप वर्षे लागली, त्या गोष्टी ही मुले श्रीस्वामीजींचा सहवास लाभल्याने लहानपणीच शिकली. श्रीस्वामीजींनी सर्व लहान मुलांमध्ये अशा संस्काराचे बीज रोवले.

सृष्टी ही माझा चुलतभाऊ गजानन याची मुलगी. श्रीस्वामीजींच्या फोटोला नमस्कार करणे, पाया पडणे, विभूति खाणे, याची तिला खूप आवड आहे. ती दीड वर्षाची असताना तिला पोलिओ डोस दिला. पोलिओ डोस दिल्याने तिला ताप आला आणि तिचे पायही दुखत होते. ती काहीच खात नव्हती. ती रडत असताना विभूति पाहिजे का विचारले असता, रडत असताना देखील ती 'हो' म्हणाली. तिला झोपताना सांगितले की तू स्वामीजींच्या फोटोला नमस्कार कर आणि प्रार्थना कर देवा मला बरं कर. थोड्या वेळात ती प्रार्थना करून झोपी गेली. मध्यरात्री ती उठून एकटीच खेळू लागली. तिच्या आईला जाग आली. तिने आश्चर्याने मुलीला विचारले तू काय करतेस. तेव्हा ती आईला विचारू लागली दत्त कुठे गेले. तेव्हा श्रीस्वामीजींच्या फोटोकडे बोट दाखवून ती आईला सांगू लागली की स्वामी बाप्पा आले होते. माझ्या गालावर हात फिरवून मला म्हणाले, ''माझं बाळ.'' आणि दुसऱ्या

दिवशी ती ठणठणीत बरी झाली. अद्याप तिला श्रीस्वामीजींचे दर्शन झाले नाही, पण श्रीस्वामीजींचे आपल्या भक्तांच्या मुलांकडे किती बारीक लक्ष आहे हे या अनुभवातून कळून येते.

**सुनिता सांडीम**

**मुंबई**

## रेखा राणे

माझे नाव रेखा राणे. माझे गाव रत्नागिरी. आमच्या गावातील दत्तमंदिरात मी जात असे. तेथे माझ्या स्नेही सुनीताताई यांच्यामार्फत मला श्रीस्वामी दत्तावधूत लिखित **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री स्वामी समर्थ सप्तशती** या दोन पोथ्या मिळाल्या. मी धार्मिक असल्याकारणाने त्याचे नित्यनेमाने वाचन करते.

मी माझ्या भावाला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** पोथी वाचण्यास दिली, तो ती पोथी अगदी नित्यनेमाने वाचतो. दोन वर्षांपूर्वी माझ्या भावाला हार्टचा त्रास झाला. डॉक्टरांनी १००% ब्लॉकेज सांगितले. त्यापूर्वी त्याची दोन वेळा प्लास्टी झाली होती. आम्ही सर्व खूपच घाबरलो होतो. पण श्रीस्वामीजींच्या कृपेने त्याची बायपास होऊन त्याला या भयंकर संकटातून बाहेर काढले. श्रीस्वामीजींच्या कृपेने त्याचा पुनर्जन्म झाला. त्याचे कुटुंब स्वामीभक्त आहेत. श्रीस्वामीजींच्या चरणी शतश: प्रणाम.

माझा दुसरा अनुभव. माझ्या मुलाला डेंग्यू झाला होता. त्याच्या प्लेटलेट्स ६००० पर्यंत खाली आल्या होत्या. शरीरात नवीन प्लेटलेट्स तयार होत नव्हत्या. मी श्रीस्वामीजींना कळवळून केलेल्या प्रार्थनेमुळे प्लेटलेट्स संध्याकाळी ९००० नी, दुसऱ्या दिवशी २३०००, तर संध्याकाळी आणखी

१५००० नी वाढल्या. या भयंकर स्थितीतून त्याला श्रीस्वामीजींनी बाहेर काढून बरे केले. त्याला बरे करणारे डॉक्टर म्हणजे माझे स्वामीच होते. त्याकाळी मी सतत श्रीस्वामीजींचा धावा करीत होते. असे आहेत माझे स्वामी.

**रेखा राणे**

**तळेकांटे, रत्नागिरी**

ॐ

# तुषार दगडू जमदाडे

मला २००१ मध्ये, नोकरीनिमित्त सिडनी, ऑस्ट्रेलियाला जाण्याचा योग आला. २००६ मध्ये माझ्या वाचनात एका तांत्रिक साधूची पुस्तके आली. त्यावेळेस मला काही कल्पना नव्हती की जो मार्ग मी स्वीकारलेला आहे, तो मला चुकीच्या ठिकाणी घेऊन जाणार आहे. २००८ पर्यंत मी त्या साधूची बरीच पुस्तके वाचली व त्यातील सर्व गोष्टी खऱ्या वाटत होत्या. आध्यात्माची आवड असल्यामुळे मला त्या गोष्टींवर पटकन विश्वास बसला आणि आश्चर्याची गोष्ट अशी की त्या शक्तींनी जे अनुभव दाखवले, स्वप्ने दाखवली ती मला काही वर्षे खरीच वाटली. त्यावेळी मला आध्यात्मात प्रगती करायची खूप इच्छा होती, परंतु जो मार्ग मिळेल तो स्वीकारून पुढे जायचं असा निर्धार केल्यामुळे मला त्या तांत्रिक साधूची ओळख लवकर पटली नाही. चमत्कार तेथे नमस्कार यामुळे मीही साधूच्या चमत्कारांना फसलो. त्याच वर्षी मी भारतामध्ये त्या साधूच्या दर्शनासाठी फॅमिलीबरोबर गेलो होतो. त्यावेळी माझ्या मुलीला खूप त्रास झाला. त्या साधूच्या दर्शनानंतर दोन-तीन महिन्यातच मला चक्कर येण्याचा खूप त्रास सुरू झाला. त्या दरम्यान मला चांगला जॉब सोडावा लागला व भारतामध्ये ट्रीटमेंटसाठी परत यावे लागले. बरेच डॉक्टर व बरेच मेडिकल चेकिंग केले असता, सर्व रिपोर्ट नॉर्मल आले व त्यामध्ये काहीही दोष आढळला नाही. शेवटी मी सर्व उपायांना कंटाळून ऑस्ट्रेलियाला परत जायचा निर्णय घेतला. परत आल्यानंतर मी माझा मित्र विशाल सांडीम याला भेटलो. त्याने मला श्रीस्वामी दत्तावधूत लिखित मानवी जीवनतील गूढ रहस्ये भाग १ ते ६ भाग ही पुस्तके दिली. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** ही पोथी व श्री दत्तात्रेय स्तोत्र दिले व हे दररोज वाचण्यास

सांगितले. तेव्हापासून मी दररोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** व श्री दत्तात्रेय स्तोत्र वाचण्यास सुरुवात केली. त्यामुळे आपोआपच एक दीड महिन्यांमध्ये माझी चक्कर पूर्णपणे थांबली व नवीन नोकरीमध्ये मी चांगला स्थिरस्थावर झालो. जरी माझे कनेक्शन त्या तांत्रिक साधूशी होते, तरी त्या दरम्यान मी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** व श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्यांची सेवा, सिडनी येथील श्री शिर्डी साई मंदिरामध्ये करू लागलो.

२०१२ मध्ये पुन्हा या तांत्रिक साधूच्या समाधीच्या दर्शनासाठी आलो असताना माझ्या मुलाला खूप त्रास झाला व मलाही नंतर काही महिन्यात गुडघ्यांचा खूप त्रास चालू झाला. त्यामुळे मला जानेवारी २०१३ मध्ये दोन्ही गुडघ्यांचे ऑपरेशन करावे लागले. अजूनही त्या तांत्रिक साधूची पुस्तके वाचनात होती व दुसऱ्या बाजूला श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचनात होत्या. पहिल्या ऑपरेशननंतर पाच ते सहा महिन्यातच माझ्या पायांना परत खूप त्रास होऊ लागला. त्यामुळे मला दोन्ही गुडघ्यांचे दुसऱ्या वेळेस ऑपरेशन करणे भाग पडले. त्या दरम्यान मला जाणीव झाली की आपण जो मार्ग स्वीकारलेला आहे, तो खूप चुकीचा आहे. त्यामुळे तांत्रिक साधूचं कनेक्शन पूर्णपणे बंद केल्याशिवाय आपली या आपत्तीतून सुटका होणार नाही याची खात्री झाली व पुन्हा सुरुवातीपासून श्री स्वामी दत्तावधूतांनी दिलेला सन्मार्ग स्वीकारून त्यातच प्रगती करण्याचा निर्धार केला. पूर्वीची तांत्रिक साधूची सर्व पुस्तके, सर्व साहित्य जे माझ्याकडे होते ते नदीत अर्पण केले व नवीन जीवनाची सुरुवात म्हणून श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचण्यास चालू केले. एवढे करूनही लगेच त्या वाईट शक्तींनी मला सोडले नाही. मला गुडघ्याला खूप खूप त्रास होत होता. त्या दरम्यान मला एक महिना दररोज तीन वेळा याप्रमाणे ९० वेळा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन केल्यावर माझ्या पायाचे दुखणे कमी झाले. त्या

दरम्यान माझी पत्नी सौ वर्षा हिनेही श्रीस्वामी समर्थ सप्तशती व श्री दुर्गा सप्तशतीची बरीच पारायणे केली. त्या दरम्यान मी भारतात कायमचा यायचा निश्चय केला. त्यावेळी माझ्यापुढे बरेचसे प्रॉब्लेम दिसत होते. मुलांचे भविष्य, माझ्या गुडघ्याच्या ऑपरेशन नंतरची ट्रीटमेंट, असे इतर बरेच विचार डोक्यात होते. श्री दाभोळकर सरांनी सांगितले की भारतामध्ये तुझे कल्याण होणार आहे, यावर माझा पूर्ण विश्वास होता. त्यामुळे मी कोणतीही चिंता न करता भारतामध्ये परतलो व श्री दाभोळकर सरांनी सांगितलेली साधना करत राहिलो. भारतात आल्यानंतर श्रीस्वामी दत्तावधूतांनी स्वप्नामध्ये सांगितले की, तू आता माझ्या ताब्यात आहेस. थोडक्यात तू काही काळजी करू नकोस. श्री सद्गुरुंच्या या आश्वासनानंतर मी सर्व चिंता श्री सद्गुरुंच्या चरणी वाहिल्या व त्यांनी सांगितलेल्या मार्गावरच ठाम राहण्याचा पूर्ण निश्चय केला. भारतात येण्यापूर्वी मला साधी चार-पाच पाऊलही चालणं अवघड होतं. मी भारतामध्ये येताना व्हीलचेअरवर बसून आलो होतो. त्यानंतर एक-दोन वर्षांमध्येच काहीही स्पेशल ट्रीटमेंट न करता माझ्या तब्येतीमध्ये एवढी सुधारणा झाली की मी दररोज मोठा डोंगर चढायला लागलो व माझे इतर सर्व आर्थिक प्रॉब्लेमही सुटले.

मी भारतात आल्यानंतर माझ्या आईने श्रीस्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचण्यास सुरुवात केली. तिलाही त्या वाचनाचे बरेच अनुभव आले. एकदा तिने अचानक तिचे बरेच वर्षांचे साठवलेले पेन्शनचे पैसे मला दान करण्यास सांगितले. त्याच्यानंतर चार-पाच दिवसानंतरच तिला पॅरालेसीसचा अटॅक आला. आश्चर्य असे की पॅरालेसिस अटॅकनंतर ती, एक-दोन महिन्यातच पुन्हा पूर्ववत झाली. तिने केलेल्या दानाचेच हे चांगले फळ आहे यावर तिचा पूर्ण विश्वास बसला. त्यानंतर तिने तिच्या पेन्शनमधील

काही रक्कम दर महिन्यास दान करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आज ती सर्व बाजूंनी सुखी व समाधानी आहे.

दोन-तीन महिन्यांपूर्वी आमच्या फोर व्हीलर गाडीचे इंजिन लिकेज झाल्यामुळे डॅमेज झाले, त्यामुळे आमची गाडी अचानक रस्त्याच्या मधोमध थांबली. परंतु ईश्वरीकृपेमुळे आम्ही गाडीतील सर्वजण सुखरूप राहिलो. नाहीतर घाटात गाडी दरीमध्ये कोसळली असती व बरीच मोठी दुर्घटना झाली असती. ही सर्व त्या सद्गुरुंचीच कृपा.

माझ्या मोठ्या बहिणीचीही आर्थिक परिस्थिती पूर्वी खूप वाईट होती. श्री दाभोळकर सरांच्या मार्गदर्शनानुसार तिने श्रीस्वामी दत्तावधूत यांची पुस्तके वाचली व सांगितलेली साधना चालू केली. याचे तिलाही बरेच अनुभव आले नंतर तिचे सर्व आर्थिक प्रॉब्लेम सुटले. तिने स्वतःची लेडीज शॉपी चालू केली व स्वतःचे घरही विकत घेतले.

सध्या श्री दाभोळकर सरांच्या मार्गदर्शनानुसार मी, माझी पत्नी वर्षा, दोन्ही मुले व आई दररोज सांगितलेली साधना करत आहोत. श्री स्वामींच्या कृपाशिर्वादाने आमचे सर्वांचे जीवन सर्व बाजूंनी सुखी, संपन्न व आनंदमय झाले आहे.

**तुषार दगडू जमदाडे**
**सिडनी, ऑस्ट्रेलिया**

ॐ

# वैदेही केरकर

परमपूज्य श्री श्रीस्वामीजी व सौ. वनिता आई यांच्या चरणी नम्रपणे अभिवादन करून मी सौ. वैदेही केरकर त्यांच्याच कृपेने आलेले अनुभव कळवत आहे.

माझे बालपण व लग्नापूर्वीचे आयुष्य समाधान व शांततेत गेले. सन २००२ मध्ये माझे लग्न झाल्यावर बहुधा माझी बरीच पुण्याई खर्च झाल्याने, कष्टदायी जीवनास सुरुवात झाली. माझ्या माहेरपेक्षा सासर हे अधिक सुखवस्तू व आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे. परंतु मला मात्र सुरुवातीपासूनच मानसिक दु:खाला सामोरे जावे लागले. अशा अनपेक्षित कष्टप्रद दु:खद जीवन जगताना माझ्या मनाला खूप वेदना होत. चिंता, काळजी व नैराश्य यांनी माझे जीवन काळवंडून गेले होते.

या दरम्यान मी गरोदर राहिले. होणारे बाळ सुदृढ व्हावे यासाठी आरोग्याचा तोल सांभाळताना, माझे मन मात्र अस्वस्थ असे. माझ्या या अवस्थेचे निरिक्षण, शासकीय सेवेतील माझी सहकारी मैत्रिण सौ. वैशाली सांडीम करत होती. तिने मला श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेले मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ हे पुस्तक देऊन वाचण्याचा सल्ला दिला होता. परंतु माझ्या अहंकारमिश्रित अज्ञानामुळे मी या प्रकाशमार्गापासून दूरच राहिले. सन २००३ मध्ये माझी अवस्था जास्तच खालावण्यापूर्वी तिने मला श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेल्या पोथ्या आणून दिल्या. पोथ्यांचे नित्य वाचन सुरू करताच एका आठवड्यात माझे मनावरचे दडपण दूर झाल्याचे तसेच ताण हलका झाल्याचे जाणवले. हा बदल पोथी वाचनाने झाल्याची खात्री पटली. आता आमरण या पोथ्या वाचायच्या असे मी ठरवले. त्यांनी लिहिलेली इतर

पुस्तकेही वाचनात ठेवली, त्यामुळे दैनंदिन जीवन जगताना आध्यात्म कसे बाणवावे हेही शिकत गेले. सततचे वाचन तसेच पुस्तकात दिलेले अनुभव व वचने वेळोवेळी मला मार्गदर्शक ठरू लागली.

माझ्या साधनेस माझ्या कुटुंबाचा कायमच विरोध असल्याने नित्योपासनेत अनेक अडथळे येत. माझे तासन्तास वाचन माझ्या पतीला अगदी सुरुवातीपासून खटकू लागले. मी कौटुंबिक जबाबदाऱ्या पार न पाडता उपासना करत असल्याची त्याची कायम तक्रार असे, यामुळे आमच्यात वारंवार वाद होत. अशा वेळी वाचन वाढवून मी घरातील वातावरण शांत ठेवण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु त्याने वाद आणखी विकोपास जात. पहाटे लवकर उठून उपासना करून मग घरातील कामे आवरून मी कामावर जात असे. रात्री उपासना करू शकत नसल्याने, संध्याकाळी कामावरून आल्यावर जेवण करताना मी उपासना करत असे.

माझा मोठा मुलगा ब्रम्हेश खूप मस्ती करत असे. भिंतीवर चढून उड्या मारत असताना दोनदा त्याला कपाळावर व हनुवटीला टाके पडले होते, तेव्हा तो ३ वर्षांचा होता. मी त्याची पत्रिका ज्योतिषाला दाखवली होती. त्यांनी शिव-उपासना करवून घेण्याचा सल्ला दिला होता. त्यावेळी सौ. वैशाली ऑस्ट्रेलियाला स्थायिक झाली होती. तिचा अधूनमधून फोन येई. ब्रम्हेशच्या मस्तीबद्दल तसेच त्याला सांगितलेल्या उपासनेबद्दल तिच्याशी बोलताना ''श्री श्री स्वामीजींवर पूर्ण श्रद्धा ठेव. त्यांच्या पोथ्यांच्या वाचनानेच आपल्या आयुष्यातील कठीण प्रसंगांवर उपाय सापडेल.'' असा मोलाचा सल्ला दिला. मी श्री श्री स्वामीजींना प्रार्थना करून ब्रम्हेशसाठी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचावयास सुरुवात केली. महिनाभरात तो शांत झाला व त्याचे भिंतीवर चढणे बंद झाले.

सन २००५-२००६ मध्ये माझ्या गळ्याखाली गाठ जाणवली. सर्व चाचण्या केल्यावर, रक्ताच्या नसा गुंतून गाठ तयार होत असल्याचे निदान झाले. तीन सिटींगमध्ये त्या जागी भूल देऊन इंजेक्शन देऊन नसा मोकळ्या कराव्या लागणार होत्या. परंतु यानंतर नसांचे गुंतणे पूर्णपणे बंद होईल याबाबतीत डॉक्टर खात्रीपूर्वक काही सांगू शकत नव्हते. माझ्या दोन सिटींग्ज झाल्या व नंतर प्रापंचिक अडचणींमुळे जाण्यास विलंब होऊ लागला. मग मला तिसऱ्या सिटींगचा विसर पडला. दरम्यान माझी गाठ पूर्णपणे विरून गेल्याचे आढळले. त्यानंतर मला कसलाही त्रास झाला नाही. ही सर्व श्री श्री स्वामीजींची कृपा.

सन २००७ मध्ये मला जुळी मुले झाली. माझी प्रकृती हे गरोदरपण व बाळंतपण झेपवण्यास सक्षम नव्हती. परंतु श्रीस्वामीजींच्या कृपेने गरोदर असताना योग्य उपचार व पुरेशी विश्रांती मिळाली. शांततेत पोथीवाचन करता आले ज्यामुळे बाळंतपण सुखरूप पार पडले. तीन मुलांचे संगोपन करताना प्रचंड तारांबळ उडत असे. पोथी वाचन तर दूरच पण मुखात नामदेखील येईनासे झाले. दानधर्म बंद झाला. नोकरी करू शकेन की नाही याची शाश्वती राहिली नाही. नोकरी सोडण्याचे विचार मनात घोळू लागले.

अशा कठीण प्रसंगी श्रीस्वामीजींच्या प्रेरणेने सौ. वैशालीचा ऑस्ट्रेलियातून फोन आला. तिने नामस्मरण व साधना पुन:श्च सुरू करण्यास प्रेरित केले. तसे केल्यावर खरोखरच मुलांना सांभाळण्याची सोय झाली व कामावरही रुजू झाले. सर्व मळभ व ताण निघून गेला. वाचनही सुरू झाले.

माझे पोथीवाचन, स्तोत्रपठण सर्वकाही प्रापंचिक अडचणींतून मार्ग काढण्यासाठी होते. सन २०१०-२०११ मध्ये मला दुर्धर आजारपण आले. प्रपंचाविषयी आसक्ती, चिंता व काळजी याने आरोग्याची हेळसांड झाल्याने ते आले होते, हे माझ्या तात्काळ लक्षात आले. या जाणीवेनंतर, माझी सर्व

उपासना आत्मोन्नत्तीकरिता सुरू झाली. आजारपणावर उपचारासोबत केलेल्या उपासनेने मन खंबीर होत गेले. जीवनातील संकटांकडे मी तटस्थ राहून पाहू लागले. सहनशक्ती वाढली. हे सर्व मनोबळ मला श्री श्री स्वामीजींच्या कृपेने प्राप्त झाले.

एका कठीण प्रसंगी घरातून पोथ्यांचे विसर्जन केले गेले व घरात उपासना करण्यास निर्बंध घातले गेले. तेव्हा मी अरूण सरांमार्फत होणाऱ्या मासिक सत्संगास जात असे. सरांना घरातील प्रसंग सांगितला. ते हसले व म्हणाले की ठीक आहे, आता स्तोत्र व नामस्मरणाची उपासना सुरू कर. त्यांच्या मार्फत मला जणू श्रीस्वामीजींचाच आशीर्वाद मिळाला आहे असे समजून दत्तस्तोत्र व नामस्मरण करू लागले. २०१३ मध्ये एक लाख दत्तस्तोत्र करण्याची सूचना मिळाली. एक क्षण मी पूर्ण खचून गेले, पण या प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी दत्तस्तोत्र करण्याचा उपाय तर मिळाला आहे या विश्वासाने मी दिवसभरात ३००-४०० दत्तस्तोत्र करण्याचा सपाटा लावला. २०१४ मध्ये हळूहळू पोथ्यांचे वाचन जमेल तसे पुन्हा सुरू केले.

श्रीस्वामीजींकडून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार स्तोत्रांची उपासना सुरू झाली होती व अरूणसरांकडून नामसाधनेचा आशीर्वाद मिळाला.

अशा प्रकारे श्रीस्वामीजींचे माझ्यावर लक्ष असल्याची पूर्ण खात्री झाली. त्यामुळे जीवनात येणाऱ्या संकटांना झेलण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. मन शांत राहू लागले व मनोबलही वाढले.

साधना करत असताना अडथळे आल्यास - घरातील शांतता भंग होत असल्यास दुर्गा सप्तशतीचे पठण करण्याबाबत श्री अरूण सर व सौ. वैशाली यांजकडून सुचविण्यात आले. २०१८ पासून दत्तोपासनेबरोबर दुर्गा सप्तशतीचे वाचन, प्रत्येक अडथळयाच्या प्रसंगी सुरू झाले. दुर्गा त्रिशती, दुर्गा स्तोत्र, देवीसुक्त इ. सुरू झाल्यावर अन्यायाला प्रतिकार करण्याच्या मूळ

स्वभावात आणखीनच भर पडली. कार्यालयात अशाच एका प्रसंगी अधिकाऱ्यांसमोर निर्भयपणे न्यायासाठी लढण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. तेव्हा श्रीस्वामीजींकडे, दुर्गा उपासनेने प्राप्त होणारी ऊर्जा अंगात जिरुन जावी याकरिता प्रार्थना केली.

२०१८ मध्ये office audit साठी माझ्या कार्यालयामार्फत काही रजिस्टर्स पाठविण्यात आले. Audit संपल्यावर तेथून एक महत्वाचे रजिस्टर मिळाले नाही. अनेक वेळा शिपायाला शोधायला पाठवूनही प्रयत्न केला पण सर्व व्यर्थ गेले. त्यानंतर तीन महिन्यांनी माझ्या वरिष्ठांनी ३–४ कर्मचाऱ्यांची एकत्रित मिटींग घेतली. त्यात या कार्यालयाचे audit एका आठवड्यात होणार असल्याचे सूचित केले. मी पटकन उठून महत्वाचे रजिस्टर अद्याप हेड ऑफिसकडून प्राप्त न झाल्याचे सांगितले. अधिकाऱ्याने ते रजिस्टर गेल्या तीन महिन्यात का शोधले नाही असे विचारून तात्काळ शोध घेण्याचे आदेश दिले.

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मी दुसऱ्या एका शिपायास सोबत येण्याबाबत सांगितले. आम्ही माझ्या नेहमीच्या कामाच्या रजिस्टरच्या रॅकमधे हात घातला, तर ते हरवलेले रजिस्टर तेथेच मिळाले. खरेतर हा रॅक मी सर्वप्रथम शोधला होता, तेव्हा ते सापडले नव्हते. या ईश्वरी कृपेचे मला खूप आश्चर्य वाटले व डोळे भरून आले. श्रीस्वामीजींचे खूपखूप आभार.

२०२० मध्ये माझा मोठा मुलगा ब्रम्हेश १२ वी पास झाला. त्याला ७०% मार्कस् पडले. Commerce शाखेत online admission घेताना तिसऱ्या यादीतही त्याला हव्या असलेल्या college मधे त्याचे नाव आले नाही. तो खूपच निराश झाला होता. म्हणून मी एकीकडे शब्द टाकून जिल्हाधिकाऱ्यांकडून शिफारसपत्र मिळवले व त्या आधारे एका नामांकित college मध्ये admission घेण्याचा प्रयत्न केला. मनाला हे पटत नव्हते.

दोन दिवस प्रयत्न केल्यावर त्या college कडून चौथ्या यादीत नाव येईल असे सांगितले गेले. परंतु दुसऱ्या दिवशी मी office ला निघाले तेव्हा ब्रम्हेशने त्याला हव्या त्या college मध्ये admission मिळाल्याचा मेल आल्याचे कळविले. त्यामुळे तो खूष झाला. मी घरी येईपर्यंत त्याच्या वडिलांनी तेथे फी देखील भरली. अशा प्रकारे श्रीस्वामीजींच्या कृपेने मला चुकीचे वागण्यापासून वाचवले व ब्रम्हेशलाही हव्या असलेल्या college मध्ये admission मिळवून दिली.

एका सत्संगात श्रीस्वामी समर्थ सप्तशतीचे किमान पाच अध्याय वाचण्याचे मार्गदर्शन मिळाले. मी रोज दोन अध्याय वाचत असे पण मग त्या दिवसापासून पाच अध्याय वाचायला सुरुवात केली. सकाळी घरी वेळ न मिळाल्यास office मधील lunch break मधे एक-दोन अध्याय वाचत असे. ही साधना चालू केल्यावर माझ्या दंडावरील चामखीळीला सूज आल्याचे जाणवले. त्यावर आश्रमातून देण्यात आलेली उदी लावावी असे एक क्षण वाटले. पण दुसऱ्याच क्षणी 'शॉर्टकट वापरून श्रीस्वामीजींना एवढ्याशा कारणासाठी त्रास देणे योग्य नाही.' असा विचार आला. त्यावर शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली आहे असे वाटले. पण तिसऱ्या-चौथ्या दिवशीच ती चामखीळ पडून गेली. हे कसे झाले? असा मला प्रश्न पडला. ती चामखीळ मला खूप वर्षांपासून आहे. श्रीस्वामी समर्थ सप्तशतीचे वाचन केल्याने हा चमत्कार घडल्याचे जाणवले.

४ ऑगस्ट २०२१ मध्ये माझे वडील वारले. ते ८४ वर्षांचे होते. एक महिन्यापूर्वी diabetes कमी-जास्त होत असल्याच्या कारणास्तव त्यांना hospital मधे admit केले होते. चार दिवसांनी घरी परतल्यावर जेवताना त्यांना ठसका लागत असल्याने पातळ अन्न देण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला

होता. पण अशक्तपणा वाढत होता. माझी आई, भाऊ व भावजय सर्वजण त्यांची सेवा करत होते. परंतु त्याच्यात काही सुधारणा दिसत नव्हती. त्या काळात ऑफिसमध्ये महत्वाची कामे असल्याने मला सुट्टी घेता येत नव्हती. मी फक्त रविवारी त्यांना भेटत असे. त्यांच्या मृत्युच्या एक आठवडा आधी बेडसोर्स झाला. मी ३ ऑगस्ट, शनिवारी सुट्टी घेतली होती. वडिलांना भेटायला गेल्यावर त्यांची बिकट अवस्था पाहून देवाकडे त्यांच्या सुटकेसाठी प्रार्थना केली. रविवारी संध्याकाळी माझे मामा-मामी व त्यांचे इतर कुटुंबीय माझ्या वडिलांना भेटायला आल्याने मीसुद्धा तेथे गेले. त्याचवेळी त्यांची शुद्ध हरपली. मी त्यांच्या छातीवर हात ठेऊन दत्तस्तोत्र म्हणू लागले. पाच-दहा मिनिटातच त्यांची प्राणज्योत मालवली. कोरोना संकट काळातही योग्यवेळी मदत मिळून सर्व विधी नीट करता आल्याने आईला व आम्हाला समाधान मिळाले. श्रीस्वामीजींच्या कृपेने सर्वकाही व्यवस्थित झाल्याचा मला आनंद झाला.

**वैदेही केरकर**

**मुंबई**

ॐ

# वैशाली विशाल सांडीम

मी सौ. वैशाली विशाल सांडीम, सिडनी, ऑस्ट्रेलिया येथून श्री स्वामीजी व ओम वनिता आई यांच्या कृपेचे मला आलेले अनुभव लिहून पाठवीत आहे. मला लहानपणापासूनच ईश्वरभक्तीची आवड होती. नवनाथ कथासार, हरिविजय यासारख्या पुस्तकांमधून ईश्वरभक्तीचा महिमा कसा असतो हे वाचले होते. मी लहानपणापासून सतत आजारी असायचे. दर महिन्याला चारशे ते पाचशे रुपये डॉक्टरचे बिल व्हायचे, मोठा आजार नसायचा, मात्र प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे सतत किरकोळ आजार म्हणजेच ताप, सर्दी, खोकला याने मी त्रस्त झाले होते. वयाच्या २४ वर्षापर्यंत मी हा त्रास सहन करीत होते.

माझे लग्न १९९८ मध्ये झाले. माझी नणंद सुनिता सांडीम हिच्यामुळे माझा नवरा विशाल व मला श्रीस्वामीजींची पुस्तके-पोथ्या वाचायला मिळाले आणि श्लोक जेव्हा सात महिन्यांचा होता, तेव्हा आम्हाला श्रीस्वामीजींचे प्रथम दर्शन झाले. आजही मला तो सुवर्णक्षण आठवतो. श्रीस्वामीजींनी माझा मुलगा श्लोक याला मांडीवर घेतले व त्यांचा आशीर्वादाचा हात त्याच्या कपाळावर ठेवला. श्रीस्वामीजींचे ते दिव्य तेजस्वी स्वरूप आणि निरागस डोळे! तो क्षण खरोखरच अवर्णनीय असाच होता. तिथूनच माझ्या सद्भाग्याला सुरुवात झाली. नंतर पुन्हा मला आश्रमात जाण्याचा योग आला. श्रीस्वामीजींना जेव्हा मी माझ्या आजारपणाबद्दल सांगितले, तेव्हा त्यांनी स्वतःच्या हाताने मला पोथ्या व पुस्तके दिली व म्हणाले, हेच तुझे औषध आहे. तू पोथ्या सतत वाचत रहा. देव तुझे कल्याण करील आणि खरोखरच त्यानंतर माझे जवळजवळ २४ वर्षांपासूनचे आजारपण पूर्णपणे पळून गेले व मी निरोगी जीवन जगू लागले.

त्यानंतर साधना करायला मिळाल्या व बरेच सुंदर अनुभव आले. ते सर्व 'श्रीस्वामी दत्तावधूत या सिद्धयोग्याच्या सहवासात भाग दोन' मध्ये दिलेले आहेत. पोथ्यांच्या आणि पुस्तकांच्या वाचनामुळे विशालला ऑस्ट्रेलियाला जाण्याची संधी मिळाली व आमची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली झाली. आम्ही इथे स्वतःचा फ्लॅट व गाडी घेऊ शकलो. भारतात असताना विशालची नोकरी गेल्यानंतर आम्ही नाडीग्रंथवाल्याला त्याची पत्रिका दाखवली होती. नाडीग्रंथवाल्याने आम्हाला स्पष्टपणे सांगितले की विशालच्या नशिबामध्ये पैसा आणि विदेश यात्रा नाही. त्यामुळे त्याला दोन हजार रुपयांची नोकरी मिळाली तरीसुद्धा खूपच मोठी गोष्ट आहे, त्याचं प्रारब्ध फार खडतर आहे. ही गोष्ट जेव्हा विशालने श्रीस्वामीजींना सांगितली तेव्हा श्रीस्वामीजी म्हणाले अजिबात काळजी करू नकोस. त्यानुसार सुरुवातीचे दिवस आमच्यासाठी थोडे कठीण होते, मात्र श्रीस्वामीजींच्या कृपेने सर्वकाही ठीक झाले. खरोखरच विशालच्या नशिबामध्ये पैसा नव्हता पण श्रीस्वामीजींच्या कृपेने त्याचे प्रारब्ध बदलून त्याला डॉलर्समधे पैसे मिळाले. सद्गुरुंच्या कृपेने अशक्य असणाऱ्या गोष्टीसुद्धा शक्य होतात. आपल्या प्रारब्धातील कष्ट कमी होऊन आपल्याला सुखाचा मार्ग सापडतो.

२०१६ मध्ये मला खूप त्रास होऊ लागला व अतिशय अशक्तपणा येऊ लागला. डॉक्टरकडे गेले असता गर्भाशयामध्ये गाठी असून प्राथमिक स्वरूपाचा कॅन्सर झाला आहे असे निदान झाले. ऑस्ट्रेलियामध्ये त्या ऑपरेशनचा खर्च रुपये २०,००० होता जो आम्हाला परवडणारा नव्हता. म्हणून सुरुवातीला मी विशालला काहीच सांगितले नाही. जवळजवळ नऊ महिने मी सतत **महायोगी** व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची** पारायणे केली व नंतर विशालला याबद्दल सांगितले. तीन महिन्यांनी सिडनी येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंटसाठी माझा नंबर लागला. सोनोग्राफी व इतर ट्रीटमेंट

करून झाल्यानंतर त्यांनी असं सांगितलं की ऑपरेशन करायला लागेल व त्याच्याआधी हॉस्पिटलमध्ये हीस्ट्रोस्कोपीची ट्रीटमेंट करायची होती. मात्र त्या ट्रीटमेंटमध्ये अतिशय आश्चर्यकारक गोष्ट घडली. ती म्हणजे त्यांना माझ्या गर्भाशयामध्ये गाठी सापडल्याच नाहीत व माझे गर्भाशय अगदी नॉर्मल असल्याचे बघून डॉक्टरांना अतिशय आश्चर्य वाटले. मला तर काय बोलावे हेच समजेना मी अतिशय आनंदित झाले. नंतर पूर्ण एक वर्ष मला काहीच त्रास झाला नाही. मात्र २०१७ मध्ये मला पुन्हा त्रास सुरू झाला तेव्हा मी भारतात होते व ओम वनिता आईंनी मला डॉक्टर अल्पाकडे जाण्यास सांगितले. माझी सोनोग्राफी करून लगेच दोन दिवसात अर्जंट ऑपरेशन झाले. कारण ते गर्भाशयातील कॅन्सरच होते, मात्र ऑपरेशन अतिशय यशस्वीपणे वेळेत पार पडले व मोठ्या संकटातून मला वाचवले गेले.

श्लोक सात महिन्यांचा असताना आम्हाला श्रीस्वामीजींचे प्रथम दर्शन झाले. या प्रथम दर्शनानंतर आमच्या सांडीम घराण्यातील सर्वांचीच आपापल्या परीने ईश्वरभक्ती वाढू लागली. आम्ही सगळेच श्रीस्वामीजींची पुस्तके वाचनात ठेवून त्यातून शिकण्याचा प्रयत्न करत असतो. परमेश्वरकृपेने मिळालेल्या या मानवी जीवनात, परोपकार, ईश्वरभक्ती, दान, प्रेम, सत्कर्म आणि सदाचार यांचे जीवनात पालन केले तर आपले ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण होते, हे श्रीस्वामीजींच्या पुस्तकातील सार आहे. आज जवळजवळ २२ वर्षे, आम्ही आमच्या सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडून, श्रीस्वामीजी व ओम वनिता आई यांनी दाखवलेल्या या परम पावन मार्गाचे आचरण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. लहानपणीच सिद्धपुरुषांचा सहवास लाभल्याने व त्यांची भक्ती केल्याने लहान मुलांवर कसे चांगले संस्कार आपोआप घडतात याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हाला आमच्या मुलाने म्हणजे श्लोकने दिला. त्याला लहानपणापासूनच श्रीस्वामीजींचे प्रेम व सहवास मिळाला. तो नित्यनेमाने

त्यांच्या मार्गदर्शनानुसार वागण्याचा प्रयत्न करतो. परिणामी त्याचे शिक्षण तर सुरळीत झालेच शिवाय केवळ वयाच्या अठराव्या वर्षी ऑस्ट्रेलियन आर्मीमध्ये त्याला मानाची नोकरी मिळून तो आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाला. त्याचवर्षी दत्त जयंतीसाठी आम्ही श्री दत्तपीठम्ला (आश्रमात) गेलो असताना विशालने त्याच्या वडिलांच्या हातात एक पाकीट दिले व म्हणाला, श्लोकने त्याच्या पहिल्या पगारातील दानाची रक्कम तुमच्या हाताने दान करण्यासाठी दिली आहे. यावर विशालचे वडील विशालला म्हणाले, अरे कल, आज और कल म्हणजे मी, माझा मुलगा व नातू अशा आपल्या तिन्ही पिढ्यांना ईश्वराने आज सुखी व समृद्ध केले आहे. यानंतर विशालने त्याच्या वडिलांचे आभार मानले व म्हणाला, तुमच्या व श्री गुरुंच्या आशीर्वादाने आपल्या सगळ्यांना या जन्मात दत्तभक्ती मिळाली आणि आता मी पूर्णपणे निश्चिंत झालो आहे. कारण तुमचा नातू सुद्धा श्रीस्वामीजींनी दाखविलेल्या मार्गाचे स्वेच्छेने अनुसरण करीत आहे. तो दान करीत राहिल्याने, भविष्यात तो विश्वात कुठेही राहिला तरी ईश्वर त्याची सर्वतोपरी सुरक्षा व काळजी घेईल. कारण आपल्या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे दानाने आपले प्रारब्ध शुद्ध होऊन आपली बुद्धीही स्थिर राहते तसेच मनाचा तोल सांभाळला जाऊन आयुष्यात योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होते जे आजच्या या कठीण सामाजिक परिस्थितीत अतिशय आवश्यक आहे. म्हणून मी आता श्लोकच्या भविष्याबाबत अत्यंत निर्धास्त झालो आहे.

२०१८ मध्ये श्रीस्वामीजींच्या कृपेने, ओम वनिता आईंचे शुभागमन सिडनी येथे होणार होते. श्रीस्वामीजींच्या आज्ञेनुसार, आम्ही सर्वजण म्हणजे २५ ते २६ भक्तगण मिळून येथे सत्संग करतो. आम्ही सर्वजण खूप आनंदात होतो कारण ओम आई आमच्याकडे राहणार होत्या. त्यामुळे सर्व भक्तांनी घर सुंदर सजवले होते. सर्वजण आईंच्या दर्शनासाठी, त्यांच्या स्वागतासाठी

आतुर होते. ज्या दिवशी आई येणार होत्या त्याच पहाटे मला अतिशय सुंदर स्वप्न पडले. पुढील तीन दिवस आम्हा सर्व भक्तांना आईंच्या दिव्य सहवासाचा लाभ मिळाला. त्या आनंदाचे वर्णन करण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत.

२०१९ मध्ये श्लोक वय वर्षे १९ व चिन्मय पेडणेकर वय वर्ष १७, हे दोघे पहिल्यांदाच एकटे, दत्त जयंतीसाठी विमानाने भारतात येणार होते. विमानप्रवास सिडनी–क्वालालमपुर मलेशिया–भारत असा होता. पहिले विमान क्वालालमपुर येथे पोहोचल्यानंतर, भारतात जाणारी दुसरी फ्लाईट, रात्री बारा वाजता होती. क्वालालमपुर येथे पोहोचल्यानंतर विशालने श्लोकला फोन केला तेव्हा श्लोक म्हणाला, डॅडी आता थोड्याच वेळात विमान उड्डाण करून मुंबईला पोहोचेल. मी व चिन्मय विमानात बसलो आहोत. त्यानंतर विशाल निवांत झोपी गेला. सकाळी चिन्मयचे वडील सुभाष यांचा फोन आल्याने विशाल जागा झाला. सुभाषने विशालला सांगितले की मुलांची दुसरी फ्लाईट रद्द झाली. तेव्हा पुन्हा विशालने श्लोकला फोन केला. श्लोक म्हणाला तुमच्याशी रात्री बोलल्यानंतर मी अतिशय दमलेलो असल्यामुळे विमानातच झोपी गेलो. थोड्या वेळातच विमान उड्डाण करण्यासाठी सज्ज झाले. अर्ध्या तासानंतर जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा मला वाटलं की विमान भारतात उतरले आहे, परंतु चिन्मयने सांगितले की अरे विमान उडण्यासाठी रनवेला गेल्यानंतर अचानक पायलटने उड्डाण रद्द करून विमान परत क्वालालमपुर एअरपोर्टवर आणले व अशी अनाउन्समेंट केली की, विमानामध्ये काही यांत्रिक बिघाड झाल्याने हे विमान रद्द करण्यात येत आहे. चार तासानंतर दुसऱ्या विमानाने दोन्ही मुले भारतात पोहोचली. गेल्या दहा वर्षांमध्ये आम्ही बऱ्याच वेळा विमानाने भारतात प्रवास केला आहे परंतु आमच्याबाबतीत अशी घटना कधीच घडली नव्हती. पुढे दोन्ही मुले आपापल्या घरी सुखरूप पोहोचल्यानंतर अरुण सरांचा आम्हाला फोन आला व त्यांनी श्रीस्वामीजींचा निरोप कळवला तो असा की, श्लोक व चिन्मय यांच्यामुळे ईश्वराने आज

विमानातील इतर सर्व प्रवाशांच्या जीवनाचे रक्षण केले कारण जर विमानाने उड्डाण केले असते तर काही तांत्रिक बिघाडामुळे हे विमान कोसळून सर्व प्रवासी मृत्यूमुखी पडणार होते. या एअरलाईन्सची आधीही अनेक विमाने दुर्घटनाग्रस्त झालेली आहेत परंतु या विमानात श्लोक व चिन्मय प्रवास करीत असल्यामुळे, ईश्वराने पायलटला अगदी शेवटच्या क्षणी विमान उड्डाण थांबविण्याविषयी प्रेरणा, बुद्धी देऊन सर्वांच्या प्राणाचे रक्षण केले. हा अनुभव अगदी अंगावर काटा आणणारा होता. श्रीस्वामीजींच्या कृपेने आमच्या मुलांचे संरक्षण झाले.

**वैशाली विशाल सांडीम**
**सिडनी, ऑस्ट्रेलिया**

ॐ

# योगेश पेडणेकर

योगेश पेडणेकर यांच्या सासू म्हणजेच दुर्वा पेडणेकर यांच्या आई सौ. इंदु काकासाहेब मोहीते (पाटील) यांच्या बाबतीत हा अनुभव आहे.

सौ. इंदु यांचा उजवा पाय खूप दुखत असे. प्रथम, वात किंवा इतर कोणत्यातरी कारणामुळे असेल असे समजून जवळजवळ वर्षभर त्या घरगुती आणि त्यांचे नेहमीचे औषधोपचार करीत होत्या, पण त्यांच्या पायाच्या दुखण्यात काहीच फरक पडला नाही उलट ते वाढतच गेले. त्या ठाणे येथे राहतात. त्यांनी ठाण्यातील डॉक्टर्सना पण दाखवले. तेवढ्यापुरते दुखणे कमी व्हायचे. सौ इंदु या स्वतः श्रीस्वामीजींचे युट्युबवरील **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** नेहमी ऐकत असत तसेच कधी योगेश पोथी वाचायला बसला तर ऐकत असत. त्यामुळे श्रीस्वामीजींच्या कृपेनेच, परेल, मुंबई येथील टाटा हॉस्पिटलमध्ये जाण्याची त्यांना बुद्धी झाली. दोन ते तीन वेळा तपासणी झाल्यानंतर बोन कॅन्सर असल्याचे समजले. त्यासाठी बऱ्याच वेळेला सौ. इंदु यांचे सतत हॉस्पिटलला जाणे व्हायचे. त्या वेळेस दुर्वा सागर येथील श्रीस्वामीजींच्या आश्रमात होती. ती आल्यानंतर एक दिवस योगेशला म्हणाली आपली आई (सौ. इंदु) खूपच आजारी असून तिचे पायाचे दुखणे खूपच वाढले आहे, आतातर पाय सुजण्यासही सुरुवात झाली आहे. असे म्हणून एका रात्री ती घरी रडू लागली. दुसऱ्याच दिवशी सकाळी योगेश आपल्या कामानिमित्त श्री. अरूण दाभोळकर यांचे घरी गेला व तेथून सरळ ठाणे येथे आपल्या सासूच्या घरी गेला व दुर्वाचे आई-वडील दोघांनाही आपल्या वाशीच्या घरी घेऊन आला. दुर्वाच्या घरी आई आली तेव्हा तिला चालणेही कठीण होते. पाय खूपच सुजलेले असून दुखत होते.

बरेच दिवस होऊनही टाटा हॉस्पिटल मधून ट्रिटमेंटसाठी फोनही येत नव्हता. योगेश व दुर्वा घरी आल्यापासून, सौ. इंदु यांना नियमितपणे वेगवेगळया पोथ्या वाचून दाखवत असत. त्यानंतर साधारण एका आठवड्यातच टाटा हॉस्पिटलमधून फोन आला व श्रीस्वामीजींच्या कृपेने लगेचच सौ. इंदु यांची टाटा हॉस्पिटलमधे उपचाराला सुरुवात झाली. (भारतातील सर्वात मोठे कॅन्सर हॉस्पिटल म्हणजे मुंबईतील टाटा हॉस्पिटल आहे, येथे नंबर लागायला चार महिने किंवा अधिक काळ लागतो). सौ. इंदु यांना उपचार म्हणून २५ रेडियेशन व ५ किमो अशी ट्रीटमेंट सांगण्यात आली. याच दरम्यान म्हणजेच रेडियेशनची तारीख मिळेपर्यंत दुर्वाचे, आईला श्रीस्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्या वाचून दाखवणे सुरूच होते. तसेच सौ. इंदु या ईश्वरभक्तीचे अनुभव हे श्रीस्वामीजींनी लिहिलेले पुस्तक जमेल तसे थोडे थोडे वाचत असत. पायाचे दुखणे वाढतच असल्याने पोथ्या वाचताना जास्त वेळ बसणे सौ. इंदु यांना शक्य होत नसे. पण श्रीस्वामीजींच्या कृपेने जसजसे वाचन होऊ लागले तसतसे आठवड्याभरातच योगेश किंवा दुर्वा पोथी वाचायला बसल्यानंतर सौ. इंदु यांनाही हळूहळू पोथी वाचन पूर्ण होईपर्यंत ती बसून ऐकणे शक्य होऊ लागले. ही उपचार पद्धती खूपच वेदनादायी असते, बऱ्याच वेळा ही उपचार पध्दती रूग्ण सहनही करू शकत नाहीत व ती अर्ध्यावरच बंद करावी लागते. श्रीस्वामीजींच्या पोथ्यांचे वाचन चालूच होते. त्यामुळे उपचारा दरम्यान कोणतीही अडचण न येता, तसेच सौ. इंदु यांना कोणत्याही प्रकारच्या अती असहय्य वेदना न होता उपचार पद्धती चालू राहिली व डॉक्टरांनी सांगितलेल्या वेळेतच ती पूर्ण झाली.

सौ. इंदु यांच्या भावाची पत्नीसुध्दा या आजारानेच ग्रस्त होती व या आजारावरील उपचार पद्धतिनेच त्या स्वर्गवासी झाल्या. त्या कॅन्सर उपचार पद्धती सहन करू शकल्या नाहीत. खरेतर त्या शरीरयष्टीने अगदी तंदुरुस्त

होत्या. त्या मानाने सौ. इंदु या सामान्य शरीरयष्टीच्या असल्याने हा औषधोपचार त्या सहन करू शकतील असा कोणालाच विश्वास नव्हता. त्यामुळे त्यांची मुले व घरातील इतर लोक खूपच घाबरली होती. इतकेच काय तर सौ. इंदु यांचे सर्व भाऊ, ज्या भावाची पत्नी कॅन्सरने स्वर्गवासी झालेली होती तो सुध्दा सौ. इंदु यांना भेटण्यासाठी सांगलीहून वाशीला आले होते. सौ. इंदु यांची बहीण तर आठ दिवस येऊन सौ. इंदु यांचे सोबत वाशी येथे राहिली व ती नेहमी म्हणत असे माणूस चांगला असताना त्याच्यासोबत राहावे.

श्रीस्वामीजींची कृपा आणि योगेश व दुर्वा यांच्या श्रीस्वामीजींवरील विश्वासानेच, आज सौ. इंदु बऱ्या होऊन आपल्या ठाण्याच्या घरी त्यांचा मुलगा प्रविण व सून रोहिणी यांच्याबरोबर राहायला गेल्या आहेत. त्यांची सून रोहिणी व मुलगा प्रविणसुध्दा श्रीस्वामीजींनी दिलेल्या पोथ्या सौ. इंदु यांना वाचून दाखवतात. आता सध्या सौ. इंदु यांची प्रकृती हळूहळू सुधारत आहे. पायाचे दुखणेही बऱ्याच प्रमाणात बरे झाले असून सुजही पूर्णपणे गेली आहे. श्रीस्वामीजींच्या कृपेने सौ. इंदु या कॅन्सरसारख्या आजारावरही खंबीरपणे मात करू शकल्या. आता तर त्यांचे आपले दैनंदिन व्यवहारही सुरू झाले आहेत. सद्गुरु कृपा असेल तर या जगात काहीच अशक्य नाही, कोणतीही बाधा, व्याधी याचे निवारण सद्गुरु कृपेने अगदी सहज होते, त्यातून बाहेर येण्याची ताकदही सद्गुरुंच देत असतात, याचा अनुभव योगेश आणि दुर्वा यांना आला.

**योगेश पेडणेकर**

**मुंबई**

ॐ

# अदृश्य शक्ती

रमेश अमेरिकेत राहतो. त्याचे आई-वडील भारतात राहतात.

या सर्वांना त्यांच्या घरात अदृश्य शक्ती दिसतात व त्यांना खूप त्रास होतो.

स्वामी भक्त लेलेकाकांच्या सांगण्यावरून रमेशने शैला मसुरकर हिच्या घरी येऊन पोथ्या व पुस्तके विकत घेतली व तो अमेरिकेला परत गेला.

पोथ्या व पुस्तके घरात येताच अदृश्य शक्ती ज्या घरामध्ये वावरतांना दिसत होत्या त्या बाहेर दिसू लागल्या. त्यामुळे त्रास खूप कमी झाला.

इतक्यात त्याच्या आईचा फोन आला.

लगेच त्या सर्व शक्ती त्रास देऊ लागल्या. मुलाने आईला सांगितले, ''तू सुद्धा पोथ्या, पुस्तके घरात आणून ठेव.'' त्याप्रमाणे आईने करताच आई व वडिलांच्या घरातीलही त्रास कमी झाला.

अमेरिका व भारत दोन्ही देशातील घरामध्ये होणारा त्रास कमी झाला. फक्त आईचा फोन आला की मुलाला खूप त्रास होत असे.

यावर उपाय म्हणून दोघांनीही एका हातात पोथी धरून फोनवर बोलणे सुरू केले. असे करताच त्रास बंद झाला. अदृश्य शक्ती घरात आहेतच पण त्या आता त्रास देत नाहीत.

याचा अर्थ अदृश्य शक्ती ज्या त्रास देत होत्या, पोथ्यांच्या अस्तित्वाने त्या शांत झाल्या.

**रमेश**

**अमेरिका**

ॐ

# अश्विनी जोशी

श्रीस्वामीजीच काळजी घेतात. नुकताच आलेला एक अनुभव सांगते. १७ ऑक्टोबर २०२२ सोमवार. पुण्यात दिवसभर तसा काही विशेष जोरात पाऊस पडत नव्हता. सगळ्यांचे रोजच्या प्रमाणे रूटीन चालू होते. आपापली कामे आटोपून लोक घरी जायला निघाले होते आणि अचानक रात्री ९.३० च्या सुमारास प्रचंड जोराने पाऊस पडायला लागला. काही मिनिटातच पावसाचा जोर प्रचंड वाढला. अंदाजे तास दिडतास एवढ्या जोराने पाऊस पडला की सगळ्या रस्त्यांना अक्षरश: नदीचे स्वरूप आले. सगळीकडे पाणी एवढे भरले की लोकांच्या २ व्हीलर ४ व्हीलर वाहून जायला लागल्या. लोकांच्या घरात व दुकानात पाणी गेले. दगडूशेठ गणपती मंदिरात पण पाणी भरले. एवढा जोरात पाऊस होता की ढगफुटीच झाली आहे, असेच वाटत होते. पुण्याच्या बुधवारपेठेतील व्यापारीपेठ असलेल्या रस्त्यावरील अनेक दुकानांमध्ये पाणी साठले. कात्रज कडून नदीपात्राकडे तसा उतार असल्यामुळे या रस्त्यावर पाणी खूपच जास्त जोराने वाहात होते. अनेक दुकानदारांचे खूप नुकसान झाले. याच रस्त्यावर आपलेपण (चंदेरी) हे दुकान आहे. या दुकानात श्रीस्वामीजींची पोथ्या व पुस्तके विक्रीसाठी असतात. चंदेरीच्या शेजारी असलेल्या सायकलच्या दुकानात आणि आजूबाजूच्या इतर दुकानांन मध्ये पण पाणी गेले. पण श्रीस्वामीजींच्या कृपेमुळे चंदेरीत अजिबात पाणी आले नाही. श्रीस्वामीजींची पोथ्या, पुस्तके दुकानात असल्यामुळेच दुकानाचे कोणतेही नुकसान झाले नाही. दुसऱ्या दिवशी बातम्यात सांगितले गेले की अनेक वर्षात पुण्यामध्ये एवढ्या मोठ्या

प्रमाणात (ताशी ८०mm) पाऊस पडला नव्हता. या पावसामुळे पुण्यात अनेकांचे खूप नुकसान झाले, पण श्रीस्वामीजींनी दुकानाचे पूर्ण संरक्षण केले. कुठलीच अडचण त्यांनी येऊ दिली नाही. रोजच्या जीवनात ते आपली किती काळजी घेतात हा आलेला अजून एक अनुभव.

**अश्विनी जोशी**
**पुणे**

ॐ

# मनाली गणपत दळवी

मी ज्या ठिकाणी काम करते तेथे स्वामी दत्तावधूतांची पुस्तके छापली जातात. माझ्याकडून खरतर एवढे दैवी काम होत होते, परंतु मला त्याची महती कळली नव्हती. एके दिवशी मी नंदिनी मॅडमकडून संक्षिप्त श्री गुरुचरित्राची एक प्रत मागून घेतली. दुसरा दिवस गुढीपाडवा असल्याने मला खूप आनंद झाला. मी श्रध्देने त्या दिवशी संक्षिप्त श्री गुरुचरित्राचे पारायण केले. परंतु नंतर मात्र माझ्याकडून त्याचे नियमित वाचन झाले नाही. एक वर्ष असेच गेले. पण या एका वर्षात मला खूपच वाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागले. माझा मुलगा निशांत त्यावेळी नव्वीत शिकत होता. तो खूप मस्ती व चिडचिड करायचा. त्याच्या शाळेतून त्याच्याबद्दल अनेक तक्रारी येऊ लागल्या. अभ्यासातही त्याचे लक्ष नव्हते. सगळीकडून येणाऱ्या त्याच्या तक्रारींमुळे मी अस्वस्थ झाले व खूपच खचून गेले. शेवटी मुलासाठी नोकरी सोडून घरी बसावे का अशा विचारात होते.

त्याचवेळी काही कामानिमित्त नंदिनी मॅडम माझ्या ऑफिसमध्ये आल्या. माझा चिंताग्रस्त चेहरा पाहून त्यांनी, काही झालय का अशी चौकशी केली. मी माझा प्रॉब्लेम त्यांना सांगितला. त्यावर त्यांनी मला विचारले की तू संक्षिप्त श्री गुरुचरित्र वाचतेस का? मी नकारार्थी उत्तर दिल्यावर त्यांनी मला संक्षिप्त श्री गुरुचरित्राची पोथी नित्य नियमाने वाचण्याचा सल्ला दिला. मला जणुकाही आशीर्वादच मिळाल्यासारखे वाटले. त्यानंतर मात्र मी रोजच्यारोज संक्षिप्त श्री गुरुचरित्राचे वाचन सुरू केले व त्याचा मला

खूपच चांगला अनुभव आला. वाचन सुरू झाल्यापासून माझा मुलगा स्वत:हून अभ्यास करू लागला. त्याच्या येणाऱ्या तक्रारी देखील बंद झाल्या. तो दहावीला चांगले मार्कस् मिळवून उत्तीर्ण झाला. अशा रितीने माझ्या आयुष्यातील सर्व चिंता दूर झाल्या.

आता मी दररोज न चुकता संक्षिप्त श्री गुरुचरित्राचे पारायण करते. माझ्या ओळखीच्या कोणालाही काही अडचणी आल्यास त्यांनाही संक्षिप्त श्री गुरुचरित्राचे पारायण करण्याचा सल्ला देते. एकदा मी माझ्या ऑफिसमधील मैत्रिणीला श्री स्वामी दत्तावधूतांचा व त्यांच्या पोथ्यांचा महिमा सांगितला. सौ. वनिताताई बद्दलही सांगितले. दुसऱ्याच दिवशी नंदिनी मॅडम ऑफिसला आल्या व त्यांनी एका नवीन पोथीच्या कामाबद्दल सांगितले. त्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपल्यावर ताईंची कृपादृष्टी होत असल्याचा दिव्य अनुभव मला आला. आश्चर्य म्हणजे मी श्री क्षेत्र गाणगापूरला दर्शनासाठी उभी असताना नंदिनी मॅडमचा फोन आला व हे काम तू लवकर सुरू कर असे सांगितले. मला अगदी धन्य झाल्यासारखे वाटले व मी तत्क्षणी कामाला लागले. माझ्या मनातील सुप्त इच्छाही आज देवाने पूर्ण केली. श्री गुरुदेव दत्त!

**मनाली गणपत दळवी**

**ठाणे**

ॐ

# देव भावाचा भुकेला

औरंगाबाद येथील डॉक्टर लालवाणी यांच्या एका मित्राचे नाव जामेरकर. या मित्राचा एक ख्रिश्चन मित्र, आलोक तामणीकर, अनेक संकटांनी व समस्यानी गांजलेला होता.

जामेरकर यांनी आलोक तामणीकरला संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची पारायणे करण्यास सांगितले, त्या ख्रिश्चन सद्भक्ताने संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची पारायणे सुरू करताच, त्याला खूप छान अनुभव आला. सर्व संकटे व त्रास दूर झाले. जामेरकर यांनी ही गोष्ट मार्च २०२३ मध्ये आम्हाला कळवली.

**औरंगाबाद**

ॐ

# सद्भक्तांचे अनुभव

श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेल्या पोथ्या वाचून आलेले काही अत्यंत दिव्य अनुभव.

## संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचा एक अद्भुत व गूढ अनुभव

ईश्वर कोणाला कसे अनुभव देईल हे सांगता येत नाही. ईश्वरभक्ती करून आपण आपली पात्रता सतत वाढवत राहिली पाहिजे. देण्याची वृत्ती जशी वाढत जाते तशी देवतांची कृपा प्राप्त होत जाते. संक्षिप्त श्रीगुरुचरित्र नित्य पठण करण्याने अनेकांना दिव्य अनुभव आले. असाच एक अनुभव नुकताच ज्योतिषी राणी बापट यांचे कडून कळला तो पुढे देत आहे.

ज्योतिषी राणी बापट यांची मैत्रिण निता ठाकूर ही बोरीवली (मुंबई) येथे आपली बहीण रुपाली नाईक हिच्या समवेत एका भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहते. राणी बापट यांच्या संगतीने दोघीही संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचू लागल्या व पोथ्या विकत घेऊन सद्भक्तांना वाटू लागल्या.

काही दिवस अशी उपासना केल्यावर त्यांना गूढ अनुभव येऊ लागला. प्रथम घराच्या एका कोपऱ्यात मूठभर तांदूळ दिसले. त्यांना वाटले आपल्या हातून पडले असावेत. ते तांदूळ गोळा करून, त्यांनी डब्यात ठेवले. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या कोपऱ्यात दोन मुठी (अंदाजे १५० ग्रॅम) तांदूळ त्यांना दिसून आले, तेव्हा ते न गोळा करता तसेच राहू दिले. तिसऱ्या दिवशी आणखी एका कोपऱ्यात तांदूळ दिसले. तेव्हा सर्व तांदूळ गोळा करून पक्ष्यांना घालण्यास त्यांनी सुरुवात केली व राणीला सर्व प्रकार सांगितला. तेव्हा राणीने थोडे तांदूळ पक्ष्यांना घालून उरलेले साठवा असे सांगितले.

त्याप्रमाणे (निता ठाकूर व रुपाली नाईक) यांनी तांदूळ साठवण्यास सुरुवात केली. आतापर्यंत (जुलै २०२२) सुमारे दहा किलोहून अधिक तांदूळ साठले आहेत व दररोज तांदूळ येतच आहेत. राणीने ते दैवी तांदूळ गरीबांना वाटण्यास सांगितले आहे. ईश्वर कोणाला काय चमत्कार दाखवेल हे सांगता येणे कठीण. ईश्वरी लीला अगाध आहे हेच खरे! ही ईश्वरी लीला ऐकून एका तथाकथित बुद्धीवाद्याने प्रश्न केला :- ''असे चमत्कार घडतात तरी कसे?''

यावर श्रीस्वामीजींनी उत्तर दिले, ''देण्याची, वाटण्याची प्रवृत्ती जोपासा, तिची वाढ करा की जीवनात चमत्कार घडू लागतात.''

## हरवले ते गवसले

सुनिता चिंदरकर या स्त्रीचा नवरा पाच वर्षांपासून बेपत्ता होता. नवरा परत यावा म्हणून तिने अनेक उपाय केले. एका तांत्रिकाने तर, ''तुझा नवरा जिवंत नाही'', असेही सांगितले. शेवटी कोणीतरी तिला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्याचा सल्ला दिला. तिने ते मन:शांतीसाठी वाचावयास सुरुवात केली. काही दिवसातच नवरा घरी परत आला.

शैलजा शैलेश सावंत या रत्नागिरीमध्ये दोन खोल्यांच्या एका जुन्या घरात राहतात. घरात फारसे सामानही नाही. आपल्याकडील सर्व सोन्याचे दागिने त्यांनी एका कापडामध्ये बांधून ट्रंकेत ठेवले होते. नेहमी ट्रंकेतून साडी वगैरे काढतांना सोने बांधून ठेवलेल्या गाठोड्याकडे त्यांचे लक्ष जात असे.

नवरा दहा वर्षांपूर्वी वारला होता, मुलगा संकेत व मुलगी सिद्धी ही दोन्ही मुले शिकत होती. एकदा त्यांनी ट्रंक उघडली व त्यांना धक्काच बसला. सोन्याचे अलंकार, दागिने, जडजवाहीर बांधून ठेवलेले गाठोडे (पार्सल) गायब झाले होते.

त्यांनी पूर्ण ट्रंक रिकामी केली. घरातील आणखी दोन पेट्या शोधल्या, घरात सगळीकडे शोधलं. ''**सोनं हरवलं होतं.**''

कुणीतरी त्यांना **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्याचा सल्ला दिला. त्यांनी श्रद्धेने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली.

एक दिवस घरातील कॉटवर, त्या दुपारची वामकुक्षी घेऊन उठल्या. त्यांच्या डोक्याजवळ त्यांचे सोन्याचे गाठोडे कोणीतरी ठेवलेले दिसले. त्यांनी मारलेली त्याची गाठही तशीच होती. तिलासुद्धा कोणी हात लावलेला नव्हता.

ही हकिकत सांगून शैलजा सावंत म्हणतात की, भूताने सोन्याचे गाठोडे नेले, हे खरं! पण ते भूत गाठोड्याची गाठ सुद्धा सोडवू शकले नाही.

तसेच्या तसे ते गाठोडे त्याला परत करावे लागले.

''**दत्तकृपा! दुसरे काय!!**''

## शशिकान्त लेले यांचे दिव्य अनुभव

**श्री दुर्गा त्रिशतीत राहती। महाकाली महालक्ष्मी महासरस्वती।।**

शशिकान्त वा. लेले वय ८०, हे विलेपार्ले, मुंबई येथे राहतात. श्रीस्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके भक्तीभावाने वाचतात. या पोथ्यांच्या वाचनाने त्यांना अनेक दिव्य अनुभव आले. आध्यात्मात प्रगती झाली. सुख, शांती, आनंद प्राप्त झाला. मनापासून ईश्वरभक्ती केल्यावर मनुष्य देवस्वरुप होतो याचे साक्षात् जिवंत उदाहरण म्हणजे लेलेकाका! आज २०२० साली ते परमानंदात विलेपार्ले येथे राहत आहेत. पोथ्या पुस्तके वाचत आहेत. प्रत्येक पोथीचे दिव्य अनुभव घेत आहेत. त्यांच्या असंख्य दिव्य अनुभवांपैकी काही खाली देत आहे.

चैत्र नवरात्र (मार्च/एप्रिल २०२०) सुरू होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर लेलेकाका आपल्या मुलीच्या घरी विलेपार्ले, मुंबई येथे कॉटवर बसून **श्री दुर्गा त्रिशती** वाचत होते. अचानक पोथी व घर प्रकाशमय झाले व त्या प्रकाशातून महालक्ष्मी, महासरस्वती व महाकाली अशा देवता प्रकट झाल्या. लेलेकाकांना समाधी सदृश्य अवस्था प्राप्त झाली. त्यांचे देहभान हरपले, स्वत:च्या देहातून ते बाहेर पडले, व तिन्ही देवतांना नमस्कार केला.

टेलीपथीद्वारा संभाषण सुरू झाले. लेलेकाकांनी विचारले....

''कसे येणे झाले?''

तेव्हा तिन्ही देवतांनी पदर पुढे केला. लेलेकाकांच्या जवळ त्यांना देण्यासाठी काहीही नव्हते पण त्यांनी सहज हात वर केला; तर हातात एक नारळ आला, तो त्यांनी एका देवीला दिला व परत हात वर केला तेव्हा हातात गजरे आले, तेही देवींना अर्पण केले. नंतर दोन्ही हात वर केले तर पाच-पाच फळे दोन्ही हातात आली, ते सर्व त्या देवींना अर्पण करताच त्या अदृश्य झाल्या.

त्या तिन्ही देवतांनी हिरवी साडी नेसली होती. कृतज्ञतेने लेलेकाकांनी आपल्या मुली-जावया बरोबर दुसऱ्या दिवशी महालक्ष्मी मंदिरात जाऊन तीन हिरव्या साड्या देवीला अर्पण केल्या. तेव्हा त्या साड्यांमधून प्रकाश बाहेर पडतांना दिसला.

या घटनेनंतर दहा दिवसांनी संध्याकाळी ८ वाजता लेलेकाका कॉटवर बसून श्रीस्वामी दत्तावधूत लिखित **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचत होते. ते उत्तराभिमुख बसलेले होते. वाचता वाचता अचानक तीव्र भावावेग उत्पन्न होऊन ते रडू लागले. आपण का रडत आहोत हे त्यांना कळत नव्हते. इतक्यात पोथीतून प्रकाश बाहेर येऊन पूर्ण खोली प्रकाशाने भरुन गेली व त्या प्रकाशातून राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता व हनुमान हे देव प्रकट झाले.

त्यांनी लेलेकाकांना जवळ बोलावले. तात्काळ लेलेकाका आपल्या समाधी सदृश्य देहातून बाहेर पडले. देवतांच्या जवळ गेले. प्रत्येक देवाने त्यांना आलिंगन दिले व आशीर्वाद दिला. त्यानंतर ते आपल्या स्थूल देहात परत आले व सर्व दृश्य अदृश्य झाले.

एकदा सकाळच्या वेळी विलेपार्ले मुंबई येथील आपल्या घरामध्ये कॉटवर बसून लेलेकाका जप करत होते. अचानक, घर-दार, बिल्डींग, पार्ले मधील ओळखीचा परिसर सारे काही अदृश्य झाले. आपण दूर कुठेतरी शून्य लोकात किंवा आकाशात आहोत असा अनुभव त्यांना आला. दूर अंतरावर पृथ्वी तरंगत होती. त्यांनी पृथ्वीला प्रार्थना केली. हे माते, ज्याप्रमाणे गणपतीने शिव-पार्वतीला प्रदक्षिणा केली त्याप्रमाणे तुझी प्रदक्षिणा करण्याची माझी इच्छा आहे.

पृथ्वीमातेने अनुमती दिली. एका क्षणात लेलेकाकांनी तीन पृथ्वी प्रदक्षिणा केल्या व डोळे उघडले तर ते आपल्या रुममध्ये कॉटवर ध्यानस्थ बसलेले होते.

जुलै/ऑगस्ट २०२०- पहाटे पाच वाजता देवी प्रकट झाली. तात्काळ लेलेकाका आपल्या स्थूल देहातून बाहेर पडले. त्यांना बरोबर घेऊन देवी उत्कर्ष मंडळ सदृश्य एका स्थानात गेली. एक खूप मोठे मंदिर होते. मोठे दरवाजे होते, एक खिडकी होती.

लेलेकाकांनी खिडकीतून आत पाहिले. सुमारे वीस फूट दूर अंतरावर गाभारा होता व तेथे रेणूकामाता, देवी अंबेजोगाई व जोगेश्वरीमाता गप्पा मारत होत्या. लेलेकाकांची चाहूल लागताच त्या तिन्ही देवता एकरूप झाल्या.

लेलेकाकांनी मंदिरात प्रवेश केला. मंदिर प्रमुख, नऊवारी साडी नेसलेल्या, कपाळावर मोठे गोल आकाराचे कुंकू लावलेल्या होत्या. त्यांनी लेलेकाकांना गाभाऱ्यात जाऊन पूजा करा असे सांगितले. लेलेकाका गाभाऱ्यात

गेले व पूजा केली तर गाभाऱ्यातील प्रकाश अनेक पटींनी वाढला. बाहेर येऊन लेलेकाकांनी मंदिर प्रमुख स्त्रीला नमस्कार केला व वर पाहतात तर त्या स्त्रीची उंची वाढू लागली होती. त्या जगन्माता होत्या. जगन्मातेने लेलेकाकांना आशीर्वाद दिला व म्हणाली– ''हे प्रकटीकरण फक्त तुझ्या पुरतेच आहे.'' तेथून लेलेकाका हवेतून तरंगत घरी आले. त्यांचा स्थूलदेह कॉटवर शांतपणे झोपलेला होता.

## मणक्याचे दुखणे

प्रणाली जागडे (ता. सुधागड, जि. रायगड), हिच्या मणक्यामधून जोराने आवाज येत असे, तिच्या आसपास असणाऱ्या व्यक्तीलाही हा आवाज ऐकू जात असे. तिच्या आईला खूप काळजी वाटत असे. अनेक तज्ञ डॉक्टर्सना दाखवले,आयुर्वेदीक उपचार, मसाज, अशा उपचारांनी सुद्धा तिला बरे वाटले नाही. अनेक वर्षे हा प्रकार सुरू होता. २०२० मध्ये **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचावयास सुरुवात केली. २–३ दिवसानंतर लक्षात आले की, मणक्यातून आवाज येण्याचे बंद झाले आहे. गेल्या आठ महिन्यात मणक्यातून आवाज आलेला नाही. म्हणून तिने हा अद्भुत अनुभव प्रकाशकांना कळविण्याचे ठरवले.

प्रकाशकांना अनुभव कळविण्यापूर्वी आणखी एक दिव्य अनुभव तिला आला. प्रसाद जागडे हा तिचा लहान भाऊ रोज रात्री किंचाळून उठत असे. झोपेत दचकत असे, आपल्या छातीवर कोणीतरी बसलं आहे असा भास त्याला होत असे. त्याच्या या त्रासामुळे घरातील कुणालाही शांत झोप येत नसे. या सर्व प्रकारामुळे तो अतिशय भित्रा झालेला होता. संध्याकाळी सहा वाजल्यानंतर तो घराबाहेर पडत नसे, त्याला खूप भीती वाटत असे. ही भयभीत अवस्था सकाळी ७ वाजेपर्यंत रहात असे. तो काळोखाला खूप भीत असे. प्रणालीने त्याला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** श्रद्धेने वाचावयास सांगितले व

जितक्या जास्त वेळा वाचशील तितक्या लवकर अनुभव येईल असेही सांगितले. प्रसाद जागडे याने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दररोज ५ वेळा वाचावयास सुरुवात केली. आठवड्याभरात त्याची सर्व भीती गेली, शांत झोप येऊ लागली. पिशाश्च सृष्टीचे उपद्रव थांबले. रात्रीचा घराबाहेर पडून तो कुठेही फिरु लागला. भीती निघून गेली. प्रणाली जागडेने हे दोन्ही अनुभव सप्टेंबर २०२० मध्ये आम्हाला कळविले.

श्री स्वामी दत्तावधूत यांच्या पोथ्या व पुस्तके वाचून असे दिव्य अनुभव अनेकांना येत असतात. हजारातील एखाद्या व्यक्तीचा अनुभव आमच्यापर्यंत पोहोचतो.

**दत्त रक्षी सर्वदा**

भारती एक अत्यंत गरीब स्त्री, लोकांच्या घरी धुणी-भांडी करून स्वत:चा व स्वत:च्या दोन मुलांचा उदरनिर्वाह कसातरी चालविणारी, एक सर्वसामान्य स्त्री! झोपडपट्टीतील १०X१२ च्या खोलीतील संसार कसाबसा चालविणारी. पण दत्तावर श्रद्धा! रोज **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** श्रद्धेने वाचणारी.

एका रात्री १०X१२ च्या आपल्या खोलीत मुलांसहित गाढ झोपलेली असताना कसलातरी जोरात आवाज झाला. उठून पाहिले तर सिलींग फॅन खाली पडला होता. विशेष म्हणजे सिलिंग फॅन खाली झोपलेल्या कुणालाही इजा झाली नव्हती कारण सिलींग फॅनची तिन्ही पाती वरच्या बाजूला आपोआप मिटली गेली होती. सिलींग फॅन एखाद्या कमळाच्या कळीप्रमाणे भारतीच्या डोक्यापासून फूटभर अंतरावर पडला होता. पडलेला फॅन उचलून भारतीने कोपऱ्यात ठेवला व पुन्हा निवांत झोपी गेली. **विश्वव्यापी श्री दत्तप्रभूंनी भारती व भारतीच्या मुलांचे सिलिंग फॅनपासून संरक्षण केले होते!**

### संततिप्राप्ती

संतोष व त्याची पत्नी, लग्नाला तेरा वर्षे होऊनही संतती सुखासाठी अनेक उपाय करून थकले होते. भारतीकडून त्यांना **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची** महती कळली व त्यांनीही **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचावयास सुरुवात केली. त्यांची इच्छा पूर्ण होऊन, त्यांना संततिप्राप्तीचा आनंद मिळाला.

## सूर जुळले पुन्हा...

संतोषची बहीण रश्मी, हिला एक मुलगी होती. परंतु रश्मीला नवऱ्याने टाकल्याने, गेली १८ वर्षे ती मुलीसह माहेरी राहत होती. शेवटी नाईलाजाने डिव्होर्स घ्यायचा विचार माहेरची माणसे करत होती. संतोषने तिला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचावयास सांगितले. तिनेही श्रद्धेने वाचावयास सुरुवात केली. काही दिवसातच रश्मीचा नवरा चंद्रकान्त याने तिची भेट घेतली व आता त्यांचा संसार आनंदात सुरू असून चंद्रकान्त **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचल्याशिवाय घरातून बाहेरही पडत नाही.

### व्यसन सुटले

एका स्त्रीचा नवरा २४ तास दारूच्या नशेत असायचा. नशेमध्ये तो बायकोला मारायचा, मुलांना मारायचा, शेजाऱ्यांना त्रास द्यायचा. कुठलेही काम करायचा नाही. बायको जे कमवायची तेही दारूतच खर्च करायचा.

आपली सारी व्यथा या दारूड्याच्या पत्नीने दिनेश नाडकर्णी (श्रीदत्त मंदिराचे पुजारी, शिवडाव, कणकवली) यांना सांगितली.

दिनेश नाडकर्णी म्हणाले, ''एक उपाय सांगतो तो करुन बघ! **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** तुला देतो. ते तू नित्यनेमाने वाचत जा! वाचतांना देवाजवळ दिवा-अगरबत्ती लावून वाच!''

यावर त्या दारूड्याची पत्नी म्हणाली, ''अहो, तो मला देवाजवळ उभे राहू देत नाही, अगरबत्ती लावू देत नाही.''

यावर नाडकर्णी म्हणाले.... ''तो घरात नसतांना तू वाचत जा!''

त्या स्त्रीने पोथी घेतली व नवरा घरात नसतांना वाचावयास सुरुवात केली. सुमारे महिनाभर पोथी वाचल्यानंतर नवऱ्याची दारू सुटली व तोही दत्तभक्ती करु लागला.

## संसार कष्ट दूर होती

बेंगलोरहून मानसा शर्मा यांनी कळविले आहे...

'मी तेलंगाणा मधील! माझी भाषा तेलगु! थोडेफार हिन्दी शिकलेली असल्याने, **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'**वाचावयास सुरुवात केली. एकाही शब्दाचा अर्थ कळत नव्हता. पण दररोज **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'** पूर्ण वाचायचे, असा नियम केला होता.

हळूहळू माहेरचे प्रॉब्लेम सुटले व संसार सुखाचा झाला. माझे लग्न झाले व मी बेंगलोरला आले. सासरीही माझे वाचन चालूच होते. सासरचेही सर्व प्रॉब्लेम सुटले. सासरी सर्व माणसे कन्नड बोलतात, हळूहळू मी पण कन्नड शिकले. आमच्या शेजारी एक फॅमिली रहात होती, या फॅमिलीला अनेक प्रॉब्लेम होते, घरात शांती नव्हती.

मी त्यांना सांगितले.....

''मराठी भाषेमध्ये, **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'** नावाची एक पोथी असून ती वाचल्याने संसार सुखाचा होतो. 'मी वाचू का तुमच्या घरामध्ये, **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'**!'' त्यांनी आनंदाने होकार दिला.

मी त्यांच्या घरी, **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'** वाचावयास सुरुवात केली. काही दिवसातच त्यांचे प्रॉब्लेम सुटले व ते सुखी झाले.

विशेष म्हणजे मी तेलगु! पोथी वाचली ती मराठी! व ज्यांच्या घरात वाचली ते कन्नड! तरीही ईश्वराने कृपा केली.

असाच अनुभव एका डॉक्टरांनी सांगितला. त्यांनी एका गुजराथी कुटुंबाला **'संक्षिप्त श्रीगुरुचरित्र'** वाचावयास सांगितले. गुजराथी कुटुंबाने श्रद्धेने वाचले व त्यांच्या जीवनातील अडचणी दूर झाल्या.

## अडली कामे पूर्ण होती

सौ राधिका सप्रे ता. पनवेल (महाराष्ट्र) यांनी पत्र लिहिले आहे.

मला लहानपणापासून आध्यात्माची आवड आहे. मी SOTC त नोकरी करते. एका टूरचे बुकींग करण्याकरिता सौ. वनिता दीक्षित माझ्या ऑफिसमध्ये आल्या...!

वनिता बुक्सची मला ऐकून माहिती होती की, या प्रकाशनाने प्रकाशित केलेली आध्यात्मिक पुस्तके खूपच छान आहेत. म्हणून त्यांना, ''तुमचा व वनिता बुक्सचा काही संबंध आहे का?'' असे विचारताच त्यांनी, ''मीच श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके प्रकाशित करते.'' असे सांगितले. मला खूप आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी त्यांनी पूर्ण पुस्तकांचा व पोथ्यांचा सेट मला आणून दिला. मला खूप खूप आनंद झाला. अनेक दिवसांची इच्छा पूर्ण झाली.

घरातील सर्वांनी पोथ्या व पुस्तके वाचावयास सुरुवात केली. जशी जशी पोथ्यांची पारायणे होऊ लागली, घरातील वातावरण प्रसन्न व आनंदमय होऊ लागले. घरात शांती नांदू लागली. डिव्हाईन एनर्जीने घर भरुन गेले आहे, असे वाटू लागले.

जमिनी संदर्भात एक महत्त्वाचे काम खूप वर्षे रखडलेले होते, ते व्हावे म्हणून आम्ही सारखे प्रयत्न करत होतो. आठ वर्षे प्रयत्न करुनही ते काम न झाल्याने घरात अशांती होती. आम्ही सर्व अस्वस्थ होतो व प्रयत्न करून थकलो होतो.

श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तके घरात आल्यानंतर सर्व कामे वेगाने होऊ लागली. समस्या सुटल्या. आठ वर्षे रखडलेले कामही पूर्ण झाले.

पोथ्या व पुस्तके म्हणजे ईश्वराने किंवा प्रभू दत्तात्रेयांनी मानवी जीवांना दिलेले वरदानच होय, असे मला वाटते. पुस्तके वाचावयास घेतली की हातातून खाली ठेवूच नये असे वाटते. पुस्तके वाचताना तहान-भूक विसरुन जायला होते. मन एकाग्र होऊन ईश्वरीय आनंदाचा अनुभव येतो. इतकी अप्रतिम पुस्तके छापल्याबद्दल सौ. वनिताताईंना खूप धन्यवाद!

ज्यांना ज्यांना मी ही पुस्तके व पोथ्या वाचावयास सांगितल्या त्या सर्वांनाही खूप चांगले अनुभव आले. त्यांच्या जीवनातील असंख्य प्रकारचे प्रॉब्लेम दूर झाले.

एका वाक्यात सांगायचे झाल्यास-

**सदा सर्वदा उभा पाठिशी। दत्तगुरु भगवान्।।**

**कराया जगताचे । कल्याण।।**

असा अनुभव येतो.

## व्यसन सुटले

डॉ. लीना भंगाळे यांच्या घरी छाया महाडिक नांवाची एक स्त्री दररोज घरकाम करण्यासाठी येत असे. लीनाताई रोज देवाच्या पोथ्या वाचतात, सतत देवाचे करत राहतात. यामुळे तिच्या मनाला एक प्रकारचे समाधान

मिळत असे. तिला त्यांच्या विषयी खूप आदर वाटत असे. एकदा छाया महाडिक लीनाला म्हणाली,

''ताई! तुम्ही खूप देवाचे करता. तुमच्या घरातील वातावरण आनंदी आहे. मला काहीतरी मार्ग सांगा. माझा नवरा दररोज खूप दारू पितो, रात्रभर धिंगाणा घालतो. आमच्या घरात अजिबात सुख-शांती नाही. आम्हाला रात्रीची झोपही शांतपणे मिळत नाही. मला काहीतरी मार्ग सांगा!''

यावर लीना भंगाळे म्हणाली,

''तू **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचशील का? श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्यांमुळे लाखो लोक सुखी झाले आहेत. त्यातील ही पोथी छोटीशी आहे. तू श्रद्धेने वाच. तुला नक्कीच चांगला अनुभव येईल!''

यावर छाया म्हणाली,

''हो! मी जरूर वाचेन!''

दुसऱ्या दिवसापासून छाया महाडिकने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली. एक-दोन दिवसातच घरातील वातावरणात फरक जाणवू लागला. दररोज दारू पिऊन धिंगाणा घालणारा नवरा घरी आल्यावर जेवून चुपचाप झोपू लागला. एका आठवड्यात त्याची दारू सुटली. आपण दारू पित होतो याचा त्याला पश्चात्ताप झाला. त्याने छायाची क्षमा मागितली. तो व्यवस्थित काम-धंदा करू लागला. विशेष म्हणजे छायाच्या नवऱ्याने आपल्या काही मित्रांना दारू सोडण्याचा सल्ला दिला.

छाया महाडिकची एक मैत्रिण होती. या मैत्रिणीचे नाव संध्या ठाकूर. संध्याला घेऊन छाया लीनाकडे आली व तिला म्हणाली, ''ही माझी मैत्रिण संध्या ठाकूर. हिची परिस्थिती माझ्याहून भयंकर आहे. नवरा दारू पिऊन

हिला व मुलांना मारतो. काहीही काम करत नाही. हिच्याकडेच पैसे मागतो व पैसे न दिल्यास तिला मारतो.''

लीनाने संध्याला विचारले, ''**संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचशील का?''

यावर संध्या म्हणाली, ''मला वाचता येत नाही. परंतु मी माझ्या मुलाला वाचायला सांगेन. तो आठवीत शिकत आहे.''

यावर लीना म्हणाली, ''तुझा मुलगा जेव्हा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचेल तेव्हा तू ते श्रद्धेने ऐक!''

संध्या हो म्हणाली व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** घेऊन आपल्या घरी गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान करून तिने आपल्या मुलाला **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सांगितले.

पोथी वाचनाची सवय नसल्याकारणाने मुलाने अडखळत ३० ओव्यांचा एक अध्याय कसाबसा वाचला व शाळेला उशीर होत आहे असे संध्याला सांगून तो शाळेत निघून गेला.

अल्पवयीन मुलाच्याद्वारे अतिशय श्रद्धेने केलेली प्रार्थना श्रीदत्तप्रभूंपर्यंत पोहोचली. संध्या ठाकूरच्या घरातील वातावरण बदलून गेले. घरात प्रसन्नता निर्माण झाली. दुसऱ्या दिवशी मुलगा **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचा** दुसरा अध्याय वाचायला बसला. तेव्हा संध्याचा नवराही तेथे येऊन बसला. त्याने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचा** दुसरा अध्याय ऐकला. त्या दिवशी तो सर्वांशी प्रेमाने वागला. आपण खूप चुकीचे वागत होतो हे त्याने कबूल केले. आपण कालपासूनच दारू पिणे सोडून दिले असे संध्याला सांगितले. तिसऱ्या दिवशी मुलाने तिसरा अध्याय वाचला. त्या दिवशी संध्याच्या नवऱ्याने घरात ३०० रुपये आणून दिले व मरेपर्यंत दारूला स्पर्श करणार नाही अशी प्रतिज्ञा मी केली आहे असे

सांगितले. तसेच आपण दोघांनी मुलांकडे नीट लक्ष देऊन मुलांना मोठे करू असे तो संध्याला म्हणाला.

चौथ्या दिवशी त्याने स्वतः **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचायला सुरुवात केली. अशा प्रकारे संध्या ठाकूर हिच्या घरात सुख-शांती नांदू लागली.

## दिव्य अनुभव

सुजाता माळवे सॅनफ्रान्सिस्को (अमेरिका) येथे रहाते. श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या सर्व पोथ्या नित्य-नियमाने वाचते. तिने सॅनफ्रान्सिस्को येथे एक घर विकत घेतले. नवीन घरामध्ये पहिल्या दिवशी कोणीतरी सज्जन, साधू अशा व्यक्तीला भोजनाला बोलवावे अशी तिची खूप इच्छा होती. तिने ईश्वराची प्रार्थना केली.

''कोणीतरी तुझा खास भक्त माझ्या घरी पहिल्या दिवशी भोजन करेल अशी व्यवस्था कर!''

प्रार्थना केल्यानंतर अचानक तिच्या मनात विचार आला आपण मंदिरातील पुजाऱ्याला भोजनाचे आमंत्रण द्यावे. त्याप्रमाणे तिने पुजाऱ्याला तशी विनंती केली. त्यानेही आनंदाने येण्याचे कबूल केले.

गृहप्रवेशाच्या दिवशी पुजारी आला. भोजन झाल्यानंतर तो सुजाताला म्हणाला, ''प्रत्येक माणसाच्या पाठीमागे त्याच्या पूर्वजांचे आत्मे असतात व त्या आत्म्यांच्या काही अपेक्षा असतात. त्या अपेक्षा पूर्ण केल्या तर सुख-शांती मिळते. तुझ्या पाठीमागेही काही आत्मे आहेत. ते आत्मे असे म्हणत आहेत की, तू ज्या पोथ्या वाचतेस त्या पोथ्यांच्या वाचनाने त्यांना शांती प्राप्त होत आहे व त्यांची प्रगतीही होत आहे. तरी तुझे पोथ्या वाचनाचे कार्य चालू राहू दे! त्यानेच तुला सुख समृद्धी प्राप्त होईल.'' हे ऐकून सुजाताला अगदी धन्य झाल्यासारखे वाटले. आपण केलेल्या प्रार्थनेचा इतका दिव्य अनुभव

येईल अशी तिने अपेक्षाही केली नव्हती. हा अनुभव डिसेंबर २०१३ मध्ये आला.

## माशाचा काटा

दीपा आंबेरकर हिने आपली बहीण मंगल कारेकर हिला **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** दिली होती व रोज एक-दोन अध्याय तरी वाच असे सांगितले होते. परंतु एक-दोन वर्षे गेली तरी पोथी वाचण्याचा योग आला नाही.

ऑक्टोबर २०१३ मध्ये एकदा तिचा मुलगा जेवत असताना माशाचा काटा मुलाच्या घशामध्ये अडकला व मुलगा वेदनेने रडू लागला. मुलाला डॉक्टरकडे नेले. त्याने स्कोपी केली व ऑपरेशन करावे लागेल चार दिवसांनी या असे सांगितले.

मुलगा दिवस रात्र रडत होता. मंगल कारेकरला काय करावे हे सुचत नव्हते. आर्थिक परिस्थिती ठीक नव्हती. मुलाच्या घशात काटा अडकून चोवीस तास उलटून गेले तरीही मुलगा सारखा रडतच होता. त्याला एक क्षणभरही झोप येत नव्हती. आर्थिक परिस्थिती ठीक नसल्याने ऑपरेशन कसे करावे हा प्रश्न मंगलला पडला होता. मंगल अशा व्याकुळ अवस्थेत असताना अचानक दीपाचा फोन आला.

मंगलने आपल्यावर आलेल्या बिकट प्रसंगाची कल्पना दीपाला दिली.

दीपाने विचारले, ''तुला **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** देऊन दोन-अडीच वर्षे झाली. तू वाचलीस का?''

''नाही गं! वाचायला वेळच मिळाला नाही. तू माझ्यासाठी प्रार्थना कर!'' मंगलने उत्तर दिले.

यावर दीपा म्हणाली, ''काळजी करू नकोस. तुझ्या मुलाला नक्की बरे वाटेल.''

दीपा बरोबर असे बोलणे झाल्यानंतर मंगल व तिचा नवरा मुलाला घेऊन डॉक्टरकडे गेली, तेव्हा डॉक्टरने मुलगा ठणठणीत बरा असल्याचे सांगितले.

अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थ, प्रभू दत्तात्रेय यांच्या कृपेने मंगलचा मुलगा पूर्ण बरा झाला. देव हाकेच्या अंतरावर असतो हेच खरे!

## मृतात्म्याने केले मार्गदर्शन

प्राची पाटील या मुलीने आम्हाला पुढील प्रमाणे तिचा अनुभव कळविला आहे.

प्राचीच्या घरामध्ये पिशाच्च शक्तीचे अस्तित्व होते. त्यामुळे घरात सतत भांडणे होत असत. कष्ट व मेहनत करून कितीही कमविले तरी पुरे पडत नसे, घरात अशांती होती, घरातील सर्वांची मने दिवस-रात्र चिंता, काळजी व भीती यांनी व्यापलेली असायची. यावर कहर म्हणजे घरामध्ये अदृश्य सृष्टीतील आवाज ऐकू यायचे. हे आवाज दिवसा व रात्री झोपल्यावर सतत ऐकू यायचे. यामुळे झोपही पुरेशी मिळत नसे. प्राचीच्या घरातील सर्वजण हैराण झाले होते.

प्राचीचे एक हॉटेल होते. या हॉटेलमध्ये घरातील सगळे खूप मेहनत करायचे. या हॉटेलला पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. अशा सर्व प्रकारांनी प्राचीचे कुटुंब गांजलेले होते. एकदा त्यांच्या हॉटेलमध्ये सावंत नांवाचे एक सज्जन सद्भक्त आले. त्यांनी प्राचीच्या आईला श्री स्वामी दत्तावधूत यांच्या पोथ्या व पुस्तकांविषयी माहिती दिली व म्हणाले, 'ही पुस्तके व पोथ्या

वाचल्याने लाखो लोकांचे कल्याण झालेले आहे. तुम्ही संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दररोज घरात वाचा व काय अनुभव येतो तो पहा!' असे म्हणून संक्षिप्त श्रीगुरुचरित्र प्राचीच्या आईला दिले. संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचायला सुरुवात केल्यानंतर प्राची व प्राचीच्या घरातील लोकांना असा अनुभव आला की, पूर्वी जे आवाज अस्पष्टपणे ऐकू येत असत तेच आवाज अदृश्य सृष्टीतून स्पष्टपणे ऐकू येऊ लागले. यातील काही आवाज म्हणू लागले की आम्ही पिशाच्च आहोत, गेली सोळा वर्षे आम्ही तुमच्या घरात अशांती निर्माण करीत आहोत, भांडणे लावून देत आहोत, तुम्हाला सर्व प्रकारचे त्रास देत आहोत, धंदा-उद्योगात तुम्हाला जे नुकसान होत आहे ते आम्हीच करीत आहोत. पण तुम्ही आता जे वाचन सुरू केले आहे या वाचनामुळे आम्हाला तुमचे घर सोडून जावे लागणार असे वाटते.

पिशाच्चांबरोबर असे संवाद होऊ लागले. एक दिवस एक वेगळाच आत्मा प्राची समोर साकार झाला. त्याने सांगितले, 'मी तुझा काका. माझे नाव आनंद गंगाधर पाटील.' कंपनीत काम करताना स्फोट झाल्याने प्राचीच्या काकांचा मृत्यू झाला होता. त्याची आठवणही त्या आत्म्याने करून दिली.

प्राचीच्या काकांचा आत्मा प्राचीला म्हणाला, ''तू जे संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे वाचन करत आहेस त्याने तुझ्या घरातील पिशाच्च शक्ती घर सोडून जात आहेत. हे वाचन कधीही थांबवू नका. श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या सर्व पोथ्यांचे वाचन घरात चालू ठेवा. याने घरात सुख-शांती नांदेल.''

''तुझ्या घरामध्ये जी अशांती आहे ती पिशाच्च शक्तींमुळे आहे. तुझी आत्या तुमच्यावर करण्या करत आहे व त्यामुळे तुमच्या घरात पिशाच्च शक्ती घुसत आहेत. तू तुझ्या आत्याच्या घरी जा. तिला सांग... आमच्यावर करण्या करणे बंद कर. नाही तर दत्त महाराज तुला भयंकर शिक्षा करतील.''

प्राचीने विचार केला, कोणाच्याही घरी जाऊन अशा प्रकारे आरोप करणे चांगले नाही. शिवाय आत्या म्हणेल मी तुमच्यावर करण्या करत नाही. अशा परिस्थितीत काय करावे हे प्राचीला व तिच्या घरातील लोकांना सुचत नव्हते. शेवटी प्राचीने धाडस करून आत्याच्या घरी जाऊन सांगितले, की 'आमच्यावर करण्या करणे बंद करा नाहीतर भगवान् दत्तात्रेय तुम्हाला शिक्षा करतील.'

प्राचीने असे सांगितल्यानंतर आत्या काहीच बोलली नाही. फक्त 'सॉरी' म्हणाली. दुसऱ्या दिवसापासून प्राचीच्या घरात सुख-शांती नांदू लागली. हॉटेल चांगले चालू लागले. घरात प्रेमाचे वातावरण निर्माण झाले.

## जीव वाचविला

मालाड, मुंबई येथील एका जनरल स्टोअर्सच्या मालकीचा कॉईन बॉक्स दुकानाच्या बाहेर ठेवलेला असतो. अधूनमधून कोणीतरी येत असते व कॉईन बॉक्समध्ये नाणे टाकून लोकल फोन करत असते. त्या दिवशी असाच एक मनुष्य आला. कॉईन बॉक्समध्ये त्याने नाणे टाकले व तो बोलू लागला..,

'मला आता जीव देण्याशिवाय गत्यंतर नाही ! मी आत्महत्या करणार! एवढे पैसे मी आणू कोठून. नाही! नाही! मी आत्महत्या करणार; याशिवाय माझ्याकडे दुसरा मार्ग नाही!' असे म्हणून त्या व्यक्तीने फोन ठेवला.

जनरल स्टोअर्समध्ये बसलेली मुलगी हा सर्व संवाद ऐकत होती. त्या माणसाने फोन ठेवताच तिने त्या माणसाला दुकानात बोलाविले व म्हणाली, 'तुम्ही कुठल्यातरी संकटात आहात पण मी तुम्हाला विनंती करते, की जीवाचे काहीतरी बरे वाईट करण्यापूर्वी तुम्ही पुन्हा पुन्हा विचार करा !

हे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** घ्या ! संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या वाचनाने लाखो लोकांच्या संकटांचे निवारण झाले आहे. तुम्हाला काहीतरी नक्कीच मार्ग मिळेल.' त्या गृहस्थाने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** घेतले व तो निघून गेला. पाचव्या दिवशी तो परत आला व म्हणाला, 'तुमच्या संक्षिप्त श्रीगुरुचरित्राने खूप मोठा चमत्कार घडविला. पहिली गोष्ट म्हणजे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचल्यानंतर माझ्या मनाला इतकी काही शांती मिळाली, की त्याचे वर्णन शब्दात करता येणार नाही. जीवनात आनंद निर्माण झाला व सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या कर्जाचेही निवारण झाले. ते लोक पूर्वी मला ५ लाख रुपये भरा म्हणत होते. त्यांच्या हिशेबातील चूक त्यांच्या लक्षात आली. त्यांनी स्वत: फोन करून आपली चूक कबूल केली. आता मी फक्त २ लाख रुपये भरायचे आहेत व ते भरण्यास मी केव्हाही तयार आहे.' अशा प्रकारे संक्षिप्त श्रीगुरुचरित्राने एका माणसाचा जीव वाचविला.

## निद्रानाशातून मुक्ती

पेण येथील विलास चिटणवीस यांना सुमारे १४ वर्षे निद्रानाशाचा रोग होता. रात्री ते जेव्हा झोपण्यासाठी अंथरुणावर पडत, तेव्हा त्यांच्या कानाशी कुठलीतरी शक्ती जोरजोरात टाळ्या वाजवीत असे. या टाळ्यांच्या आवाजाने त्यांची झोप उडत असे व रात्रभर जागे रहावे लागत असे. त्यांच्या बायकोची बहीण पार्ल्याला रहात असे. त्यांच्या शेजारी मुकुंद कुलकर्णी व वेदवती कुलकर्णी रहात असत. आपल्या मेहुणीच्या घरी अधून-मधून गेल्याने श्री. मुकुंद कुलकर्णी बरोबर त्यांचा परिचय झाला होता. निद्रानाशाचा प्रकार जेव्हा वेदवती कुलकर्णी यांना कळला, तेव्हा त्यांनी विलास चिटणवीसांना सांगितले की, 'श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या वाचल्याने अशा अडचणीतून मार्ग सापडतो.' असे म्हणून त्यांनी विलास चिटणवीसांना संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दिले.

विलास चिटणवीसांनी संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचण्यास सुरुवात करताच त्यांना एक स्वप्न पडले. स्वप्नामध्ये त्यांना भगवान् श्रीदत्तात्रेय दिसले. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी त्यांना उजवा हात वर करून आशीर्वाद दिला व 'ॐ द्राम् दत्तगुरु' या मंत्राचा सतत जप करत राहा असे सांगितले. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी डाव्या हाताने त्या दुष्ट शक्तीला पकडले होते, जी गेली १४ वर्षे चिटणवीसांना सतावत होती.

भगवान् श्री दत्तात्रेयांनी त्या दुष्टशक्तीचे अक्षरश: मुटकुळे बांधले व भूगर्भातील खाचेमध्ये त्या शक्तीला टाकून दिले. भूगर्भातून ती कधीही परत वर येणार नाही, अशी व्यवस्था केली. त्या दिवसापासून चिटणवीसांना एकदम शांत झोप लागू लागली.

सप्टेंबर २००९ मध्ये अचानक चिटणवीसांचे बोलणे असंबद्ध होऊ लागले. बोलतांना जीभ का अडखळते आहे, म्हणून डॉक्टरांना दाखविले. डॉक्टरने एम. आर. आय. काढायला सांगितले. त्यावरून असे निदान केले, की गेली ८-१० दिवस मेंदूमध्ये रक्तस्त्राव होत असून, मेंदूचे ऑपरेशन करणे अतिशय आवश्यक आहे. ऑपरेशनमध्ये प्राण जाण्याची किंवा एखादा अवयव निकामी होण्याची शक्यता डॉक्टरांनी बोलून दाखविली. परंतु श्रीदत्त उपासनेमुळे चिटणवीसांना खूपच मनोबल प्राप्त झालेले होते.

ऑपरेशन शंभर टक्के यशस्वी झाले. बेशुद्धी उतरल्यानंतर जेव्हा त्यांनी डोळे उघडले तेव्हा त्यांना हॉस्पिटलच्या भिंती अष्टगंधाच्या रंगाने रंगवलेल्या व प्रकाशमान दिसल्या व त्यामध्ये त्यांना अष्टविनायक व इतर अनेक देव-देवतांची दर्शने झाली. अशा प्रकारे संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या वाचनाने तसेच श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या इतर पोथ्यांच्या व पुस्तकांच्या वाचनाने लाखो लोकांना अनुभव येत आहेत.

## विलक्षण अनुभव

महाराष्ट्रातील असंख्य घरांमध्ये श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या म्हणजे श्री स्वामी समर्थ सप्तशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री दुर्गा सप्तशती, श्री दुर्गा त्रिशती, श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत वाचल्या जात आहेत. याशिवाय कॅनडा, अमेरिका, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, कटार, सौदी अरेबिया या देशातील अनेक भाविक वरील पोथ्या अतिशय श्रद्धेने वाचत आहेत. लाखो लोकांना अतिशय दिव्य अनुभव येत आहेत. हे अनुभव प्रकाशित करण्याचे ठरविल्यास सुमारे हजार पानांहून अधिक पानांचा एक ग्रंथ तयार होईल, इतके अनुभव लोकांनी आम्हाला कळविले आहेत. प्रत्येक अनुभव अतिशय विलक्षण असतो. तो ऐकल्यावर मनाला अतिशय आनंद होतो, परंतु आम्हाला पृष्ठांचे भान ठेवून लेखन करावे लागते.

श्री स्वामी दत्तावधूतांसारखे सत्पुरुष समाजाच्या कल्याणासाठी तळमळीने जरी प्रयत्न करीत असले तरी स्वार्थाला परमेश्वराच्या दरबारात महापाप मानले जाते. स्वार्थी माणसे जीवन जगतांना अतिशय अस्वस्थ व अशांत असतात. त्यांच्या कुटुंबात आनंद नसतोच. परंतु मृत्यूनंतरही अशा लोकांचे आत्मे अनेक वर्षे यातना भोगत राहतात. स्वार्थ जेव्हा पराकोटीला पोहोचतो तेव्हा पवित्र ग्रंथाची पाने कोरी दिसू लागतात. वर्षाला काही कोटी कमावणाऱ्या एका गृहस्थाची पत्नी नेहमी आजारी असायची. तिची सारखी ऑपरेशन्स करावी लागायची. प्रत्येक ऑपरेशनला लाखो रुपये खर्च यायचा. अशा प्रकारे कोट्यावधी रुपये औषधोपचारावर खर्च होत असत.

सुमती नावाची एक स्त्री श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके व पोथ्या वाचायची. या ईश्वरभक्तीचे तिला खूप चांगले अनुभव आलेले होते. तिच्या घरातील आजारपणे दूर पळाली होती. सर्व समस्यांचे निवारण झाले होते. आनंद व शांती यांचा लाभ झाला होता. सुमती त्या कोट्याधीशाच्या पत्नीची

मैत्रीण होती. सुमतीला सारखे वाटायचे आपली मैत्रीण कोट्यावधी रुपये औषधांवर खर्च करत आहे. त्या ऐवजी तिने थोडाफार दान-धर्म करावा व पोथ्या वाचाव्या. पोथ्या वाचल्याने औषधोपचाराला गुण येईल व आपली मैत्रीण बरी होईल.

एक दिवस सुमती या कोट्याधीशाच्या पत्नीकडे गेली व तिने पोथ्यांचा महिमा सांगितला. यावर कोट्याधीशाची पत्नी म्हणाली, 'असल्या पोथ्या वगैरे वाचण्यावर माझा काही विश्वास नाही.' कोट्याधीशाच्या पत्नीचे हे उत्तर ऐकूनही सुमती म्हणाली, 'मी तुला पोथ्या आणून देते. तू वाचून तरी बघ!'

दुसऱ्या दिवशी सुमती **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री स्वामी समर्थ सप्तशती, श्रीदत्तलीलामृत-श्रीसिद्धलीलामृत** या पोथ्या घेऊन तिच्या मैत्रिणीकडे गेली व मैत्रिणीच्या हातात तिनही पोथ्या ठेवल्या. त्या पोथ्या पाहून कोट्याधीशाची पत्नी म्हणाली, 'तू काय माझी चेष्टा करतेस की काय? या पोथ्या नसून कोरी पाने आहेत!'

सुमतीला हे ऐकून आश्चर्य वाटले. परंतु तिच्या मनात, 'कदाचित प्रिंटिंगमध्ये चूक झाली असेल', असा विचार आला. तिने तिनही पोथ्या स्वत:च्या हातात घेतल्या व प्रत्येक पान तपासून पाहिले. सर्व पोथ्या व्यवस्थित होत्या. पोथ्यांची छपाई अप्रतिम होती. एकही पान कोरे नव्हते. असे असताना कोट्याधीशाच्या पत्नीला मात्र तिनही पोथ्यांची पाने कोरी करकरीत दिसत होती. सुमती काय समजायचे ते समजली व पोथ्या घेऊन घरी परत आली. आध्यात्मावर श्री स्वामी दत्तावधूतांनी अगम्यवाणी, अमरत्वाकडे वाटचाल, जीवनमुक्तीचा मार्ग, भारतीय गूढ विद्या, मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग १ ते ७, विहंगम मार्ग, दत्त-दुर्गा संवाद, ईश्वर भक्तीचे अनुभव व श्रीस्वामी दत्तावधूत या सिद्ध योग्याच्या सहवासात भाग १ व २, ही पुस्तके लिहिलेली

आहेत. या सर्व पुस्तकांचे थोडक्यात सार सांगण्याचे ठरविल्यास ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

''आपण सर्व आत्मे आहोत. आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी ईश्वर आपल्याला मनुष्य जन्म देतो. प्रत्येक माणसाच्या पूर्वजन्मातील कर्माप्रमाणे प्रत्येक माणसाचा स्वभाव वेगळा असतो. त्याचप्रमाणे अर्थार्जन करण्याचे त्याचे मार्गही भिन्न असतात. हे सर्व काही खरे असले तरी आध्यात्मिक प्रगती करणे किंवा ईश्वराच्या जवळ जाणे हेच प्रत्येक आत्म्याचे मनुष्यरूपाने जन्माला येण्यामागचे ध्येय असते. जन्माला आल्यानंतर दुर्दैवाने मनुष्य आपले ध्येय विसरतो व सत्ता, संपत्ती, सामर्थ्य व प्रसिद्धी यांच्या मागे लागतो. मूळ ध्येय विसरल्या कारणाने शांती व आध्यात्मिक प्रगती श्रीमंताला तसेच गरिबालाही प्राप्त होत नाही. पृथ्वीतलावरची ७०-८० वर्षे कशीबशी पार पडतात. परंतु त्यानंतर खऱ्या अर्थाने यातना व त्रासाची सुरुवात होते. मानव जन्माचा दुरुपयोग केल्याच्या भयंकर शिक्षा राजा महाराजांपासून गोरगरिबांपर्यंत सर्वांनाच भोगाव्या लागतात. त्या किती भयंकर असतात, ते फक्त योग्यांनाच कळू शकते. अन्य कोणालाही कळत नाही. अशा प्रकारे जीवन ही एक गूढ गोष्ट असून, नि:स्वार्थपणे, परोपकारीवृत्तीने जीवन जगणारे तरुन जातात. परंतु स्वार्थाने जीवन जगणारे हजारो वर्षे यातना भोगत राहतात.''

श्रीस्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्यांमध्ये ईश्वराने अद्‌भुत शक्ती सामर्थ्य ठेवलेले आहे. त्यामुळे लाखो लोकांचे कल्याण होत आहे. लोकांचे अनुभव ऐकून आम्हाला आश्चर्याचे धक्के सतत बसत असतात. असाच एक मोठा धक्का आम्हाला त्यावेळी बसला जेव्हा आम्हाला कळले की या पोथ्या वाचल्याने अदृश्यसृष्टीमध्ये अडकलेल्या व यातना भोगणाऱ्या पूर्वजांचाही उद्धार होतो.

सॅनफ्रान्सिस्को (अमेरिका) येथून सुजाता प्रवीण माळवे कळवितात... अमेरिकेत त्यांची सबवेची दुकाने आहेत. त्यांना घर व दुकानांमध्ये अनेक प्रकारचे प्रॉब्लेम्स होते. ती स्वत: भक्तिमान असल्याने नेहमी देवाच्या पोथ्या वाचत होती. परंतु तिला काही अनुभव येत नव्हते. डोळे मिटल्यावर बरेचदा तिला मराठी पुस्तकांची प्रिन्टेड पाने दिसत. विविध प्रकारचे ग्रंथ वाचूनही समस्यांवर मार्ग सापडत नव्हता. डोळ्यासमोर पुस्तकांची प्रिन्टेड पाने दिसण्यापलीकडे तिला कुठलाच अनुभव येत नव्हता. परंतु या अनुभवामुळे तिच्या मनाला सारखे वाटत होते आपण काहीतरी वेगळे वाचावे. परंतु काय वाचावे हे तिला कळत नव्हते. तिचा नवरा प्रवीण माळवे भारतात आलेला असतांना एका ज्योतिषाला भेटला व आपल्या सर्व समस्या त्याला सांगितल्या. तेव्हा त्या ज्योतिषाने प्रवीण माळवेला सांगितले, श्री स्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचल्याने पूर्वजांचा उद्धार होतो व आपल्या घरात शांती नांदते. तेव्हा तू श्री स्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तके वाचत जा.

ज्योतिषाच्या सांगण्याप्रमाणे प्रवीण माळवे याने सर्व पोथ्या व पुस्तके विकत घेतली व अमेरिकेला गेला. सुजाता माळवेने पुस्तके वाचायला सुरुवात केल्यानंतर तिला अनेक दिव्य अनुभव आले. पहिल्याच दिवशी तिला डोळ्यासमोर दिसणारी पुस्तकांची प्रिन्टेड पाने दिसणे बंद झाले. त्या ऐवजी तिला दिव्य प्रकाश दिसू लागला.

पोथ्यांचे काही दिवस वाचन केल्यानंतर घरातील व दुकानातील सर्व प्रॉब्लेम्स दूर झाले. या अनुभवाव्यतिरिक्त तिच्या ३० वर्षांपूर्वी मृत झालेल्या आईने व ९ वर्षांपूर्वी मृत झालेल्या आजीने स्वप्नात येऊन विविध मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा थोडक्यात सारांश पुढील प्रमाणे...

''या पोथ्यांचे नित्यनियमित वाचन चालू ठेव. या वाचनाने अदृश्य

सृष्टीतील तुझ्या सर्व पूर्वजांचा उद्धार होत आहे, त्यांना सद्गती प्राप्त होत आहे, शांती प्राप्त होत आहे व या सर्व आत्म्यांना शांती प्राप्त झाल्याने तुम्हाला सुख शांती व समृद्धी प्राप्त होत आहे.''

पृथ्वीतलावर राहणाऱ्या माणसांचे पूर्वज अदृश्य सृष्टीत असतात व अदृश्य सृष्टीमध्ये ते जर यातना भोगत असतील व अतृप्त असतील किंवा अशांत असतील तर पृथ्वीतलावरील त्यांच्या घराण्यांमध्ये अशांती व समस्या असतात. एकंदरीत पृथ्वीतलावरील माणसांच्या समस्यांचे मूळ हे अदृश्य सृष्टीत असते. सुजाता माळवेला अशा प्रकारचे असंख्य अनुभव आले.

## दत्तप्रभूंची अलौकिक कृपा

अर्चना (आळंदी-पुणे) हिने पुण्यातीलच रॉय नांवाच्या हिंदी भाषिक प्रोफेसर बरोबर लग्न केले. ही गोष्ट अर्चनाच्या सासूला अजिबात आवडली नाही. तिने अर्चनावर भयंकर अघोरी असा मारण प्रयोग केला. अर्चनाला अमावस्येच्या अगोदर ५-६ दिवस व अमावस्येच्या नंतर ५-६ दिवस, पौर्णिमेच्या अगोदर ५-६ दिवस व पौर्णिमेच्या नंतर ५-६ दिवस अशा प्रकारे महिन्यातील सुमारे १८-२० दिवस फिट्स येऊ लागल्या. या फिट्समुळे तिला घरातील कुठलेही काम करता येत नसे. तसेच घराच्या बाहेरही जाता येत नसे. एकदा एका स्त्रीने तिला संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे तिने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली व तिच्या नवऱ्याने श्रीदत्त उपासना करण्यास सुरुवात केली. या उपासनेने तिला फिट्स येणे बंद झाले. परंतु फक्त अमावस्येच्या दिवशी फिट्स येत असत. म्हणजे महिन्यातून फक्त एकच दिवस फिट्स येऊ लागल्या.

अर्चना व तिचा नवरा फ्लॅटमध्ये रहात होते. त्या फ्लॅटमध्ये बाथरूमवर एक माळा होता. रॉयच्या आईचा लग्नाला विरोध होता म्हणून त्याने लग्नाच्या आधी हा फ्लॅट घेतला होता व अर्चना व रॉय दोघेही तेथे रहात होते. रॉयला मराठी येत नसल्या कारणाने तो 'श्रीदत्त जय दत्त' असा अखंड जप करीत असे व श्रीदत्तात्रेय स्तोत्राचे दररोज २१ पाठ करत असे (ॐ जटाधारं पांडुरंगम् या श्रीदत्तात्रेय स्तोत्राचे). महिन्यातून अठरा-वीस दिवस येणाऱ्या फिट्स बंद झाल्या. परंतु अमावस्येच्या दिवशी दिवस रात्र फिट्स येत असत.

यातून मार्ग मिळावा म्हणून अर्चनाने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दोन वेळा वाचण्यास सुरुवात केली व रॉयने श्रीदत्तस्तोत्राचे ३६ पाठ करण्यास सुरुवात केली.

नवीन फ्लॅटमध्ये राहण्यास येऊन जेमतेम चार महिने झाले होते. एक दिवस रॉय काहीतरी शोधण्यासाठी माळ्यावर चढला. तेथे त्याला काळ्या कापडाची एक बाहुली व टाचण्या टोचलेले एक लिंबू या वस्तू आढळल्या. त्या वस्तू घेऊन तो खाली आला व त्याने अर्चनाला विचारले, ''या वस्तू माळ्यावर कोणी ठेवल्या?'' यावर अर्चनाने उत्तर दिले, ''आपण येथे रहायला आल्यानंतर १५-२० दिवसांनी सासूबाई आल्या होत्या व त्या माळ्यावर चढल्या होत्या.''

अर्चनाला फिट्स का येतात याचे उत्तर अर्चना व रॉय दोघांनाही मिळाले होते. रॉयने ती बाहुली व लिंबू इंद्रायणी नदीत सोडून दिले. तेव्हापासून अमावस्येच्या दिवशी येणाऱ्या फिट्सही बंद झाल्या.

## कर्ज फिटले

सांगलीमध्ये एक सज्जन गृहस्थ होते. त्यांच्या डोक्यावर खूप कर्ज होते. अक्षरश: लोकांची तोंडे चुकवून ते दिवस काढीत होते. लोकांकडून घेतलेले पैसे परत करण्याची त्यांची खूप इच्छा होती, परंतु मार्ग मिळत नव्हता. एक दिवस त्यांच्या एका मित्राने त्यांना सांगितले, **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचल्याने अडचणी दूर होतात, मार्ग मिळतो, असा हजारो लोकांचा अनुभव आहे. या **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राच्या** वाचनाने अनेकांचे कल्याण झाले आहे, माझेही झाले आहे, तू **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाच! म्हणजे तुझेही चांगले होईल! तुलाही मार्ग मिळेल. सहा-सात दिवस **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचल्यावर या सज्जनांना एक विलक्षण अनुभव आला. त्यांचे एक नातेवाईक त्यांच्या घरी आले व त्यांना म्हणाले, ''तू कोणा कोणाचे किती पैसे देणे आहेस ! त्या सर्वांचे पैसे मी देऊन टाकतो व तू तुझ्या सवडीप्रमाणे हळूहळू पैसे मला परत कर!'' गुरु दत्तात्रेयांची ही अद्‌भुत कृपा पाहून या सज्जनाच्या डोळ्यात अश्रू आले. अशा प्रकारे या सज्जनाचे संपूर्ण कर्ज श्रीदत्तकृपेने फिटले. दोन वर्षांपूर्वी आमचा एक प्रतिनिधी नरसोबावाडीला गेला असतांना या सद्‌गृहस्थांची भेट झाली व त्यांनी ही हकिकत आम्हाला सांगितली.

## न्यूझीलंड

न्यूझीलंडला कोठारे नावाचे एक गृहस्थ होते. ते अनेक अडचणींना तोंड देत होते. ते मुंबईत आले असताना त्यांना कोणीतरी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे न्यूझीलंडला गेल्यानंतर त्यांनी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली. त्यांच्या सर्व अडचणी दूर झाल्या. तद्‌नंतर पुनश्च मुंबईला येऊन त्यांनी आम्हाला संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे अनेक अनुभव सांगितले.

## व्याधीमुक्तता

मुंबईतील सौ. मिस्त्री यांचा मुलगा अनेक वर्षे आजारी होता. अनेक औषधोपचार करूनही त्याला बरे वाटत नव्हते. त्याच्या आईला कोणीतरी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे सौ. मिस्त्री यांनी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केली. तिसऱ्याच दिवशी स्वप्नात श्री दत्तमहाराज आले व म्हणाले, ''तुझ्या मुलाला बरे वाटेल! काळजी करू नकोस!''

दुसऱ्या दिवशी ती आपल्या मुलाला पाहण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेली तेव्हा मुलगा म्हणाला, ''अनेक वर्षांनंतर आज मला खूपच बरे वाटत आहे.'' आठ-दहा दिवसांत मुलगा ठणठणीत बरा झाला व हॉस्पिटलने त्याला डिस्‌चार्ज दिला.

## एका पोलिसाचा अनुभव

या पोलिसाचे नाव पवार. सुमारे १८ वर्षे याला पिशाच्च बाधेचा त्रास होता. एक पिशाच्च याच्या कानामध्ये चोवीस तास काहीतरी बोलत असे. त्याला सुखाने झोपू देत नसे. पिशाच्च जेव्हा त्याच्या अंगात येऊन त्याच्याशी बोलत असे तेव्हा त्याचे हात, पाय, तोंड वाकडे होत असत व बघणाऱ्याला भयानक दृश्य दिसत असे. १८ वर्षे या त्रासाने पवार हैराण झालेला होता. ही बाधा जाण्यासाठी त्याने अनेक उपाय केले. अखेरीस एक दिवस त्याच्या जीवनात तो भाग्याचा क्षण आला. एक दिवस श्री स्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेले भारतीय गूढविद्या हे पुस्तक त्याच्या वाचनात आले व वातावरणातील चांगल्या वाईट शक्तींचे ज्ञान त्याला मिळाले. म्हणून त्याने श्री स्वामी दत्तावधूतांची जी पुस्तके मिळाली, ती वाचून काढली व एक दिवस श्री स्वामी दत्तावधूतांची माहिती मिळविण्यासाठी तो वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये आला. वनिता बुक्सचा सेवक प्रकाश याला त्याने आपली सर्व हकिकत सांगितली. प्रकाश म्हणाला, श्री स्वामी दत्तावधूतांसंबंधी

मला काही सांगता यायचे नाही, कारण ते नेहमी एकांतवासात राहतात. मीच अद्याप त्यांना पाहिलेले नाही. परंतु त्यांनी काही पोथ्या लिहिल्या आहेत. या पोथ्यांच्या वाचनाने लोकांच्या समस्या सुटतात, असे म्हणून प्रकाशने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** पवारच्या समोर ठेवले. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राकडे** दृष्टी जाताच पवारच्या अंगात पिशाच्चाचा संचार झाला. त्याचे अंग वाकडे तिकडे झाले. ते पिशाच्च पवारला सांगू लागले, ''या पोथीला हात लावू नकोस, ही खूप दिव्य पोथी आहे, माझे अंग भाजले जात आहे, तू ताबडतोब येथून निघ, नाही तर तुला मारून टाकीन!'' अंगातून पिशाच्च निघून गेल्यानंतर पवारने सर्व हकिकत प्रकाशला सांगितली. यावर प्रकाश म्हणाला, ''मग, तर तुम्ही हे संक्षिप्त श्रीगुरुचरित्र घ्याच! जळून जाऊ दे त्या पिशाच्च शक्तीला!''

पवारने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** घेतले व घरी गेला. आठ-दहा दिवसांनी पवार परत आला व प्रकाशला म्हणाला, ''खरंच! **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** एक दिव्य ग्रंथ आहे. बाधा जाण्यासाठी मी अनेक साधू संतांकडे गेलो, अनेक उपाय केले, परंतु माझी बाधा काही गेली नाही. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचनास सुरुवात केल्यानंतर मला एक स्वप्न पडले- स्वप्नामध्ये हिरव्यागार मैदानात मी उभा आहे. जवळच एक तुडुंब पाण्याने भरलेली विहीर दिसली. विहीरीचे पाणी स्फटिकासारखे स्वच्छ होते. अचानक तेथे एक सत्पुरुष प्रकट झाले. ते साक्षात् दत्तमहाराज होते. ते मला म्हणाले, ''विहीरीतून आंघोळ करून ये! मी तुला एक मंत्र देतो. त्या मंत्राच्या जपाने तू सुखी होशील!'' मी विहीरीतून आंघोळ करून आलो. त्यांनी मला 'श्रीदत्त जय दत्त' मंत्र दिला व म्हणाले, ''या मंत्राचा जप सतत करीत राहा. तुझे सर्व कष्ट दूर होतील.'' इतक्यात एक काळी भयंकर आकृती तेथे आली व श्री दत्तमहाराजांना म्हणाली, ''दिसेल त्या व्यक्तीचा तुम्ही उद्धार करता, भेटेल त्या व्यक्तीला मंत्र देता, तुम्ही असे करत राहिलात तर आम्ही काय करायचे?'' यावर श्री

दत्तमहाराज म्हणाले, ''तुझे काम तू कर, माझे काम मी करतो!'' माझे स्वप्न संपले. दुसऱ्या दिवसापासून मी 'श्रीदत्त जय दत्त' असा जप अखंड करण्यास सुरुवात केली. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्राचे** वाचन व जप यांनी माझी बाधा पूर्णपणे निघून गेली व मी आता पूर्णपणे सुखी आहे.

## माहात्म्य नृसिंहवाडीचे

सांगली येथील नाना मुरलीधर झांबेड यांना बरीच वर्षे वाईट शक्ती त्रास देत होत्या. कोणीतरी त्यांना बेळगाव येथील एका पीराची माहिती दिली. त्यामुळे ते बेळगावला पीराकडे गेले. त्या पीराने त्यांना दत्तभक्ती करण्यास सांगितले. पीराच्या आदेशाप्रमाणे नाना दत्तभक्ती करू लागले. दत्ताला १०८ प्रदक्षिणा घालू लागले व दत्त मंत्राचा २० लाख जप केला.

एक दिवस श्री स्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेली पुस्तके त्यांना वाचण्यास मिळाली. नानांनी सर्व पुस्तके वाचून काढली व त्यांनी आपल्या जीवनामध्ये काही बदल केले. 'श्रीदत्त जय दत्त' असा जप व दानधर्म करण्यास सुरुवात केली. **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** दररोज जमेल तितके वेळा वाचण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे उपासना सुरू केल्यानंतर त्यांना नरसोबावाडीला जाण्याची प्रेरणा मिळाली. नाना अधून-मधून नरसोबावाडीला जाऊ लागले. प्रदक्षिणा घालू लागले व तेथे बसून **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचू लागले. या उपासनेने त्यांचे सर्व कष्ट दूर झाले. नरसोबावाडीच्या अकराव्या वारीच्या वेळी एका तेज:पुंज साधूचे दर्शन नानांना झाले. त्यांना काहीतरी पैसे द्यावेत म्हणून नानांनी खिशात हात घातला. तोपर्यंत ते तेज:पुंज साधू अदृश्य झाले. त्याच दिवशी त्यांना बेळगावच्या पीराचा निरोप मिळाला म्हणून ते बेळगावला गेले. तेथील पीराने त्यांना सांगितले, ''गुरु दत्तात्रेयांचे दर्शन तुला झालेले आहे. तू जी उपासना करतोस तीच उपासना चालू ठेव. म्हणजे **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचन, पुस्तकांची सेवा, दान-धर्म व जप या गोष्टी चालू

ठेव,'' असे सांगितले. ही सर्व हकिकत नाना झांबेड यांनी पत्राने आम्हाला कळविली. हे पत्र आम्हाला ५ ऑगस्ट २००५ रोजी मिळाले. असंख्य भक्तांचे असंख्य अनुभव आम्हाला नित्य ऐकण्यास मिळत आहेत. आम्हाला मार्गदर्शन करा अशी पत्रेही येत आहेत. त्या सर्वांना आमचे एकच सांगणे आहे. ''दत्तभक्ती करा, दान करा व श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचा! या पेक्षा आम्ही जास्त काय सांगणार!''

## वकिली सल्ला

श्री. प्रभाकर मुळे यांनी **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री स्वामी समर्थ सप्तशती, श्री दुर्गा सप्तशती** इत्यादी, श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या सद्ग्रंथांचा समाजात प्रसार केला. त्यांनी ज्यांना ज्यांना ग्रंथ वाचण्यास सांगितले, त्या सर्वांनाही चांगले अनुभव आले. एकदा त्यांच्याकडे एक पति-पत्नी वकिली सल्ला घेण्यासाठी आले. ''सून बरोबर वागत नाही, भांडणे करते व न सांगता माहेरी निघून जाते.'' अशी त्यांची तक्रार होती. मुलाला घटस्फोट मिळवून द्यावा अशी विनंती सासऱ्याने श्री. प्रभाकर मुळे यांना केली. त्यासाठी आवश्यक तो खर्च करण्यास ते तयार होते.

श्री. प्रभाकर मुळे यांनी त्यांची समजूत घातली व **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** हा ग्रंथ त्यांना वाचण्याचा सल्ला दिला व आपल्या जवळील ग्रंथ त्यांना देऊ लागले.

वकिलांचा हा विचित्र सल्ला ऐकून सासरेबुवा चक्रावले, परंतु सासूने पोथी घेतली व, ''मी जरूर वाचेन,'' असे सांगितले.

त्यानंतर आठ-दहा दिवसांनी ते दोघे परत श्री. प्रभाकर मुळे वकिलांकडे आले व त्यांनी श्री. प्रभाकर मुळे यांना पुढील प्रमाणे हकिकत सांगितली. सासरेबुवा म्हणाले,''माझी तर मुळीच श्रद्धा नव्हती, परंतु माझ्या बायकोने **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** वाचण्यास सुरुवात केल्यानंतर आमच्या घरातील

वातावरणच पालटून गेले. घरात एक प्रकारची शांतता निर्माण झाली. एक प्रकारचे आनंदाचे वातावरण निर्माण झाले. तिसऱ्या दिवशी सून घरी परत आली. तिच्या स्वभावातही बराच फरक झाला. आता आम्ही सुखी आहोत.'' असे म्हणून त्यांनी श्री. प्रभाकर मुळे यांना शाल व श्रीफळ अर्पण केले. एकदा श्री. प्रभाकर मुळे यांनी निवस्कर नावाच्या एका सद्गृहस्थांना भेटून सांगितले, ''मी तुम्हाला काही सद्ग्रंथ भेट देणार आहे. तुम्ही रविवारी जरूर माझ्याकडे या!'' या गोष्टीचा निवस्कर यांना विसर पडला. शनिवारी रात्री निवस्करांच्या पत्नीच्या स्वप्नामध्ये अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ आले व म्हणाले, ''तुझ्या नवऱ्याला उद्या मुळे यांच्याकडे पुस्तके घेण्यास पाठव!'' असे म्हणून अक्कलकोट स्वामी अदृश्य झाले. हा अनुभव ऐकून निवस्करांना अतिशय धन्य वाटले. त्यांनी श्री. मुळे यांच्याकडे येऊन हा अनुभव सांगितला व श्रद्धेने पुस्तके घेतली.

श्री. प्रभाकर मुळे यांच्या परिचयाचे एक वयस्कर गृहस्थ होते. त्यांच्या मुलाचे व त्यांचे संबंध दुरावले होते. सूनही त्यांच्याशी व्यवस्थित वागत नसे. या गृहस्थांचा मुलगा व सून हे मुंबईच्या बाहेर रहात असत. मुलगा आपल्या वडिलांना भेटायला येत नसे व फोनही करीत नसे. त्यामुळे हे गृहस्थ बेचैन असायचे. श्री. मुळे यांनी त्यांना संक्षिप्त श्रीगुरुचरित्र दिले व ही पोथी रोज पूर्ण वाचायला सांगितली. त्या गृहस्थाने ही पोथी वाचण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांच्या मुलाचा त्यांना फोन आला. हळूहळू त्यांचे संबंध सुधारले. आता मुलगा व सून अधूनमधून त्यांच्याकडे येतात व राहतात. मुलगा नास्तिक होता, तो सुद्धा आता देवपूजा करतो व उपवास करतो. आता ते वयस्कर गृहस्थ आनंदात जीवन जगत आहेत.

ॐ

# दिव्य दर्शन

सौ. निता आंगणे हिने नवरात्रामध्ये ९ दिवसात श्री दुर्गा त्रिशती या पोथीतील श्री दुर्गा कवच व श्री देवीसूक्त या स्तोत्रांचे प्रत्येकी एक हजार पाठ पूर्ण केले. दसऱ्याच्या दिवशी सकाळी सौ. निता ध्यान करत असताना तिला ध्यानामध्ये प्रथम सोनेरी प्रकाश दिसला व विराट रूपामध्ये देवी दिसली. तिच्या अंगावर हिऱ्या-मोत्यांचे दागिने होते व मागे तळपणारा सूर्य दिसला.

## देवत्वप्राप्ती

सौ. गीता श्री दुर्गा त्रिशती पोथीतील श्री देवी कवच, श्री देवी सूक्त, नारायणीस्तुती व श्री दुर्गास्तुती अशा सर्व स्तोत्रांचे सतत पाठ करत असे. या शिवाय श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचत असे.

तिच्या फ्लॅटसमोर सौ. रचना नावाची एक स्त्री रहात असे. तिला अनेक समस्या होत्या.

रचनाला एका ज्योतिष्याने सांगितले की, 'तुझ्या फ्लॅट समोर जे २-३ फ्लॅटस् आहेत. त्यातील एका फ्लॅटमध्ये खूप दैवी शक्ती आहे. तेथील स्त्रिचे मार्गदर्शन जर तू घेतलेस तर तुझे कल्याण होईल.' आपल्या फ्लॅट समोरील तीन फ्लॅटस्पैकी कुठल्या फ्लॅटमध्ये दैवी शक्ती आहे, असे चिंतन रचना करत असताना तिच्या डोळ्यासमोर सौ. गीता स्पष्टपणे दिसली. हा अनुभव आल्यानंतर तिने सौ. गीताला आपल्या घरी बोलविले, तिची ओटी भरली, आपले सर्व अनुभव तिला सांगितले व मार्गदर्शन करण्याची तिला विनंती केली.

सौ. गीताने तिला श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचण्यास सांगितले व श्री दुर्गा त्रिशती या पोथीतील श्री देवी कवच, श्री देवीसूक्त व नारायणीस्तुती या प्रत्येक स्तोत्राचे ११०० पाठ पूर्ण करण्यास सांगितले.

सौ. संगिता नावाची एक स्त्री रोज ५ वेळा श्री देवीसूक्त वाचते. तिने आपले अनुभव पुढीलप्रमाणे कळविले आहेत. श्री देवीसूक्त वाचायला सुरुवात केल्यापासून घरातील भांडणे कमी झाली, वाईट स्वप्ने पडणे बंद झाले, उत्पन्न वाढले. एकदा नवरात्रामध्ये तिने श्री देवीसूक्त व नारायणीस्तुती या स्तोत्रांचे १४००-१४०० पाठ केले. त्यानंतर तिला देवीचे दर्शन झाले व ध्यान लागू लागले. तसेच ध्यानामध्ये देव-देवतांची दर्शने होऊ लागली.

आमच्या घरी ज्योत्स्ना नावाची एक मुलगी घरकाम करण्यासाठी येत असे. तिला मी दररोज ५ वेळा श्री देवीसूक्त व ५ वेळा नारायणीस्तुती वाचण्यास सांगितली होती. ती नित्य नियमाने हे दोन्ही पाठ करत असे. ती घरात काम करत असताना एकदा मी कामानिमित्त बाहेर गेले होते. जेव्हा बाहेरून परत आले तेव्हा पाहिले की, ज्योत्स्नाच्या कपाळावर भले मोठे कुंकू लावलेले होते.

तिची चेष्टा करण्याच्या उद्देशाने मी तिला म्हणाले, ''ज्योत्स्ना, चांगलाच मळवट भरला आहेस !'' यावर ती खूप आनंदाने हसून म्हणाली.

''अहो ताई, काय सांगू तुम्हाला, मला आत्ता एक खूपच दिव्य अनुभव आला. इथे आत्ता देवी प्रगट झाली होती. तिने मला आशीर्वाद दिला व माझ्या कपाळाला कुंकू लावले !''

तिचा हा अनुभव ऐकून मलाही अतिशय आनंद झाला.

## त्रासातून सुटका

सांगलीतील सौ. पटवर्धन या अनेक त्रासाने व्यापलेल्या होत्या. जीवनाला कंटाळलेल्या होत्या. कुठल्यातरी कामाच्या निमित्ताने त्या कोल्हापूरला गेल्या. कोल्हापूरला त्यांनी महालक्ष्मीच्या मंदिरात जाऊन महालक्ष्मीचे दर्शन घेतले. मंदिरातून बाहेर आल्या तेव्हा एक गरीब हडकुळा मुलगा त्यांच्या समोर येऊन म्हणू लागला, 'ताई, मला खूप भूक लागली आहे, ही पोथी घ्या व मला जेवणासाठी १० रुपये द्या!' सौ. पटवर्धन यांनी त्याला दोन रुपये देऊन स्वत:ची सुटका करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने पाठ सोडली नाही. तो सारखा म्हणू लागला, ''ही पोथी घ्या व मला १० रुपये द्या.'' त्याने असा बराच आग्रह केल्यानंतर सौ. पटवर्धन यांनी पोथी घेतली व त्याला त्या पोथीची किंमत ३० रुपये देऊ लागल्या. मुलगा म्हणाला, 'मला दहा रुपये पुरेत!' तरी पण सौ. पटवर्धन यांनी त्या मुलाला आग्रह करून ३० रुपये घ्यायला लावले व ती पोथी घेतली. 'ती पोथी होती, श्री स्वामी दत्तावधूत लिखित **श्री दुर्गा सप्तशती** !'

महालक्ष्मीच्या मंदिरामध्ये श्रीदुर्गा सप्तशती मिळाली म्हणून सौ. पटवर्धन यांना आनंद झाला. घरी गेल्यावर त्यांनी श्रीदुर्गा सप्तशती वाचली. पुढील काही दिवसांत त्यांच्या सर्व समस्यांचे निराकरण झाले. जीवनात आनंद निर्माण झाला. त्या पुन्हा महालक्ष्मीच्या दर्शनाला गेल्या व तेथे त्यांनी त्या मुलाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; परंतु तो मुलगा त्या परिसरात कोठेही सापडला नाही. इतकेच नव्हे तर महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात व त्या गल्लीत कोठेही श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके कोणीही दुकानदार विकत नाहीत, असे त्यांच्या लक्षात आले. यामुळे त्या मुलाच्या रूपाने परमेश्वरानेच आपल्याला मार्ग दाखविला, असे त्यांना वाटू लागले. घरी परत आल्यावर त्यांनी वनिता बुक्सला पत्र पाठवून सविस्तर हकिकत

कळविली व श्री स्वामी दत्तावधूत यांची सर्व पुस्तके मागवून घेतली. त्यांचे जीवन सुखी झाले. सध्या त्या सेवा म्हणून श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके लोकांना भेट देतात. त्यांनी ज्यांना श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके दिली त्यांना खूप चांगले अनुभव आल्याचे सौ. पटवर्धन यांनी कळविले आहे.

## विवाह जुळला

कु. सुनिता हिचा विवाह जमत नव्हता. असे का होत आहे, हे कोणालाही कळत नव्हते. म्हणून त्यांनी एके ठिकाणी चौकशी केली. त्या ज्योतिष्याने त्यांना सांगितले की, मुलीने देवीची उपासना करायला हवी, म्हणजे तिच्या लग्नात येणारी विघ्ने दूर होतील. देवीची उपासना करायची म्हणजे काय करायचे? असा विचार सुनिता करत असतानाच तिच्या एका मैत्रिणीने '**श्री दुर्गा त्रिशती**' दिली. श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ सुरू केल्यानंतर तिचे लग्न झाले व ती सुखी झाली.

## नोकरी वाचली

न्यू जर्सी (अमेरिका) येथे मनोज शेंडे राहतो. त्याचा एक मित्र त्याला म्हणाला, की कंपनीने मला नोकरीवरून काढून टाकले आहे. पुढील एक तारखेपासून मी बेकार होणार आहे. जगायचे कसे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. शक्य झाले तर एखादी नोकरी माझ्यासाठी बघ. मनोज शेंडे याने श्री स्वामी दत्तावधूत यांची सर्व पुस्तके त्याला भेट म्हणून दिली व सांगितले, ''ही सर्व पुस्तके तू वाच व **श्रीदुर्गा त्रिशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** व **श्री समर्थ सप्तशती** या पोथ्या नित्य वाचनात ठेव. परमेश्वराच्या कृपेने तुला नक्की मार्ग मिळेल !'' मनोजच्या मित्राने श्री स्वामीजींची सर्व पुस्तके वाचली व पोथ्या नित्य नियमाने वाचण्यास सुरुवात केली. चार –

पाच दिवसांनंतर कंपनीने त्याला पत्र पाठविले व आम्ही तुला नोकरीवरून काढून टाकत नाही, असे कळविले.

## पिशाच्च बाधेतून सुटका

पिशाच्च शक्तीच्या त्रासामुळे एक घराणे हैराण झालेले होते. श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचून ते प्रभावित झाले. त्यांनी घरामध्ये श्री दुर्गा सप्तशतीचे पाठ करणे सुरू केले. श्री दुर्गा सप्तशतीचे पाठ सुरू केल्यानंतर काही दिवसांनी त्या घराण्यातील मुख्य स्त्रीला स्वप्न पडले. 'आसुरी शक्तींबरोबरच देवी युद्ध करीत आहे.' असे स्वप्नात दिसले व स्वप्नातच त्यांना असे सांगितले गेले की, देवीचे आसुरी शक्तींबरोबर युद्ध सुरू झाले आहे. आता श्री दुर्गा सप्तशती वाचण्याऐवजी श्री दुर्गा त्रिशती वाचावी.

यावरून असे वाटते की, ज्यांना आसुरी शक्तींचा त्रास आहे फक्त त्यांनीच श्री दुर्गा सप्तशतीचे काही पाठ करावेत व नंतर श्री दुर्गा सप्तशतीचे पाठ बंद करून श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ सुरू करावेत. ज्यांना आसुरी शक्तींचे त्रास मुळीच नाहीत, अशा भक्तांनी श्री दुर्गा सप्तशतीतील फक्त देवी कवच, देवी सूक्त व नारायणी स्तुती वाचावी किंवा श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ करावेत. स्वप्नातील आदेशाप्रमाणे त्या घराण्यातील सर्वांनी श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ सुरू केले. दोन-तीन महिने श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ केल्यानंतर त्यांचे सर्व त्रास दूर झाले. श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके व ग्रंथ अशा प्रकारे समाजातील दु:ख निवृत्तीचे व ज्ञान प्रदानाचे कार्य करीत आहेत.

## सद्‌गती

शैला मसुरकर गेली अनेक वर्षे श्री स्वामीजींची पुस्तके सेवा म्हणून लोकांना देण्याचे कार्य करीत आहे. एक दिवस तिच्या स्वप्नामध्ये तिचे वडील आले व म्हणाले, ‘गेल्या १६ वर्षांत मी तुझ्या स्वप्नात आलो नाही. कारण माझ्यावर करणी केलेल्या तांत्रिकाच्या कैदेत मी होतो. तू जी पुस्तकांची सेवा केलीस त्या सेवेच्या पुण्याईमुळे माझी सुटका झाली. आमच्या काळामध्ये जर अशी पुस्तके निर्माण झाली असती तर माझ्यासारख्या असंख्य आत्म्यांचा उद्धार झाला असता !’ शैलाच्या या दृष्टांतावरून श्री स्वामीजींच्या पुस्तकांची सेवा केल्याने अदृश्य सृष्टीतील पूर्वजांच्या आत्म्याचाही उद्धार होतो हे सिद्ध होते. अशा अनेक घटना, असंख्य अनुभव आम्हाला कळत असतात, परंतु विस्तार भयास्तव ते देता येत नाहीत.

ॐ

## मंत्र पुष्पांजली

**असितगिरीसमंस्यात्, कज्जलम् सिंधु पात्रे।**

**सुरतरूवर शाखां, लेखनी पत्र मुर्वी।।**

**लिखित यदि गृहित्वा, शारदा सर्व कालम् ।**

**तदपि तव गुणांनाम् ईश पारम् न याति।।**

पृथ्वी वरील समस्त वृक्षांची लेखणी केली, सप्त सागरांची शाई केली, व स्वतः सरस्वती सतत लिहीत बसली तरीही, हे ईश्वरा, तुझे गुणानुवादन लिहून पूर्ण होणार नाहीत !

**समाप्त**